म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ग्रु-प्रवास
सं. क्र. ७२८



उषा गडकरी

# ...ा वृक्षाला ... ओढ

REFBK-0026371

संदर्भ भू.प्रवास
७२८
२६३५७
३२।६।९१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

7 JUL 1991
4 AUG 1991
4 DEC 1991
15 FEB 1992
13 MAY 1992
23 ... 1992
13 JUN 1992
17 JUL 1993
7 AUG 1993
17 DEC 1994
14 OCT 1995
28 OCT 1995

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

# पश्चिमेच्या वृक्षाला पूर्वेची ओढ

लेखिका

उषा गडकरी

REFBK-0026371

प्रस्तावना

माधव गडकरी

श्रीविद्या प्रकाशन

२५०, शनिवार, पुणे ३०.

PASHCHIMECHYA VRIKSHALA
PURVECHI ODH

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन,
२५०, शनिवार पेठ, पुणे – ३०

© उषा गडकरी
4, BYRNE DRIVE
MAHWAH N. J U S. A. 07430

मुखपृष्ठ कमल शेडगे
प्रकाशनकाल प्रथमावृत्ती
२६ एप्रिल १९९१

मूल्य ४० रुपये

मुद्रक .
महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय
९१५/१, शिवाजीनगर,
पुणे - ४

टाईप सेटर .
हेमत हरीष भोळे
'क्षितिज'
२०३, ब्ल्यू बर्ड सोसायटी,
शिवाजीनगर, पुणे – १६

ह्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ
२६ एप्रिल १९९१ रोजी
हिंदी महासागरातील मॉरिशस
ह्या देशात दुसऱ्या जागतिक
मराठी परिषदेत सपन्न झाला

माझ्या मुलाचे वडील,
कै मधुकर गडकरी
याना प्रेमपूर्वक अर्पण —

८२९
२३६१
२२५४१

# अमेरिकन जीवनाचे निकोप चित्रण

श्रीमती उषाताई गडकरी याचे हे पहिलेच पुस्तक 'किर्लोस्कर' मासिकात त्या एकेकाळी लेखन करीत होत्या राहणाऱ्या दादरच्या, शिवाजीपार्कच्या एक दिवस त्याचे चिरजीव आणि आता माझे झालेले मित्र श्री राजन् गडकरी हे अमेरिकेला गेले प्रत्येक भारतीय तरुण सुरुवातीस संघर्षमय टप्पा ओलाडून विकसित आयुष्याचा मार्ग शोधतो तसेच त्यानी केले आणि आज न्यू जर्सी परिसरातील एका छोट्या गावात बोटीसारख्या दिसणाऱ्या एका लाबलचक सुदर घरात ते स्थायिक झाले आहेत श्रीमती उषाताई याची कन्या शोभा आणि जावई श्री दीनानाथ आबेगावकर हे लॉस एजिलिस् येथे राहतात या दोघाच्या घरी अमेरिकेतील दौऱ्यात मी राहून आलो उषाताई तेव्हा लॉस एजिलिस्ला होत्या त्या अधीपासूनच लोकसत्तेच्या रविवार अकात लिहीत होत्या एल् ए च्या या भेटीत ही लेखमाला पूर्ण करायचे ठरले प्रकाशक श्री मधुकाका कुलकर्णी बरोबर होते पुस्तक छपाईचेही निश्चित झाले आणि मॉरिशस येथे भरत असलेल्या दुसऱ्या जागतिक मराठी परिषदेत अमेरिकेतील मराठी माणसाच्या जीवनावर लिहिलेले हे पुस्तक आता प्रकाशित होणार आहे

श्रीमती उषाताई गडकरी यांनी हे सर्व लेख काही स्वत च्या तर काही इतराच्या अनुभवावर लिहिलेले आहेत 'उत्तर नसलेले प्रश्न' या प्रकरणानेच हे पुस्तक सुरू होते भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या प्रत्येक तरुणापुढे हा प्रश्न असतो जाताना आपण शिक्षण पूर्ण केल्यावर निश्चित परत येणार आहोत असे तो खबीरपणे सांगतो परतु अमेरिकेचे ते झगमगते जग, ते मिळणारे पैसे, त्या तुलनेत असलेल्या भारताची स्थिती, सुखसोयी, भारतात उपलब्ध नसलेल्या मोठ्या पसाराच्या नोकऱ्या या सर्वांचा विचार त्याच्यापुढे उभा राहतो आणि मग तो तेथेच राहण्याचा निर्णय घेतो श्रीमती शोभा चित्रे यानी लिहिलेल्या 'गोठलेल्या वाटा' या पुस्तकाच्या नावाप्रमाणेच वाटा गोठून गेलेल्या असतात पण त्या

वाटेवरच्या एका टोकाचे आपले घर, आपले गाव आणि आपला देश त्याला दिसत असतो त्यामुळे तो जेथे राहात असतो तेथे समाधानी नसतो आनंद मिळविण्याचे अनेक मार्ग तो चोखाळतो भारतीय संगीत, नाटके यांच्या कॅसेट जमा करून ते ऐकत बसतो एकत्र येऊन तो सण साजरे करतो मराठी मंडळींना घेऊन तो पिकनिकला जातो आणि हे सर्व कमी पडले तर भारतातील येणारे गायक, वादक नाटके करणारे पाहुणे याची इतकी उठाठेव करतो की त्याचाही शेवटी त्याला थोडा त्रासच होतो मराठी माणसाच्या या सर्व मानसिक अवस्थाचे वर्णन श्रीमती उषाताई गडकरी यांनी आपल्या विविध लेखात करून दिले आहे

श्रीमती उषाताई गडकरी या वयोमानामुळे असाव्यात या पुस्तकातील बहुतेक प्रकरणात आईच्या भूमिकेत आहेत अमेरिकेस गेलेल्या आपल्या मुलापासून इतराच्या मुलाकडेही त्यानी आईच्या भूमिकेने पाहिले आहे, पुन्हा त्यांचा दृष्टिकोण अगदी निकोप आहे दूषणे देण्याचा प्रयत्न त्यानी कुठेही केलेला नाही अमेरिकेत गेलेल्या मुलांनी भारतीय पद्धतीने जगावे असा भोळसट विचारही त्यानी कुठे मांडलेला नाही भारतीय विशेषत मराठी आईबापाच्या भावनांचा फार सुरेख मागोवा त्यांनी या पुस्तकात घेतला आहे प्रत्येक आई-बापाला 'अमेरिकन शिकलेला नवरा सुंदरसा मुलीसाठी' हवा असतो आणि मग त्याचा शोध सुरू झाला की निर्माण होणाऱ्या सर्व प्रश्नानी ते कसे भाबावून जातात याचे सुरेख चित्रण 'लग्न पाहावे करून' या दुसऱ्या प्रकरणात आहे अमेरिकेहून येणारी आणि महिन्याभरातच मुलगी निवडून विवाह करून जाणारी मुले, न पाहिलेल्या मुलाबरोबर मुलीचा विवाह जमविणारे मातापिता, त्याना लागलेली चिंता, काही झालेले फसगतीचे प्रकार या सर्वांची चर्चा उषाताई फार हळुवारपणे करतात प्रश्न समजून घेतले पाहिजेत आणि घेतलेल्या निर्णयाना सामोरे जाण्याची तयारी हवी हा दुष्ट विचार त्यांच्या मनात सतत डोकावताना दिसतो

भारतीय माणूस अमेरिकेस प्रथम गेला ही कथा डॉ श्रीपती चंद्रशेखर याच्या नावाने सुरू झाली 'मागे वळून पाहताना' या प्रकरणात ही सर्व हकीकत आली आहे, ती सर्व मनोरंजक आहे १८५१ मध्ये ४ जुलै रोजी होणाऱ्या अमेरिकन स्वातंत्र्य दिनाच्या परेडमध्ये सहा भारतीय चालले अशी नोंद त्यानी केली आहे भारतामधील दहा लाख पारशी लोकाना एके काळी अमेरिकेत स्थलांतर करण्याची इच्छा झाली होती हे वाचून तर मला आश्चर्य वाटले ट्रुमन यांच्या कारकीर्दीत अमेरिकेची दारे खऱ्या अर्थाने भारतीयाना उघडी झाली विल्यम फुलब्राइट यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी एक समिती नेमली आणि त्या समितीने 'To whom shall we welcome' या मथळ्याचा एक अहवालच दिला अनेक देशाचे, अनेक जाति-धर्मांचे आज अमेरिका हे जे वेगळे राष्ट्र निर्माण झाले, ते सर्व या अहवालातून निर्माण झाले आज अमेरिकेचे वर्णन 'मेल्टिंग पॉट' असे केले जाते त्याचे सुंदर विवेचन उषाताईनी हा प्रकरणात केले आहे श्रीमती उषाताईकडे सुरेख मराठी भाषा आहे, मराठी

कविता सतसाहित्य या सर्वांनी घडविलेली शैली आहे त्यामुळे अमेरिकेस त्या प्रथम गेल्या तेव्हा 'हारीन सोंगट्या मांडाव्यात तशी घरे' असे सहज वर्णन करून त्या जातात 'अमेरिकेस सोन्याची धूळ होती काय, की जिच्या आयत्या पिठावर अमेरिकन लोकांनी रेघोट्या मारल्या ' असा प्रतिप्रश्न करून तिथे गेलेल्या तरुणानी अपार कष्टाने आजची अमेरिका कशी घडविली याच त्या वर्णन करतात 'भारताबाहेर पडले खरी' या प्रकरणात त्यांनी अनेक सदर्भ दिले आहेत वॉल्ट डिस्नेचा बाप त्याला पहाटे तीन वाजता वृत्तपत्र टाकण्यासाठी उठवत असे आणि ती गोष्ट त्या मुलाने त्या काळात केली एडिसन रेल्वे गाडीत गोळ्या-चॉकलेट्स विकत असे त्याला हेन्री फोर्ड असा एकदा गाडीतच भेटला, पुढे एडिसनने शोध लावला, तो मोठा झाला, तेव्हा फोर्डने सत्कारासाठी त्याच रेल्वेगाडीतून एक ट्रीप केली आणि एडिसनने पुन्हा गोळ्या आणि चॉकलेट्स विकली जगातील ८० टक्के शोध अमेरिकेने लावलेले आहेत याचा उल्लेख करून उषाताई अमेरिकेच्या कर्तृत्वाचे फार सुरेख चित्र भारतीय मनापुढे उभे करतात दीर्घोद्योग आणि कर्तृत्व याला पर्याय नसतो, इतका ठसा या पुस्तकाने वाचकाच्या मनावर उमटला तरी भारताचे भले होईल

इडियातले वेडे आईवडील असा उल्लेख तिथे केला जातो, त्या आईवडिलाना लागलेली आपल्या मुलाच्या भवितव्याची ओढ आणि त्या मुलांना लागलेली आपल्या देशाची ओढ याचा कुठेतरी समतोल साधावा याचा त्या प्रयत्न करातात उषाताईंना एक दाक्षिणात्य मुलगा भेटतो तो खाली वाकून उषाताईंना नमस्कार करतो आणि म्हणतो, 'माझ्या आईला मी बरेच दिवसात पाहिलेले नाही ती दिसायला तुमच्यासारखीच आहे ' फार सुरेख प्रसग उषाताईंनी आपल्या या लेखात आणले आहेत मानवी मनाचे धागेदोरे हे किती तरल असतात, देश, प्रात, भाषा, यांच्या सीमारेषा कशा तुटून पडतात हे सर्व वाचताना जाणवते

'इडियन मणी अमेरिकन दोरा' हे प्रकरणाचे नावच इतके सुदर आहे की त्यामधील उषाताईंच्या प्रतिभेचे दर्शन घडते आपली मुले तर तेथे स्थायिक झाली, ती मोठी झाली, त्यानी चागली घरे घेतली आणि आता ती सुखात आहेत या विश्वासाने आईबाप भारतात परत येतात आणि मग पत्राची वाट पाहात कशी बसतात याचे वर्णन या प्रकरणात वाचायला मिळते मुलाच्या भारतात राहणाऱ्या आईबापाचे त्या एक मंडळ काढतात आणि त्याचे थट्टेनेच असावे 'अमुआबा' मडळ असे नाव देतात आणि मग एकमेकाना आलेल्या पत्राची व छायाचित्राची देवघेव यामध्ये ते रमून जातात 'नागरिकत्व' या प्रकरणात त्याच्या मुलाने अमेरिकन नागरिकत्व स्वीकारले त्या वेळी त्यांच्या झालेल्या सर्व प्रतिक्रिया फार हृदयस्पर्शी शब्दात आल्या आहेत आपल्या मुलाने भारतीय नागरिकत्व सोडले याचे आईला झालेले दुःख 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' याची त्याना आठवण येते मुलांनासुद्धा त्याबद्दल वाईट वाटलेले आहे अमेरिकन नागरी कायद्यामध्ये

होणारे बदल, त्यामध्ये असलेल्या तरतुदी याचा विचार करून व्यवहार्य निर्णय घेणे शेवटी अपरिहार्य होते याची जाण त्याना आहे अमेरिकन जीवनामध्ये स्त्रीला पुरुषाने सर्व कामात मदत करणे ही अगदी साहजिक अशी गोष्ट आहे स्त्रीला पुरुषाच्या आधी सकाळी लौकर कामावर जावे लागत असल्यामुळे अनेक ठिकाणी पुरुष स्वयपाक करतात आपल्या येथील सवयी त्याला टाकाव्या लागतात त्यामुळे सघर्ष निर्माण होत नाहीत असे नाही येथून गेलेल्या आईबापाना आपली सून मुलाचा काहीच मान ठेवत नाही असेही काही वेळेस वाटू लागते आजी-आजोबा तेथे गेले तर त्याना नातवडाना साभाळावे लागते काही वेळेस त्याच्याकडे दुर्लक्षही होते अमेरिकेची जीवनपद्धती आपल्यापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे १८ वर्षाचा मुलगा होताच तो घरातून निघून जातो आणि आपले स्वतत्र जीवन जगू लागतो आपल्या मुलाना आईबाप सोडावयास तयार नसतात कोणत्याही भारतीय मातापित्याना आपल्या मुली बाहेर जाव्या असे वाटत नाही तेथील लैंगिक स्वातत्र्य, त्यासंबंधीची त्याची कल्पना या सर्व इतक्या वेगळ्या आहेत की अमेरिकन जीवन आपल्या मुलांना द्यायचे आणि त्याना भारताचे नियम लावायचे हे कसे शक्य होत नाही याचीही सुरेख चर्चा या पुस्तकात आहे काळा मुलगा गोऱ्या मुलीबरोबर डेटिंगला गेला म्हणून त्याचा खून झाला असेही आज तेथे घडते आहे अमेरिकन जीवनातील हिंसा, दाडगाई आणि भारतीय मुलावरचे वेगळे ससार याची सुरेख चर्चा 'मुल-मुल-मुलं' या प्रकरणात आली आहे 'स्वातत्र्य हा घटक अमेरिकन जीवनात ओतप्रोत भरलेला आहे' असे शून्य पिढी या प्रकरणात त्या म्हणतात लोकसभेत जसा 'शून्य तास' असतो तसे भारतातून अमेरिकेत गेलेल्या लोकाना तेथे झालेली मुले म्हणजे 'शून्य पिढी' असे वर्णन त्यानी केले असावे दोन भिन्न सस्कृतीमधील हा प्रयोग यशस्वी होईल अशी आशा 'अनोखी वाट' या प्रकरणात त्या प्रगट करतात भारताच्या इतर प्रांतांतून येणाऱ्या लोकाबद्दलही चांगले विवेचन त्यानी एका प्रकरणात केले आहे गुजराथी लोकाची वागण्याची पद्धती, कुठेही जाण्यास त्याची असलेली तयारी अमेरिकेत असलेले पन्नास हजार तेलगू भाषिक व्हिस्कॉन्सीन विद्यापीठात तेलगूसाठी चेअर ठेवतात आणि त्याना तिरुपतीचे मदिर मदत करते यावरून आपणही बराच बोध घेण्यासारखा आहे बारा हजार परिचारिका आज अमेरिकेत आहेत फ्लॉरिडामध्ये केरळीय लोकांचे अधिवेशन भरले आणि त्यास अमेरिकेतील वृत्तपत्रानी प्रसिद्धीही दिली याउलट, १९२० साली भाटवडेकर नावाचा एक गृहस्थ अमेरिकेत आला, विवेकानद केंद्रात राहिला आणि १९६५ नंतर भारतीयाचे प्रयाण मोठ्या प्रमाणावर सुरू झाले ते मात्र आता जवळजवळ थाबलेले आहे फारच थोड्या जणाना आता अमेरिकेत प्रवेश मिळतो

'अमेरिकेची पवित्र गाय' हे प्रकरण तर सर्वांनीच वाचावयास हवे अमेरिकेतील वृद्ध वार्धक्याला 'सोनेरी दिवस' मानतात आणि आनदात जगतात तेथे कुणाला 'वृद्ध'

म्हणत नाहीत त्याला 'सीनियर सिटिझन' म्हणतात त्यांना आदराने आणि प्रेमाने समाज वागवतो प्रश्न फक्त मुलांचा असतो वृद्धांना आपल्या दफनाचीही व्यवस्था करून ठेवावी लागते मृत्यू झाल्यास तो माणूस आधी येतो मग मुलगा येतो अमेरिकेत नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर एजिंग अशी संस्था संशोधनाचे काम करते Life to years not years for life हा तेथे दृष्टिकोण आहे आणि अगतिक अवस्थेत इच्छामरण ते मागतात

अमेरिकन जीवनाचे अनेक पैलू 'पश्चिमेच्या वृक्षाला पूर्वेची ओढ' या पुस्तकामुळे वाचकांपुढे येतील उषाताईंचे अक्षरही सुरेख आहे अगदी एका ओळीत त्या लिहितात विचारही कसे आशावादी आणि निर्भेळ श्री राजन गडकरी यानी प्रकाशक मधुकाका कुलकर्णी याना जे पत्र लिहिले आहे त्यात त्यांनी आपल्या आईच्या लेखनाचे फार सुरेख मूल्यमापन केले आहे -

'She has approached the Indian American scene in a very matter of factly manner Instead of criticizing any one sector of the society, she has chosen to understand all nations, people and generations '

एकमेकाना इतके चांगले जाणणारे माता-पुत्र भाग्याचेच म्हणावयास हवेत श्री राजन यांचे वडील आज हयात नाहीत त्याना हे पुस्तक पाहून खूप आनंद झाला असता परंतु थोडा उणेपणा असणे म्हणजेच जीवन आहे ते स्वीकारावयास हवे

श्रीमती उषाताईंना दीर्घायुष्य लाभो आणि हे पुस्तक घरोघर जावो, हीच प्रार्थना

मुंबई
२१ फेब्रुवारी

— माधव गडकरी

# मनोगत

'उषाताई, तुम्ही इतकी वर्षे अमेरिकेत आहात, मग तुमचे अनुभव तुम्ही लिहा न तुमच्यासारख्या वयोवृद्ध माणसाच्या दृष्टिकोणातून अमेरिका, तिथ आलेली आपली भारतीय माणसं यांच्याबद्दल तुम्ही लिहा' मधुकाका म्हणाले अमेरिकेत, माझ्यासारखीचं जीवन एकाकीच असत त्यावर लेखन हे रामबाण औषध तेव्हा मी पट्दिशी 'हो' म्हटल पण प्रत्यक्ष पेन्सिलीने ते कागदावर उतरवणं फार कठीण वाटायला लागलं

मुंबईमध्ये महिला मडळ पुष्कळ त्याच्या वक्तृत्व स्पर्धा अनेक त्यात भाग घ्यायची भारी हौस म्हणून त्यासाठी भाषण तयार करायचं दादरच्या वक्तृत्वोत्तेज सभेतर्फे, गणपती-नवरात्र उत्सवात आम्ही कार्यक्रम करायचो त्यातल्या आपल्या भूमिकेसाठी काही लिहायच एवढीच—कुपणाच्या अलीकडेच माझी धाव मुलगा अमेरिकेत गेला आम्ही तिथं यावं असा त्याचा आग्रह काही वर्षांनी गेलो तिथ, कायम राहायला मग ती मंडळं, ती सभा, त्या स्पर्धा, त्या मैत्रिणी सर्वांशी फारकत झाली फार उदास वाटायच रिकामटेकडेपण खुपायचं तेव्हा मुलाचे वडील म्हणाले, 'तू आता काहीतरी लिहायला सुरुवात कर ' त्या वेळी अमेरिकेच अतराळयान कोलंबिया प्रथमच अतराळात जाणार होत त्याबद्दलची माहिती, रोजच्या वर्तमानपत्रांत रकानेच्या रकाने भरून यायची मग स्पेस सेन्टर्सना पत्रं लिहिली त्यानी माझ नाव त्याच्या मेलिग लिस्टात घातलं आणखी खूप माहिती पाठवली फोटो पाठवले ते सगळ वाचून, त्याचा अभ्यास करून लेख तयार केला नि किर्लोस्करकडे पाठवला तो वाचकाना खूपच आवडला सपादकांनी तर पत्रावर पत्र पाठवून आणखी लिहायला सागितलं असा एखादा नवा विषय आढळला की, मी लायब्ररीत जायची त्या लायब्रेरियनला माझा विषय सागायची अमेरिकन माणसांना दुसऱ्यांना मदत करायला आवडतं ती बाई कम्प्युटरसमोर बसून, त्याची बटण दाबायची कंप्युटरच्या पडद्यावर, त्या विषयावरच्या पुस्तकांची यादी यायची कुठल्या मासिकात त्या विषयावर

लेख आलेत ते पण मग ती बाई सगळी पुस्तक, मासिक शोधून मला द्यायची त्या सगळ्याचा अभ्यास करायचा नी लेख लिहायचे असे काही लेख किर्लोस्करला पाठवले त्यातूनच अमृतमधल 'नवे शोध' हे सदर तयार झाल पण असे लेख लिहिणं सोप होतं त्या विषयावर पुष्कळानी खूपखूप लिहिलेल असायच ते सगळ वाचायचं नी लेख तयार करायचा पण हे अनुभव? त्यावर कुणी कधी लिहिलेल नव्हत म्हणजे माझ मीच लिहायच पण ते कस? काही समजेना

तस म्हटलं तर गेली १०-१२ वर्षे अमेरिकेत राहात होते रोजच्या रोज वेगवेगळे अनुभव येतच होते मनाच्या कपाटाचे कप्पे, त्या अनुभवानी टिच्च भरलेले होते घरातल्या कपाटाच्या खणांत कपड्याचे बोळे चोळामोळा करून कोंबून भरावे तसे ते कपडे इस्त्री करून, त्याची वर्गवारी करून कपाट लावण कष्टाच असल तरी अशक्य नसत पण या अनुभवाना शब्दरूप द्यायचं कस? ते सगतवार मांडायचे कसे? आपल्याला हे काही जमणार नाही, असंच वाटायला लागल पण लिहायचं नाही म्हणजे मधुकाकानी ज्या प्रियसखीशी गाठ घालून दिली होती, तिच्याशी कट्टी करायची सकाळी मी एकटी चालायला जायची तेव्हा ती माझ्याबरोबर सतत असायची घरातली सगळी आपआपल्या उद्योगाला घराबाहेर पडायची मी एकटी घरात मी म्हणेन तेव्हा ती माझ्याशी गुजगोष्टी करायला हजर व्हायची रात्री तर तिच्याशी बोलता बोलता माझा केव्हा डोळा लागायचा ते समजायचंच नाही तेव्हा ती संगत मुळीच सोडायची नाही अस ठरवून लिहायला सुरुवात केली विचार करताना काय लिहायचं हे मनाशी ठरवताना, प्रत्यक्ष लिहिताना खूप खूप आनंद वाटायचा दुसरा काही उद्योग नसल्याने, सतत काहीतरी कसलीतरी काळजी करत बसायचा हा आम्हा म्हाताऱ्यांचा उद्योग पण लिहिण्याच्या आनंदाने काळजीला छेद दिला तेच तेच बोलून, मुलाच्या मागे भुणभुण लावण नाहीस झाल, मुलाच्या प्रत्येक गोष्टीत नाक खुपसायला वेळच उरला नाही माझ्याच लिखाणाबद्दल मी बोलायची त्यावर मुलगा-सून याची टीकाटिप्पणी त्यातून मला काहीतरी मिळायच मुलांनाही छान वाटायच मला उत्तेजन द्यायची लेख लिहून पाठवायला सुरुवात केली तरी कधी कधी मनात यायचं, 'मी लिहितेय् खरी, पण कोणी ते वाचेल का? कुणाला ते आवडेल का?' पण लिहिण्याचा हुरूप असल्या विचाराना मनातून हद्दपार करायचा पद्मश्री माधव गडकरी लोकसत्तेत लेख छापत होते नातलग, मैत्रिणी, कुणाकुणाची पत्रं आली कुणी लेखाची कात्रण पाठवली लेख आवडले अस लिहिलं कुणी लिहिलं, 'तुम्ही आमचीच मन:स्थिती चितारलीत्' माझ्या धाकट्या जावेनं लिहिल, 'छान लिहिलयत् वाचताना तुम्ही भेटल्यासारख वाटत' हे सगळ माझ्या प्रेमापोटी होत हे मला समजत होत, तरीपण मला लिहायला उत्तेजन मिळत होतच आता मधुकाका पुस्तक छापताहेत ते वाचकाना आवडाव अस, सर्व लेखकाप्रमाणे मलाही वाटतच पण मला यापेक्षा काहीतरी हवय्

आमची मुल अमेरिकेत आली शिकली सवरली पैसाअडका मिळवला संसार थाटले गाड्या, घरदार, त्यांना जे जे काही हव होतं ते सर्व त्यांनी मिळवलं हो ना करता करता तिथच स्थायिक झाली झाड अमेरिकेत उगवल-रुजल खर, पण मूळ इंडियात होतं आणि त्याची झाडाला जबरदस्त ओढ होती इंडियात जाण्याची, तिथल्या माणसाना भेटण्याची, म्हणून एअर इडियाची विमानं, अमेरिकेतून इडियात आणि परत अशा रोजच्या रोज फेऱ्या करायला लागली मुलाना इडियन पदार्थ हवेसे वाटायचे म्हणून अमेरिकेत ठिकठिकाणी इंडियन ग्रोसरी स्टोअर्स निघाली कुणी देवळ बांधली दिवाळी-गणपती धुमधडाक्याने साजरे व्हायला लागले इडियाच्या बातम्या देणारी साप्ताहिकं, पाक्षिक निघाली इडियातल्या कलावताना, लेखकांना आगत्याने आदरातिथ्य करणारी घर अमेरिकेत मिळाली आणि त्या लोकांनाही आमच्या मुलांचं कौतुक इंडियात परतल्यावर त्याच्याबद्दल सांगायच, लिहायचं जणू दोन्हीकडल्या भारतीयाच्या मधला दुवाच बनले ते आमच्या मुलाबद्दल विकृत लिहिणारेही काही महाभाग आहेत पण ते नगण्य शिवाय त्यामुळे ते सर्वांच्या रोषालाच पात्र झालेत आपण मिळवलेल्या ज्ञानाचा आपल्या देशाला उपयोग व्हावा ही मुलाची भारी इच्छा निदान आपण मिळवलेल्या पैशांचा थोडाफार आपल्या देशातल्या गरजू सस्थांना उपयोग व्हावा, अस तर प्रत्येकालाच वाटत त्यासाठी ती पोर खूप धडपडतात

ह्या मुलाची पहिली २० - २५ वर्षे भारतात गेली म्हणून त्याना अशी ओढ, असं प्रेम पण पुढे काय? दुसऱ्या पिढीत हे सर्व संपले. भारत त्यांना परकाच वाटेल इडियाशी त्याचा सर्व संबंध तुटेल अस पुष्कळाना वाटत असं होऊ नये नि होणारही नाही त्यासाठी दोन्हीकडून प्रयत्न झाले पाहिजेत

भारतातल्या खेड्यात छोट्या छोट्या खेड्यातले लोक येतात पिढ्यान् पिढ्या शहरातच राहतात पण त्यांच्या मनात, कधी न पाहिलेल्या त्या खेड्याविषयी ओलावा असतोच अमेरिकेत जगातल्या सगळ्या देशांतले लोक आहेत पिढ्यान् पिढ्या तिथच राहतात तरी आपल्या देशावर आपत्ती कोसळली की, ते हेलावतात भराभरा पैसे जमवून मदत पाठवतात चीनमध्ये टिनॅनियन स्केअर प्रकरण झालं तेव्हा अमेरिकेतला प्रत्येक चिनी हवालदिल झाला होता पोलडमध्ये राजवट बदलली तेव्हा क्लारा, माझी पोलीश मैत्रीण म्हणाली, 'I am proud of my nation' तिचा चेहरा अभिमानाने फुलला होता नुसता वास्तवात ती पोलंडला कधी गेलीच नव्हती इंडियन्स तर भावनाप्रधान जास्त ते कसे आपल्या मूळ देशाला विसरतील?

अमेरिकेत काळे लोक गोऱ्याच्या बरोबरच आले त्यांची नाव, गाव, धर्म सगळ ह्या गोऱ्यांनी नामशेष केलं तरी सुद्धा, सात पिढ्यांनतर, त्या हेलीला आपलं मूळ शोधून काढायची ओढ वाटलीच त्याने त्रिखड पालथे घातले तिथल्या मोठमोठ्या

वाचनालयातल्या जुन्यापुराण्या पुस्तकाचा कीस काढला नी आपल्या पूर्वजाच नावगाव, ते अमेरिकेत कसे आले, कसे राहिले हा सात पिढ्याचा इतिहास त्याने आपल्या 'Roots' ह्या कादबरीत साग्रसगीत लिहिला झाडाला मुळाची ओढ नैसर्गिक असते हे सिद्ध केल

आपल्या बाबतीत तर जमेच्या बाजू पुष्कळच आहेत दुसरी पिढी म्हणजे आमची नातवंडं ती जोवर शाळकरी असतात, तोवर त्याचे सगळे मित्र अमेरिकन त्याना त्यांच्यासारख वागावंस वाटतं पण कॉलेजात गेली की, आपोआप इडियन ग्रुपमध्ये मिसळतात त्यांना इडियन अमेरिकन म्हणवून घतलेल आवडतं इंडियन सस्कृती, इडियन कौटुंबिक मूल्यं चांगली वाटायला लागतात कुणाला इडियन कलाचा आविष्कार करावासा वाटतो कुणाला इंडियन विषयांचा, तत्त्वज्ञानाचा अभ्यास करावासा वाटतो आजच हा प्रकार आढळतोय् अमेरिकन लोकाच्या ते जास्त जवळ जातीलही त्यामुळे एकमेकाच्या सस्कृतीची अधिक ओळख होईल चागल्या गोष्टीची देवघेव होईल त्यामुळे इडियाबद्दल आपलेपणा वाढेलच

अमेरिकेचं आकर्षण कायम राहणारच मग आमच्या मुलासारखी मुलं सतत इथ येत राहणार आमची मुल जे आज करताहेत तेच ती मुल उद्या करणार इडियाशी आपली जवळीक राहावी अस त्याना सतत वाटणारच आजच्यासारखे नामवत पाहुणेरावळे येतच राहणार अमेरिकेत बहरलेल्या झाडाच्या मुळाना इडियातल्या लोकांनी प्रेमाचं, नी आपुलकीचं खतपाणी घालावं असा प्रयत्न करतच राहणार पूर्वीच्या दुव्यांचं भरभक्कम पुलांत ते रूपातर करतील त्या पुलाच्या उभारणीत माझ्या पुस्तकाने, खारीच्या शेपटीच्या झुपक्याला चिकटलेल्या चिमूटभर वाळूच काम कराव, ही माझी मनोमय इच्छा

माझी मुलं इथ आली म्हणून मी पण अमेरिकेत आले बोटीवरचे उंदीर जसं परदेशगमन करतात त्यातलीच गत माझी मी विमानाने आले एवढाच फरक मुलाबरोबर इथच राहिले कैक माणस भेटली त्याचे अनुभव गाठीला बांधले त्या सर्वांचेच आभार मानायला पाहिजेत मधुकाकानी पुस्तक छापलय् केवढे नामवंत प्रकाशक ते मोठमोठ्या साहित्यिकाची पुस्तकं छापणारे माझ्यासारख्या नवशिक्या लेखिकेच पुस्तक छापायच त्यानी मनावर घ्यावं हेच नवल माधवरावाचा तर पायच ठिकाणावर नसतो तोंडाला उसत नसते एवढ लिखाण ते केव्हा करतात राम जाणे तशात माझ्या पुस्तकाला त्यानी प्रस्तावना लिहिली पण ते दोघे म्हणजे सगळ्या जगातल्या मराठी लोकांना जवळ आणण्याचा प्रयत्न करणाऱ्याचे अध्वर्यू पूर्वपश्चिम पुलाचे ते काँक्रिटचे भक्कम खांबच म्हणायचे त्या दोघाचे केवढे उपकार माझ्यावर? नुसत 'आभार मानते' म्हणून का ते फिटणार? त्यापेक्षा मी आपली त्यांच्या ऋणातच राहीन म्हणते

न्यूजर्सी (अमेरिका)
२६ जानेवारी १९९१

उषा गडकरी

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | अनोखी वाट | १ |
| २ | उत्तर नसलेला प्रश्न | १३ |
| ३ | लग्न पहावं करून ! | २० |
| ४ | मागे वळून पाहता | २८ |
| ५ | भारताबाहेर पडले खरे | ३८ |
| ६ | इंडियन मणी अमेरिकन दोरा | ४७ |
| ७ | नागरिकत्व | ५७ |
| ८ | चित्रं संसाराची | ७२ |
| ९ | मुल, मुल, मुल | ८७ |
| १० | शून्य पिढी | १०० |
| ११ | अमेरिकेची पवित्र गाय | ११६ |

# १

# अनोखी वाट

'मुलाला अमेरिकेत पाठवतोय खर, पण तो परत येईल नं ? की, अमेरिकन मुलीशी लग्न करून तिथच कायम राहील ? मग म्हातारपणी आम्ही कुणाच्या तोंडाकडे बघायच ?'

'ही मुल डॉक्टर होतात, इंजिनियर होतात, खूप शिकतात आणि सरळ अमेरिकेचा रस्ता धरतात अमेरिका तर सुदर चेहऱ्याची चेटकीण सर्व जगातल्या विशेषत विकसनशील देशाच्या बौद्धिक वर्गाचं क्रीम, ती खुणावून नेते ही बौद्धिक आणि परिणामत आर्थिक, सामाजिक गळती थांबवायची कशी ? भारतीय जनतेने, त्याच्या शिक्षणासाठी प्रचड खर्च केलेला त्या लोकाना दोन वेळेला जेवण मिळत नाही तिच्या जीवावर शिकूनही तिला मदत करावी असं त्याना वाटत नाही भारत मदतीसाठी, कर्जासाठी, तत्रज्ञासाठी, झोळी घेऊन जगाच्या दारात आणि ही मडळी, भरपूर विकास झालेल्या अमेरिकेच्या विकासाला हातभार लावताहेत पारिजातक आम्ही लावला, आम्ही जोपासला आणि फुलं पडताहेत अमेरिकेच्या अंगणात आमच्या देशाची ही हानी भरून निघणार कशी ?'

'खावं, प्याव, चैन करावी, मोटारी उडवाव्यात, टी व्ही पाहावा, व्हिडिओवर चित्रपट पाहावेत, या व तत्सम गोष्टी म्हणजे जीवन, अस ज्याला वाटत, त्याच्यासाठी अमेरिकेसारखा दुसरा देश नाही ऐहिक सुखाच्या पलीकडे ज्याना काहीही नको असत, उत्तम अन्न, किंमती वस्त्र, शोभिवंत निवारा यात ज्यांना आयुष्याची इतिकर्तव्यता वाटते, त्यानी अवश्य अमेरिकेत जावं आणि 'ग्रीनकार्ड' नामक गुलबकावलीचं फूल हस्तगत करावं

स्वयकेन्द्री माणसासाठी अमेरिका हा स्वर्गच आपल्या कोषात मश्गुल राहणाऱ्या सुखासीन माणसासाठी अमेरिका हे नदनवनच इण्ट्रोव्हर्ट माणसासाठी अमेरिका आहे एक्स्ट्रोव्हर्ट माणसासाठी नाही '

'तुमच्या आग्रहास्तव अमेरिकेत आलो नी दु:खी होऊन परतलो काय तिथल्या मुलींची वेशभूषा नी केशभूषा ? कुकू व मगळसूत्राचीही त्याना अडचण वाटते तुमची मुल तर पुरती अमेरिकन कधी देवाला नमस्कार केलेला मी पाहिलाच नाही तुम्ही त्याना भारतीय संस्कृती शिकवलीच नाही तुम्हाला तरी ती कुठ हवी आहे म्हणा ? तुम्ही ती रसातळाला नेणारच तुमच्या मुलाना मातृभाषा येत नाही, यापेक्षा आणखी लाजिरवाणी गोष्ट दुसरी कोणती ? तुमची अमेरिका तुम्हालाच लखलाभ होवो' एका मुलाच्या वडिलाच्या पत्रातला मजकूर

मुलं अमेरिकेत आली तेव्हा, त्यांच्या आईवडिलाना स्वत:ची काळजी वाटली, विचारवताना देशाची चिता लागली अमेरिकेला नाव ठेवली म्हणजे आपल, आपल्या देशावरच प्रेम सिद्ध होत अशी कुणाची भाबडी कल्पना तर कुणी अमेरिकेत भारतीय सस्कृतीचा ऱ्हास होतोय, म्हणून डोक्यात राख घालून घेतली खरं म्हणजे आजवर भारतातल्या थोड्या का लोकांनी देशातर केल ? पण ही बुद्धिमान, उच्चशिक्षित मुल, आपल्या देशाच काही भल करतील अशी अपेक्षा आणि तीच देश सोडून निघून गेली, तेव्हा अशा काही प्रतिक्रिया होणारच पण हे सगळं प्रेमापोटी आपल्या मुलावर आपण प्रेम करतो म्हणूनच रागावतो कधीतरी धपाटाही पाठीत घालतो तसच बरं हे आता आमची मुल इथं येऊन २०-२५ वर्षे झालीत कुणाचे केस पिकायला लागलेत, कुणाला टक्कल पडायला लागल, इतक्या वर्षांत त्यानी काय केल? अमेरिकेत ती कायम राहणार, त्याच्या पुढच्या पिढ्याही, तेव्हा अमेरिकेच्या मूळ प्रवाहात त्यांना फिरायलाच हव ते सुद्धा भारतातील ऋणानुबधाचे धागे हातात घट्ट पकडून, अमेरिकेतल्या अल्पसख्याकाची दखल घेत, आपल्या मुलाना काखेत घेऊन, हळूहळू ते धागेदोरे त्याच्या सुपूर्द करायचेत ही वाट अनोखीच नाही का?

आईवडिलाना मुलं मुळीच दुरावली नाहीत, अगदी अमेरिकन मुलीशी लग्न केल तरी त्यानी आपल्या जवळ राहाव हीच त्यांची इच्छा त्यांच्या लहान मुलाना साभाळायला प्रेमाच माणूस मिळत, भारतीय पदार्थ खायला मिळतात, मुलावर आपोआप भारतीय संस्कार होतात, तेव्हा इथल्या सुनानाही सासू हवी मुलाचे घर मुलीचे घर असा भेद इथ नाही पार्ट्यांना, प्रवासाला बरोबर नेतात त्याचा वेळ चांगला जावा म्हणून प्रयत्न करतात पण त्यांनी साखरेत घोळल नी तुपात तळलं, तरी आमचा जीव सगळा भारतात सर्वच मुल इथं आली की नाइलाजाने राहाव लागत म्हणा आपआपले काही उद्योग करीत, आनंदात राहतो इंडियात राहणारे पुन्हा पुन्हा येतच असतात तेव्हा मुल दुरावण्याची भीती

व्यर्थ ठरली

२० व्या शतकाच्या सुरुवातीला जे इंडियन्स आले, त्यात शिखाचा भरणा जास्त वादळी दर्यातून प्रवास केला, इथल्या चावऱ्या थंडीशी सामना केला, इथल्या लोकांना नकोसे, वाळीत टाकलेले, तरी चिकाटीने राहिले कारण पैसे चागले मिळत होते इडियात कुटुबासाठी पाठवता येत होते कधी गावात शाळा किंवा विहीर बांधायलाही बायका इथ आणता येईनात अर्धे तर कोरेच राहिले कोणी केल्या मेक्सिकन बायका पण जाण्यायेण्यावरची बधन उठल्याबरोबर त्यांना घटस्फोट देऊन धावले इंडियातल्या [illegible] अमेरिकेत गद्दार चळवळ सुरू झाली ती भारतीय स्वातंत्र्य चळवळीला पाठिबा देण्यासाठी पण या लोकांना तो आपल्या धर्माचा, सस्कृतीचा हुंकार वाटला त्यांनी त्यासाठी पैसे पुरवले १९१२ मध्ये या लोकांनी एक जुन बुद्ध मदिर घेऊन, त्याचं गुरुद्वारात रूपांतर केल होतं (१९७८ साली भारत सरकारने तिथ एक वास्तू बाधली, त्यात वाचनालय, सभागृह व म्यूझियमही आहे) त्या ठिकाणी गद्दारच्या सभा होत ती चळवळ ब्रिटिशांनी निपटून काढली परतु अमेरिकेत असलेल्या अल्पसख्य भारतीयांच्या राग व अपमानाच तिने अभिमानात रूपातर केल या अभिमानापायी, नागरिकत्वाची शपथ घेताना, शिरस्त्राण काढण्यास नकार देऊन बीरसिंगाने नागरिकत्वावर पाणी सोडल अद्यापही ब्रिटिश व कॅनेडियन सरकारशी त्याच या विषयावर भाडण आहेच हळूहळू हे लोक चागले गब्बर झाले त्यानी अमेरिकेत ठिकठिकाणी गुरुद्वारा बांधलेत, स्वत च्या पैशानी व कष्टानी सुद्धा व्हँक्युवर, ब्रिटिश कोलबिया, मिशिगन विद्यापीठाना, पजाबच्या अभ्यासासाठी पैसे दिलेले आहेत आणखी मान्यवर विद्यापीठात, पजाबी भाषा, इतिहास व धर्म हा अभ्यासक्रम ठेवायला, शिकवायला प्राध्यापक, शिकणाऱ्याला शिष्यवृत्त्या यासाठी भरपूर पैसे देण्याचा त्यांचा विचार आहे आपल्या धर्माच्या व सस्कृतीच्या खुणा, त्याना इथ कायम उठवायच्या आहेत

बगालचा व अमेरिकेचा फार जुना संबध दोनशे वर्षांपूर्वी कलकत्ता-सालेम-बोस्टन याच्यात व्यापार होता १८९३ मध्ये स्वामी विवेकानद शिकागोला आले, सर्व धर्मपरिषदेसाठी त्यांचं व्यक्तिमत्त्व, त्याचे विचार, त्याची वाणी याचा अमेरिकन लोकावर विलक्षण प्रभाव पडला रामकृष्ण मिशनची विवेकानंद केंद्रं इथं कितीतरी आहेत एक मुलगी स्वयपाक करत होती बिन काचालसणाचा भावानद, प्रेमानंद अशी नाव धारण केलेल्या विवेकानदाच्या शिष्यासाठी केद्र मुद्दाम जाऊन बघितले एवढा सुदर परिसर मुख्य इमारतीत विवेकानदाचा पुतळा, अनेक फोटो विशेष म्हणजे ध्यानधारणेसाठी अगदी शांत असा दिवाणखाना, त्यात बैठकी हे लोक विवेकानंदाच्या लिखाणाचा अभ्यास करतात मोठी लायब्ररी आहे तिथ सास्कृतिक वर्ग चालवले जातात विवेकानदांची पुण्यतिथी दरवर्षी साजरी केली जाते गुरुदेव रवीद्रनाथ टागोरानी तर अमेरिकेला आपलं दुसरं घरच मानल

स्वयकेन्द्री माणसासाठी अमेरिका हा स्वर्गच आपल्या कोषात मश्गुल राहणाऱ्या सुखासीन माणसासाठी अमेरिका हे नदनवनच इण्ट्रोव्हर्ट माणसासाठी अमेरिका आहे एक्स्ट्रोव्हर्ट माणसासाठी नाही '

'तुमच्या आग्रहास्तव अमेरिकेत आलो नी दु खी होऊन परतलो काय तिथल्या मुलींची वेशभूषा नी केशभूषा ? कुकू व मंगळसूत्राचीही त्यांना अडचण वाटते तुमची मुल तर पुरती अमेरिकन कधी देवाला नमस्कार केलेला मी पाहिलाच नाही तुम्ही त्याना भारतीय सस्कृती शिकवलीच नाही तुम्हाला तरी ती कुठ हवी आहे म्हणा ? तुम्ही ती रसातळाला नेणारच तुमच्या मुलाना मातृभाषा येत नाही, यापेक्षा आणखी लाजिरवाणी गोष्ट दुसरी कोणती ? तुमची अमेरिका तुम्हालाच लखलाभ होवो' एका मुलाच्या वडिलाच्या पत्रातला मजकूर

मुलं अमेरिकेत आली तेव्हा, त्याच्या आईवडिलाना स्वत ची काळजी वाटली, विचारवंताना देशाची चिंता लागली अमेरिकेला नावं ठेवली म्हणजे आपल, आपल्या देशावरच प्रेम सिद्ध होत अशी कुणाची भाबडी कल्पना तर कुणी अमेरिकेत भारतीय सस्कृतीचा ऱ्हास होतोय, म्हणून डोक्यात राख घालून घेतली खर म्हणजे आजवर भारतातल्या थोड्या का लोकानी देशातर केल ? पण ही बुद्धिमान, उच्चशिक्षित मुलं, आपल्या देशाच काही भल करतील अशी अपेक्षा आणि तीच देश सोडून निघून गेली, तेव्हा अशा काही प्रतिक्रिया होणारच पण हे सगळ प्रेमापोटी आपल्या मुलावर आपण प्रेम करतो म्हणूनच रागावतो कधीतरी धपाटाही पाठीत घालतो तसच बर हे आता आमची मुल इथ येऊन २०-२५ वर्षे झालीत कुणाचे केस पिकायला लागलेत, कुणाला टक्कल पडायला लागलं, इतक्या वर्षांत त्यांनी काय केल ? अमेरिकेत ती कायम राहणार, त्यांच्या पुढच्या पिढ्याही, तेव्हा अमेरिकेच्या मूळ प्रवाहात त्यांना फिरायलाच हव ते सुद्धा भारतातील ऋणानुबधाचे धागे हातात घट्ट पकडून, अमेरिकेतल्या अल्पसख्याकाची दखल घेत, आपल्या मुलांना काखेत घेऊन, हळूहळू ते धागेदोरे त्याच्या सुपूर्द करायचेत ही वाट अनोखीच नाही का?

आईवडिलाना मुल मुळीच दुरावली नाहीत, अगदी अमेरिकन मुलीशी लग्न केल तरी त्यानी आपल्या जवळ राहाव हीच त्याची इच्छा त्याच्या लहान मुलाना सांभाळायला प्रेमाचं माणूस मिळतं, भारतीय पदार्थ खायला मिळतात, मुलावर आपोआप भारतीय सस्कार होतात, तेव्हा इथल्या सुनानाही सासू हवी मुलाचे घर मुलीचे घर असा भेद इथ नाही पार्ट्यांना, प्रवासाला बरोबर नेतात त्याचा वेळ चागला जावा म्हणून प्रयत्न करतात पण त्यानी साखरेत घोळल नी तुपात तळल, तरी आमचा जीव सगळा भारतात सर्वच मुल इथ आली की नाइलाजाने राहावं लागतं म्हणा आपआपले काही उद्योग करीत, आनदात राहतो इडियात राहणारे पुन्हा पुन्हा येतच असतात तेव्हा मुल दुरावण्याची भीती

व्यर्थ ठरली

२० व्या शतकाच्या सुरुवातीला जे इंडियन्स आले, त्यात शिखांचा भरणा जास्त वादळी दर्यातून प्रवास केला, इथल्या चावऱ्या थंडीशी सामना केला, इथल्या लोकांना नकोसे, वाळीत टाकलेले, तरी चिकाटीने राहिले कारण पैसे चांगले मिळत होते इंडियात कुटुंबासाठी पाठवता येत होते कधी गावात शाळा किंवा विहीर बांधायलाही बायका इथ आणता येईनात अर्धे तर कोरेच राहिले कोणी केल्या मेक्सिकन बायका पण जाण्यायेण्यावरची बंधनं उठल्याबरोबर त्यांना घटस्फोट देऊन धावले इंडियातल्या बायकांकडे अमेरिकेत गद्दार चळवळ सुरू झाली ती भारतीय स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा देण्यासाठी पण या लोकांना तो आपल्या धर्माचा, संस्कृतीचा हुंकार वाटला त्यांनी त्यासाठी पैसे पुरवले १९१२ मध्ये या लोकांनी एक जुनं बुद्ध मंदिर घेऊन, त्याच गुरुद्वारात रूपांतर केल होतं (१९७८ साली भारत सरकारने तिथ एक वास्तू बांधली, त्यात वाचनालय, सभागृह व म्यूझियमही आहे) त्या ठिकाणी गद्दारच्या सभा होत ती चळवळ ब्रिटिशांनी निपटून काढली परंतु अमेरिकेत असलेल्या अल्पसंख्य भारतीयांच्या राग व अपमानाच तिने अभिमानात रूपांतर केल या अभिमानापायी, नागरिकत्वाची शपथ घेताना, शिरस्त्राण काढण्यास नकार देऊन बीरसिंगाने नागरिकत्वावर पाणी सोडल अद्यापही ब्रिटिश व कॅनेडियन सरकारशी त्याच या विषयावर भांडण आहेच हळूहळू हे लोक चांगले गब्बर झाले त्यांनी अमेरिकेत ठिकठिकाणी गुरुद्वारा बांधलेत, स्वतःच्या पैशांनी व कष्टांनी सुद्धा व्हँक्युवर, ब्रिटिश कोलंबिया, मिशिगन विद्यापीठांना, पंजाबच्या अभ्यासासाठी पैसे दिलेले आहेत आणखी मान्यवर विद्यापीठात, पंजाबी भाषा, इतिहास व धर्म हा अभ्यासक्रम ठेवायला, शिकवायला प्राध्यापक, शिकणाऱ्याला शिष्यवृत्त्या यासाठी भरपूर पैसे देण्याचा त्यांचा विचार आहे आपल्या धर्माच्या व संस्कृतीच्या खुणा, त्यांना इथ कायम उठवायच्या आहेत

बंगालचा व अमेरिकेचा फार जुना संबंध दोनशे वर्षांपूर्वी कलकत्ता-सालेम-बोस्टन यांच्यात व्यापार होता १८९३ मध्ये स्वामी विवेकानंद शिकागोला आले, सर्व धर्मपरिषदेसाठी त्याच व्यक्तिमत्त्व, त्याचे विचार, त्यांची वाणी याचा अमेरिकन लोकांवर विलक्षण प्रभाव पडला रामकृष्ण मिशनची विवेकानंद केंद्रं इथ कितीतरी आहेत एक मुलगी स्वयंपाक करत होती बिन कांद्यालसणाचा भावानंद, प्रेमानंद अशी नावं धारण केलेल्या विवेकानंदाच्या शिष्यांसाठी केंद्र मुद्दाम जाऊन बघितले एवढा सुंदर परिसर मुख्य इमारतीत विवेकानंदाचा पुतळा, अनेक फोटो विशेष म्हणजे ध्यानधारणेसाठी अगदी शांत असा दिवाणखाना, त्यात बैठकी हे लोक विवेकानंदांच्या लिखाणाचा अभ्यास करतात मोठी लायब्ररी आहे तिथ सांस्कृतिक वर्ग चालवले जातात विवेकानंदाची पुण्यतिथी दरवर्षी साजरी केली जाते गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी तर अमेरिकेला आपल दुसरं घरच मानल

स्वयकेन्द्री माणसासाठी अमेरिका हा स्वर्गच आपल्या कोषात मश्गुल राहणाऱ्या सुखासीन माणसासाठी अमेरिका हे नंदनवनच इण्ट्रोव्हर्ट माणसासाठी अमेरिका आहे एक्स्ट्रोव्हर्ट माणसासाठी नाही '

'तुमच्या आग्रहास्तव अमेरिकेत आलो नी दुःखी होऊन परतलो काय तिथल्या मुलींची वेशभूषा नी केशभूषा ? कुकू व मंगळसूत्राचीही त्याना अडचण वाटते तुमची मुल तर पुरती अमेरिकन कधी देवाला नमस्कार केलेला मी पाहिलाच नाही तुम्ही त्याना भारतीय संस्कृती शिकवलीच नाही तुम्हाला तरी ती कुठं हवी आहे म्हणा ? तुम्ही ती रसातळाला नेणारच तुमच्या मुलाना मातृभाषा येत नाही, यापेक्षा आणखी लाजिरवाणी गोष्ट दुसरी कोणती ? तुमची अमेरिका तुम्हालाच लखलाभ होवो' एका मुलाच्या वडिलाच्या पत्रातला मजकूर

मुलं अमेरिकेत आली तेव्हा, त्याच्या आईवडिलांना स्वत ची काळजी वाटली, विचारवतांना देशाची चिंता लागली अमेरिकेला नाव ठेवली म्हणजे आपल, आपल्या देशावरचं प्रेम सिद्ध होत अशी कुणाची भाबडी कल्पना तर कुणी अमेरिकेत भारतीय सस्कृतीचा ऱ्हास होतोय, म्हणून डोक्यात राख घालून घेतली खर म्हणजे आजवर भारतातल्या थोड्या का लोकानी देशातर केलं ? पण ही बुद्धिमान, उच्चशिक्षित मुल, आपल्या देशाच काही भलं करतील अशी अपेक्षा आणि तीच देश सोडून निघून गेली, तेव्हा अशा काही प्रतिक्रिया होणारच पण हे सगळं प्रेमापोटी आपल्या मुलावर आपण प्रेम करतो म्हणूनच रागावतो कधीतरी धपाटाही पाठीत घालतो तसच बर हे आता आमची मुल इथ येऊन २०-२५ वर्षे झालीत कुणाचे केस पिकायला लागलेत, कुणाला टक्कल पडायला लागल, इतक्या वर्षांत त्यानी काय केल? अमेरिकेत ती कायम राहणार, त्याच्या पुढच्या पिढ्याही, तेव्हा अमेरिकेच्या मूळ प्रवाहात त्याना फिरायलाच हवं ते सुद्धा भारतातील ऋणानुबधाचे धागे हातात घट्ट पकडून, अमेरिकेतल्या अल्पसख्याकांची दखल घेत, आपल्या मुलाना काखेत घेऊन, हळूहळू ते धागेदोरे त्याच्या सुपूर्द करायचेत ही वाट अनोखीच नाही का?

आईवडिलाना मुलं मुलीच दुरावली नाहीत, अगदी अमेरिकन मुलीशी लग्न केल तरी त्यानी आपल्या जवळ राहाव हीच त्याची इच्छा त्याच्या लहान मुलाना सांभाळायला प्रेमाच माणूस मिळतं, भारतीय पदार्थ खायला मिळतात, मुलावर आपोआप भारतीय सस्कार होतात, तेव्हा इथल्या सुनांनाही सासू हवी मुलाचे घर मुलीचे घर असा भेद इथ नाही पार्ट्यांना, प्रवासाला बरोबर नेतात त्याचा वेळ चांगला जावा म्हणून प्रयत्न करतात पण त्यांनी साखरेत घोळलं नी तुपात तळलं, तरी आमचा जीव सगळा भारतात सर्वच मुल इथ आली की नाइलाजाने राहाव लागत म्हणा आपआपले काही उद्योग करीत, आनदात राहतो इडियात राहणारे पुन्हा पुन्हा येतच असतात तेव्हा मुलं दुरावण्याची भीती

व्यर्थ ठरली

२० व्या शतकाच्या सुरुवातीला जे इडियन्स आले, त्यात शिखाचा भरणा जास्त वादळी दर्यातून प्रवास केला, इथल्या चावऱ्या थंडीशी सामना केला, इथल्या लोकाना नकोसे, वाळीत टाकलेले, तरी चिकाटीने राहिले कारण पैसे चागले मिळत होते इडियात कुटुबासाठी पाठवता येत होते कधी गावात शाळा किवा विहीर बाधायलाही बायका इथ आणता येईनात अर्धे तर कोरेच राहिले कोणी केल्या मेक्सिकन बायका पण जाण्यायेण्यावरची बधनं उठल्याबरोबर त्याना घटस्फोट देऊन धावले इडियातल्या बायकाकडे अमेरिकेत गद्दार चळवळ सुरू झाली ती भारतीय स्वातत्र्य चळवळीला पाठिबा देण्यासाठी पण या लोकाना तो आपल्या धर्माचा, सस्कृतीचा हुकार वाटला त्यांनी त्यासाठी पैसे पुरवले १९१२ मध्ये या लोकानी एक जुनं बुद्ध मदिर घेऊन, त्याच गुरुद्वारात रूपातर केल होतं (१९७८ साली भारत सरकारने तिथं एक वास्तू बाधली, त्यात वाचनालय, सभागृह व म्यूझियमही आहे) त्या ठिकाणी गद्दारच्या सभा होत ती चळवळ ब्रिटिशानी निपटून काढली परंतु अमेरिकेत असलेल्या अल्पसख्य भारतीयाच्या राग व अपमानाच तिने अभिमानात रूपांतर केल या अभिमानापायी, नागरिकत्वाची शपथ घेताना, शिरस्त्राण काढण्यास नकार देऊन बीरसिंगाने नागरिकत्वावर पाणी सोडल अद्यापही ब्रिटिश व कॅनेडियन सरकारशी त्याच या विषयावर भांडण आहेच हळूहळू हे लोक चागले गब्बर झाले त्यानी अमेरिकेत ठिकठिकाणी गुरुद्वारा बाधलेत, स्वत च्या पैशानी व कष्टानी सुद्धा व्हँक्युवर, ब्रिटिश कोलबिया, मिशिगन विद्यापीठाना, पजाबच्या अभ्यासासाठी पैसे दिलेले आहेत आणखी मान्यवर विद्यापीठात, पजाबी भाषा, इतिहास व धर्म हा अभ्यासक्रम ठेवायला, शिकवायला प्राध्यापक, शिकणाऱ्याला शिष्यवृत्त्या यासाठी भरपूर पैसे देण्याचा त्याचा विचार आहे आपल्या धर्माच्या व संस्कृतीच्या खुणा, त्याना इथ कायम उठवायच्या आहेत

बगालचा व अमेरिकेचा फार जुना सबध दोनशे वर्षांपूर्वी कलकत्ता-सालेम-बोस्टन याच्यात व्यापार होता १८९३ मध्ये स्वामी विवेकानंद शिकागोला आले, सर्व धर्मपरिषदेसाठी त्याच व्यक्तिमत्त्व, त्याचे विचार, त्याची वाणी याचा अमेरिकन लोकावर विलक्षण प्रभाव पडला रामकृष्ण मिशनची विवेकानद केंद्र इथं कितीतरी आहेत एक मुलगी स्वयपाक करत होती बिन काचालसणाचा भावानद, प्रेमानद अशी नाव धारण केलेल्या विवेकानंदाच्या शिष्यासाठी केंद्र मुद्दाम जाऊन बघितले एवढा सुदर परिसर मुख्य इमारतीत विवेकानदाचा पुतळा, अनेक फोटो विशेष म्हणजे ध्यानधारणेसाठी अगदी शात असा दिवाणखाना, त्यात बैठकी हे लोक विवेकानदाच्या लिखाणाचा अभ्यास करतात मोठी लायब्ररी आहे तिथ सांस्कृतिक वर्ग चालवले जातात विवेकानदाची पुण्यतिथी दरवर्षी साजरी केली जाते गुरुदेव रवींद्रनाथ टागोरानी तर अमेरिकेला आपलं दुसरं घरच मानलं

होतं त्याच्या गीतांजलीच्या सहा कविता, शिकागोमधल्या मासिकात प्रसिद्ध झाल्या होत्या अमेरिकेतले विद्वान, शिक्षणतज्ज्ञ, लेखक त्यात हेलन केलर पण त्याचे मित्र झाले होते त्यानी आपल्या मुलाला शेतकीशास्त्र शिकायला अमेरिकेत पाठवल होतं तारकानाथ दास, मानवेन्द्र रॉय हे भारतीय स्वातन्त्र्यासाठी मदत मागायला इथ येऊन राहिले होते १९६० मध्ये स्वामी प्रभुपाद न्यूयॉर्कमध्ये आले, खिशात फक्त सात डॉलर्स त्यांनी कृष्णभक्तीचा प्रचार केला शेकडो पुस्तकं लिहिली त्याना पुष्कळ अनुयायी मिळाले १९७७ मध्ये ते वारले अवघ्या १७ वर्षांत त्याच्या आध्यात्मिक सघटनानी अनेक देवळ बाधली-लाखो डॉलर्स किमतीची पंडित रविशकरनी तर जणू जादूच केली बिटल्सच्या पिढीच मन त्यानी आकर्षून घेतलं सगीतप्रेमी लोकाना लोभावल आपल्या सतारीच्या झंकारांनी, पूर्वपश्चिम सीमा त्यानी एकमेकात गुंतवल्या चिन्मयानद हे एक आणखी बंगाली- खूप अनुयायी असलेले न्यूयॉर्क हे त्याच कायमच घरच झालय् अमेरिकेतल्या श्रेष्ठ विद्यापीठात भारतीय सस्कृती व वाङ्मय याचे अभ्यासक्रम आहेत अनेक बगाली प्रशालेत अध्यापक शिकवतात बगाली लोक १९६५ नतरच मोठ्या संख्येने इथे आले १६००० आहेत ते त्यातले सहा हजार बागला देशीय परक्या देशात स्थायिक होण जडच जात मग ते बगाली असोत की ज्यू असोत सर्वांच्या जीवनात पोकळी निर्माण होते मग ती धार्मिक, सास्कृतिक गोष्टी करून भरून काढायची बंगाली माणसाच्या मनात, आपल्या सस्कृतीच्या गोष्टी जाग्या आहेत इथल्या वातावरणात, त्या गोष्टी त्याना रुजवायच्यात, वाढवायच्यात पुष्कळसे बगाली शिक्षणतज्ज्ञ आहेत, डॉक्टर, इजिनियर आहेत व्यवस्थापनातही पुष्कळ अलीकडे थोडे राजकारणातही भाग घ्यायला लागलेत आपल्या ज्ञानाचा, मायदेशाला उपयोग व्हावा म्हणून काही परतही गेलेत काही बगाली लेखन करून आपल्या देशाशी सबध कायम ठेवतात बगाली गायक, नट, लेखक इथ येतात, त्याचे कार्यक्रम करतात सर्वांना एकत्र आणण्यासाठी अधिवेशनं भरवतात बंगाली सिनेमा दाखवायचा, कलाकृतींचं प्रदर्शन भरवायच, अनेक विषयावर चर्चा करायच्या, सगळ्यांतून इडियाशी सबंध ठेवण्याची इच्छाच प्रगट होते बगाली भाषा व वाङ्मय याच जतन व्हाव यावर त्यानी लक्ष केंद्रित केल आहे दोन पिढ्यामधल अंतर कमी करण्याचा त्याचा प्रयत्न चाललाय तरुण पिढीला आपला वारसा काय आहे, हे समजावं यासाठी विचाराची देवघेव चालते काली उत्सव तर त्याचा मानबिंदू त्यांची व बागला देशीयाची भाषा व सस्कृती एकच आहे, तेव्हा त्यानी आपल्यात मिसळाव असा प्रयत्न करतात

पैसा मिळवायला जगाच्या पाठीवर कुठेही जायला तयार असतात ते गुजराथी ते युगाडा, केनिया, फिजी, सिंगापूर, गियाना, दक्षिण आफ्रिका कुठ कुठ गेले अमेरिकेच त्यांना १९६० नतर आकर्षण वाटल काही इग्लडमधून आले इथल्या इडियन्सच्या चाळीस टक्के गुजराथी आहेत काहीनी भरपूर पैसा केलाय्, नी देवळ नी पुजारी यावर खर्चही

केलाय् विमानात बसले की, यांना शाकाहारी जेवण लागतं मांसाहारी लोकाबद्दल फारसा आदर नाही चार गुजराथी एके ठिकाणी जमले की, पैसे एकत्र करून मोटेल काढायच्या गोष्टी डॉक्टर, इजिनियर असले तर कन्सल्टिंग, ऑफीस सोन्या-चादीची, कापडाची दुकान त्याची पटेल मोटेलवाले, पालनपुरीचा वडिलोपार्जित हिऱ्याचा धंदा कष्टाळू जात गरजा कमी पैशासाठी तीन तीन नोकऱ्या करतील, बायका खाद्य पदार्थ करून विकतील पुष्कळसे डॉक्टर आहेत, इंजिनियर आहेत सैन्यातही खूप गुजराथी आहेत पुष्कळांचे आईवडील आलेत ते नातवडांशी मातृभाषेत बोलतात, त्यांना गीता शिकवतात नवरात्रात रास गर्बा ठिकठिकाणी तिथं खाण, गप्पा असं काही असल की, खूप गर्दी व्याख्यानाला ५-५०सच ठिकठिकाणी गुजराथी समाज, स्वतच्या इमारती, आर्थिक फायदा असला तर राजकारणात शिरणार एरव्ही दुसऱ्याशी संपर्क नाही आपल्या नातलगाना, जातभाईना अमेरिकेत आणि इडियातसुद्धा खूप मदत करतात इंडियातल्या टाटा मेमोरियल सारख्या हॉस्पिटल्सना उपकरण पुरवतात अमेरिकेत दुसऱ्या देशातल्या डॉक्टर्सना (FMG) फार भेदभावाची वागणूक मिळते, त्यासाठी काही गुजराथी डॉक्टर, असोसिएशन ऑफ फिजिशियन्स इन् अमेरिका या सस्थेमार्फत फार प्रयत्नशील आहेत

आध्रप्रदेशातले तेलगू लोक अमेरिकेत ५०,००० आहेत ॲनी बेझटचे दत्तक पुत्र जे कृष्णमूर्ती अमेरिकेत आले होते त्यांच्या विद्वत्तेमुळे पुष्कळ अमेरिकन त्याच्याकडे आकर्षित झाले म्हणे ग्रेटा गार्बो त्याच्या व्याख्यानांनी इतकी भारली गेली की, तिने आपला सिनेनटीचा धदा सोडून शांत जीवन पत्करलं त्याच्यापैकी शेट्टी समाज व्यापार करणारा बाकीचे डॉक्टर, इजिनियर, शास्त्रज्ञ, सशोधक त्यानी अमेरिकेला आपल घर समजल असलं तरी, भारताशी विशेषत आध्रप्रदेशाशी निकटचे सबध ठेवलेत इडियातून इथ शिकायला आलेल्या मुलाना सशोधनात खूप मदत करतात इडियातल्या प्रकल्पाना मदत करण्यासाठी तिथं जाऊन राहतात मोठ काम करतात गरीब, अनाथ, गृहहीन लोकांसाठी इडियात व अमेरिकेतसुद्धा पैसे देतात, इतरही मदत करतात इंडियन कार्बाइड विरुद्ध चाललेल्या खटल्यात एका तेलगू वकिलाने भारताला कायद्याची मदत केली व्हिस्कॉन्सिन विद्यापीठात, तेलगू शिक्षणासाठी त्यानी चेअर ठेवली आहे गांधी वर्षदिनानिमित्त, अमेरिकेतल्या १३,००० बेघर लोकाना त्यांनी जेवण दिल नोकरीतून रजा घेऊन ते २-३ वर्षे भारतात जातात आपल्या ज्ञानाचा तिथल्या लोकासाठी उपयोग करतात काही नेत्रतज्ज्ञांनी, आधयावत उपकरणांनी सज्ज असा दवाखाना भारतात उभारलाय पधरा वर्षांपूर्वीच त्यांनी आंध्रप्रदेशासाठी चॅरिटेबल ट्रस्ट स्थापन केलाय मुलाना स्कॉलरशिप्स देण्यासाठी १,००,००० डॉलर्सचा कायम निधी उभारलाय नुकत्याच झालेल्या वादळग्रस्तासाठी त्यानी ५०,००० डॉलर्स जमवून दिले हे लोक स्वभावत लाजाळू व देवधर्मी आंध्रप्रदेशात मोठमोठी देवालयं आहेत तिरुपती-तिरुमलाई देवस्थानाच उत्पन्न

वार्षिक ७० लाख डॉलर्स या देवालयाने आर्थिक व इतरही सर्व प्रकारची मदत पुरवून अमेरिकेत पिट्स्बर्ग, सान्फ्रान्सिस्को, ऑगस्टा, बोस्टन, लॉस एंजिलिस्, मिसिसिपी या ठिकाणी श्रीव्यंकटेश बालाजीची भव्य देवळ बांधलीत, बँकेकडून कर्ज न घेता सर्व हिंदू धर्मीयाना शाती लाभावी हा उद्देश लोकामध्ये धार्मिक व सास्कृतिक आवड निर्माण व्हावी म्हणून इडियातल्या गवयाना नर्तकांना इथ आणतात सगीताचे ते फारच भोक्ते पुष्कळ बायका-मुली संगीत-नृत्य शिकतात त्याचे बरेच वर्गही इथे आहेत अमेरिकन जीवनावर त्याच्यातले लेखक लेखन करतात व ते तेलगू मासिकात प्रसिद्ध होत त्यामुळे अमेरिकन संस्कृतीशी जुळवून घेताना होणारे कौटुबिक कलह त्या लोकांना समजतात त्याच्या असोसिएशनतर्फे एक पत्रिका छापली जाते ती ७२०० घराना मिळते त्यावरून इडियातल्या हुडाबळीसारखे प्रकार इथल्या लोकांना समजतात आध्रप्रांतातले अल्पसख्य मुस्लिम व ख्रिश्चन याचेही त्यात लेख असतात त्या लोकानी असोसिएशनमध्ये सामील व्हावं असे प्रयत्न चाललेत

केरळच्या मल्याळी लोकानी, आपल पाचव अधिवेशन नुकतच फ्लॉरिडात पार पाडलं २५०० लोक जमले होते इंडियातूनही मोठमोठे लोक आले होते त्यांचे वाङ्मय, संगीत, कला याचा आविष्कार झाला सामाजिक, सास्कृतिक कार्यक्रम झाले राजकारण, आरोग्य, उद्योगधदे यांवर चर्चासत्र झाली ओणम्सारखा सणसमारंभच ह्यानी केला त्यामुळे खरी मल्याळी सस्कृती केरळात लोप पावून अमेरिकेत पुन्हा उगवलेली दिसली इथल्या लोकांच्या श्रीमतीमुळे वातावरण फुललेलं दिसल केरळमधल्या नर्सिस म्हणजे छोट्या नायटिंगेलच त्याना अमेरिकन इडियन नर्सिसची असोसिएशन इथ स्थापन करायची आहे इडियातल्या १२,००० नर्सिस इथ आहेत जास्त करून केरळच्या मल्याळी लोकानी पैसे जमवून विशाखापट्टमजवळच्या डामळी गावी एक प्रकल्प सुरू केला आहे साक्षरता प्रसार हा मूळ उद्देश शिवाय मीठ तयार करण्यासारखे गृहउद्योग शिकवतात नापीक जमीन सुपीक करण्याचा प्रयत्न चाललाय त्या खेडेगावातल्या बायकानी या प्रयोगाला उत्तम प्रतिसाद दिलाय काहींनी इडियात जाऊन उद्योगधदे सुरू केलेत

१९२० साली भाटवडेकर अमेरिकेत आले व ते शिकागोच्या विवेकानद केंद्रात राहिले पण बहुसख्येने मराठी लोक अमेरिकेत यायला लागले ते १९६५ नतर ते वेगवेगळ्या गावात राहिले मग त्यांनी आपली मडळ स्थापन केली अशी २१ मराठी मडळ उत्तर अमेरिकेत आहेत काही गावात अगदी थोडी कुटुब त्याचे छोटे छोटे गट प्रत्येक मंडळाचे वर्षाचे सहा कार्यक्रम गणेश चतुर्थी, दिवाळी, मकर सक्रात, गुढीपाडवा, एखादं पिकनिक् प्रत्येक वेळी करमणुकीचे कार्यक्रम व जेवण कधी मराठी सिनेमा बर्फावरून घसरण, बोटीतून सहल, कॅम्पिंग असेही कार्यक्रम काही उत्साही मंडळीचे 'इडियातल एक मूल दत्तक घेणं' हा क्लीव्हलॅण्डच्या मडळाचा कार्यक्रम एवढी अफाट अमेरिका, दूरदूरच्या

शहरी असलेली मंडळ त्याचा एकमेकाशी संपर्क राहावा म्हणून १९८०त 'बृहन्महाराष्ट्र मंडळ' ही मध्यवर्ती सस्था स्थापन केलीय १९८१ पासून 'बृहन्महाराष्ट्र वृत्त' नावाची पत्रिका दर दोन महिन्यानी प्रसिद्ध होते त्यात सर्व मडळाच्या हालचाली, कार्यक्रम प्रसिद्ध होतात शिवाय महाराष्ट्रातल्या घडामोडी, बातम्या, पुस्तक-परिचय, तरुणांचं पानही असत १९७६ सालापासून कॅनडातून 'एकता' नावाच मासिक प्रसिद्ध होतय ठिकठिकाणी विखुरलेल्या मराठी माणसामध्ये आपुलकीचे धागे जोडण्याचा हे मासिक प्रयत्न करत परदेशात वास्तव्य करणाऱ्या लोकाच्या लिखाणाला प्राधान्य त्यामुळे विचाराची देवाणघेवाण होते दर दोन वर्षांनी मराठी अधिवेशन भरत त्याला मोठ्या सख्येने लोक हजर राहतात विचारांची, कल्पनाची देवघेव होते मराठी समाजाच बदलत स्वरूप, अमेरिकन समाजात त्याच स्थान, त्याच्या प्रेरणा, सेवानिवृत्तीच्या योजना, पुढच्या पिढीसमोरच्या समस्या, त्याची आव्हान इत्यादी विषयावर परिसवाद होतात 'Youth Exchange' कार्यक्रम, 'Youth Friendship Club' ह्या योजना तयार आहेत यापुढं 'आधुनिक तंत्रज्ञान भारतात पाठवण', 'नव्यान अमेरिकेत आलेल्यांना मदत', 'आपत्तीत सापडलेल्या कुटुबाला आधार' या योजना हाती घ्यायच्या आहेत बृहन्महाराष्ट्र मंडळाने महाराष्ट्रीय कुटुबाची एक नामसूची तयार केली आहे त्यात ३५०० कुटुबाचा समावेश आहे आणखी एक हजार कुटुंबं अमेरिकेत असावीत असा अदाज आहे

इथं आलेले सर्व महाराष्ट्रीयन स्त्री-पुरुष दोघही उच्चशिक्षित आहेत त्याच्या जवळ अमेरिकेच्या डिग्र्या आहेत कुणी डॉक्टर तर कुणी इंजिनियर, आर्किटेक्ट व्यवस्थापनात तर खूपच आपले पोटापाण्याचे घ्यवसाय साभाळून हे लोक इतरही काहीना काही करत असतात मराठी लोक म्हणजे नाटकप्रेमी इथं आल्यापासून त्यांनी सत्तर नाटकं बसवलीत शिवाय १०-१२ एकांकिका सगळे हौशी इंडियात कधीही नाटक न केलेले, सुप्रसिद्ध नाटककारांची नाटकं करायचे आता स्वत लिहितात लहान मुलांच्या एकांकिका मुलाना मराठी शब्दाच इंग्लिश स्पेलिंग करून द्यायच १६-१७ वर्षांची मुलं नाटकांत मराठी चागल बोलतात टोरॅन्टोमध्ये तर गेल्या वर्षी नाट्यमहोत्सव झाला १९८२ साली मराठी चित्रपट महोत्सव गावोगावी गाजला सात मराठी चित्रपट न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया, डेट्रॉइट, हौस्टन, शिकागो, लॉस ॲंजिलिस, टोरॅन्टो, कॅनडा इथं दाखवले त्याला अमराठीही हजर होते एवढ्या दूर राहून मराठी चित्रपट पाहायला मिळाले, भारताच्या सास्कृतिक वारशाची खोली समजली मराठी चित्रपट मडळाला एक लाख रुपये देता आले संगीताची आवडही तशीच नामवत गायक वादक येतात त्याचे कार्यक्रम ठिकठिकाणी शिवाय सर्वांच्या तबकड्या फिती सगळ्याकडे गायन, वादन, नृत्याचा छद असतो आपला रियाझ चालू ठेवून इतराना शिकवतात, कार्यक्रम करतात लॉस ॲंजिलिसमधल्या अशा हौशी लोकांनी गीतरामायणाचे ठिकठिकाणी कार्यक्रम करून सावरकर चित्रपट निधीला

हजारो डॉलर्स मिळवून दिले काहींना लेखनाची आवड अमेरिकेत कायम राहिल्यामुळे, इथल्या परिस्थितीची, जीवनाची त्याना चागली कल्पना आलेली आहे, त्यावर कुणी गोष्टी लिहितात, लेख, नाटक पण इथल शीघ्र, गतिमान जीवन, एकाकीपणा, व्यक्ति-स्वातंत्र्याला प्राधान्य, जीवघेणी चढाओढ, सेक्स फ्री समाज, घटस्फोट, स्वैराचार, फसवणूक याबद्दल इडियातल्या लोकाना थोडफार समजल, या पुस्तकांना इडियात चागली दाद मिळालीय काही साहित्यप्रेमी 'शब्दाच्या संध्याकाळी' असा काही कार्यक्रम करतात कुणी स्वतःची कविता तर कुणी कथाकथन करत कुणी एखाद्या पुस्तकाच कवितेच रसग्रहण करत तर कुणी आवडलेला एखादा उतारा वाचून दाखवतं उदबत्ती, अत्तर, गुलाब, पेढे तर हवेतच

नव्या देशात आपला निभाव कसा लागेल ह्या विवचनेत, स्थिरस्थावर होण्यात ८-१० वर्षे गेली भारतात परत जाण्याचे विचार मनात घोळत होते हळूहळू सुस्थिती आली, इथंच स्थायिक व्हायच ठरल तेव्हा मात्र आपण आपल्या देशातल्या गरीब बाधवाना सोडून इथ आलोय्, मजेत राहतोय्, अशी अपराधीपणाची भावना तीव्र झाली दुष्काळ, पूर, वादळं अशा आपत्तीच्या वेळी मडळी मदतीला सरसावत आपल्या देशाची गरिबी हटवण्यासाठी काहीतरी सतत केलं पाहिजे हा विचार बळावला व त्यातून 'महाराष्ट्र फौडेशनचा' जन्म झाला १९७७ मध्ये सर्व देशाला मदत म्हणजे मनुष्यबळ, द्रव्यबळ खूपच हवं, म्हणून लहान घास घ्यायचा ठरवला महाराष्ट्रातल्या आदिवासी, दलित, बहिरे-मुके, अपग, कुटुबनियोजन, पाणीपुरवठा यासाठी मदत द्यायला सुरुवात केली जसजसे पैसे जमायला लागले तसे पश्चिम बगाल, केरळ, गुजराथ इथल्याही संस्थाना मदत दिली पनवेलच्या शातीवनातले ५१ महारोगी ह्या सस्थेने दत्तक घेतलेत अलीकडे सस्था, फड उभा करण्यासाठी सास्कृतिक कार्यक्रम व भोजन असा, 'मेंदीच्या पानावर' नावाचा कार्यक्रम ठिकठिकाणी करते इथले कलावत मोठ्या हौसेने त्यात सहभागी होतात कार्यकर्ते, निवेदक प्रेक्षकांना २०-२५ वर्षापूर्वीच्या काळात नेतात जणू त्या काळातली लोकप्रिय गाणी, ओव्यांपासून ते शास्त्रीय सगीतापर्यंतची त्याच्या पूर्वस्मृती उचबळून येतात त्या सस्थांसाठी आपल आयुष्य वेचणारी विशेषत अगदी अल्प पगारावर तिथ काम करणारी माणस तर त्याच्या जिव्हारी भिडतात मग सस्थेला पटापट देणग्या मुल दत्तक घ्यायला सगळे तयार कायम निधी उभारून या सस्थाना कायम मदत देण्याचा विचार चाललाय

विश्व हिंदुपरिषदेचा तर केवढा व्याप दर सुट्टीत मुलासाठी शिबिरं शनि, रवि सांस्कृतिक वर्ग रामायण-महाभारत शिकवतात हिंदू एकात्मता दिन साजरा करतात 'India Abroad', 'India West', 'L A. India', 'न्यूज इडिया' अशी साप्ताहिकं चालवतात ईंडियातल्या इत्थभूत बातम्या कळतात अमेरिकेतल्या इडियन लोकाची हालहवाल कळते शिवाय छोटी-मोठी, वेगवेगळ्या भाषांतील नियतकालिके .

फ्लॉरिडातल्या लोकांनी प्रातीयता ओलांडून 'इडियन्स तेवढे सगळे एक' या तत्त्वावर असोसिएशन स्थापन केलीय फ्लॉरिडाची लोकसख्या १८५,००० आहे त्यात ३०,००० इंडियन्स आहेत शिवाय मूळ इडियातले पण फिजी, दक्षिण आफ्रिका, ब्रिटिश गियाना इथून आलेले पाच हजार इडियन्स आहेत त्या सर्वांनी इंडियन्स म्हणून एकत्र यावं व आपल्या संस्कृतीचा ठसा इथं उमटवावा, असे प्रयत्न हे लोक गेली वीस वर्षे करताहेत आपल अस्तित्व अमेरिकनांना जाणवून दिल पाहिजे ह्याचप्रमाणे प्रत्येक यशस्वी अभ्यागत अमेरिकेचेही काही देणं लागतो ती त्याची नैतिक जबाबदारी आहे, अस त्या असोसिएशनच म्हणणं आहे म्हणून हे लोक इडियातल्या हॉस्पिटल्सबरोबर अमेरिकेच्या हेल्थ असोसिएशनलाही पैसे देतात इडियन व अमेरिकन कुटुंब एकत्र आणतात फ्लॉरिडात ७० हजार हॉटेल्स आहेत त्यातली १० टक्के इडियन्सची डिस्ने वर्ल्डमध्ये कितीतरी इडियन्स मोठ्या अधिकारावर आहेत काही लोक इलेक्ट्रॉनिक्सच सामान व अतिपूर्वेकडील कपडे याचा व्यापार करतात करेबियनमध्ये शाविंगी आहे धार्मिक चर्चा घडवून आणतात प्रत्येक भाषेचा वेगळा समारभ इथे नाही जानेवारीचा शेवटचा शनिवार (२६ जा च्या जवळचा) 'इडिया डे' म्हणून त्यानी जाहीर करायला लावला आहे तिसऱ्या इयत्तेच्या पुस्तकात, 'इडिया हा मागासलेला देश आहे' असा उल्लेख होता फ्लॉरिडाच्या लोकानी, ते पुस्तक अभ्यासक्रमातून रद्द करावं अशी मागणी केली पुस्तक रद्द झाल नाही तरी, 'शिक्षकांनी इंडियाबद्दल सर्व बाजूनी माहिती द्यावी' असा फतवा निघाला

एकूण इंडियातले लोक, मग ते शीख, बगाली, मद्रासी, मराठी कुणीही असोत, त्याना इडियाशी घनिष्ठ सबध ठेवावा, तिथल्या घडामोडी समजाव्यात, तिथल्या गरजूना मदत करावी असं मनोमनी वाटतच त्यात त्याना फार मोठं समाधान मिळतं इडियन सस्कृती व परंपरा त्याच्या मनीमानसी आहेच पण या धोपट मार्गाने जाऊन, त्याचा या देशात निभाव लागणं कठीणच त्यात इथले शेजारी वेगळेच आहेत उजवीकडे इटॅलियन तर डावीकडे फिलिपिनो मागच्या बाजूला काळा तर समोर ग्रीक, असे कितीतरी अल्पसंख्य लोक इथ आहेत कधी त्याच्यावर अन्याय होतो आज ते जात्यात आहेत, उद्या सुपातल्या आपल्यावर ही वेळ येणार आहे, हे इंडियन्स ओळखून आहेत शिवाय याच्यापैकी काळे व हिस्पॅनिक सामाजिक आर्थिकदृष्ट्या मागे राहिलेत काल आलेल्या इडियन्सची श्रीमंती त्याच्या डोळ्यात येते त्यांच्याबद्दल हेवा वाटतो मग त्याना हरप्रकारे त्रास द्यायचा जर्सी सिटीमध्ये dotbusters च केवढ प्रकरण झालं 'या लोकांशी आपल्याला काय करायचय्? आपण इंडियन्सना बोलवाव, त्याच्याकडे पार्टीला जाव की झाल' हीच विचारसरणी कपाला-युगाडात गेलेल्या इडियन्सची होती म्हणूनच त्याना आपलं चंबूगबाळं कसलं सगळी इस्टेट तिथ टाकून पळून जाव लागल तेव्हा आता पुढच्यास ठेच मागचा शहाणा होणारच तेव्हा त्याच्यात मिसळायचं, त्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घ्यायचा,

आपल्या कार्यक्रमाना त्यांना बोलवायचं अशा गोष्टी करायलाच हव्या नाहीतरी सहिष्णुता नी निधर्मीपणा ही आपली परंपराच आहे

अमेरिकेत गोरे, काळे, तपकिरी, पिवळे सगळे लोक असले तरी बहुतेक गोरेच अमेरिकेत इडियन्स फार तर १० लाख असतील अमेरिकेची लोकसख्या २४ कोटी, म्हणजे आपण नगण्यच की त्यांचाच मुख्य प्रवाह तळ्यात राहायच तर त्यातल्या माशाशी जमवून घेतल पाहिजेच गेल्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी डुकाकीस हे उमेदवार होते ते एकदा म्हणाले, 'हे इडियन्स फक्त इंडिया, इंडिया करतात, इडियाचीच स्वप्नं बघतात, सगळा वेळ त्यातच अस केल तर त्याना व त्याच्या वारसाना हक्क, सवलती मिळणार कशा?' त्यासाठी नागरिक कार्यात भाग घ्यायला हवा अमेरिकेच राजकारण म्हणजे धार्मिक व वांशिक पुढाऱ्याशी देवाणघेवाण त्यासाठी आपल्यातलेच पुढारी हवेत म्हणून राजकारणात भाग घ्यायला हवा त्याना समजून घ्यायच, त्याच्या सदिच्छा मिळवायच्या, म्हणजे त्याच्या सस्कृतीत मिसळायच पण कस? दोन सस्कृतींत जमीन अस्मानाचा फरक जगातल्या देशाच्या सर्व संस्कृती, एका भांड्यात वितळवून, प्रत्येक सस्कृतीतल्या चागल्या गोष्टींची, एक नवी सस्कृती अमेरिकेत उदयाला येईल, अशी एक आदर्श कल्पना इथल्या लोकापुढे मांडली जाते पण या एकजिनसी सस्कृतीत कुणाचच वैशिष्ट्य राहणार नाही त्यापेक्षा या सर्वांच्या सस्कृतीचे धागे घेऊन एक सुंदर गालीच्या विणावा रगीबेरगी, नक्षीदार शिवाय दणकट त्यात गुंफायला इडियाजवळ वेगवेगळे रंग आहेत, तऱ्हेतऱ्हेच्या आकृत्या पण आणि भारतातल्या या पहिल्या पिढीला नेमक तेच करायचय अमेरिकेच्या मुख्य प्रवाहात शिरायचंय पण आपल्या सस्कृतीचे धागेदोरे घट्ट धरून ठेवून

हे धागेदोरे, १०० वर्षांपूर्वी स्वामी विवेकानदांनी तयार करायला सुरुवात केली त्यांनी अमेरिकेतल्या विद्वानांची, थोर साहित्यिकाची मन जिंकून घेतली त्यामुळे त्या लोकाच लक्ष इडियाकडे वेधल कुणाला भगवद्गीता आदरणीय वाटली, त्यानी इडियाच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू केला कुणाला वाड्मयात रस वाटला. कुणाला इंडियाचे अनेक प्रश्न समजून घ्यावेसे वाटले इडियन लोकांची स्वातत्र्यतृष्णा कुणाला स्पर्शून गेली, कुणाला सस्कृती अभ्यासावीशी वाटली इडियातल नागरी जीवन, त्या खेडुताची जीवनपद्धती, त्याच्या चालीरीती, त्याचे समज हे तर अद्यापही अमेरिकन विद्यार्थ्यांचे आवडीचे विषय आहेत लोकाची ही आवड पाहून हेन्री फोर्डसारख्या बड्या लोकानी, इंडियाच्या अभ्यासासाठी कोट्यवधी डॉलर्सची फौडेशन्स उभारली कॉर्नवॉल, विस्कोन्सिन विद्यापीठानी मुबई, मद्रास, मदुराई, बनारस या विद्यापीठाशी सहकार्य करायला सुरुवात केली पी एल ४८० नुसार इडियाला अमेरिकेतलं जादा धान्य मिळत होत त्याची किमत रुपयांत द्यायची इडियाला सवलत होती ते रुपये खूपच साठले तेव्हा अमेरिकेचे इडियातले राजदूत मोहिनी हॅन यानी, ते पैसे इंडियातच खर्च करावे, अशासाठी अमेरिकन कॉंग्रेसच मन

वळवल (त्यांनी त्या वेळी एवढ्या मोठ्या रकमेचा चेक लिहिला की, गीनीज बुकात त्याच्या नावाची नोंद झाली ) मग ते पैसे अमेरिकन वकिलातीवर व इडियात अभ्यासासाठी येणाऱ्या अमेरिकन विद्यार्थ्यांवर खर्च व्हायला लागले त्यामुळे अभ्यासासाठी येणाऱ्या अमेरिकन विद्यार्थ्यांची सख्या वाढली ते इडियाच्या वेगवेगळ्या प्रांताच्या निरनिराळ्या विषयावर अभ्यास करायला लागले बस स्टॉपवर एक बाई गीता वाचत होती अडलेला शब्द इडियन म्हणून आम्हाला विचारत होती आमच्या शेजारची एक मुलगी इडियन तत्त्वज्ञान शिकतेय् त्यावर बोलायला म्हणून ती कधी कधी माझ्याकडे येते महाराष्ट्रापुरतं सागायचं तर, अमेरिकन विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक, आगरकर, ज्योतिबा फुले, गोपाळ कृष्ण गोखले, सावरकर, आबेडकर इत्यादी राष्ट्रीय व सामाजिक नेत्यावर प्रबध लिहून मास्टर्सच्या पदव्या मिळवल्यात कुणी सताचाही अभ्यास केलाय ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, दलित चळवळ इतकेच नव्हे तर शिवसेनेचाही कुणी कुणी अभ्यास केलाय इथ आलेले मराठी लोकही असा सशोधनात्मक अभ्यास करतात काही अमेरिकन लोकाना मराठी लिहिता वाचता येत भारतीय चित्रकला, शिल्पकला याचाही अमेरिकेवर प्रभाव पडलेला आहे भारतीय विद्यार्थी अमेरिकेत प्रदर्शन भरवतात इडिया फेस्टिव्हलमुळे ग्रामीण कलाही त्याना बघायला मिळली त्या कलाच आकर्षण असणारे, इंडियातल्या त्या त्या प्रातात जातात व त्या कलेचा अभ्यास करतात इडियातून खूप पुस्तकं अमेरिकेत येतात पडित रविशकर व झुबिन मेहेता, ही भारताने अमेरिकन सगीताला दिलेली अमूल्य देणगी आहे, अस अमेरिकन जाणकार समजतात अमेरिकन लोकानी आठ तासाचं संपूर्ण महाभारत अमेरिकन स्टेजवर करून दाखवलं घाशीराम कोतवाल हे नाटकही लोकांनी आवडीन बघितल इडियन सिनेदिग्दर्शकांबरोबर काम करायला पण काही तयार आहेत अमेरिकन लोक भारताचे प्रश्न, भारताची सस्कृती समजून घेताहेत अस दिसतं इथ आलेल्या पहिल्या पिढीने भारतीय सस्कृती बुरसटलेली नाही, हेही दाखवून दिलय तरीपण भारतीय संस्कृतीचे ठसे अमेरिकन भूमीवर उठवणं, हे एका पिढीत होणार काम नाही सस्कृती निर्माण करण हे रुद्राक्षाच्या झाडासारखं आहे बी लावून वर्षानुवर्षं जोपासना करावी तेव्हा ६०-७० वर्षांनी त्याला रुद्राक्ष लागणार इथ तर परक्या सस्कृतीत वाढणाऱ्या मुलाकडून हे काम करवून घ्यायचय त्याच्यावर जुलूम जबरदस्ती तर मुळीच करता कामा नये ती सदा आनदी राहिलीच पाहिजेत त्या मुलांचे विचार, प्रेरणा, भावना सगळ जोरकस झालं पाहिजे आधुनिक जगाच्या धकाधकीत ती कुठही कमी पडता कामा नयेत या देशाची ती उत्तम नागरिक बनलीच पाहिजेत यासाठी त्याना भारतीय सस्कृतीचा दृढ पाया मिळावा या संस्कृतीत अनेक प्राचीन, सुदर परपरा आहेत, त्या मानवतेच्या प्रेमाने ओथंबलेल्या आहेत सगळ खर पण ही वाट घडवायची कशी?

दोन संस्कृतीच्या चिमटीत सापडलेले एकटे भारतीयच नाहीत इतर देशाना

विशेषत आशियाई लोकाना, हे संस्कृतीमधल अतर फार जाणवतं व्हिएटनामच्या डॉक्टर को फामची गोष्ट ऐका तो ४७ वर्षांचा म्हणजे आमच्या मुलांएवढाच सायगाव कम्युनिस्टाच्या हाती पडलं तेव्हा तो, त्याचे आई-वडील, बायको थुए बुई व सहा महिन्यांचा मुलगा सगळी अमेरिकेत आली, निर्वासिताच्या बोटीतून हात हलवीतच त्याला इथ यावं लागल त्या नवराबायकोन नोकरी करून शिक्षण केलं त्यामुळे मुलाना मातृभाषा शिकवायला त्याना वेळच मिळाला नाही आज फाम, एका मोठ्या हॉस्पिटलचा डिरेक्टर आहे समुद्रकाठी मोठ घर, मर्सिडिज गाडी, सगळ इथ एक लक्ष व्हिएटनामी लोक आहेत त्याच्या चेंबर ऑफ कॉमर्सचा हा अध्यक्ष त्याची आई ८७ वर्षांची तिला आपला मायदेश फार आवडतो ती तिथली स्वातत्र्यगीत गात असते आणि हा शातपणे ऐकत असतो तिला फक्त व्हिएटनामी भाषा येते मुलाना फक्त इग्लिश येत त्यामुळे आजी नातवड एकमेकाशी बोलू शकत नाहीत घरात व्हिएतनामी सस्कृती जपलेली आहे पण मुलं अमेरिकन बनलीत त्यांना आधुनिक अमेरिकन सगीत आवडतं, 'Banh Counh' ह्या व्हिएतनामी पदार्थापेक्षा हॅम्बरगर जास्त आवडतो आईवडील त्यांना बुद्ध मदिरात नेतात ते नाखुषीने प्रार्थना म्हणतात (रविवारच्या चर्चच्या शाळेतील मुलंपण हेच करतात म्हणा) फामची आई भूतकाळात वावरतेय तर मुल हायटेक भविष्यकाळाकडे नजर ठेवून

फामच्या मुलासारखीच बहुतेक मुलं-दुसऱ्या पिढीतली ह्यांना पाच हजार वर्षे टिकून राहिलेल्या आपल्या सस्कृतीची मूल्य कशी देतील आईवडील? आपल तत्त्वज्ञान, ज्याने भल्याबुऱ्या काळात आपल्याला आधार दिला, कोणत्याही परिस्थितीत समाधानाने राहायला शिकवल, मनाला शाती दिली, त्याची ओळख याना कशी करून देतील? कुटुबाच्या स्वास्थ्यासाठी व्यक्ती आपल मन मारते, म्हणून आपली कुटुंबं भक्कम पायावर स्थिर उभी आहेत, ही गोष्ट या व्यक्तिप्रधान सस्कृतीत, मुलाच्या गळी कशी उतरवतील? पॉप सगीताच्या तालावर नाचणारी ही मुल, त्यांना भारतीय सगीताची गोडी कशी लावतील? मातृभाषेत बोलायला धजत नाहीत, त्याच्यात आपल्या समृद्ध वाङ्मयाची आवड कशी निर्माण करतील? या दोन परस्परविरुद्ध सस्कृतींतून ते कशी वाट काढतील? कुणाला पुसावं तर कुणी या वाटेने कधी गेलाच नाही हेच पहिले जाणारे पण ते अमेरिकेत आले तेव्हा, हे पैशाच्या मागे लागतील, सस्कृती, देश इतकच काय आईवडिलांना पण विसरतील काय? या प्रश्नानी मन कातर झाल होतच, पण त्यानी सस्कृती व समृद्धी याचा मेळ घातला, तीच मुल काढतील मार्ग, कधी त्याचा रस्ताच बंद होईल, कधी चुकीची वळण घेतील, पण प्रयत्न चालू ठेवतील कुणी पडतील, झडतील, घायाळही होतील पण त्यांनी मुलाना जे प्रेम दिल, आपल्या स्वत च्या वर्तनाने जी मूल्य त्याच्या मनावर ठसवली, त्यामुळे हा दोन सस्कृतीमधला, दोन पिढ्यांमधला प्रयोग यशस्वी होईल, अशी आशा करायला जागा आहे खास

# २

# उत्तर नसलेला प्रश्न

मुलगा अमेरिकेला जाणार याचा मला आनद होत नव्हता खर म्हणजे तो तिथ गेला की, त्याचं भलं होईल, हे का मला समजत नव्हत? तरी सुद्धा मला आनंद वाटत नव्हता म्हणजे मी जगावेगळी आई होते का? मला आनदापेक्षा काळज्याच जास्त वाटत होत्या अनोळखी देश, तिथ त्याला काय झाल, एखाद सकट आलं, कधी आजारी पडला, तर ते निस्तरायला कुणी काका मामा होता का तिथं? शिवाय तो इतक्या दूर जाणार, मला दुरावणार, कधी येईल, केव्हा येईल हेच सगळ

गेल वर्षभर त्याच्या डोक्यात अमेरिका भरली होती मित्रामित्राचे बेत चालले होते कुठून कुठून माहिती मिळवत होते कुणाला ग्रीन कार्ड मिळाल होतं एकदोघाना ॲसिस्टटशीप मिळाली अमेरिकेच्या विद्यापीठात शिकण्यासाठी प्रवेश मिळाला की, स्टूडट व्हिसा मिळतो याची चर्चा घरात चाले वडील त्यात उत्साहाने भाग घ्यायचे मी विचारल,

'कशाला पाठवायचा याला अमेरिकेत?'

'आणखी शिकायला तो अमेरिकेत जाईल खूप खूप शिकेल इथ परत येईल तेव्हा त्याला मोठ्या पगाराची नोकरी मिळेल चांगला थाटात राहील तो' वडिलाचं उत्तर

'माझा मुलगा चागला बुद्धिमान आहे, हुशार आहे, तडफदार आहे इथ राहूनही तो सगळ काही मिळवील' मी माझंच चालू ठेवल

'पण तो पुढारलेला देश आहे तिथल शिक्षण उच्च प्रकारच आहे ते त्याला मिळेल शिवाय मी एक साधा माणूस माझा मुलगा अमेरिकेला जाईल, अस स्वप्नातसुद्धा मला

कधी वाटलं नाही आता त्याची महत्त्वाकाक्षा आहे, त्यासाठी तो प्रयत्न करतोय माझा मुलगा अमेरिकेला गेला तर मला कृतकृत्य वाटेल.'

मुलाची महत्त्वाकांक्षा व बापाची कृतार्थता याच्या आड येण काही बरोबर नाही हे मला पटल आणि मी गप्प बसले

मुलगा वेगवेगळ्या विद्यापीठांत अर्ज करीत होता त्याची उत्तर येत होती दरम्यान GRE टॉफेल परीक्षा देऊन झाल्या होत्या पासपोर्टसाठी अर्ज केला होता ग्रीन कार्ड मिळायला दोन वर्ष लागणार होती तेवढ थांबायला मुलगा व वडील दोघंही तयार नव्हते विद्यापीठाची उत्तरं येत होती पण असिस्टटशिप द्यायला कुणी तयार नव्हत शिक्षणासाठी प्रवेश मिळत होता पण त्यासाठी लागणाऱ्या डॉलर्सचे आकडे डोळे फिरवीत होते कमीत कमी पचवीस हजार रुपयाची सोय व्हायला हवी होती मुलगा नाराज दिसत होता वडील म्हणत होते, 'माझा प्रॉव्हिडट फड आहे, ग्रॅच्युइटी आहे, त्यातून खर्च करू ' असे सगळेच्या सगळे पैसे न्यायला मुलगा मुळीच तयार होईना त्याला आमची काळजी होतीच मग पुन्हा त्याची धडपड सुरू झाली एखाद्या सस्थेकडून पैसे मिळतील का? एखादा ट्रस्ट कर्जाऊ पैसे देईल का? काही सस्था होतकरू मुलाना परत करण्याच्या बोलीने पैसे देतात एका ट्रस्टनेही काही पैसे दिले मुलाची विम्याची पॉलिसी काढून, ती त्या ट्रस्टच्या नावे करून दिली तरीपण २५ हजाराची जुळणी होईना अमेरिकेला जाण्याच तारू पैशांच्या खडकाशी अडून बसल

आमचा मुलगा अमेरिकेला जाणार ही बातमी सगळीकडे पसरलेलीच होती लोक आमच्याकडे वेगळ्याच नजरेने पाहात होते मुलाला अमेरिकेला पाठवणारे आईवडील म्हणजे चागलेच पैसेवाले असणार, असच त्याना वाटत होतं 'कस्टम्समध्ये होते ना? पैसे खाल्ले असतील भरपूर' असं कुणीतरी म्हटल्याचं कुणीतरी सागितल मडळात गेले तर सगळ्या बायका माझ्याकडे आदराने पाहायला लागल्या 'खरच का तुमचा मुलगा अमेरिकेला जाणार?' असं कौतुकाने विचारू लागल्या एक स्पष्टवक्ती म्हणाली,

'पाहा हो तिथ जाईल नी तिथलीच मुलगी करील त्या नलूताईच्या मुलाने नाही का केली अमेरिकन बायको?'

नेमका हाच काटा माझ्या मनाला टोकरीत होता नलूताई तर माझ्या मैत्रिणीच किती कठीण परिस्थितीत तिने मुलाला अमेरिकेला पाठवल आणि त्याने अमेरिकन मुलीशी लग्न केलं अकरा वर्षांनी आईला भेटायला आला पण नलूताईला दुसरा मुलगा आहे तो आईबापाचं सर्व बघतो माझा तर हा एकच्या एक त्याने अस केल तर तो मला पुरताच दुरावणार कायम तिकडेच राहणार कधीतरी मला उभ्या उभ्या भेटून जाणार कस व्हायच म्हातारपणी आमचं?

'मग तुम्ही माझ्या भावाच्या मुलीशी त्याच लग्न करून मगच त्याला तिकडे पाठवा

ना हो तो तुमच्या मुलाचा जाण्याचा सगळा खर्च करेल ' दुसरीचा सल्ला

माझ्या मनात आलं कितीतरी वधूपित्याचे माझ्या मुलावर डोळे आहेत काय हरकत आहे फडणिसाची मुलगी करायला? माणसं चागली आहेत मुलीत नाव ठेवण्याजोग काही नाही मुख्य म्हणजे पैशाचा प्रश्न सुटेल, आणि एकदा लग्नाची बेडी पायात अडकवली की, अमेरिकन मुलगी करेल हीही भीतीच नको घरी आल्यावर मी मुलाजवळ हळूच विषय काढला तो स्पष्ट म्हणाला,

'मी कुठल्याही बधनात गुतणार नाही '

मी त्याच्या वडिलाकडे पाहिल वाटलं ते त्याला काहीतरी समजावतील पण ते गप्पच तो म्हणेल ते प्रमाण जणू त्याचा मुलगा सर्वज्ञ पण पैशाच कसं करणार आहेत?

इतक्यात सहा महिन्यापूर्वी अमेरिकेत गेलेल्या त्याच्या मित्राच पत्र आलं 'तुला असिस्टटशिप मिळाली नाही, तरी बेत बदलू नकोस सहा महिन्यापुरते पैसे घेऊन ये पुढच्या सहा महिन्याचे पैसे तुझ्या वडिलाजवळ आहेत, अशी रिझर्व बँकेची खात्री करून द्यायची, तेवढे पैसे अमेरिकेत पाठवायची परवानगी घेऊन ठेवायची तू इथ आल्यावर तुला असिस्टंटशिप मिळेल, किंवा दुसरी कुठली ना कुठली नोकरी मिळेलच '

ह्या पत्राने जाण्याचा विचार पक्का झाला अमेरिकेत थडी फार तेव्हा थर्मल, सूटस्, बूटस्, शर्टस् सहा महिने पुरतील एवढ्या कपड्यांची तयारी करायला हवी होती मुलाच्या आता त्यासाठी खेपा सुरू झाल्या एक दिवस माझी जाऊ मला भेटायला आली मुख्य विषय अमेरिकेला जाण्याचाच ती सांगत होती तिचा भाऊ काळा चौकीला राहतो त्याच्या शेजारी कुणी राणे म्हणून राहतात त्याना चार मुलीच मोठी मुलगी खूप हुषार बी एस्सी ला फर्स्ट क्लास फर्स्ट आली, आणि तिन अमेरिकेचं वेड डोक्यात घेतल तिच्या प्रोफेसर्सनी तिला मदत केली स्कॉलरशिप मिळवून दिली, आणि ही मुलगी दोन वर्षापूर्वी अमेरिकेला गेलीसुद्धा लोक राण्याना हसतायत पदरात चार मुली मोठीचं लग्न करायचं सोडून तिला अमेरिकेला पाठवली आता त्या पोरीचं काय होणार? ती इथं येणार कधी नी तिचं लग्न होणार कधी? बिचाऱ्या राणेबाई, अमेरिकेतच मुलीला योग्य कुणी मुलगा आहे का याच्या शोधात आहेत दुसर काय त्यांच्या हातात आहे?

माझ्या मनाला थोडा थडावा वाटला त्याची मुलगी, त्याना केवढी काळजी माझा मुलगा कितीही वर्षांनी परत आला तरी त्याला हव्या तेवढ्या बड्याबड्याच्या मुली सागून येतील बड्यावरून आठवण झाली, असेच एक बडे गृहस्थ कपनीमध्ये मोठ्या अधिकारावर असलेले त्याच्या मनात त्याची एकुलती एक मुलगी माझ्या मुलाला द्यायची होती त्याच्या कपनीत त्याला चागल्या हुद्द्यावर पोचवायच होत त्याना त्याचं अमेरिकेच समजलं, तेव्हा ते म्हणाले, 'तिथ जाऊन काय करणार? कपबश्या धुणार?'

माझ्या डोळ्यासमोर हॉटेलमधला पोऱ्या उभा राहिला अर्धीचड्डी, गजीफ्रॉक नी

खाद्यावर काळं मळकट फडकं ह्या मुलानी हॉटेलमधले पदार्थ खाल्ले तर हॉटेल मालक त्याना पायाने तुडवतात म्हणे आमची एवढी शिकलीसवरलेली मुलं त्यानी असं हलकं काम करायचं? मग अशा या देशात जाण्यासाठी एवढा अटापिटा कशासाठी करायचा? पण आता बोलण्याची वेळ निघून गेली होती मुलाची पावलं पुढे पडत होती एक्स-रे, डॉक्टरच्या तपासण्या चालू झाल्या होत्या मग लक्षात आलं की, तिथ त्याला जेवायला कोण करून घालणार? त्याला तर चहासुद्धा करता येत नाही शेवटी म्हटलं,

'बाबारे, चार स्वयपाकाचे जिन्नस शिकून जा '

माझं म्हणणं त्याला पटलं खरच शिकव म्हणाला पण केव्हा शिकवायचा त्याला स्वयपाक? सकाळ उजाडली की हा मुलगा नाहीसा व्हायचा तो रात्री उगवायचा पैशाची तरतूद, कपडेलत्ते, डॉक्टर तपासण्या यात सारा दिवस जायचा स्वयपाक म्हणजे काय पाढे आहेत? नुसते पाठ करायला? प्रत्यक्ष करून बघितल्याशिवाय काय येणार? ते काही जमलच नाही वाटल लाडू-चिवड्याचे डबे तरी भरून द्यावेत कुणीतरी सागितलं, अमेरिकेत काहीच खाण्याचे पदार्थ नेऊ देत नाहीत ते पदार्थ त्यांनी पाहिले की, सरळ ते कचऱ्याच्या कुडीत फेकून देतात शिवाय बरोबर दोनच बॅगा न्यायच्या २० किलो वजन फक्त त्यात माझ्या भूकलाडू-तहानलाडूच्या डब्यांना कितीशी जागा मिळणार? व्हिसा मिळाला नी जायची तारीख नक्की झाली मित्रांना पार्टी झाली जायच्या दिवशी तर घर लग्नघरासारखं गजबजल सर्वांनाच विमानतळावर त्याला पोचवायला यायच होत एक बस करून सर्वजण गेलो मुलाशी खूप बोलून घ्याव, त्याला डोळ्यात साठवून घ्याव, त्याला काहीतरी सागाव असं वाटत होत पण तोंड उघडल की, शब्दांच्या ऐवजी डोळ्यांत अडकवून ठेवलेल्या गगायमुनाच बाहेर यायच्या मुलालाही आमचा विरह जाणवत होता तोही डोळ्याला डोळा देण चुकवत होता मधूनच आम्हाला कवेत घेत होता पण मन आवरणं भागच होत

विमानतळावर कितीतरी विमान एकसारखी उडत होती एकदम मनात आलं, एवढा लाबचा प्रवास हा विमानाने करणार, विमान सुखरूप जाईल का की अपघात होईल? या काळजीने पुन्हा काळीज लकलकायला लागल शेवटी हिय्या करून म्हटलं,

'बाळा पोचल्या बरोबर तार कर हं '

'तार कशाला? विमान पोचणारच उगीच खर्च '

'होऊ दे पण तुझी तार आल्याशिवाय आम्हाला चैन पडणार नाही '

शेवटी कस्टम्स तपासणी, पासपोर्ट तपासणी होऊन आत गेला आम्ही सर्व विमानतळाच्या गच्चीवर गेलो विमान सुटण्याची वाट पाहात होतो खाली वाकून हा कुठं दिसतो का म्हणून पाहत होते डोळ्यापुढे अश्रूचा पडदा काय दिसणार? इतक्यात कुणीतरी म्हटलं, विमान सुटलं, विमान उडाल मी मान वर केली पूर्व क्षितिजावर सूर्यनारायण

हळूहळू वर येत होता मला तो शुभशकुन वाटला मी त्याला हात जोडले

घरी आलो घराचा कोपरा न् कोपरा सुनासुना वाटायला लागला खर तर मुलगा सबध दिवस घराबाहेरच असायचा पण आज तो नसल्याचं क्षणोक्षणी जाणवत होत एकदा वाटल, ह्याच्या अगावर जोराने ओरडाव, 'कशाला पाठवलात माझा मुलगा एवढ्या दूर?' पण त्याचा चेहरा पार उतरला होता माझ्या मनातला प्रश्न माझ्या चेहऱ्यावर त्यानी वाचला असावा त्याच्या चेहऱ्यावर आणखी अपराधीपणाची झाक होती दिवस उगवला की, मुलाची आठवण यायची मग म्हणायच, 'आता तो झोपला असेल' पण आता मन रमवायला दुसरे उद्योग शोधून काढायलाच पाहिजे होते आमच वधूवर सूचक मडळ होत आला गेला असायचाच महिला मडळात आणखी जबाबदाऱ्या घ्यायच्या चारचौघांत वेळ जातो तरी वाचन होतच दिवस जात होते मुलाची पत्र येत होती

अमेरिकेत पोचल्यावर तो चार दिवस कुणा ओळखीच्या घरी राहिला मग चार-पाच मित्रानी मिळून एक अपार्टमेंट घेतल इडियाच्या रुपयाचा भागाकार केल्यावरच त्याचे डॉलर्स झाले अगदीच थोडे त्यात कॉलेजचा खर्च, अपार्टमेंटच भाड, जाण्यायेण्याचा खर्च, जेवणाखाण्याचा खर्च बसवायचे कसे? अशक्यच होतं ते घरून पैसे फारसे मिळण्यासारखे नव्हते ज्याना मिळण्यासारखे होते त्यांना मागायचेच नव्हते कुणाची मदत घ्यायची नव्हती कुठंतरी नोकरी करायला हवी होती पैसे कमवायला हवे होते मग नोकरीसाठी शोधाशोध एकाला नाइट वॉचमनची नोकरी मिळाली १२ तास जागायच पुन्हा सकाळी उठून आपल्या उद्योगाला लागायच कस जमायच हे? अमेरिकेतले दुसरे ४-५ जण होते त्यातला एकजण म्हणाला, 'आपण सहाजण आहोत प्रत्येकान दोन दोन तास जागायच सुपरवायझरची चाहूल लागली की, सर्वांना उठवायच' असं खोट काम करायला मन धजेना पण पैशाची निकड दुसरी नोकरी मिळेपर्यंत ही नोकरी करायलाच हवी दुसऱ्याला गोडाऊनमध्ये खोके उचलायसाचलायच काम मिळालं, हमालीच ती पण तेही पत्करण भाग होत कुणी गॅस स्टेशनवर उभ राहून गाड्यात गॅस भरला तर कुणी सुपरमार्केटमध्ये, लोकाना पिशव्यात सामान भरून दिल कुणाला रेस्टॉरंटमध्ये वेटरची नोकरी मिळाली तो मात्र खूष सर्व पदार्थ कागदात गुडाळून द्यायचे कागदाचे, प्लॅस्टिकचे ग्लास वापरले की फेकून द्यायचे जेवणाखाण्याचा प्रश्न सुटायचा वर टीप मिळायची थोडे थोडे पैसे मिळायला लागले सकाळी उठून नाष्टा करून कामावर जायच तिथून परस्पर कॉलेजमध्ये जायच रात्री घरी परतायच व पोटपुजेला लागायच सुपाचे कॅन्स फोडून त्यात तिखटमीठ घालून आमटी बनवायची भातात हळद घातली की झाली खिचडी शनीरवी आजुबाजूची, लाबवरची जमतील तेवढी मुल एकेठिकाणी जमायची मग खिमा किवा चिकन करायच चहासाखरेशिवाय हाताशी मिळेल ते घालून कुणीतरी डाळीच पीठ उकडून त्यात ब्राऊन शुगर घालून, पुरणपोळ्याही केल्या होत्या तर एकाने मार्केटमधली आखखीच्या आखखी

कोंबडी उकडून मित्रांना मेजवानी दिली होती घरच्याची आठवण यायची आपलं घर, आपले नातलग, आपले मित्र यांच्याकडे मन ओढ घ्यायचं पण मुख्य प्रश्न होता तो पैशाचा चांगले पैसे मिळणाऱ्या नोकरीचा आपल्या शिक्षणाचा काही उपयोग करता येईल अशा कामाचा मुलामुलांचा संसार होता पण त्यात एखादं नवविवाहित दांपत्य असायचं एखादी एकटीच शिकायला आलेली मुलगी असायची या संसारालाही भांडीकुंडी, बाडबिस्तारा, कपडेलत्ते हवेच होते त्यासाठी पैशाची गरज सर्वांनाच होती म्हणून मुलाने कॉम्प्यूटरचे कोर्सेस घ्यायला सुरुवात केली रोजच्या धडपडीत ही आणखी भर पण त्यात त्याला आनंद होता कष्ट करण्याची तयारी होती आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याची जिद्द होती

मुलगा अमेरिकेला गेलाय आपण काय कधी जन्मात जाऊ शकणार नाही तेव्हा मी त्याला पत्रात अनेक प्रश्न विचारी त्याची उत्तरं तो पाठवायचा कधी मला वाचायला काही कात्रणं यायची नलूताई बसायला आली होती तशी मुद्दामच आली होती ती तिच्या मुलाचं तिला पत्र आलं होतं माझा लेक त्याला भेटला होता मला चांगलं वाटलं मी म्हटलं,

'तुझ्या मुलाने त्याला चार अनुभवाच्या गोष्टी सांगितल्या असतील '

'ते कुणास ठाऊक पण तुझ्या मुलाजवळ गरम कोट नव्हता असं लिहिलय् त्यानं '

काय गरम कोट नव्हता? मला हुडहुडीच भरली जणू आम्ही त्याला म्हणत होतो, इथंच गरम कोट विकत घे तर म्हणाला, 'मी लंडनला मित्राकडे उतरणार आहे तिथं घेईन ' शेवटी घेतलाच नाही म्हणायचा आता तिथल्या बर्फाच्या थंडीत कुडकुडत असणार मला डॉ आनंदीबाईंची आठवण झाली शिक्षणाची जिद्द करून एवढ्या लांब आली देश तसा वेष नको होता का करायला? पण नुसतीच साडी नेसून राहिली पौष्टिक खाणं खाल्लं नाही शेवटी काय उपयोग झाला त्या शिक्षणाचा? महाग म्हणून याने कोट घेतला नाही काटकसर म्हणून चिकन-मटण पण खात नसेल की काय? काय होईल याचं? एखाद्या माणसाची आपल्याला काळजी वाटायला लागली, आणि ते माणूस नजरेस पडलं, की काळजी मिटते पण हा मला दिसणार होता? माझी भुणभुण चालूच होती शेवटी हे म्हणाले,

'कशाला काळजी करतेस उगीच? कोटाशिवाय कसा राहील तो तिथं? त्याचं तिथं छान चाललय् नोकरी चांगली आहे ग्रेडस् चांगल्या मिळताहेत शिक्षण संपवून तो आता लवकर परत पण येईल '

'असं म्हणता? मग आपण मोठ्ठा ब्लॉक घेऊ त्याचं लग्न करू मग आपण सर्वजण एकेठिकाणी मजेत राहू ' माझ्या मनाचा वारू मोठा ब्लॉक, लग्न, सून, नातवंड अशी स्टेशनं घेत भरधाव सुटला होता

'त्याच्या घरी नाही राहायचं आपण मधूनमधून जाऊ पण इथंच राहायचं ' ह्यांचं बोलणं म्हणजे ठाम

मला खूप राग आला मुलगा चांगला मोठा ब्लॉक घेणार मग आम्ही कशाला या लहान जागेत राहायच? पण म्हटल, कशाला उगीच हुज्जत घाला? त्याच येण महत्त्वाच बाकीच्या गोष्टी आपोआप होतीलच

दोन दिवसानी त्याच पत्र आल पत्र वडिलाना आल होत मनातल्या मनातच पत्र वाचीत होते चेहरा नेहमीसारखाच होता पण वाचताना एखाद वाक्य मोठ्यानी वाचायच, मध्येच एखादा मिष्किल पुटका टाकायचा हा नेहमीचा शिरस्ता मात्र नव्हता पत्र माझ्या हातात दिल आणि म्हणाले,

'तुझ्या मोठ्या ब्लॉकची तयारी करतोय तो'

मी पत्र सगळ वाचलं त्याने लिहिल होत, 'माझ शिक्षण संपत आलय अमेरिकेच शिक्षण जस महत्त्वाच तसा अनुभवही महत्त्वाचा, म्हणून मी आणखी २-३ वर्षे इथ राहणार आहे, अनुभव घ्यायला तोपर्यंत पैसेही साठतील'

पत्र हातातच ठेवून मी बसून होते मनात येत होत म्हणजे तेच ते तो इथून जाताना, माझ्या समोर प्रश्न होते, तो परत केव्हा येईल? कधी भेटेल? की कायमच तिथ राहील? आहे का या प्रश्नाला काही उत्तर? मग मुलगा अमेरिकेत गेला याचा आनद मानायचा तरी कसा?

❋❋❋

# ३

# लग्न पाहावं करून!

'लग्न पाहावं करून' ही म्हण मी आयुष्यभर ऐकत आलेली आहे पण या अमेरिकेत
गेलेल्या मुलांनी, ती खऱ्या अर्थाने सिद्ध करून दाखवलीय् इथल्या तर सर्वांनीच लग्न
केली, घरही बांधली लग्नात विघ्न आली नकटीच्या लग्नाला तर सतराशेसाठ विघ्न
आली तिरळ्या ठकीचं लग्न जमावताना तिंबूनानाच्या नाकी नऊ आले चिमणराव गेला
बहिणीच लग्न जमवायला, आणि आला स्वतःचच लग्न ठरवून कुणी प्रीती फुलवून
फुलवून मग लग्नं केली ज्यांना तेवढा धीर धरवला नाही, त्यांनी एकमेकांच्या संमतीने
दुष्यंत-शकुंतलेसारखा गांधर्व विवाह उरकला प्रीती नाही, संमतीही नाही, त्यांनी
आडदांडपणे राक्षसविवाह केले मुली बघ बघ बघायच्या त्यातली त्यांच्या दृष्टीने सर्व-
गुणसंपन्न मुलगी निवडायची, मग हुंडा-करणीसाठी बैठक, साखरपुडा शेवटी धुमधाम
लग्न हा तर लग्न करण्याचा राजरस्ताच पण या अमेरिकेतून आलेल्या मुलांची लग्न
अफलातूनच दोन आठवड्यांची रजा घेऊन मुलगा इंडियात येतो काय, मुली पाहतो काय,
पसंत करून लग्न ठरत काय आणि होऊनही जात सगळा झटपट कारभार

विमलाबाईंच्या मुलीच असं लग्न झाल चर्चेला चांगलाच विषय चपूताई म्हणत
होत्या, 'एवढा अमेरिकेचा जावई मिळाला विमलाबाईंना, पण विशेष काही दिलेल दिसलं
नाही मुलीच्या अंगावर ठसठशीत दागिने नव्हते, जावयाला चांदीची भांडी नाही रुखवत
मांडायला वेळच मिळाला नाही म्हणे देऊन देऊन दिल काय तर मुलीच अमेरिकेच तिकीट
मी तर माझ्या लतासाठी कधीच दागिने करून ठेवलेत सगळी चांदीची भांडी घेतलीत

असा अमेरिकेचा जावई मिळाला असता, तर आम्ही नसत हो पैशांकडे पाहिलं पण नशीब पाहिजे ना आमच बलवत्तर '

चपूताईंची लता या अमेरिकेवाल्याने नापसंत केलेली आहे, हे इंदूताईंच्या लगेच लक्षात आलं आता आपल्यालाही आपल्या मनातली गोष्ट बोलायला हरकत नाही त्यांनी मन मोकळं केलं,

'आणि त्या मुलानं मुलीत बघितलं तरी काय एवढं? भुरी कातडी एवढंच ना? आमची स्नेहा तिच्यापेक्षा किती नीटस आहे द्रौपदी नव्हती का सावळी? तिच्यासाठी केवढा कठीण पण लावायला लागला द्रुपदाला देशोदेशाचे राजे आले तिच्यासाठी पण तुम्ही म्हणता तेच खरं आपलं नशीब आडवं येतं '

माझ्या डोळ्यासमोर परकऱ्या मुली उभ्या राहिल्या कानामागून जेमतेम खांद्यापर्यंत पोचलेले दोन बारीक शेपटे हातात चिंधूक नेसवलेली बाहुली आणि गाताहेत,

'पाहिन हिजसाठी अमेरिकेत शिकलेला नवरा सुंदरसा'

सर्वांनाच अमेरिकेचा जावई हवा असतो जन्मभर संसारासाठी कष्ट केलेल्या या आया त्यांना अमेरिकेत मुलाला मिळणारा डॉलरमधला लठ्ठ पगार, त्याची गाडी, सुसज्ज घर, तिथल्या सुखसोयी आपल्या मुलीला मिळाव्या असं वाटणारच कुसूमला पण तसं वाटत होतं कुसूम माझी मराठी शाळेपासूनची मैत्रीण तिच्यापेक्षा तिच्या मुलीलाच अमेरिकेत जाऊन शिकण्याची खूप इच्छा होती आईवडील म्हणत होते, 'तुझ्यासाठी अमेरिकेचा मुलगा बघू, लग्न करून देऊ मग खुशाल तू अमेरिकेत जाऊन शीक ' पण अमेरिकेच्या मुलाची बातमी त्यांना लागत होती, ती असं त्याचं लग्न झाल्यावरच म्हणून कुसूम मला वैतागाने म्हणाली,

'या लोकांना अमेरिकेतून येणाऱ्या मुलाचा वास लागतो तरी कसा?'

कुसूमचं गाऱ्हाणं देवानं ऐकलं आणि अमेरिकेच्या मुलाचं स्थळ तिच्या पायाशी चालत आलं कुसूमच्या मुलीचा गळा गोड, चांगली गाणारी ती कुठं एका समारंभात गायली ते कुणीतरी ऐकलं त्यांना तिचं गाणं आवडलं आणि मुलगी पण त्यांचा मुलगा अमेरिकेत होता त्याच्यासाठी त्यांनी आपली इच्छा हस्ते परहस्ते मुलीच्या आईवडिलांच्या कानावर घातली त्यांचं म्हणणं, मुलीला अमेरिकेला पाठवावी, तिथं मुलाचा काका आहे, तो लग्नाची सर्व व्यवस्था करील त्यांचं घराणं नामांकित मुलगा अमेरिकेचा इंजिनियर सगळं हवं तसं खरं म्हणजे 'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे' असं कुसूमला व्हायला हवं होतं पण झालं उलटंच अमेरिकेच्या मुलाला मुलगी द्यायची, प्रत्यक्ष वेळ आली तेव्हा ते दोघेही गडबडले मुलगा कसा असेल, तिथली खरी परिस्थिती काय असेल, आपली फसवणूक तर होणार नाही ना? अशा अनेक शंकाकुशंका त्यांच्या मनात यायला लागल्या

'आईवडील आम्मणहून मुलगी मागताहेत ते का? त्याच्या मुळात काही खोडबीड असेल का?' कुसूमने मला आपली पहिली शंका विचारली

'असच काही नसतं आपल्याकडेसुद्धा एखादी चुणचुणीत कामसू मुलगी दिसली, तर तिला मागणी चालतात हो शिवाय या मागणी घालणाऱ्याना पैशाचा लोभ नसतो आपल्या घरात मिळूनमिसळून वागणारी आपल्या मुलाचा ससार सुखाचा करणारी मुलगी त्याना हवी असते ' मी माझ मत सागितलं

'तरीपण अमेरिकेतल्या मुलाला मुलगी द्यायला मन धजत नाही ग तुला ती गोष्ट माहीत आहे का? असाच एक मुलगा लग्नासाठी इथ आला यायला तयारच नव्हता तो पण आईबापाचा आग्रह लग्न केल नी गेला परत मुलीला न्यायच नावच काढीना मुलीचा बाप पत्र लिहितोय्, मुलाचा बाप पत्र लिहितोय् हा आपला मूग गिळून बसलेला शेवटी सासरा सुनेला घेऊन अमेरिकेला गेला तर मुलाच्या घरात त्याची अमेरिकन बायको दोन मुलसुद्धा आता साग, तिने त्याची बटीक होऊन राहायचं का?'

'मी पण ऐकल्यात अशा काही गोष्टी पण सगळीच काय तशी नसतात एक लग्न झाल तरी पैशासाठी दुसर लग्न करणारे महाभाग इथ पण आहेतच की सात लग्न करणारा काझी, तो इथलाच न? दुसऱ्याना फसवणारी दुष्ट माणस दुनियेत सगळीकडे आहेत फसल जाऊ नये अशी काळजी आपणच घ्यायची त्या काझीला सात मुलींनी वरल पण त्या आधी त्याची चौकशी केली का? माहिती काढली का? आणि कुसूम, ही मडळी अमेरिकेत लग्न करायच म्हणताहेत, म्हणजे मुलाचं लग्न झालेल नाही एवढ नक्की '

'पण लग्नाशिवाय आणखी काही भानगडी असल्या तर? मुलगा बघितलेला नाही, त्याची चालवागणूक माहीत नाही, स्वभाव कसा आहे कुणास ठाऊक पोटचा गोळा एवढा सातासमुद्रापलीकडे द्यायचा तिथ काही वेडवाकड असल तर ती आपल्याला कळवेल तरी का? ती ग आपल्याच मडळातच्या बाईच्या मुलाची गोष्ट त्यांना आपण 'इदुरी साडी न् हिऱ्याची कुडी' असच म्हणायचो केवढा मोठा बगला त्यांचा मुलगा अमेरिकेहून आला दिसायला छकडा मुलीच्या बापाची नुसती रीघ लागली त्याच्याकडे श्रीमत बापाची एकुलती एक मुलगी पसत केली त्याच घर दुमजली त्या जिन्याला जितक्या पायऱ्या तितके हजार हुडा घेतला म्हणे शिवाय करणी विहीणबाईंचा मानपान, विहीणबाईंची हौस अशा मागण्या एकसारख्या चालूच होत्या लग्न करून मुलगी अमेरिकेला गेली तर काय? याला नोकरीच नाही कम्प्यूटर सायन्समध्ये मास्टर्स केलय् ही त्याची थाप काही शिक्षणच नाही बापान पाण्यासारखा पैसा खर्च करून लग्न करून दिलेल, आता त्याना कळवू तरी कस, अस त्या मुलीला झाल तिनेच नोकरी धरली पण या हीरोला नव्यानव्या हिरॉइन्स लागायच्या हिने नाराजी दर्शविली की हा डाफरायचा, म्हणायचा, 'जा चालती हो आपल्या बापाकडे' शेवटी अती झाल नी परत आली '

'या लोकानी तर मुलाची काहीच चौकशी केलीली दिसत नाही नुसता भपका बघितला अमेरिकेचा मुलगा म्हटल्यावर हुरळले पैशांच्या मागण्या मुग्ध झाल्यावर तरी, हे लोक पैशासाठी आपली मुलगी करताहेत अस का वाटल नाही?' आता मीच शका काढली

'खर म्हणजे त्याच वेळी त्यानी हे लग्न मोडायला पाहिजे होतं पण लोकापवादाला ते भ्याले त्या वेळी धैर्य दाखवल असत, तर मुलीची अशी परवड झाली नसती पैसे देऊन मुलीच सुख विकत घेता येत नाही, हे जेव्हा आपल्या लोकाना उमजेल तेव्हाच आपल्याकडले हुडाबळी थावतील ' कुसूम म्हणाली

'पण कुसूम, तुझ्या मुलीच्या बाबतीत पैशाचा काही प्रश्न नाही पण मुलगी द्यायची मग ती इडियात असो की अमेरिकेत असो, मुलाचा स्वाभाव, शिक्षण, नोकरी, वय या मुख्य गोष्टीची तरी माहिती काढायलाच हवी '

'ती खात्री झाल्याशिवाय आम्ही अमेरिकेत मुलगी पाठवणारच नाही ' कुसूम ठामपणे म्हणाली

कुसूमकडली माणस शहाणी होती, खटपटी होती त्यानी त्या मुलाची व्यवस्थित माहिती मिळवली व मगच मुलीला अमेरिकेत पाठवल मुलगी तिथं गेली, तिनेही मुलाची पारख केली लग्नही साग्रसगीत झालं गळ्यात माळ घालण, लाजाहोम, सप्तपदी सगळ इडियन, अमेरिकन बरीच मडळी जमली होती इडियन लोकाना अमेरिकेत वैदिक विवाहविधी पाहायला मिळाला याचं अप्रूप वाटल अमेरिकन लोकही कुतूहलाने सर्व बघत होते एक अमेरिकन बाई म्हणाली, 'तुम्ही अस लग्न करता म्हणून तुमचे घटस्फोट होत नाहीत ' एक अमेरिकन जोडपं, लग्नविधी बघून एवढं भारावून गेल की, त्याना आपल तस लग्न व्हाव अस वाटल त्याच्या लग्नाला दहा वर्षे झाली होती पण त्यानी खरोखरच गुरुजीकडून पुन्हा लग्न लावून घेतल व लोकाना पार्टी दिली कुसूमच्या मुलीने आईला लिहिल, 'आम्ही दोघं जणू जन्मोजन्मी एकमेकाची वाट पाहात होतो ' कुसूमचा जीव भाड्यात पडला

प्रभाताईच्या मुलाचही अमेरिकेत लग्न झाल तिथं जाऊन त्याला २ $\frac{१}{२}$ वर्षे झाली होती शिक्षण सपलं होत बऱ्यापैकी नोकरी होती लग्नाचे विचार मनात येत होते कुणाशी लग्न करायच, हे तर त्याने मनाशी कधीचच ठरवून ठेवल होत त्याच्याच चाळीत राहणारी मुलगी लहानपणी त्याच्याबरोबर लपाछपी, धावाधावी खेळलेली, भाडलेलीसुद्धा इडियात असताना तिला विचारावं, अस पुष्कळदा मनात आल, पण धीर होईना तिला मी आवडत असेन का? आईवडील काय म्हणतील? तिच्या घरचे नाही म्हणतील का? अमेरिकेत येताना तर फारच वाटल, एकदा सोक्षमोक्ष करावा पण तो तिथ आला, तेच मुळी पैशाची कशीबशी जुळवणी करून पुन्हा अमेरिकेत आल्यावर यश पदरात पडणार आहे, की

अपयशाचा धनी व्हायला लागणार आहे? ही शंका शेवटी ते राहिलंच आता मात्र त्याने मनाचा निश्चय केला त्याने तिला पत्र लिहिलं तेही घरच्या पत्त्यावर नाही कॉलेजच्या पत्र वाचून ती खुदकन हसली लबाडीने मुलाचं मानस आधीच हेरल होत वाटत अमेरिकेच्या मुलाने आपल्या मुलीला लग्नाच विचारलं, याचा तिच्या आईवडिलाना आनद झाला मुलीचा अभिमान वाटला प्रभाताई तरी कशाला विरुद्ध जातील हो? चांगल्या घरातली, डोळ्यांसमोर वाढलेली मुलगी मुलाला आवडलेली, डॉक्टर झालेली आणखी काय पाहिजे? त्यानी हौसेने तिची ओटी भरली, साड्या दिल्या मगळसूत्राची डबी तिच्या हातात दिली एवढच काय विमानाच तिकीट पण काढून दिल मुलगी अमेरिकेत आली लग्नाला १०-१५ माणस येणार होती लाबून लाबून मित्रमडळी येणार होती तिनेच स्वयपाक केला त्याने लुडबूड केली गुरुजीनी व्यवस्थित लग्न लावल

प्रभाताईच्या मुलाच्या लग्नाच ऐकल आणि मला माझ्या मुलाच्या लग्नाचे वेध लागले त्यालाही अमेरिकेत जाऊन जवळ जवळ तेवढीच वर्षे झाली होती तो सुद्धा अशी कुणी मुलगी इथून बोलवेल का? आमच्या नात्याच्या, ओळखीपाळखीच्या कितीतरी मुली माझ्या नजरेसमोर आल्या तो ही बोलवेल की ती बोलवेल हा मनात एकसारखा विचार रस्त्याने जाता येताना तरुण अविवाहित मुली दिसायच्या त्याच्याकडे मी निरखून पाहायची व मनाला विचारायची 'ही माझ्या मुलाला योग्य आहे का?' कोण त्याला सुखी करेल? कोण त्याची आमची जवळीक कायम ठेवील? हेच विचार त्याला सुदर मुलगी हवी असेल का? पण सुदर मुलीला आपल्या सौंदर्याचा गर्व असतो शिक्षणबिक्षणाची फारशी आवड नसते नको बाई अशी मुलगी आपल्याला त्यापेक्षा खूप शिकलेली, हुषार मुलगी केली तर अमेरिकेत ती आणखी शिकेल त्याच्याबरोबरीने नोकरी करेल शिकलेल्या मुली शहाण्या असतात मुलाच मन ओळखेल आईचं मन ओळखेल पण ती करिअर करिअर करत बसली तर? तिला ससारात रस वाटला नाही तर? बेताची शिकलेली साधीसुधी मुलगी बरी पण तिचा तरी स्वभाव कसा असेल? म्हणजे मुलासाठी मुलगी निवडण्याच काम कठीणच आहे पण या अमेरिकेत गेलेल्या मुलाला मी थोडीच सागणार होते, 'हीच मुलगी कर' म्हणून त्याच तोच काय ते ठरवणार कदाचित ठरवलही असेल त्याने त्या मुलीला तो अमेरिकेत बोलवेल पण लग्नाला आम्हाला नाही हजर राहता येणार मुलाचं काय नी मुलीच काय लग्न झाल की, आपल कर्तव्य सपत तो सोहळा बघावा, कर्तव्यपूर्तीचा आनद लुटावा अस वाटणारच पण चालेल मला लग्न बघायला मिळाल नाही तरी चालेल त्यान तिथ लग्न कराव त्याला तर जीवाभावाच माणूस मिळेल एकाला दोघ होतील मग मला त्याची कसली काळजीच नको केव्हा तरी ती दोघं इथ येतील मग हॉल घेऊन आपण मोठ्ठा सत्यनारायण करू नातलग, स्नेहीमंडळी, ओळखीपाळखीचे लोक सर्वांना बोलवू मी भराभर मनात माडे भाजीत होते ते लुटूपुटूचे माडे त्याच्या पानात वाढीत होते त्याच

म्हणणं एकच, 'त्याचं तो काय ते करील, तू कशाला विचार करून शिणतेस?' मुलाच्या लग्नाचे विचार आईला किती सुखावतात, हे त्यांना कसं समजणार? त्यासाठी आईच व्हायला हवं

मालूताईंच्या मुलाचं पण अमेरिकेत लग्न झालं ती तऱ्हा वेगळीच खरं म्हणजे जाण्यापूर्वी मालूताईंनी त्याचं लग्न ठरवलं, साखरपुडा केला, मगच तो गेला आता तो तिथं भेटलेल्या ब्रियानाशी लग्न करणार होता खरं म्हणजे ती अमेरिकन नव्हती इटालियन होती थोडे आपल्यासारखेच ते नवऱ्याचा वरचष्मा, घटस्फोट कमी ती पण त्याच्यासारखीच अमेरिकेत शिकायला आलेली होती दोघंही आपला देश, आपली माणसं, घरदार सोडून आलेले दोघांचे अभ्यासाचे काही विषय सारखे बरोबरीने लायब्ररीत जायचे, अभ्यास करायचे, चर्चा करायचे कटाळली की कॅफेटॅरियात जायचे कधी एखादी मुव्ही मैत्री वाढत गेली तिचं रूपांतर प्रीतीत कधी झालं, हे त्या-दोघानाही समजलं नाही साखरपुडा करून आल्याचं त्याला डाचत होतं पण ती मुलगी फारशी माहितच नव्हती ब्रियानाची ओढ मात्र विलक्षण होती शेवटी त्याने लग्न करण्याचा निर्णय घेतला आईला सर्व वस्तुस्थिती कळवली व तिने लग्नाला यावं अशी इच्छाही कळवली मालूताईंनी जायचं ठरवलं ह्या लग्नाचा विषय लोकांना खूप दिवस पुरला साखरपुडा मोडणारा मुलगा व त्याला साथ देणारी आई, दोघानाही लोकांनी दोषी ठरवलं मालूताई म्हणाल्या, 'लोक आम्हाला दोष देतात, त्याचं बरोबर आहे पण मुलाच्या पाठीशी राहा असं आईचं प्रेम मला सांगत '

एका चर्चच्या उघड्या आवारात, झाडांच्या गर्द राईत हे लग्न झालं कुणी गीतेचा अध्याय वाचला, कुणी बायबलमधले उतारे वाचले एकमेकांच्या हातात आंगठ्या घातल्या गळ्यात हार घातले टाळ्यांच्या कडकडाटात लग्न झाल्याचं जाहीर झालं मग मेजवानी

ह्या लग्नाची गोष्ट समजली तेव्हा माझ्या नजरेसमोर, सदा दुर्मुखलेली रमावहिनी उभी राहिली तिच्या नवऱ्याचं असंच दुसरीवर प्रेम होतं बापाने रमाच्या वडिलांना शब्द दिलेला बापाच्या विरुद्ध ब्र काढण्याची मुलाची छाती नाही लग्न केलं पण सगळा राग काढला निरपराध रमावहिनीवर तिला खंडीभर पोरं झाली पण नवऱ्यानं प्रेमाचा शब्द नाही नवऱ्याची नावडती म्हणून सगळ्यांकडून अवहेलना त्या काळात प्रेमलग्न करणं कठीणच होतं कुणाची पत्रिका जमायची नाही, कधी घराणी तोलामोलाची नसायची, कधी दोघही अगदी जवळच्या नात्याचे, कधी कुटुंबात एखादा रोग खरीखोटी अनेक कारणं पण मूळ मुद्दा मुलामुलींनी आपआपली लग्नं ठरवली हे वडिलधाऱ्यांना अमान्य मग मुलाकडची म्हणायची, 'भारंभार हुंडा देऊन आमच्या मुलाला मुली येताहेत् हिलाच काय सोनं लागलय् ' मुलीकडलीही काही कमी नव्हती त्यांचं म्हणणं, 'हा कसला मुलगा आम्ही हवा तेवढा हुंडा देऊन चांगला हुद्देदार मुलगा बघून देऊ आमच्या मुलीला ' मग कुणी आप्तेष्ट मध्यस्थी करायचे समजदार माणसं राजी व्हायची पण बहुतेकांना अनेक खटपटी

लटपटी करायला लागायच्या. कुंडलीतल्या ग्रहांची घर बदलून घ्यायची, एखादं छोटंस नाटक रचायचं. एखाद्या भोंदू गुरूला वश करून प्रेमसाफल्य करून घ्यायचं. एखादे हिरशिंगराव वडील आपला हेका मोडायचेच नाहीत. मुलगा एखाद्या नातलगाच्या मदतीने लग्न करायचा. घरी तुळस बाळकृष्ण विवाह सण व्हायचा. सून घरी यायची. नातवंड व्हायची. मग त्या दुधावरल्या मऊ साईत हा कठोर विरोध विरघळायचा. कधी ही प्रेमप्रकरणं परजातीत व्हायची. मग सगळी जात हादरायची. परजातीतल्या सुनेला घरात घ्यायचं कसं. 'या दोघांच पटणार नाही' ही तर सर्वांची प्रामाणिक समजूत. 'ह्याच्या मुलाशी कोण लग्न करणार?' साऱ्या समाजाला ही चिंता. वीस वर्षांनतरच्या गोष्टीची. जमदग्नी वडील, 'या पोराने माझा केसाने गळा कापला.' असं म्हणून शेंडीत राख घालायचे. मुलीचे तर हालच. तिला कोंडून घालायचे, मार खावा लागायचा. त्या दोघांच्या मनाची रस्सीखेच. मुलाचं प्रेम व नवऱ्याची भीती या कात्रीत सापडलेली आई. मुलीला घरून पळून यावं लागायचं. एका मुलीने चोरून लग्न केलं नी मंगळसूत्र नऊवारी साडीच्या केळ्यात खोचून ती वावरत असे. मुलगा नाइलाजाने वेगळं बिऱ्हाड करायचा. आई, वडिलांच्या नकळत लहान भावंडांना त्याच्याकडे पाठवायची. नातवंड झालं की मग तो गोंद हे रक्ताचं नातं चिकटवून टाकायचा. परधर्मात लग्न हा प्रकारही क्वचित का होईना घडत होता व. तो म्हणजे भलताच गहजब. वर्तमानपत्रातून त्याची चर्चा. एका मराठी मुलाने पारशी मुलीशी लग्न केलं. पारशी म्हणजे शामळू. पण ते लोक त्याला मारायला टपले होते. मित्रांनी त्याला गोठ्यात लपवला होता. मालिनी-खान लग्नाने विविधवृत्ताचा खप चांगलाच वाढवला होता. हळूहळू ही प्रेमलग्नं जास्त प्रमाणावर व्हायला लागली. मुलामुलींनी एकदा ठरवलं की, ते ती गोष्ट करणारच. जे केलं ते यशस्वी करण्याची जबाबदारी ते पत्करणार. अशी वडिलधाऱ्याची खात्री पटली आहे. म्हणून विरोधाची, टीकेची धार बोथट झालीय.

मुलं अमेरिकेत आलीत. कॉलेजात, नोकरीच्या जागी अमेरिकन तरुणी भेटतात. ही मंडळी मनमोकळी, बोलकी, मदत करायला तयार. असाच एक मुलगा पीएच.डी. करत होता. खूप पुस्तकं लागायची त्याला. लायब्ररियनशी ओळख झाली. ती त्याला कुठून कुठून पुस्तकं मिळवून द्यायची. आपल्या गाडीतून त्याला कुठे न्यायची. त्यातून त्याचं प्रेमलग्न झालं. एकजण आजारी पडला. त्याला हॉस्पिटलमध्ये राहावं लागलं. तिथल्या नर्सच्या प्रेमात पडला. इंडियातून एवढ्या लांबून मुलं इथं शिकायला आलीत, याचं अमेरिकन कुटुंबाला कौतुक वाटायचं. या मुलांना कधीतरी घरगुती वातावरण मिळावं म्हणून अशा कुटुंबांनी कॉलेजमध्ये क्लब स्थापन केले. एकएक कुटुंब एकाएका मुलाची होस्ट फॅमिली बनली. एखाद्या वीकएण्डला त्या मुलाला घरी न्यायचं. कधी पिकनिकला न्यायचं, त्याला लागणाऱ्या वस्तू आपल्या गाडीतून नेऊन आणून द्यायच्या. अशा होस्ट फॅमिलीतली एक मुलगी. तिला इंडियाबद्दल कुतूहल. इंडियात अमेरिकेप्रमाणे शहरं आहेत, इंडियातले सर्वच

लोक गरीब नाहीत, ही तिला नवी माहिती मिळाली. ह्या मुलाचे भाऊबहिणी उच्च शिक्षण घेताहेत त्याची आई, मावशी, आत्या शिकलेल्या आहेत नर्स शिक्षिका म्हणून पैसे कमावताहेत याच तिला नवल वाटायच आपल्याबद्दल एवढ्या आपुलकीने चवकशी करणारी मुलगी त्याला जवळची वाटली

पण या मुलाना अमेरिकन मुलीशी लग्न करण्याचा धीर झालाच कसा? आमच्या मनात आलेली गोष्ट स्वतःच्या मनाशी उच्चारायलाही आम्हाला धीर होत नव्हता म्हणून तर वडिलांनी आमच दाव ज्या ठिकाणी नेऊन बाधल तिथ निमूट गेलो आता आहे का तस? आर्थिकदृष्ट्या तर ती स्वतःच्या पायावर उभी आहेतच शिक्षणाने त्याच्या ज्ञानात भर पडलीय् हे ज्ञान त्याना स्वतत्र विचार करायला शिकवतंय् स्वतःच्या प्रश्नाचे निर्णय स्वतःच घेण्याची त्याच्यात कुवत आलीय्, घेतलेले निर्णय तडीस नेण्याचीही कोण काय म्हणेल, कोणाला काय वाटेल यापेक्षा मला स्वतःला काय हवय् याला महत्त्व आहे, असा आत्मविश्वास त्याच्यात आलाय् स्वतत्र वातावरण, स्वतंत्र विचारसरणी याचा हा परिपाक आहे म्हणूनच त्याच्या मनाने ठरविलेल्या अमेरिकन मुलीशी लग्न करण्याच त्यांच्यात धैर्य आलय् स्वातत्र्य व धैर्य याच समत्रैराशिक आहे त्याचं उत्तर वाढीतच येणार तरीपण अमेरिकन मुलीशी लग्न करणाऱ्यांची सख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच बाकीचे सरळ इडियात गेले मुली बघितल्या, ठरवल्या, थाटामाटात लग्न करून परत आला क्वचित एखाद्याला त्यासाठी तीनतीन फेऱ्या माराव्या लागल्या इडियातल्या मुलांचा लग्न करण्याचा जो राजरस्ता, तो याचा राजमार्ग काही फरक नाही

अमेरिकेतल्या मुलाच्या लग्नाच्या कथा मी तुम्हाला सागत होते, पण माझ्या मनात सतत माझ्या मुलाच्या लग्नाचे विचार घोळत होते त्याने ज्याअर्थी इथली मुलगी अमेरिकेत बोलावली नाही, त्याअर्थी त्याच इथ काही कुणावर प्रेमबिम नाही म्हणजे आता एकच शक्यता हा अमेरिकन मुलीशी लग्न करणार बाई ग मग कस होणार? मी आडून सगळ्या प्रीतिविवाहाची तरफदारी केली त्याच्या धैर्याची प्रशसा केली मुलाच्या मनासारख झाल, यात आईबापानी आनद मानावा असा परोपदेश केला पण माझ्यावर ही वेळ आली तर? मला कल्पनाच करवेना माझी मैत्रीण गुजराथी मासाहार करणारी सासू आपल्या भाड्यात ते ती शिजवू देत नाही तिला मराठी धड बोलता येत नाही सासूला गुजराथी येत नाही कुठली जवळीक हो अमेरिकन मुलगी म्हणजे तर संस्कृतीची वेगळी माझ्याशी नाही समजा पण माझ्या मुलाशी तरी ती समरस होईल का? त्याला सुख देईल का? उठल्यासुटल्या डायव्होर्स मागणाऱ्या त्या डायव्होर्स म्हणजे ससाराचा विचका आणि मुलाची दुर्दशा अरे देवा, माझ्या मुलाच्या ससाराचा असा विस्फोट होईल की काय? माझ डोक भणभणून गेल काही सुचेना इतक्यात त्याच पत्र आल त्यात लिहिल होत, 'लग्न करून पाहाव म्हणतोय् '

❊❊❊

४

# मागे वळून पाहता

सकाळी उठले, तर सगळीकडे चिडीचूप कोणाच्या बोलण्याचा आवाज नाही, कुणाच्या नळाचा आवाज नाही, स्टोव्हचा फरफराट नाही की दुधाची शिट्टी नाही रस्त्यावरसुद्धा सगळं चिडीचूप माणसाच्या हालचालीची, बोलण्याचालण्याची काही जाग नाही मधूनमधून एक आवाज यायचा कुणीतरी गाडीत बसून फर्कन् निघून जायच इंडियात पहाटेपासून आवाज सुरू व्हायचे झाडूवाले झाडताहेत, पेपरवाले धाडधाड जिन्याची चढउतार करताहेत, घराची घंटी वाजवताहेत इथ कुणी अस अचानक घंटी वाजवून येतच नाहीत मला राजाभाऊंची आठवण आली सकाळी शिवाजी पार्कला फिरायला आले तर कधी चहाला आमच्याकडे यायचे माझी इतकी गडबड असायची कामाची पण कुकर उतरवून आधी चहा करायला लागायचा खर म्हणजे राजाभाऊच नुसत नाव त्याच्या नावावर ह्यानाच, आणखी एकदा चहा हवा असायचा कधी कधी मला राग यायचा पण इथं आल्यावर ते राजाभाऊ यावेत, अस फार वाटायच पण चिटपाखरू फिरकायच नाही कधी कधी अगदी भकास वाटायचं

पण वीक - एण्डला मात्र हे सगळं बदलायच सगळी माणस घरात, शिवाय कुठंतरी जायचं, कुणीतरी यायच पुष्कळ जमायचे, गप्पागोष्टी, खाणपिण भुर्रकन् संपायचा वीक-एण्ड या वीक-एण्डला यायची होती लीला खटाव बिल्डिंगमध्ये शेजारी शेजारी राहिलेल्या होतो आम्ही पण मग मात्र कित्येक वर्षात आमची गाठभेट नाही तिचा मुलगा, अमेरिकेत गेल्याच कुणाकडून तरी, कधीतरी कळल होत इथं आल्यावर चवकशी केली तेव्हा पत्ता

लागला ती पण माझ्यासारखी मुलाकडे आली होती ती राहायलाच आली होती समवयस्काशी, गप्पा मारायची संधी कितीतरी दिवसानी मला मिळत होती शेंडा ना बुडखा अशाच गप्पा त्या मग ती आपल्या मुलाच एक एक सागायला लागली

'पधरा वर्षं झाली, त्या गोष्टीला आमची का परिस्थिती होती, त्याला अमेरिकेत पाठवायची? पण हा मुलगा पहिल्या नंबरचा हुषार लहानपणापासून कधी अमुक कपडा हवा म्हणाला नाही की तमुक खायला हव असही नाही अमेरिकेला जातो म्हणाला तेवढच पण पाठवायचं कस? तो म्हणत होता, मला फक्त•जाण्याचा खर्च द्या बाकी माझ मी बघून घेईन त्याला अमेरिकेत गरज पडली तर इथून पैसे पाठवीन', अस कुणीतरी लिहून द्यायला हवं होत तो कुणाची दिडकीसुद्धा मागणार नव्हता पण सही तर हवीच न? आणली बाई त्याने कुणाची तरी आम्हाला मुलाच मन मोडवेना कमीत कमी तिकिटाची बोट शोधून काढली आणि पाठवला त्याला मी दुधाच्या सेंटरवर काम करायची निभल आमच कसतरी '

'पण इथ आल्यावर कस चालल त्याच? खूप अडचणी आल्या असतील न?'

'तर ग मुख्य अडचण पैशाचीच आपल कुणी नाही एक मित्र होता पण तोही दूरच्या गावी त्याने स्वीपरच पण काम केल असं सूनबाई आता सागते कुठतरी दोनचार मुलांबरोबर राहायच, स्वत राधून खायचा कॉलेजच्या लायब्ररीतून पुस्तक मिळवायचा तिथ काहीतरी काम करायचा काही हवं झाल, तर जाणार कसं? इथ बसची गाडीची कसली सोय नाही हा मुखदुर्बळ पण कोणतरी चागल माणूस भेटायच, भागायच याचं कसतरी पण याने आपली जिद्द पुरी केली पीएच डी झालाच पुऱ्या आठ वर्षांनी माझ पोर मला भेटलं '

'पण त्याच्या पूर्वी कोण आलेल तुम्हाला भेटल का?'

'मला तस कुणी भेटल नाही पण शिकायला कोण कोण आलेच असतील की आणि सेनापती बापट नाही का आले? बॉम्ब करायची विद्या इथंच शिकले ते जयप्रकाश आले

पण त्याही पूर्वी कुणी आलच असेल

आनदीबाई नाही का आली डॉक्टर व्हायला तिची ती कार्पेंटर मावशी, तिच्या कॉलेजचे प्रोफेसर्स किती कौतुक वाटल त्याना तिच

ती शभर वर्षांपूर्वीची गोष्ट पण ही सर्व मडळी आली आणि परत गेली माझ म्हणणं, इथ काय राहायला कुणी आले का? इतर देशातले लोक जसे आले तसे

काय की बाई पण कॅलिफोर्नियात पुष्कळ शीख आहेत त्याची खूप शेतीभाती आहे त्याची देवळं आहेत, अस मी उडत उडत ऐकलय खर '

लीला परत गेली पण माझ्या मनात तोच विचार घर करून राहिला पहिल्यादा इथ कोण इडियन्स आले? ते कुठे राहिले? कसे राहिले? त्याना काय अडचणी आल्या?

पण असा विचार मनात घुमवणारी मी एकटीच? मी तर कोण आले? कसे आले? अस नुसत घोकतच राहिले पण दुसरे जे होते, ते विद्वान होते, अभ्यासू होते, उद्योगी होते त्यानी ह्या प्रश्नाचा छडा लावलाच त्यातले प्रमुख म्हणजे डॉक्टर श्रीपती चद्रशेखर आपल्या भारताचे पूर्वीचे मत्री आरोग्य व कुटुबनियोजनाचे प्रख्यात डेमोग्राफर ते जन्म, लग्न, मृत्यू सर्व गोष्टीची नोंद ठेवणारे त्यांनी अमेरिकेच्या इमिग्रेशन धोरणाचा अभ्यास केलाय् फक्त इडियाच्या नव्हे तर चीन, जपान याच्या बाबतीतसुद्धा अमेरिकेच्या, इडियाच्या लायब्ररीत या विषयावर लिहिलेले लेख वाचलेत पूर्वीचे वर्तमानपत्रातले या विषयावरचे लेख तेही जमवले त्यानी काही युनिव्हर्सिटीत या विषयावर अभ्यास-सशोधन करून विद्यार्थ्यांनी थिसीस लिहिलेत काही ठिकाणी या विषयावर कॉन्फरन्सीस झाल्या त्याचे वृत्तान्त त्यानी मिळवले इतका सखोल अभ्यास करून, त्यानी लेख लिहिलेले आहेत म्हणजे रवा खरपूस भाजून, पाकात टाकून, वेलची बदामसुद्धा घातलेय् त्यांनी मी फक्त त्याचे लाडू वळून तुमच्यापुढे ठेवतेय्

त्याना एक डायरी मिळाली मॅसॅच्युस्टेट्समधल्या सालेम गावच्या धर्मगुरूची विल्यम बेन्टली हे नाव त्यांचं त्यांनी लिहिलय्, 'आज प्रथमच एक इडियन भेटला, त्याला पाहून आनद वाटला' त्यानी त्याच जे वर्णन केलंय् त्यावरून तो दाक्षिणात्य असावा, असा श्री चद्रशेखर याचा कयास या डायरीच्या पानावर तारीख होती २८ डिसेबर, १७९० म्हणजे दोनशे वर्षांपूर्वी एक इंडियन अमेरिकेत येऊन गेला त्या वेळी इंडियात ब्रिटिशाच राज्यसुद्धा नव्हत अशा वेळी हा माणूस, एका व्यापारी जहाजातून, कॅप्टन गिबाऊट बरोबर, अमेरिकेत पोचला होता इग्रजी राज्य आल्यावर लोक इग्रजी शिकले पण या हुषार माणसाला त्या वेळी इग्रजी भाषा येत असणार त्याशिवाय त्याने एका इंग्रज कॅप्टनबरोबर एवढा प्रवास केला? रेव्हरंड बेन्टलीशी तो बोलला असणार, तेव्हाच त्याचं मत त्याच्याविषयी चागल झाल इग्रजी भाषा येणारा, एवढ्या दूरचा प्रवास करणारा हा इडियन माणूस, त्याची अधिक माहिती मिळायला हवी होती

त्यानतर साठ वर्ष कुणी इडियन, आलागेल्याची नोंद नाही पण १८५१ सालची गोष्ट ४ जुलै हा अमेरिकेचा स्वातत्र्य दिन त्या दिवशीच्या परेडमध्ये सहा इडियन लोकानी भाग घेतला होता, असं एका रिपोर्टवरून समजतं कोण होते हे इडियन्स? पजाबी? बगाली? मद्रासी? की महाराष्ट्रीयन? पण हा प्रश्न कशाला? इथ रस्त्यावर किंवा मॉबमध्ये एखादं इडियन जोडप दिसल की पटकन् ओळखू येते व त्यांच्याशी बोलावसही वाटतं तशी ही सहा इडियन माणस इथ आली त्यानी ईस्ट इडिया मरीन सोसायटीचा गणवेश घातला छाती पुढे काढून, मान उच करून, ते परेडमध्ये ऐटीत चालत होते लेफ्ट-राइट, लेफ्ट-राइट

आणखी सुरस गोष्ट आहे ती पार्श्यांची १८७१-७२ साली इडियाची पहिली

जनगणना झाली तेव्हा लोकसख्या होती १९ कोटी त्यात पारशी अवघे १,००,००० ब्रिटिश, पोतुगीज व्यापाऱ्यांचे हे इडियातले मध्यस्थी तेही सधन व्यापारी होते ब्रिटिशाच्या जवळिकेमुळे त्यानी त्यांचे काही रीतिरिवाजही उचलेले पूर्वी पार्शी बायका, रेशमी किंवा जरीचे काठ लावलेल्या साड्या नेसायच्या, डोक्याला पाढरा रुमाल बाधायच्या ते जाऊन फ्रॉक्स आले बॉब आल पुरुषांनीही काळी चकचकीत उभी टोपी लांब कोट टाकून, इंग्रजी सूटबूट घालायला सुरुवात केली ब्रिटिशांच्यामुळे त्याची अमेरिकन व्यापाऱ्याशी ओळख झाली इडियातले लोक, विशेषत गुजराथी केनिया, युगांडा, झाबिया, मालावी अशा देशांत जात होते भरपूर पैसा कमवत होते तेव्हा पार्श्यांच्या मनात अमेरिकेला जाण्याची कल्पना आली पण ते जाणार होते म्हणजे पाच-पचवीस माणस नाही, पाच दहा कुटुबं नाही, तर सर्वच्या सर्व १,००,००० लोक अमेरिकेबद्दल सर्व माहिती मिळावी म्हणून त्यांनी अमेरिकन कौन्सिलला पत्र पण लिहिलं पण कुठ माशी शिंकली कुणास ठाऊक त्याचा बेत बारगळला एवढ खर सर्वच्या सर्व जातजमात घेऊन दुसऱ्या देशात जायच, तिथ आपली कॉलनी करायची, हा बेत करणारे पार्शी एकमेव या लोकांचा एकोपा, त्याचं एकमेकांवरच प्रेममात्र वाखाणण्याजोग श्रीमत पार्श्यांनी, गरीब पार्श्यांसाठी पार्शीवाडे बाधलेत त्याच्या मदतीसाठी ट्रस्टस् केलेत. पार्शी भिकारी तुम्ही कधी पाहिलाय्? हे ब्रिटिशाचे जवळचे ब्रिटिश राज्य चांगलं चालावं म्हणणारे पण तरीसुद्धा त्याना ने राज्य सोडून जावस वाटलं म्हणजे इग्रज त्यानाही भेदभावाने वागवत असणारच इडियातल्या इतर सर्वांच्या मनात, ब्रिटिश राज्याबद्दल असतोष होता, तसाच ह्याच्याही मनात होता, असच म्हणायच

विसाव शतक उजाडता उजाडता, इंडियन लोक अमेरिकेत यायला सुरुवात झाली आलेले कॅनडामधून कॅनडाच्या कन्स्ट्रक्शन कपन्यानी बोटी भरभरून हिंदी मजूर आणले वर्षाला साधारण दोन हजार त्यात जास्त भरणा शिखाचा शेतकरी, मजूर, सुतार, थोडे सैन्यातले जवान असे कॅनडातल्या थंडीचा कडाका त्यांना सोसेना कॅनडातल्या लोकाशी त्याचं जमेना म्हणून ते कॅलिफोर्नियातल्या उष्ण हवेत आले पण कुठही गेलं तरी, पळसाला पानं तीनच तिथं रेड इडियन, आयरिश असे मजूर होते तेही अनपढ त्याना ह्याच येणं आवडल नाही आगगाडीच्या डब्यात माणसं बसलेली असतात पुढच्या स्टेशनवर गाडी थांबली की, दुसरी माणसं आधी शिरायला बघतात ती आत येऊ नये म्हणून, डब्यातली माणसं किती खळखळ करतात कधी मारामारी तसच होतं ते इंडियन्सच्या आधी, चिनी, जपानी मजूर आले होते त्यानाही विरोध झाला

चिनी मजूर फार कष्टाळू कमी मजुरीवर काम करायला तयार त्यांच्या देशात लोकसख्या भरमसाठ कॅलिफोर्नियात सोन्याच्या खाणी सापडलेल्या खणायखोदायला माणसं हवी होती चीनच्या बादशहाशी बर्लिंगेम तह झालेला होता इकडची माणस तिकडे,

तिकडची माणस इकडे जाण्याची परवानगी होती, म्हणून पोट भरायला चिनी मजूर अमेरिकेत आले आशियाई सस्कृती चारपाच हजार वर्षांची कॅलिफोर्निया अवघ १३२ वर्षांच कस जमाव त्याच एकमेकाशी? अमेरिकेतल्या मजुराना चिनी मजुराची राहणी कंजुष वाटायची, गलिच्छ वाटायची मग भाडण, मारामाऱ्या ह्या नव्या मजुराना हाकलावं म्हणून लीगची स्थापना केली त्यानी माणूस एका दृष्टिकोणाने विचार करायला लागला की, त्याला आपलच बरोबर आहे अस वाटतं त्यात समविचाराच्या माणसाचा ग्रुप झाला की, दुसरा विचार पार चुकीचाच अशी त्याची ठाम समजूत होते पोटाची खळगी भरण्याची पचाइत असणाऱ्या चिनी मजुराना कजुषपणे वागण भागच होत स्वच्छतेमुळे काय होत हे त्याना माहितच नव्हत त्यामुळे भाडण इतकी वाढली की, १८८२त Chinese Expulsion कायदा करायला लागला

जपानने कधी अमेरिकेची दखल घेतलीच नव्हती आपण बरे आणि आपली लहान लहान बेटे बरी, ही त्याची वृत्ती देशाबाहेर जाण्याची बंदी अमेरिकेने जेव्हा आपणहून जपानी व्यापारी सबध जोडले, तेव्हा जपानच्या बादशहाने आपल्या मजुरांना पासपोर्ट दिले आणि जपानी लोक हवाईत आले चिनी लोकावर बदी करण्यात अमेरिकन मजूर यशस्वी झाले होते आता जपान्यावर का नको? त्याना एक कारण मिळाल अमेरिकेत आलेल्या जपानी लोकांत काही बिनलग्नाचे तरुण होते जपानी समाज लहान त्यातून त्याना वधू मिळेनात म्हणून त्यानी जपानमधून मुलीचे फोटो मागवले त्या फोटोशी लग्न केल मग त्या मुलीला, अमेरिकेत कायदेशीर रीतीने यायला परवानगी होती अमेरिकन मजुराच म्हणण, 'हे लोक अशी लग्न करणार, मग त्याना मुलंबाळ होणार, म्हणजे या जपान्याना अमेरिका पिवळी करायची आहे तेव्हा फोटो लग्नावर बदी घालावी ' अशा लग्नाची जपानमध्ये पद्धत होती शिवाय त्या काळी अशियाई देशात, वडील माणसंच मुलामुलींची लग्नं ठरवत असत शिवाय, जर हे तरुण लग्नासाठी जपानमध्ये गेले असते, तर त्याना पुन्हा अमेरिकेत प्रवेश मिळणं अशक्यच होतं जपानी मजुराना येण्याची बदी करावी, असं लोकमताचं दडपण वाढतच होत रूझवेल्ट सरकारला जपानशी सलोखा हवा होता कॅलिफोर्नियातल्या मतदाराची मनही मोडता येत नव्हती म्हणून अमेरिकन सरकारने जपानशी Gentlemen's Agreement केलं त्यानुसार जपानने यापुढे आपले लोक अमेरिकेत पाठवू नयेत व त्या मोबदल्यात, अमेरिकेत असलेल्या बादशहा मिकाडोच्या प्रजेला, अमेरिकेने कमी लेखू नये असं ठरल

या पार्श्वभूमीवर इडियन मजूर अमेरिकेत आलेले आले ते कायदेशीरपणेच पण अमेरिकेतल्या मजुराना त्याच येण कस रुचावं? ते खाण्यापिण्यावर, कपड्यालत्त्यावर फारसा खर्च करायचे नाहीत मौजमजा तर दूरच त्याची ही कंजुषी अमेरिकन मजुराना मुळीच आवडायची नाही पण ते ज्या घरातून आले, त्या घराची परिस्थिती याना कशी

समजणार? वडिलोपार्जित शेतीचा लहानसा तुकडा, बापाच्या वाटणीला आलेला मुलंबाळ, लेकीसुना, नातवंडं असा मोठा परिवार कसं भागणार? म्हणून तर या एका मुलाला, एवढ्या दूर पाठवला अर्ध्या जगाचा प्रवास तीन महिने लागायचे काहीतरी कमवून पाठवेल, या आशेने, मन घट्ट करून पाठवलेला तो आपल्याला मिळालेले सर्व पैसे कसे फस्त करील? त्या काळी लहानपणी लग्नं व्हायची म्हणजे याचीही मुलबाळ असणारच अमेरिकेतल्या मजुरांची स्थिति वेगळी प्रत्येकजण आपआपलं कमवून खात होता पण इंडियन मजूर नको यात खरं कारण पैशाच होतं इंडियन मजूर चिनी लोकांच्या इतके नसले, तरी कामसू होते कमी मजुरी मिळाली तरी कामाला तयार ह्या लोकाबरोबर आपलीही मजुरी कमी होईल, ही खरी अमेरिकन मजुराना भीती वाटत होती म्हणून त्यांच्याबरोबर भांडणतंटे, मारामाऱ्या, दंगेधोपे कधी त्याना कोंडून ठेवायचे कधी गावाबाहेर हाकलायचे मजुराच्या पुढाऱ्यांना आपलं पुढारीपण टिकवायला या प्रश्नाचं भांडवल करणं भागच 'त्यांनी मागणी केली इंडियन लोकांचे आर्थिक व राजकीय हक्क खच्ची करा वर्तमानपत्रानाही, आपला खप वाढवायला काहीतरी सनसनाटी हवच Overland नावाच्या वर्तमानपत्रात एक माथेफिरू लेख आला

अमेरिकेवर हिंदूंच आक्रमण त्यांच्या वेदानी, त्यांना सर्व पृथ्वी आक्रमण करण्याचा आदेश दिला आहे

वेदांनी आदेश दिला खरा पण तो पाच हजार वर्षांपूर्वी त्या वेळी पृथ्वीवर फार थोडी माणसं होती ती इकडे तिकडे गेली, म्हणून तर आज दिसतय् तसं सुंदर जग तयार झालं कोलंबसने अमेरिका शोधून काढली, तेव्हा तिथं फक्त मुठभर लोकच होते न? युरोपमधल्या देशातून कितीतरी लोक इथं आलेले आहेत इंडियन्स फक्त सहा हजार तो आकडा त्यांनी फुगवून फुगवून दहा हजार केला तरीसुद्धा इतराच्या मानाने अगदीच कमी आजसुद्धा तीच स्थिति आहे लीगच्या पाठिंब्यावर निवडून आलेले राजकीय पुढारी, त्याना तोच कार्यक्रम जारी ठेवणं भागच त्यांनी इंडियन लोकाचे दोष काढायला सुरुवात केली काही खरे, काही खोटे इंडियन लोकात जातिभेद आहेत, ते अनेक बायका करतात, ते गरीब आहेत, तेव्हा चोऱ्यामाऱ्या करतील पुरुष पुरुष तेव्हा लैंगिक गुन्हे करतील ते अंधश्रद्ध आहेत त्यांना आपली संस्कृती अमेरिकेत आणायची आहे अंधश्रद्ध लोक सगळ्या समाजात असतात आताच्या घटकेला, इथं पण आहेत धर्माने मना केलीय् म्हणून पोटच्या मुलीला औषध न देता मरू देणारे, त्या आईवडिलावर सरकारने खटला केलाय्, आणि संस्कृती काय, इकडून तिकडे न्यायची वस्तू आहे झाडसुद्धा इकडचं तिकडे जगत नाही संस्कृती त्या त्या देशांतल्या माणासाच्या वागण्या, चालण्यात, पेहेरावात, संगीतात, कलामध्ये विखुरलेली असते या सर्वांचे रसायन त्या त्या देशांतल्या लोकानी शतकानुशतक, पिढ्यान् पिढ्या मुरवलेलं असतं ते काय बुदलीत भरून आणण्याजोगं? पण आपलं

म्हणण लोकाना पटवायसाठी लोक कुठचातरी खराखोटा मुद्दा माडतात त्यामुळे इथल्या लोकाची मन इडियन्सबद्दल कलुषित झाली लोकमताचा दबाव वाढला सरकारने सहा जणाच कमिशन नेमल त्यानी ४२ कलमी रिपोर्ट तयार केला सगळ पूर्वग्रहावर अधारित सरकारने १९०७ साली एक barred zone निर्माण केला त्यात चीन, जपान पूर्वीपासून होतेच आता इंडियाचाही समावेश झाला

असे कायदे होत होते, तरी काही इंडियन्स, मेक्सिकोमधून बेकायदा अमेरिकेत येतच होते काहींना हद्दपार केल जाई, पण काही लपूनछपून राहातच काही धदा व्यवसाय करायला लागले होते काही शेताचे मॅनेजर होते तरीपण बहुसख्य शाळा न शिकलेले मजूरच होते अमेरिकेत शिक्षणासाठी विद्यार्थी येत होते पहिले महायुद्ध सुरू झाले होते ब्रिटिश सत्ता हिदुस्थानातून उखडून टाकायला ही नामी सधी आहे, अस काही विद्यार्थ्यांना वाटल त्यानी युगातर पक्ष काढला गद्दार वर्तमानपत्र सुरू केल इडियन लोकांना इडियात जाऊन, ब्रिटिशाशी लढण्याचा आदेश दिला त्याप्रमाणे ४०० लोक आले फारसे आलेही नाहीत त्यामुळे, हटाव मोहिम थोडी थडावली पण युद्ध सपल्यावर, तिला पुन्हा जोर चढला युरोपियन मजुराची उपासमार होईल, हे नव कारण पुढे आल आणि १९२४ साली आणखी एक कायदा झाला जे लोक अमेरिकन नागरिक व्हायला पात्र असतील, त्यानाच अमेरिकेत प्रवेश म्हणजे अर्थातच इडियातल्या ब्रिटिश गोऱ्या लोकाना

असे हे वशवर्णावर आधारित, इमिग्रेशन कायदे काही अमेरिकन लोकांना मान्य नव्हते ते विशाल मनाचे, समजूतदार लोक होते इडियन लोकाशी, ज्याचा थोडापार सबंध आला, त्याचा इडियन्सबद्दल चागला ग्रह झालेला होता अमेरिकन लोक, स्वत ला प्रजासत्ताक पद्धतीचे पुरस्कर्ते मानत होते, नैतिकतेचे पुढारी मानत मग असा भेदभाव का? असा प्रश्न ते विचारीत होते चीन बाबतचा expulsion कायदा १९४३ मध्ये मागे घेतला होता, मग इडियाबाबत तसं का करू नये? हा त्याचा सवाल होता तरीपण, आजवरच धोरण बदललं, तर ते धोकादायक ठरेल अशा लोकाचं मताधिक्य होतंच हो ना करता करता, इंडियाला थोडासा तरी कोटा द्यावा, म्हणजे 'भेदभाव करणारे' असा जो काळिमा अमेरिकेला लागला आहे, तो पुसून जाईल, यावर तडजोड झाली व इडियाला १०० चा कोटा मिळाला इडियन लोकाना सिटिझनशिपचेही हक्क मिळाले त्यामुळे अमेरिकेत असलेल्या इडियन लोकावर, अवलबून असलेल्या त्याच्या बायकामुलाना, अमेरिकेत येण्याची परवानगी मिळाली हा कायदा १९४६ साली झाला पण फक्त १८ लोकच आले इडियाला स्वातत्र्य मिळाल होतं आपल्या स्वतत्र देशात राहावे, त्याच्या जडणीघडणीत सामील व्हाव, तिथंच आपल्याला चागली सधी मिळेल, अशी इडियन लोकाची कल्पना झाली असावी

दुसऱ्या महायुद्धानतर परिस्थितीत खूपच फरक पडला होता युद्धात इंडियन

म्हणणं लोकाना पटवायसाठी लोक कुठचातरी खरंखोटा मुद्दा मांडतात त्यामुळे इथल्या लोकाची मन इंडियन्सबद्दल कलुषित झाली लोकमताचा दबाव वाढला सरकारने सहा जणांचं कमिशन नेमल त्यांनी ४२ कलमी रिपोर्ट तयार केला सगळ पूर्वग्रहावर अधारित सरकारने १९०७ साली एक barred zone निर्माण केला त्यात चीन, जपान पूर्वीपासून होतेच आता इंडियाचाही समावेश झाला

असे कायदे होत होते, तरी काही इंडियन्स, मेक्सिकोमधून बेकायदा अमेरिकेत येतच होते काहींना हद्दपार केलं जाई, पण काही लपूनछपून राहातच काही धदा व्यवसाय करायला लागले होते काही शेताचे मॅनेजर होते तरीपण बहुसख्य शाळा न शिकलेले मजूरच होते अमेरिकेत शिक्षणासाठी विद्यार्थी येत होते पहिले महायुद्ध सुरू झाले होते ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानातून उखडून टाकायला ही नामी संधी आहे, असं काही विद्यार्थ्यांना वाटल त्यानी युगातर पक्ष काढला गद्दार वर्तमानपत्र सुरू केलं इंडियन लोकाना इंडियात जाऊन, ब्रिटिशांशी लढण्याचा आदेश दिला त्याप्रमाणे ४०० लोक आले फारसे आलेही नाहीत त्यामुळे, हटाव मोहिम थोडी थडावली पण युद्ध सपल्यावर, तिला पुन्हा जोर चढला युरोपियन मजुराची उपासमार होईल, हे नवं कारण पुढे आलं आणि १९२४ साली आणखी एक कायदा झाला जे लोक अमेरिकन नागरिक व्हायला पात्र असतील, त्यानाच अमेरिकेत प्रवेश म्हणजे अर्थातच इंडियातल्या ब्रिटिश गोऱ्या लोकांना

असे हे वंशवर्णावर आधारित, इमिग्रेशन कायदे काही अमेरिकन लोकाना मान्य नव्हते ते विशाल मनाचे, समजूतदार लोक होते इंडियन लोकाशी, ज्याचा थोडापार संबध आला, त्यांचा इंडियन्सबद्दल चागला ग्रह झालेला होता अमेरिकन लोक, स्वतःला प्रजासत्ताक पद्धतीचे पुरस्कर्ते मानत होते, नैतिकतेचे पुढारी मानत मग असा भेदभाव का? असा प्रश्न ते विचारीत होते चीन बाबतचा expulsion कायदा १९४३ मध्ये मागे घेतला होता, मग इंडियाबाबत तसं का करू नये? हा त्यांचा सवाल होता तरीपण, आजवरच धोरण बदलल, तर ते धोकादायक ठरेल अशा लोकाचं मताधिक्य होतच हो ना करता करता, इंडियाला थोडासा तरी कोटा द्यावा, म्हणजे ‘भेदभाव करणारे’ असा जो काळिमा अमेरिकेला लागला आहे, तो पुसून जाईल, यावर तडजोड झाली व इंडियाला १०० चा कोटा मिळाला इंडियन लोकाना सिटिझनशिपचेही हक्क मिळाले त्यामुळे अमेरिकेत असलेल्या इंडियन लोकांवर, अवलबून असलेल्या त्याच्या बायकामुलांना, अमेरिकेत येण्याची परवानगी मिळाली हा कायदा १९४६ साली झाला पण फक्त १८ लोकच आले इंडियाला स्वातंत्र्य मिळालं होत आपल्या स्वतत्र देशात राहावे, त्याच्या जडणीघडणीत सामील व्हाव, तिथंच आपल्याला चागली सधी मिळेल, अशी इंडियन लोकाची कल्पना झाली असावी

दुसऱ्या महायुद्धानतर परिस्थितीत खूपच फरक पडला होता युद्धात इंडियन

सैनिकानी चांगलीच कामगिरी बजावली होती १९४२ सालच्या, महात्मा गांधीची, 'चलेजाव' घोषणा, स्वातंत्र्यासाठी इडियन लोकानी केलेल्या चळवळी, याकडे अमेरिकन लोकांचे, अमेरिकन वृत्तपत्राचे तसेच अमेरिकन सरकारचे लक्ष होतेच पर्लहार्बरनतर अमेरिकेने, जपानविरुद्ध ज्या कारवाया केल्या, त्यात त्याना इंडियाची मदत झाली होती इडियात औद्योगिक प्रगती होत होती, तेव्हा तिथ आपल्या मालाला बाजारपेठ मिळेल, ही आशा होतीच तेव्हा इडियाचा कोटा वाढवावा, अस म्हणणाऱ्या लोकाची सख्या थोडी वाढली तरीपण १९५२ सालच्या कायद्याने इंडियाच्या कोट्यात फरक पडला नाही ही गोष्ट अमेरिकेचे प्रेसिडेंट ट्रुमन यांनाच आवडली नाही त्याना ती पद्धत जुनीपुराणी वाटत होती, समाजविरोधी वाटत होती त्याना यापेक्षा विशाल दृष्टिकोणातून केलेला कायदा हवा होता त्यानी पुष्कळाची समजूत घातली, काहीच्यावर दडपण आणल, शेवटी आपला व्हेटो वापरला पण इमिग्रेशन कमिशनरच विरोधी होते म्हणून हा कायदा Meearran Walter कायदा पास झाला तरीही प्रेसिडेंट ट्रुमननी, विथ फुलब्राइट याच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमल या कमिशनने इमिग्रेशन कायद्यातील दोष, त्याच्या मर्यादा याची कसून तपासणी केली व To whom shall we welcome ह्या नावाचा एक रिपोर्ट तयार केला

हा रिपोर्ट प्रसिद्ध झाला तेव्हा, उदारमतवादी, जॉन केनेडी हे अमेरिकेचे प्रेसिडेंट होते त्यामुळे एक नव इमिग्रेशन बिल तयार झालं प्रेसिडेन्ट केनेडीनी, या बिलाचा हेतू राष्ट्राला स्पष्ट शब्दांत सागितला ते म्हणाले, 'आपला इमिग्रेशन कायदा, वर्ण वश-देश यावर आधारित आहे त्यामुळे आपल्या राष्ट्राची गरज भागणार नाही व इतर राष्ट्राचही भलं झालं नाही जन्म हा तर एक अपघात असतो तो गृहीत धरून केलेल्या कायद्याला तर्कशास्त्राची बैठक नाही, तारतम्यभावाचा आधार नाही सध्याच्या जगात सर्व राष्ट्र एकमेकावर आवलबून आहेत अशा वेळी, हा कालबाह्य कायदा, मुळापासून बदलला पाहिजे अमेरिकेत येऊ इच्छिणाऱ्याना त्याच्या गुणवत्तेवर प्रवेश मिळावा, त्याच्या निकटच्या नातलगानाही कोटा मिळावा, अशी या बिलात तरतूद आहे

१९६५ साली न्यूयॉर्कच्या लिबर्टी बेयलर, एक छानदार समारभ झाला प्रेसिडेन्ट लिंडन जॉन्सन, यांनी त्या बिलावर सही केली इडियाला दोन हजाराचा कोटा मिळाला अमेरिकेत राहात असलेल्या लोकाचे जवळचे नातलग म्हणजे बायको किवा नवरा, मुल, आईवडील, बहिणभाऊ यानाही अमेरिकेत प्रवेश मिळण्याची सोय झाली इडियाच्या लोकसख्येच्या मानाने हा कोटा फार कमी आहे जगाच्या लोकसख्येच्या १५ ३ टक्के इंडियाची लोकसंख्या आहे आणि इंडियाला मिळालेला कोटा ५ १ टक्के आहे पण अमेरिका म्हणेल, 'तुमच्या लोकसंख्येचा विचार करून, आम्ही का कायदे करावेत?' ते खरच आहे तो त्याचा प्रश्न नाहीच तो आपला प्रश्न

अमेरिकेत प्रवेश मिळण्याचे नियम असे दिले झालं आणि इडियातली माणस

म्हणण लोकाना पटवायसाठी लोक कुठचातरी खराखोटा मुद्दा माडतात त्यामुळे इथल्या लोकाची मन इडियन्सबद्दल कलुषित झाली लोकमताचा दबाव वाढला सरकारने सहा जणाचं कमिशन नेमलं त्यानी ४२ कलमी रिपोर्ट तयार केला सगळं पूर्वग्रहांवर अधारित सरकारने १९०७ साली एक barred zone निर्माण केला त्यात चीन, जपान पूर्वीपासून होतेच आता इंडियाचाही समावेश झाला

असे कायदे होत होते, तरी काही इडियन्स, मेक्सिकोमधून बेकायदा अमेरिकेत येतच होते काहीनां हद्दपार केल जाई, पण काही लपूनछपून राहातच काही धंदा व्यवसाय करायला लागले होते काही शेताचे मॅनेजर होते तरीपण बहुसंख्य शाळा न शिकलेले मजूरच होते अमेरिकेत शिक्षणासाठी विद्यार्थी येत होते पहिले महायुद्ध सुरू झाले होते ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानातून उखडून टाकायला ही नामी संधी आहे, असं काही विद्यार्थ्यांना वाटलं त्यानी युगांतर पक्ष काढला गद्दार वर्तमानपत्र सुरू केल इडियन लोकाना इडियात जाऊन, ब्रिटिशाशी लढण्याचा आदेश दिला त्याप्रमाणे ४०० लोक आले फारसे आलेही नाहीत त्यामुळे, हटाव मोहिम थोडी थंडावली पण युद्ध संपल्यावर, तिला पुन्हा जोर चढला युरोपियन मजुरांची उपासमार होईल, हे नव कारण पुढे आल आणि १९२४ साली आणखी एक कायदा झाला जे लोक अमेरिकन नागरिक व्हायला पात्र असतील, त्यानाच अमेरिकेत प्रवेश म्हणजे अर्थातच इडियातल्या ब्रिटिश गोऱ्या लोकांना

असे हे वशवर्णावर आधारित, इमिग्रेशन कायदे काही अमेरिकन लोकाना मान्य नव्हते ते विशाल मनाचे, समजूतदार लोक होते इंडियन लोकांशी, ज्याचा थोडाफार सबध आला, त्याचा इडियन्सबद्दल चागला ग्रह झालेला होता अमेरिकन लोक, स्वतःला प्रजासत्ताक पद्धतीचे पुरस्कर्ते मानत होते, नैतिकतेचे पुढारी मानत मग असा भेदभाव का? असा प्रश्न ते विचारीत होते चीन बाबतचा expulsion कायदा १९४३ मध्ये मागे घेतला होता, मग इंडियाबाबत तसं का करू नये? हा त्यांचा सवाल होता तरीपण, आजवरच धोरण बदलल, तर ते धोकादायक ठरेल अशा लोकाचं मताधिक्य होतच हो ना करता करता, इडियाला थोडासा तरी कोटा द्यावा, म्हणजे 'भेदभाव करणारे' असा जो काळिमा अमेरिकेला लागला आहे, तो पुसून जाईल, यावर तडजोड झाली व इडियाला १०० चा कोटा मिळाला इंडियन लोकाना सिटिझनशिपचेही हक्क मिळाले त्यामुळे अमेरिकेत असलेल्या इडियन लोकांवर, अवलंबून असलेल्या त्याच्या बायकामुलाना, अमेरिकेत येण्याची परवानगी मिळाली हा कायदा १९४६ साली झाला पण फक्त १८ लोकच आले इडियाला स्वातंत्र्य मिळाल होतं आपल्या स्वतत्र देशात राहावे, त्याच्या जडणीघडणीत सामील व्हाव, तिथंच आपल्याला चागली संधी मिळेल, अशी इडियन लोकाची कल्पना झाली असावी

दुसऱ्या महायुद्धानतर परिस्थितीत खूपच फरक पडला होता युद्धात इंडियन

सैनिकानी चागलीच कामगिरी बजावली होती १९४२ सालच्या, महात्मा गाधीची, 'चलेजाव' घोषणा, स्वातत्र्यासाठी इडियन लोकानी केलेल्या चळवळी, यामकडे अमेरिकन लोकाचे, अमेरिकन वृत्तपत्राचे तसेच अमेरिकन सरकारचे लक्ष होतेच पर्लहार्बरनतर अमेरिकेने, जपानविरुद्ध ज्या कारवाया केल्या, त्यात त्याना इडियाची मदत झाली होती इडियात औद्योगिक प्रगती होत हाती, तेव्हा तिथ आपल्या मालाला बाजारपेठ मिळेल, ही आशा होतीच तेव्हा इडियाचा कोटा वाढवावा, अस म्हणणाऱ्या लोकांची सख्या थोडी वाढली तरीपण १९५२ सालच्या कायद्याने इंडियाच्या कोट्यात फरक पडला नाही ही गोष्ट अमेरिकेचे प्रेसिडेट ट्रुमन यानाच आवडली नाही त्याना ती पद्धत जुनीपुराणी वाटत होती, समाजविरोधी वाटत होती त्याना यापेक्षा विशाल दृष्टिकोणातून केलेला कायदा हवा होता त्यानी पुष्कळाची समजूत घातली, काहींच्यावर दडपण आणल, शेवटी आपला व्हेटो वापरला पण इमिग्रेशन कमिशनरच विरोधी होते म्हणून हा कायदा Meearran Walter कायदा पास झाला तरीही प्रेसिडेंट ट्रुमनने, विथ फुलब्राइट याच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमल या कमिशनने इमिग्रेशन कायद्यातील दोष, त्याच्या मर्यादा याची कसून तपासणी केली व To whom shall we welcome ह्या नावाचा एक रिपोर्ट तयार केला

हा रिपोर्ट प्रसिद्ध झाला तेव्हा, उदारमतवादी, जॉन केनेडी हे अमेरिकेचे प्रेसिडेट होते त्यामुळे एक नवं इमिग्रेशन बिल तयार झाल प्रेसिडेन्ट केनेडीनी, या बिलाचा हेतू राष्ट्राला स्पष्ट शब्दांत सागितला ते म्हणाले, 'आपला इमिग्रेशन कायदा, वर्ण वंश-देश यावर आधारित आहे त्यामुळे आपल्या राष्ट्राची गरज भागणार नाही व इतर राष्ट्रांचही भलं झाल नाही जन्म हा तर एक अपघात असतो तो गृहीत धरून केलेल्या कायद्याला तर्कशास्त्राची बैठक नाही, तारतम्यभावाचा आधार नाही सध्याच्या जगात सर्व राष्ट्र एकमेकावर आवलबून आहेत अशा वेळी, हा कालबाह्य कायदा, मुळापासून बदलला पाहिजे अमेरिकेत येऊ इच्छिणाऱ्याना त्यांच्या गुणवत्तेवर प्रवेश मिळावा, त्यांच्या निकटच्या नातलगानाही कोटा मिळावा, अशी या बिलात तरतूद आहे

१९६५ साली न्यूयॉर्कच्या लिबर्टी बेयलर, एक छानदार समारभ झाला प्रेसिडेन्ट लिंडन जॉन्सन, यानी त्या बिलावर सही केली इडियाला दोन हजाराचा कोटा मिळाला अमेरिकेत राहात असलेल्या लोकाचे जवळचे नातलग म्हणजे बायको किंवा नवरा, मुलं, आईवडील, बहिणभाऊ यांनाही अमेरिकेत प्रवेश मिळण्याची सोय झाली इडियाच्या लोकसख्येच्या मानाने हा कोटा फार कमी आहे जगाच्या लोकसख्येच्या १५ ३ टक्के इडियाची लोकसंख्या आहे आणि इडियाला मिळालेला कोटा ५ १ टक्के आहे पण अमेरिका म्हणेल, 'तुमच्या लोकसंख्येचा विचार करून, आम्ही का कायदे करावेत?' ते खरंच आहे तो त्याचा प्रश्न नाहीच तो आपला प्रश्न

अमेरिकेत प्रवेश मिळण्याचे नियम असे दिले झाल आणि इडियातली माणसं

भराभरा इथ आली पूर्वी आलेल्यापेक्षा हे फार वेगळे होते पूर्वी आलेले अशिक्षित होते आपल पोट भराव, चार पैसे गाठी बाधून कुटुबासाठी पाठवावेत, एवढीच माफक इच्छा त्यांची पण आता आलेले? एकापेक्षा एक शिकलेले, डिग्रया घेतलेले डॉक्टर, इजिनियर, प्रोफेसर आणखी शिकण्याची इच्छा असलेले खूप कर्तृत्व गाजवून खूप पैसा मिळवावा ही महत्त्वाकाक्षा असलेले त्याना आपलं जीवनमान उचवायचं होतं पूर्वीचे लोक धर्मभोळे होते याना आर्थिक विकास महत्त्वाचा वाटत होता त्यासाठी अमेरिकेत त्याना सधी मिळणार होती, ती ते पकडणार होते

सेनेटर एडवर्ड केनेडी म्हणाले होते, 'राष्ट्र चुका करत, पण ती चूक उमजल्यावर ती दुरुस्त करण हे त्या राष्ट्राच खर मोठेपण' त्यांच म्हणण अगदी बरोबर आहे प्रत्येकाच्या हातून कळत नकळत चुका होतात, पण त्या कबूल करायला सामान्य माणूससुद्धा तयार होत नाही त्यात त्याला कमीपणा वाटतो राष्ट्राची चूक मान्य करायची म्हणजे, राष्ट्राची किंमत कमी करण, हीच समजूत मग तो प्रतिष्ठेचा प्रश्न बनतो प्रतिष्ठेचा कैफ एका बरोबर अनेक चुका करायला लावतो त्यातून गैरसमज वाढतात नुकसान होत अमेरिका एवढं मोठं राष्ट्र, श्रीमत, पुढारलेले पण चूक मान्य करून सुधारली, हा खरा विशालपणा त्यामुळे त्या देशात हुषार, गुणवान लोक गेले, त्याना संधी मिळाली, स्वास्थ्य लाभल त्यांनी प्रत्येक क्षेत्रात, मनापासून हिरिरीने काम केल आणि अमेरिकेची उन्नती व्हायला त्याची मदतच झाली त्याच्या स्वतःच्या महत्त्वाकाक्षा सिद्धीला गेल्या

जगातल्या सर्व राष्ट्राच्या लोकाना अमेरिकेत येण्याची संधी मिळाली इतकंच नाही, तर जो इथं आला त्याला समान हक्क, कोणताही ग्रुप श्रेष्ठ नाही व कोणताही कनिष्ठ नाही, हे आश्वासन मिळालं अमेरिकेच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रवाहात सामील होण्याची मुभा मिळाली पण ही 'बोलाचीच कढी' ठरता कामा नये अमरिकेने ते आपल्या वर्तनाने सिद्ध केलं पाहिजे आज, उद्या, परवा नव्हे तर भविष्यात केव्हाही सर्वांना समान सधी, सारखा कायदा, नोकरीत कसला भेदाभेद नाही, याचा सर्वांना अनुभव आला पाहिजे प्रत्यक्ष सासूने, सुनेला, 'तू मला माझ्या मुलीसारखी' अस नुसतं वरवर बोलून काय उपयोग? सुनेला तसा प्रत्यक्ष अनुभव आला पाहिजे, आणि सुनेनेही माझी आई चागली, तिचं जेवण रुचकर, तिच वागणच योग्य, अस म्हणून कसं चालेल? वेगवेगळ्या देशांतून आलेल्या लोकांना, अमेरिकेची चालवागणूक, रीतिभाती वेगळ्या वाटतील, काही खटकतीलही परतु त्या वाईटच आहेत अस म्हणून त्याच्यापासून दूर राहायचं, आपल्याच लोकाचा ग्रुप करून राहणे, हे योग्य आहे का? सगळ्यांच्यात मिसळूनच राहिलं पाहिजे अमेरिकेच्या मूळ प्रवाहात मिसळून जाण्याचा हक्क मिळाला, त्याची किंमत म्हणून ही जबाबदारी घ्यायला पाहिजे जगभरच्या सस्कृतीचे लोक इथं आलेत ह्या सर्वांचं एक Melting Pot इथं तयार व्हाव, आणि त्यातून प्रत्येकाचं उत्तम उत्तम मिळून एक आदर्श

संस्कृती निर्माण व्हावी, अशी इथं एक कल्पना आहे मग स्वर्गच की तो पण तो पोथीतला मात्र स्वर्ग नसावा काम, क्रोध, द्वंद्व, दुःख, मद, मत्सर नसलेला अशी स्वर्गात प्रगती कशी व्हायची? आणि तिथं राहण्यात रंगत तरी काय? मग

तिथं सुरतरूंची बने अपारे।सुरभीची बहुत खिल्लारे
चिंतामणीची धवलागारे।भक्ताकारणे निर्मिली ॥

बोलता क्षणी सर्व मिळेल असा स्वर्ग? नको नको, असला स्वर्ग मला पण नको ज्या देवाची भक्ती करून अंस ऐतोबासारख राहायला मिळेल, त्या देवाची भक्ती मी करणार नाही तो स्वर्ग मला नकोच मग आमची हिंमतबहाद्दर, महत्त्वाकांक्षी मुलं त्यांना असल जीवन? मग ती धडपडत इथं आलीच कशाला? आम्ही इंडियातच त्यांना दिलं असत की, थोड फार आयत टिचभर जागा, ताब्यापितळेची भांडी, डबेडुबे, ते काही आयत नको होतं म्हणून तर ती इथं आली स्वत झगडाव, स्पर्धेला तोंड द्याव, स्वतःच रक्त आटवून, घाम गाळून, त्यांना उच्च जीवनमान मिळवायचय्, खूप उंच उंच व्हायचय् त्यांना पण असं उंच उंच होताना ते आपल्या देशाची आठवण ठेवतील का? त्यांचं ज्ञान, त्यांचे अनुभव, त्यांचा पैसा यांचा आपल्या देशाला काही उपयोग होईल का? आपल्या देशात बुटकीच फार त्यांची उंची वाढायला हे हात देतील का?

❀❀❀

# ५

# भारताबाहेर पडले खरे

•

अमेरिका, जगातला श्रीमंत देश, पुढारलेला देश तुम्हाला उच्च शिक्षण घ्यायचंय्? मग चला अमेरिकेला तिथं खूप ज्ञानदीप लावलेले आहेत हवं तेवढ शिका तुम्हाला संशोधनाची आवड आहे? तिथ जा तिथ सगळ्या सोईसुविधा मिळतील, पैसेही चांगले मिळतील तुम्हाला व्यापारधंदा करायचाय्? अमेरिकेत त्याला पूर्ण मोकळीक शिका, सवलतीही मिळतील तुमच्या डोक्यात नव्यानव्या कल्पना आहेत? मग अमेरिकेतच जा, त्या पडताळून पाहायला, तिथ तुम्हाला पूर्ण स्वातत्र्य मिळेल तुम्ही डॉक्टर, इंजिनियर, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ असे काही आहात, आणि तुम्हाला खूपखूप पैसे कमवायचेत, मग अमेरिकेतच तुम्हाला तशी चागली सधी मिळेल पण समजा तुमच्याजवळ शिक्षण नाही, फार कसल कसबही पण भरपूर अगमेहनत करण्याची मात्र तुमची तयारी आहे मग अमेरिकेसारखा दुसरा देश नाही कुणी तुम्हाला कमी लेखणार नाही शिवाय पैसेही भरपूर मिळतील जगातले कितीतरी लोक, या ना त्या कारणासाठी अमेरिकेत जात होते आम्ही पण जाणार होतो पण आमचं कारण अगदीच वेगळ आम्ही जात होतो आमच्या मुलाच्या लग्नाला

दहा हजार मैलांचा विमानाचा प्रवास, व जवळजवळ तेवढ्याच रुपयाच विमानाच तिकीट, म्हणून की काय कोण जाणे, पण विमानात बसल्यापासून, आपण एका श्रीमत देशात जातोय असं एकसारख जाणवत होत खर प्रवास पुरा होत आला नी विमानातूनच अमेरिका दिसली हरीने सोंगट्या माडाव्यात तशी घरं, घराच्या रागांमधून जाणारे उभे

आडवे समातर रस्ते, रस्त्यावरून जाणाऱ्या काड्यापेटीसारख्या गाड्या या श्रीमत देशातल्या लोकानी आपल्या देशाची माडणी किती झकास केली होती केवढा मोठा विमानतळ, पण शपथेला एक कागदाचा कपटा नाही की सिग्रेटच थोटुक नाही हमालाशी हुज्जत नाही प्रत्येक जण आपआपल्या बॅगा उचलत होता फारतर ढकलगाडीत घालून ढकलायच झालं लाबरुद रस्ते चार चार गाड्या जात होत्या चार चार गाड्या येत होत्या शिवाय कडेला भरपूर झाडे, बुंध्यापासून शेड्यापर्यंत हिरव्यागार पानानी लहडलेली जणू हिरवी श्रीमंती झाडांच पाननूपान राखून ठेवण्याचं काही औषध यांनी शोधून काढलय की काय? उच उच इमारती, तू आभाळाला शिवतेस की मी शिवू अशी एकमेकाशी पैज लावणाऱ्या झाडामध्ये लपलेली बुटकी बुटकी घर आमच्या अपार्टमेंट कॉम्प्लेक्समध्ये एकासारख्या कितीतरी बिल्डिगा ५-६ बिल्डिंगा झाल्या की कोपऱ्यावर छोटीशी बाग, बागेत घसरगुडी, पण त्यावर खेळणारी मुल क्वचितच दिसायची शिवाजीपार्कची बाग नजरेसमोर आली घसरगुडीसाठी लागलेली लाब राग झोपाळ्यावर पाळी मिळावी म्हणून चाललेली धक्काबुक्की सर्व कॉम्प्लेक्ससाठी एक स्वीमिंगपूल इतर कुठ न दिसणारी माणस, तिथे मात्र खूप होती अगदी नाइलाज एवढे कपडे घातलेली जी निःसंकोचपणे वावरणारी डोळे ते दृश्य बघायला तयार होईनात बिल्डिंगचा दर्शनी भाग बघून मात्र मन प्रसन्न झाल मोठमोठ्या कुड्यांत लावलेली, वेगवेगळ्या आकाराच्या पानाची मोठमोठी झाडं, छताला झुबर वीक-एण्डला कुठकुठ फिरत होतो बागेत पिकनिकला जात होतो एखाद तळ, त्यात बदक, खळखळणारा ओढा, त्यावर पूल सगळ छान तर दिसलं पाहिजेच, शिवाय ते नैसर्गिक वाटाव, अशी सगळी सजावट एकदा नायगाराला गेलो हॉल तर या लोकानी इतका सजवलाय्, उच टॉवरवर जाऊन त्याची शोभा बघा, नाहीतर बोगद्यातून त्याच्या तळाशी जा धबधब्याचे,पाणी जिथे पडत तिथ नेणारी मेड ऑफ मिस्ट आहेच बर ते लोक रेनकोट देतात म्हणून नाहीतर नखशिखांत आघोळच घडायची रात्री नायगाराला रगीबेरगी दिव्याच्या माळांनी शृगारतात कुणी हवतर हेलीकॉप्टरमधून धबधबा बघावा अमेरिकेच्या पश्चिमेला लॉस ॲंजिलीस, न्यूयॉर्कहून बसने गेलो तीन दिवस व दोन रात्रीचा प्रवास अमेरिकेची पूर्वपश्चिम रुंदी बघायला मिळाली रोज सकाळी गाडी एका मोठ्या हॉटेलसमोर थाबायची तिथ भरपेट ब्रेकफास्ट,'गाडीत भरपूर खाद्यपदार्थ, ते देणारी होस्टेस आरामगाडीत आरामशीर प्रवास झाला लॉस ॲंजिलिस हे तर अमेरिकेचं सर्वात श्रीमत स्टेट, तिथ अमेरिकेच्या समृद्धीच्या खुणा ठायी ठायी डिस्नेलॅण्ड, नोटस् बॅरो फार्म, युनिव्हर्सल स्टुडीओ, किती बघाल? डिस्नेलॅण्डमध्ये निर्जीव पक्षीच काय पण फुल पान नी खाबसुद्धा गातात जगातल्या सगळ्या देशातल्या बाहुल्या तिथ, कुणी नाचतात, कुणी वाद्यं वाजवतात तर कुणी गाण्याची बैठक माडलेली, असले खेळ करतात समुद्राच्या तळाशी जाता येत, अरण्यात फेरफटका मारता येतो इतकंच काय भूत-नगरीतही सैर

करता येते कॅलिफोर्निया एकेकाळी वाळवट होतं म्हणे तिथ लाखो डॉलर्स खर्चून असं वैभव उभारलेलं रोज हजारो लोक बघायला येत होते पेरलेला पैसा असा उगवत होता शिवाय तिथ काम करणारी किती माणसं, ती पोटापाण्याला लागली हे का थोड? नुसती पोटापाण्याला का? सगळ्याजवळ गाड्या असणारच चागली थाटात राहात असतीलच डिस्नेलॅण्डमध्ये ए ते झेड पार्किंग लॉटस् गाडी उभी करून त्याच्या बसने आत जायचं गाड्या बघून तर थक्क व्हायला होत रस्त्यावरून अहोरात्र गाड्या धावत असतात मोठमोठे शॉपिंग हॉल्स त्याच्या तिप्पट जागा गाड्या उभ्या करायला मोठमोठे रस्ते तर माणसाना वर्ज होतेच पण लहानसहान रस्त्यावरसुद्धा माणसं दिसायची ती गाड्यांत सर्वजण ताठ कुणी लाचार नाही, कुणी भिकार नाही खरच अमेरिका इतकी श्रीमत आहे? इथल्या सर्व लोकाना अन्न, वस्त्र, निवारा याची काही ददाँत नाही? स्वतःच्या गाड्या ठेवण्याइतकी सर्व सधन आहेत?

अमेरिका एवढी वैभवशाली झाली तरी कशी? कुणी केल एवढं तिला श्रीमत? अवघ दोनशे वर्षापूर्वीच राष्ट्र कसा जमला एवढा पैसा? इथं सोन्याची धूळ होती की काय? मग तिथ आलेल्यानी त्या आयत्या पिठावर रागोळ्या घातल्या? तस काही नाही इथ जे लोक आले, त्यानी स्वतःच्या अक्कलहुषारीने, दीर्घोद्योगाने, कष्टाने निर्माण केलेल - शून्यातून निर्माण केलेल विश्व अमेरिकेचा शोध लावला कोलबसने, धाडसी दर्यावर्दी माणूस तो त्याला स्पेनच्या राणीने, आपले दागिने मोडून तीन जहाजे दिली युरोपमधल्या दुसऱ्या राजेराजवाड्यानी पैसे दिले, व्यापाऱ्यानी पैसे दिले हा नवीन भूमी शोधून काढील मग तिथ आपली कॉलनी करता येईल, त्या देशाशी व्यापार करता येईल, तिथल्या लोकाना ख्रिश्चन करता येईल, असे एकेकाचे हेतू कोलबसने सुवर्णभूमी हिंदुस्थानचे नाव ऐकले होते, तिथल्या मसाल्याच्या पदार्थांची तर सर्वांनाच लालूच होती, म्हणून तो निघाला हिंदुस्थान शोधायला पण त्याची वाट चुकली, नि तो अमेरिकेच्या किनाऱ्याला लागला तिथं त्याला थोडे लोक दिसले त्याला वाटले हाच हिंदुस्थान म्हणून त्याने त्याना इंडियन हेच नाव चिकटवल हे लोक होते रानटी डोगराच्या गुहात, कपारीत कुठंतरी राहणारे ना अगावर धड वस्त्र डोक्यावर पिस काय, अवतारच सगळा मक्याशिवाय धान्यच माहीत नव्हत त्याना अगदीच मागासलेले मूठभर असे हे लोक आणि मैलोमैल पसरलेली अफाट जमीन बेवारशीच म्हणायची तर काय? त्याला वाटलं सोनंरूप तरी कोठे सापडेल पण त्याच्या हयातीत तरी ते मिळाले नाही पण कोलबसला नवी भूमी सापडल्याची बातमी, सगळ्या युरोपभर वाऱ्यासारखी पसरली मग सगळ्या लोकाच्या झुडीच्या झुडी अमेरिकेत यायला लागल्या स्पॅनीज-पोर्तुगीज तर त्याचे भाईबदच आयरीश आले, स्कॉटिश आले डच आले दूधदुभत्याचा धदा करायला इटालियन लोक दारू गाळण्यात पटाईत आपला धदा चांगला चालेल म्हणून ते आले ज्यू म्हणजे हाडामासाचे व्यापारी, ते व्यापार करायला

आले जर्मन आले फ्रेंच आले ब्रिटिशाना तर अमेरिकेवर राज्यच करायचे होते या सगळ्यानी आफ्रिकेतल्या नीग्रो लोकाना, गुलाम म्हणून बरोबर आणल मग चिनी लोक मजूर म्हणून आले काही लोक म्हणाले, 'जाऊन तर पाहूया जमल तर जमल गाजराची पुंगी, वाजली तर वाजली, नाहीतर मोडून खाल्ली ' पण एकदा अमेरिकेत जे आले, ते तिथच राहिले, परत गेलेच नाहीत मग त्याना वाटल, जे इथे आले, त्याचा हा देश अमेरिका आपली, आपलं स्वतंत्र राष्ट्र पण त्यासाठी त्याना खूप लढाव लागल फ्रेंचाशी विशेषत ब्रिटिशांशी आणि अमेरिका स्वतत्र राष्ट्र म्हणून घोषित झाली 'One nation under the God, justice and freedom for all ' हे त्याच्या शपथेचे प्रमुख शब्द स्वातत्र्य, प्रत्येक व्यक्तीला स्वतत्र वागण्याच, बोलण्याच, लिहिण्याच स्वातत्र्य बुद्धिमत्तेच स्वातत्र्य माणसात भावना निर्माण करणार, त्याला विचार करायला लावणार, त्याला कार्य करण्यास प्रवृत्त करणार जे मन त्याला स्वातत्र्य अस स्वातत्र्य मिळाले की माणसाचा स्वाभिमान जागृत होतो, तो त्या देशावर प्रेम करतो, त्या देशासाठी काहीही करण्याची त्याची तयारी होते वास्तविक, इथ आलेले लोक वेगवेगळ्या देशाचे होते त्याचे चेहरे वेगळे, भाषा वेगळी, पोषाख वेगळा, सस्कृती वेगळी, सगळ वेगळ आवळ्याभोपळ्याची मोट होती ती पण प्रत्येकाला स्वातत्र्य मिळाल होत आपल्या मनाप्रमाणे काहीही करायला प्रत्येक जण स्वतत्र होता व्यक्ती तितक्या प्रकृती प्रत्येकाच्या मनात निरनिराळ्या कल्पना ह्या कल्पना साकार करण्यामागे जो तो लागला त्याच कामाचा ध्यास घेतला हिंमत धरली कोण काय म्हणेल, याची पर्वा नव्हती, आणि कुणी काही म्हटलं नाही कुणी डोक चालवल, कुणी मेहनत मजदुरी केली कुठलही काम हलकं न समजता स्वातत्र्य मिळाल्याने सर्वांना मोठा हुरूप आला होता काहींना काही करण्याची प्रेरणा झाली होती या प्रेरणेतून घर, रस्ते, टेलिफोन, रेडिओ, मोटारी, विमान हे सगळ निर्माण झाल हे निर्माण करणारे फार बुद्धिमान होते अस काही नाही कुणी शाळा अर्ध्यावर सोडलेले होते कुणी बहिरा, कुणी पागळा पण होता इथ आलेल्या प्रत्येकाला अर्धा पाऊण एकर जमीन फुकट मिळाली होती पण नुसत्या जमिनीने काय होणार? फारतर पोटापुरत धान्य पिकल असत पण या लोकाची महत्त्वाकाक्षा जबर त्याना त्या जमिनीची शेकडो एकर जमीन करायची होती तिच्यातून अमाप पीक काढायच होत शिवाय माणसाचे कष्ट कमीत कमी करायचे होते त्यासाठी त्यानी अनेक शोध लावले एकेकाने कष्ट तरी किती करावेत बेंजामिन फ्रँकलीन पेपर टाकायचा तसाच वॉल्ट डिस्ने त्याचा बाप त्याला पहाटे तीन वाजता पेपर टाकायला उठवायचा शिकागोच्या मी म्हणणाऱ्या थडीत हा कुडकुडायचा, झोपेने पेंगायचा, पण तो हिंमत हरला नाही त्याने केवढ जग निर्माण केल प्रत्येक जण आपल्या स्वतत्र बुद्धीने काम करीत होता कुणी कुणाचा पाय ओढला नाही की पडला तरी त्याची कीव केली नाही कुणाच्या प्रशंसेची गरज नव्हती राईट बधूची गोष्ट त्याना बोलण्याचा कंटाळाच एका

भोजनप्रसगी त्यांना काहीतरी बोलण्याचा आग्रह झाला सगळे मोठ्या भावाकडे बघायला लागले थोरला उठला आणि म्हणाला, 'तुमचा काहीतरी गैरसमज झालाय् बोलण्याचे काम नेहमी ऑर्व्हिल करतो ' अर्थात सर्वांच्या नजरा ऑर्व्हिलवर स्थिरावल्या तो उठला व म्हणाला,' आताच विल्बरने भाषण केलं ' अशी ही माणसं कोणाला पैशाचं पाठबळ तर नव्हतच एडिसन आगगाडीत गोळ्या शेंगदाणे विकायचा त्याचा बालमित्र मोटारवाला हेन्री फोर्ड त्याने आपल्या मित्राच्या सन्मानार्थ मेजवानी दिली त्या सर्व पाहुण्याना त्याने त्या पूर्वीच्या जुन्या गाडीने आणले, आणि त्या गाडीत एडिसनने पुन्हा गोळ्या शेंगदाणे विकले या संशोधकाने, आपल्या बालपणचा असा पुन्हा प्रत्यय घेतला स्वातत्र्याबाबत अमेरिकेत सधीही मिळते ह्या सधीचा फायदा घेणारा अमेरिकेचा अध्यक्ष होऊ शकतो हर्वर्ट हूपर हा जमिनीतून बटाटे खणून काढणारा पोरका मुलगा शभर बटाटे काढले की दहा पेनी मिळवणारा, ऑफीस बॉय झाला कुणीतरी पुस्तक वाचायचा सल्ला दिला पब्लिक स्कूलमध्ये फुकट शिक्षण, फुकट लायब्ररीतून आणलेली पुस्तक, इजिनियर झाला व शेवटी प्रेसिडेंटही अमेरिकेच्या या लोकानी अनेक शोध लावले जगातले ८० टक्के शोध अमेरिकेचे त्यानी भूगर्भाचा ठाव घेतला, समुद्राचा तळ गाठला, अतराळात विहार केला नोबेल पारितोषिकाचे विजेते बहुतेक अमेरिकनच असतात स्वातत्र्य युद्धाचा सेनानी जॉर्ज वॉशिंग्टन, गुलामी नाहीशी करून अमेरिका एकसंध करणारा अब्राहम लिंकन हे त्याचे आवडते व आदर्शही कायावाचामनाला मिळालेल हे स्वातत्र्य, त्याने अमेरिकेचा कायापालट केला तिला जगाच्या शिखरावर नेऊन ठेवल पण दुष्टानाही हे स्वातत्र्य मिळाले व त्यानी अमेरिकेपुढे जटिल प्रश्न उभे केलेत हेही तितकंच खर

आणि अशा या अमेरिकेत आमची मुल आलेली होती ४-५ वर्षे झालेली होती बहुतेकांचे शिक्षण सपल होत, पण प्रश्न संपले नव्हते स्टुडट व्हिसावाल्याना नोकरी करण्याची परवानगी नव्हती पैसे पुरत नव्हते नोकरी करता येत नव्हती बाप भीक मागू देईना नी आई जेवू घालीना अशातली गत केव्हा केव्हा वर्क परमिट मिळायचे, मग नोकरी करून ते पैसे जपून वापरायचे त्या स्टुडट व्हिसाचा पर्मनट व्हिसा करायला कोण सायास तोपर्यंत जीव आधांतरी इथ येण्याची चूक केली की काय असे वाटायच ज्याच्या जवळ ग्रीन कार्ड होत, त्याना सरळ नोकरी मिळत होती, अस पण नाही वास्तविक अमेरिकेत जेव्हा डॉक्टराची वाण पडली, तेव्हा इडियातल्या डॉक्टराना इथ यायला ग्रीन कार्ड मिळाली कारखान्यात इजिनियर्स हवे झाले, तेव्हा त्याना इथ यायला मिळाले कॉलेजात शिकवायला प्रोफेसर कमी पडले, तेव्हा इडियन प्रोफेसरची वर्णी लागली हॉस्पिटलमध्ये नर्सिस पुरेशा नव्हत्या म्हणून इडियातल्या नर्सिसना दुसऱ्या दिवशी पर्मनट व्हिसा दिला म्हणजे अमेरिकेच्या गरजेनुसार हे लोक इथं आलेले हे शिकलेले होते, त्यांच्याजवळ ज्ञान होत, त्या त्या क्षेत्रातले कौशल्य होत सर्व काही पण नोकरी मागायला ते ज्याच्या जवळ जायचे,

त्याला हा परका, त्याच नाव अनोळखी हा धड ना गोरा धड ना काळा ह्याची पोषाखाची रीत वेगळीच विशेषत मुलगी असली, म्हणजे तिची ती साडी म्हणजे आणखीनच हा इग्लिश चांगला बोलतो व्याकरणदृष्ट्या अगदी बिनचूक त्याच्या नोकरी देणाऱ्या मालकापेक्षा सरस पण दोघाचे उच्चार अगदीच वेगळे ह्याच त्याला समजत नाही, त्याच ह्याला समजत नाही. सभाषण पुढे सरकणार कस? खुंटलच की ते आणि समजा, पहिल्या चाचणीत हा पास झाला, मग ओळखपत्राचा प्रश्न हा काल अमेरिकेत आलेला कुणाच ओळखपत्र मिळणार याला? त्याचा पूर्वीचा मालक राहिला दूर इडियात आणि काही झाल तरी त्याला इथ कोण ओळखणार? हा ना कुठल्या चर्चमध्ये जाणारा, ना कुठल्या क्लबचा मेंबर अमेरिकेच्या सामाजिक, राजकीय पुढाऱ्याची धड नावसुद्धा याला माहीत नाहीत, तर ओळख विसराच ज्याच इथ शिक्षण झाल त्यांची जरा बरी परिस्थिती म्हणजे काय? दगडापेक्षा वीट मऊ इतकच कारण कामाचा अनुभव गाठी नाही, हा त्याच्यातला मोठा दोष परिणाम एकच आपल्या योग्यतेपेक्षा कमी पगाराची नोकरी पत्करणे करता काय? काही तरी सुरुवात झाली हे समाधान ज्यानी अमेरिकन मुलीशी लग्न केली, ते बेटे या बाबतीत भाग्यवान

नोकऱ्या कमी पगाराच्या असल्या तरी, इडियापेक्षा पुष्कळच चागला पगार नोकरीचा प्रश्न सुटल्यावर या मुलानी लग्न केली कुणाची अमेरिकेत लग्न झाली, तर कुणी इडियात जाऊन चतुर्भुज होऊन आले काहीच्या आईवडिलानी, ते इथ येण्यापूर्वीच, त्यांच्या पायात लग्नाची बेडी अडकवलेली होती कॉलेजच्या डॉर्मिटरीत राहणारे, एका आपार्टमेंटमध्ये गर्दी करून राहणारे सर्वांनी आता वेगवेगळी बिऱ्हाड केली होती अपार्टमेंटमध्ये चागली सोयीस्कर होती ती अपार्टमेंटस् स्वयंपाकघर लहानस, पण त्यात चार गॅसच्या किवा इलेक्ट्रिकच्या शेगड्या, फ्रीज होता जमिनीपासून तक्तपोशीपर्यंत कपाट होती ब्लॉक मिळाल्यावर गॅससाठी अर्ज करा कुठ वशिला लागतोय् का बघा, फ्रीजसाठी पैसे जमवा, कपाटासाठी सुतारामागे खेपा घाला, अस काही कराव लागल नाही थोडीशी भाडीकुडी, थोडे बहुत कपडे, टी व्ही तर जरुरीच्याच वस्तू डायनिंग टेबल, सोफा सेट सेकंड हॅण्ड, लिव्हिंग रूम, बेडरूम तर काय पण बाथरूम्सही सजवलेल्या लग्नात आहेर मिळालेल्या अनेक इडियन वस्तूनी नवी की जुनी पण प्रत्येकाची गाडी होती आणि हे सगळं स्वकष्टार्जित आम्ही जन्मात गाडी घेऊ शकलो नाही, आणि या मुलानी इथ आल्या आल्या गाड्या घेतल्या इडियात त्याना हे जमल असत का? मला मुलाचं खूप कौतुक वाटलं बाजारहाट करायला जायच तर पिशव्या हुडकायला नकोत, फडकवीत न्यायला नकोत, वेगवेगळ्या दुकानात जाऊन, त्यांच्याशी घासाघीस करायला नको एका सुपरमार्केटमध्ये आपल्याला हव ते सगळं, भाज्या, फळ, दूधदही, डाळतादूळ, अंडी, मांसमासे सगळ दुकानभर फिरून अपल्याला हवी ती वस्तू शेल्फवरून काढून आपल्या ढकलगाडीत

ठेवायची कौंटरवरची मुलगी सगळे जिन्नस, ब्राऊन पेपर बॅगमध्ये भरून देते बिल दिलं की सगळ्या पिशव्या आपल्या गाडीच्या डिकीत ठेवून घरी आणायच्या आठवड्याची ग्रोसरी करण्याची इथं पद्धत तांदूळ निवडायला नकोत, न धुता वैरले तरी हरकत नाही गहू चाळारे, पाखडारे, दळून आणारे काही व्याप नाही तयार पीठच पिठाची गिरणी हा प्रकारच नाही इथ भाज्यासुद्धा हव्यातर चिरूनकापून तयार मिळतात स्वयपाकाच काम केवढ हलक झाल नाही? मोठमोठे शॉपिंग मॉल्स तिथं कपडे, जुते, खेळणी, फर्निचर, प्रसाधन, दागिने, घड्याळ सगळ्याची नुसती गौर माडलेली कपडे तर काय नुकत्या जन्मलेल्या मुलापासून सर्वांचे मुल-मुली, स्त्रीपुरुष याचे वयावारी गट लठ्ठभारतीसाठी खास विभाग ते कपडे, त्यांचा पोत, त्याचा रग, त्यावरच डिझाइन, त्याची फॅशन मनात भरायची टी-सेट, डिनर सेट, शोभेच्या वस्तू, खेळणी यातल काय इडियाला न्यायच हाच सभ्रम

घरात इडियन पदार्थच शिजायचे वीस वर्षांपूर्वी इंडियन ग्रोसरीची फारशी दुकाने इथ नव्हती न्यूयॉर्क, शिकागो, लॉसअँजिलिस अशा मोठ्या शहरांत दोन तीन दुकाने असायची एखादी मुलगी आपल्या अपार्टमेंटच्या क्लॉझेटमधून इडियन ग्रोसरी ठेवून विकायची तेवढाच ससाराला हातभार पुष्कळजणी सुपर मार्केटसारख्या दुकानात विक्रेत्या म्हणून काम करायच्या कुणी सौंदर्यप्रसाधनं विकून कमिशन मिळवायच्या तस इथल जीवन सुखाच होत भरपूर वस्तू मिळत होत्या रवा सपला, डालडा गायब झाला, हे काही नाही दुधाच्या रागेत उभ राहा, रेशनचे जाडे तादूळ बदलून निम्मे बारीक तादूळ घ्या, अशा गोष्टी करायला लागत नव्हत्या काय हव ते भरपूर मिळायच पण टॉमॅटो, बटाटे बेचव लागायचे, फ्लॉवर कोबी पाणचट वाटायचे इथ लॅम्ब, हॅम, बीफ, चिकन किती प्रकारच मास मिळायच पण इडियाच्या बोकडाच्या मटणाची चव कशाला नाही, हे अगदी एकमत कुणाला लोण्याखालच्या फुलकवणी ताकाची आठवण यायची, तर कुणाला लसणीची फोडणी दिलेल्या अबाडीच्या भाजी भाकरीची ह्या वस्तू इथ कशा मिळणार? सणावाराची आठवण यायची विशेषत गणपतीची ती आरती, त्या मिरवणुका, मोदक अमेरिकेत येईपर्यंत कॉलेजात शिकणाऱ्या, घराघरातल्या या लाडाकोडाच्या लेकी, त्याना मोदक कसे जमणार? दिवाळी म्हणजे तर सणाचा राजा पहाटेची न्हाण, फटाके, आकाशकदिल, कानवले, अनारसे, तो सगनवाला तरी डाळीच्या पिठात सेंट घालून उटण व्हायच फराळाच व्हायच नवऱ्याच्या मित्राला ओवाळून भाऊबीज साजरी व्हायची इडियात आई जे करायची ते आठवून आठवून मुली करायच्या पण इथ 'घरघरमें अंधेरा सिर्फ मेरे घरमें दिवाळी' अशी स्थिती त्यामुळे सुन सुन वाटायच सक्रांतीच हळदीकुंकू, नवरात्रीच्या सवाष्णी सगळ थाटात करायच्या त्या सवाष्णीसाठी गुलाल बुक्का मिळाला की एकदम खूष इथल्या दह्याबद्दल सगळ्याची तक्रार एक इडियाहून दही घेऊन आली ही अपूर्वाईची

भेट, तिच्या मैत्रिणींनी विरजण म्हणून नेली

त्या वेळी क्वचितच कुणाचे आईवडील इथ आलेले होते त्यामुळे आम्हाला भेटायला, आमच्याशी बोलायला, सर्व मुलांना खूप आवडायच स्वत च्या गाडीत घालून, ती आम्हाला आपल्या गावी घेऊन जायची त्या गावात दुसरी मुल असायची कुणी गुजराथी, कुणी मद्रासी, कुणी बगालीसुद्धा त्याना आमच्या येण्याची बातमी फोनवरून कळायची मग सर्वांची आम्हाला आमंत्रण सगळ्याकडे भारतीय सगीताच्या रेकॉर्डस् भारतीय वस्तू, भारतातले मसाले भारतातल्या गोष्टी ऐकताना रगून जायचे आणि प्रत्येकजण म्हणायचा, 'आम्ही पैसे साठवणार आणि भारतात परत जाणार ' मी कुणाला पुरणपोळ्या करून घातल्या तर कुणाला नारळीभात कुणाला सोड्याच्या खिचडीच प्रात्यक्षिक दाखवल एकदा तिखट साजा केला तीन घरच्या तीन मुली आल्या होत्या, प्रत्येकजण म्हणते, 'अगदी माझ्या आईसारखा झालाय् ' आम्ही आमच्या दोन मुलाना भेटायला इथ आलो होतो पण इथ आल्यावर आम्हाला किती मुल मिळाली आणि त्यांच्यात आमच्यात निर्माण झालेला तो रेशमी धागा, अजून तसाच चिवट आहे

इडियातले गायक वादक इथ यायचे ही मुल त्याना इकडून तिकडे न्यायची त्याना आपल्या घरी ठेवून खाऊपिऊ घालायची कधी एखादी हौशी नाटक मडळी यायची या सर्वांचे कार्यक्रम ठरवून, त्याना पैसे मिळावेत म्हणून ही मुल धडपड करायची आधीची ना ओळख ना देख पण आपल्या देशातली माणस, म्हणून मोठ्या आनंदाने त्यांचं करायची आम्ही लॉस अँजिलिसच्या रस्त्यावरून फिरत होतो एक चार पाच वर्षांची मुलगी मला येऊन बिलगली एवढ्यात तिची बगाली आई माझ्या जवळ आली आणि म्हणाली, 'तिला तुम्ही तिच्या आजीसारख्या वाटता ' असाच एक मुलगा भेटला न्यूयॉर्कच्या म्युझियममध्ये बहुदा मद्रासी असावा झटकन् आमच्या पायाशी वाकला, मग म्हणतो, 'You look like my parents ' अशी ही आईबापाच्या भेटीसाठी आसुलेली मुलं आणि आम्ही इडियातले वेडे आईवडील? मुलगा पाठवलाय् खरा त्या मोहनगरीत, आपल्याला दुरावेल की काय? अशी काळजी करत बसतो वेडेच नाहीतर काय? वेड्याला काय आणखी शिंग असतात? सगळ्याना इडियात परत जायच होत कुणी म्हणत होत, आम्ही एवढी अमेरिका पाहिली, एवढ उपभोगल एकदां आईवडिलाना इथ आणू या सर्व दाखवू या मग परत जाऊ या भारतात परत जाण एवढ सोप नाही, हे का त्याना समजत नव्हत? तिथ जायचं म्हणजे पुन्हा नवी विटी नवा दांडू तिथ ब्लॉक घ्यायला हवा तो सजवायला हवा आईवडिलाची जबाबदारी तर सर्वांच्यावर होती कुणाला भावंडाची शिक्षण करायची होती कुणाला बहिणीच लग्न करायच होत त्याचा स्वत चा ससार सुरू झाला होता तो वाढणार होता इडियात हे सगळं जमेल का? याच्या उलट इथ राहिल तर, दोनचार वर्षांत दुप्पट तिप्पट पैसे मिळण्याची खात्री होती एखादं टुमदार घर घेता येणार होतं शॉपिंग मॉलमधल्या

आवडणाऱ्या नव्याकोऱ्या फर्निचरने ते सजवता येणार होत फ्रीज, वॉशर ड्रायर स्वत चा घेता येणार होता नवी गाडी घेता येणार होती राहणीमान खूपच उंचावणार होतं तरीपण मायदेशाची विलक्षण ओढ वाटत होती तिथली माणसं, तिथले पदार्थ, तिथल सामाजिक सास्कृतिक जीवन हवहवसं वाटत होतं त्यासाठी परत जायचच अमेरिकेतून शिकून आलोय् तेव्हा इडियात चागली नोकरी मिळेल अशी आशा वाटत होती कुणाला स्वत चा उद्योगधदा करायचा होता अमेरिकेइतके पैसे मिळाले नाही तरी चालतील सुखाने जगता येईल, एवढ मिळाल, तरी पुरे, अशी तडजोड करायची तयारी होती परत जायला मिळाल म्हणजे झाल दोनचार वर्षे थाबू हव तर घरदार घेऊ ते विकू मग ते पैसे घेऊन भारतात जाऊ पण काही झाल तरी अमेरिकेत कायम राहायचं नाही, हे नवराबायको दोघांचही एकमत

❊❊❊

६

# इंडियन मणी : अमेरिकन दोरा

मी अगदी वाट पाहात होते चाराचे सहा आठवडे झाले होते मुलाच पत्र नाही जीव उडून गेला होता नुसता नोकरी, कॉलेज, स्वयपाक, भाडी घासायची, कपडे धुवायचे, कामांची नुसती लामण लागलेली असते त्यातून पत्र लिहायला वेळ कसा मिळणार ? हे मला कळत होत, पण वळत नव्हत महिन्यातून एक पत्र यायचच मग, या वेळी का एवढा वेळ झाला ? आजारीबिजारी तर पडला नाही ? इतक्या मोटारी धावतात तिथ, काही अप-बघा वैरीही चिंतणार नाही, ते विचार आईच्या मनात येतात असले विचार कुणाजवळ बोलायचीही चोरी आपला जीव काळजीने कुरतडतोय्, तेवढ पुरे काही केल्या तो विचार मनातून जायचा नाही गोचडीसारखा चिकटून बसलेला जसा मन उदास व्हायच सारखी हुरहूर लागायची रात्री झोपेतून जाग आली की, लागली ती गोचडी लुचायला मग कुठली झोप ? कुणाशी बोलण्यात चित्त नाही कुठं जाण्याचा उत्साह नाही वाचनात मन नाही नुसती बेचैनी

सोमवार होता काशी विश्वेश्वराला जावं, म्हणजे मन थोडं शात होईल अस वाटलं पूजा केली आणि देवळातून बाहेर पडले रस्त्याला लागले वर नजर गेली, तर पलीकडच्या फुटपाथवर वीणाताई भराभर चालत जाऊन मी त्याना गाठल श्वास टाकायच्या आधीच विचारल,

'तुमच्या अनिलच अलीकडे पत्र आलय् का ?'

'हो, परवाच आलं सगळीजण मजेत आहेत बिपिनचा वाढदिवस केला सर्वांनी

मिळून चिकन केलं, मटारचे सामोसे केले, केक विकत आणला पुष्कळजण जमले होते धमाल आली म्हणे'

माझ्या मनाला चिकटलेली गोचडी केव्हाच गळून पडली मन अगदी गारेगार झालं खर म्हणजे, वीणाताईंची नी माझी पूर्वी मुळीच ओळख नव्हती कोण, कुठल्या काहीच माहीत नाही पण मुलाच पत्र आल, त्याचा मुलगा अमेरिकेत आलेला आहे पत्रात पत्ताही होता तेव्हा मुद्दाम त्याचं घर शोधून काढल व त्याची ओळख करून घेतली त्यानाही आनद वाटला त्यांनी, दुसऱ्या काही लोकांची ओळख करून दिली त्यांचीही मुल अमेरिकेत होती आम्ही, आमच्या माहितीच्या लोकाशी, त्यांची ओळख करून दिली अस आमच, अमेरिकेत गेलेल्या मुलांचे आईबाबा म्हणजे 'अमुआबा' मडळच बनलं म्हणाना आमच्या या मंडळाला ना घटना ना नियम, अध्यक्ष नाही की सेक्रेटरी नाही इकडे तिकडे विखुरलेले आम्ही मणी, त्याना ओवणारा धागा म्हणजे आमची मुल—अमेरिकेत असलेली आम्ही एकमेकाकडे जात होतो मुलाच्याबद्दल बोलत होतो आमच्या सर्वांच्या आवडीचाच विषय तो वेळ पटकन् जायचा एकाच नाही एकाच तरी पत्र आलेलं असायचं मुलाची खुशाली कळायची मनावरचं दडपण जायच, फार मोठी गोष्ट होती ती म्हणूनच अशा ओळखी करून घ्यायला सर्व आईवडील उत्सुक असायचे, आणि अस आमच मडळ वाढतच चालल होत

एक दिवस सुमनताई आल्या त्याच्या शेजारची मीना न्यूयॉर्कला जाणार होती एअर इंडियात होती न ती? पास होते, तेव्हा नवराबायको दोघजण फिरून येणार होती आमच्या मुलाना भेटणार होती मुलासाठी काहीही न्यायला तयार होती सुमनताई लोणची, मुराबे देणार होत्या वीणाताई बेसन लाडू नी चकल्या पाठवणार होत्या मी पुरणपोळ्या केल्या सणावारी मुलाच्या आवडीचा पदार्थ केला की, खाताना घशात घास अडकायचा माझ्या मुलाच्या तोडात पुरणपोळी जाईल, या विचाराने मला पुरणपोळी फार गोड लागली मुलाचे वडीलही म्हणाले, ' या वेळी पुरणपोळ्या खास केलेल्या दिसता फार छान झाल्यात ' असं कुणी ना कुणी अमेरिकेत जाणारं अधूनमधून भेटायच एखादा मुलगा मुलगी नव्याने अमेरिकेत जायचे आम्ही त्या वासावरच मग आमच्या मंडळातर्फे, सर्वांना बातमी समजायची मग नेणारा जे काही थोडफार नेईल ते त्याच्या बरोबर पाठवायच मुल सुद्धा, अमेरिकेतून कुणी येणार भेटलं की, त्याच्याबरोबर काहीना काही पाठवायची बहिणीला साडी, भावाला शर्ट, भाचराना खेळणी, आईला स्वयंपाकाला उपयोगी पडेल अस एखाद उपकरण मुलाकडून आलेल्या वस्तूंची अपूर्वाई काय विचारता? बहीण साडी नेसून मिरवायची तिच्या मैत्रिणींना हेवा वाटायचा फॉरिनचा शर्ट म्हणजे आकाशातला चद्रच होता त्या काळी मिरची-लसूण बारीक करायचं यंत्र-ह्यामुळे माझ काम किती सोप झालंय्, अस आई ज्याला त्याला सागायची मुलाकडून कधी कधी पैसेही यायचे त्या डॉलर्सचे केवढे

तरी रुपये व्हायचे मग काश्मीरच्या ट्रीपचे बेत आखायचे

मुलांची लग्नवऱ्हाडं झाली नी आमच अमुबाबा मडळ दुप्पट झालं आमची व्याही मडळी आपोआप या मडळात सामील झाली कुणी बडोदा-अहमदाबादचे, तर कुणी पुण्या-कोल्हापूरचे, नाशीक, सांगली, नागपूर गावोगावचे हे मणी होते पण त्याना ओवणारा धागा तोच त्यामुळे आम्ही सगळे एका माळेचे मणी झालो होतो, आणि आम्हाला ओवण्यासाठी तिसऱ्या कुणाची आम्हाला गरजच नव्हती मणी आणि धागा याच परस्पर आकर्षण एवढ जबरदस्त होत की, ते आपोआप गुफले जात होते मुलंही दुप्पट झाली होती पत्रंही दुप्पट, त्यामुळे 'सातासमुद्रापलीकडे मुलाला पाठवलाय्, तो तिथ एकटा आहे' हा मनाला टोचणारा टोकदार काटा बोथट झाला होता ही गावोगावची मंडळी, मुंबईत आली की, आम्हाला भेटत होती आम्हीसुद्धा त्यांच्या गावी गेलो की, त्यांची भेट घेत होतो त्याच्या गावचे खास पदार्थ मठीये, भुसु, भडग, पेढेबर्फी, सुतरफेणी या वस्तू मुलांना मिळत होत्या

आम्ही अमेरिकेला जाणार याचा आनद, आमच्यापेक्षा आमच्या 'अमुबाबा' मडळालाच जास्त झाला होता त्याच्या लाडक्या मुलामुलींना आम्ही भेटणार होतो न ओळखीच्या कितीतरी मुलामुलींना आम्ही भेटलो, शिवाय दुसरी मुलं पूर्वी ओळखीची नसलेली त्यानी आपल्या आईवडिलाचे आम्हाला पत्ते दिले मुद्दाम त्याना भेटायला जा सांगितल एका मुलाचं मला टेक्साससहून पत्र आलं त्याने लिहिल होतं,' तुम्ही अमेरिकेत आलात याचा मला आनद झाला मी लांब असल्याने आपली भेट होऊ शकली नाही पण तुम्ही इडियात गेल्यावर माझ्या आईला भेटा आम्ही मुल इथं किती मजेत आहोत, ते तिला सागा म्हणजे ती माझी काळजी करणार नाही ' आपल्या आईवडिलांच मन ओळखणारी ही मुलं

इंडियाला परत आल्यावर या सर्व मुलांच्या घरी जायचं, त्याच्या आईवडिलांना, त्यांच्या मुलांची सविस्तर हकीकत सागायची, अस आम्ही ठरवलंच होतं कुसुमच्या मुलीच लग्न म्हणजे एक चित्रकथाच होती जावई बघितलेलाच नव्हता, तिथं त्याचा स्वभाव कसा माहीत असणार? तो आपल्या मुलीशी कसा वागतो, याची धाकधुक त्याना वाटत होती म्हणून प्रथम तिच्याकडे गेलो मला बघितल्याबरोबर, दारातच तिने मला मिठी मारली मी तिच्या कानाशी तोंड नेऊन म्हटल,

'तुझ्या लाडकीला मी पण अशीच मिठीत घेतली होती गं '

'आता साग सगळ' आवेग ओसरल्यावर कुसूम म्हणाली

'तुझा जावई खरच रत्न आहे इंडियात शोधून तुला असा मुलगा मिळाला नसता तुझ्या मुलीच्या पायात काटा टुपला, तर त्याच्या डोळयात पाणी येईल, एवढा जपतो तो तिला '

'पत्रातून ती लिहिते कधी कधी मला बर वाटावं म्हणून तस लिहिते की काय अस मला वाटायच पण तू आता प्रत्यक्ष बघून आलीस, तेव्हा खात्री पटली '

'आणि तुझ्या मुलीचा गाण्याचा छंद तो जोपासायला तो केवढी मदत करतो '

'गाणं शिकवायला कुणी मिळालय् का तिथ?'

'नाही, तस तिथं कुणी मिळणं कठीणच, पण कितीतरी गायक-गायिकाच्या रेकॉर्डस् त्याने मिळवल्यात. कितीतरी टेप्स् जमवल्यात तुझी मुलगी घरात असली की, कुणाचं ना कुणाचं तरी गाण, त्याच्या घरात वाजतच असत शिवाय तिच्यासारखे हौशी तबलापेटी वाजवणारे आहेत तिथ त्यांच्याबरोबर ती प्रॅक्टिस करते तिथल्या लोकांना तिचं गाणं फार आवडतं काहीतरी कारणाने, ती मडळी तिला गायला बोलवतात, नवरा तर तिला कुठही घेऊन जायला तयार '

'तिच नशीब चागलं, म्हणून तिच्या कलेच चीज करणारा नवरा तिला मिळाला नाहीतर त्या तेलंगाच्या मुलीचं बधितलंस न? उत्तम डान्सर ती, पण लग्न झाल्यावर नवऱ्याने सागितले, 'नाचाचे कार्यक्रम केलेले मला आवडणार नाही ' बसली बिचारी गप्प एवढ शिक्षण, इतकी तिची हौस, सगळं फुकटच गेल की '

कुसुमला, न बघितलेल्या जावयाला कुठं ठेवू नी कुठ नको अस झालं

वीणाताईंचा फोन आला, म्हणून दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडे जायची सवड काढली स्वयंपाकघरातून रुमालाला हात पुसत पुसत त्या बाहेर आल्या माझ्या शेजारी सोफ्यावर बसल्या माझे दोन्ही हात त्यानी आपल्या हातात घेतले माझ्याकडे टक लावून बघत त्यानी विचारलं,

'कसा आहे माझा अनिल?'

'थाबा, मी तुम्हांला त्याचे फोटोच दाखवते ' पर्समधल फोटोंच पाकीट मी त्याच्या हातात दिल, त्यातले एक एक फोटो निरखून पाहात त्यानी विचारलं,

'इथून गेला तेव्हा इतका काटकुळा होता आता खरंच का एवढा सुधारलाय? की फोटोग्राफरची किमया?'

'खरच त्याच्या गालावर गाल आलेत गोरा गोरा पान दिसतो '

'आणखी काय विशेष म्हणत होता?'

'खास निरोप आहे तुम्हाला म्हणाला, आईला सांगा, आता तुला माझी काळजी करण्याचं काही कारण नाही तेव्हा मीच तुझी काळजी करत बसतो, म्हणजे माझं वजन तरी थोड कमी होईल '

'मुलखाचा वात्रटच आहे तो '

'सारखा अस काही गमतीच बोलून आम्हाला हसवायचा त्याच्याकडचे दोन दिवस नुसते हसण्या खिदळण्यातच गेले आमचे '

वत्सलाबाईंच्या बद्दल सर्वांनाच आदर नवऱ्याच्या मागे चार मुल त्यांनी वाढवली साधी शिक्षिकेची नोकरी करून मुल मात्र एकापेक्षा एक हुशार निघाली मोठा तर स्कॉलरशीप्सवरच शिकला शिकवण्या करायचा असा हिरा कुणाच्या तरी नजरेत भरायचाच, आणि तसच झाल आपल्या मुलीशी त्याच लग्न लावून दिल आणि त्या दोघाना अमेरिकेला पाठवून दिल मुलगा अमेरिकेला गेला, त्याचे नशीब उजळेल, याचा आनद वाटला त्यांना पण थोऱ्यामोठ्यांची मुलगी मिळाली, अमेरिकेत राहायला मिळाल, म्हणून हा आपल्याला दुरावेल का? भावडाची जबाबदारी विसरेल का? हे प्रश्न त्याच्या मनात यायचेच त्याच्या मुलाने त्याच्यासाठी कांदे चिरायच यत्र दिलं होत रविवार बघून मी त्यांच्याकडे गेले त्याच्या मुलाची भेट त्याच्या हातात देत मी म्हणाले,

'तुमचा मुलगा म्हणत होता, कादा चिरताना आईला फार झोंबतो, तिला सागा, या यत्राने कादा चीर म्हणजे झोंबणार नाही '

'किती बारीकसारीक गोष्टी लक्षात ठेवल्यात त्याने ' कांदा न चिरताच वत्सलाबाईच्या डोळ्यांत पाणी आलं

प्रभाताईंच्या नातीला, तिच्या काकाने बाहुली दिली होती सुमनताईंच्या मुलीने आईसाठी छत्री दिली होती ज्याच्या त्याच्या वस्तू ज्याला त्याला पोचवल्या ती मुलं कशी आहेत? त्याचं घर कस आहे? ती काय बोलली? जेवायला काय केल होत? सगळ्या बरीकसारीक गोष्टी मी त्याना सांगितल्या मी त्याच्या मुलांना भेटून आले, याचा प्रत्येक घराघराला आनंद वाटत होता मला वाटलं, आनदाच्या ज्योतीची निराजन मी अमेरिकेहून घेऊन आलेय् व त्या ज्योतीने, मी घराघरातील निरांजन पेटवतेय्

अमेरिकेत शिक्षणाची उत्तम सोय, तुमच्या कुवडीप्रमाणे अभ्यासाचे वर्ग, तुमच्या आवडीचे विषय, तुम्हाला जमतील तेवढी क्रेडिटस् घेण्याची सोय या सधीचा मुलमुलीनी चागलाच फायदा घेतला काही डॉक्टर मुली इथ आलेल्या होत्या तो व्यवसाय करायला लायसन्स हव त्यासाठी त्यानी परीक्षा दिल्या, खडतर इंटर्नशीप केली कप्युटरशिवाय नव्या जगाच पान हालत नाही मुलीनी त्यात मास्टर्स केल, कुणी एम बी.ए केल कुणी सी पी.ए केल ज्याना डिग्री कोर्स जमला नाही, त्यानी लहानसहान कोर्सेस केले पण प्रत्येकाने आणखी आणखी ज्ञान मिळवून, आपली गुणवत्ता वाढवली दोघानी एकमेकाच्या मदतीने केल कुणी कुणीतर एकदोन मुलं सांभाळून केलं, हे विशेष

बाळंतपणासाठी, कधी कुणाचे आईवडील, कुणाचे सासूसासरे यायचे वीणाताई सुनेच बाळतपण करून परत आल्या, तेव्हा आम्ही ५ - ६ जणी त्याना भेटायला गेलो या, बसा झाल्यावर, प्रभाताई म्हणाल्या,

'अमेरिकेत बाळतपण कस केलत, हे विचारायला आलोत आम्ही '

'मी गेले नी पुढच्या शनिवारी तिच्या अमेरिकन इडियन मैत्रिणींनी तिला बेबी

शॉवर केला '

'बेबी शॉवर म्हणजे?'

'आपण डोहाळेजेवण म्हणतो न, तसलाच प्रकार एकीच्या घरी सगळ्या जमल्या प्रत्येकीने एक एक खाण्याची डिश आणली होती काही गेम्स् खेळल्या '

'कसले गेम्स् खेळल्या? एखादा तरी सांगा, गंमत म्हणून ' सुमनताईंनी मध्येच विचारलं

'एक मोठा सुताचा गुंडा आणला होता डोहाळतुलीच्या पोटाचा घेर किती असेल, त्याच्या अंदमाने, प्रत्येकीने तेवढा दोरा तोडून ठेवायचा मग प्रत्यक्ष तिच्या पोटाच माप घेऊन दोरा तोडायचा जिचा दोरा, त्या मापाच्या दोऱ्याच्या जास्तीत जास्त जवळचा, तिला बक्षीस मग प्रत्येकीने लहान मुलाच्या उपयोगी पडतील अशा वस्तू तिला प्रेझेन्ट दिल्या लहान मुलांचे कपडे, ब्लँकेट, नाइट ड्रेस, बेबी सीट, चिमणाळ, काटेचमचे अस सगळ '

'ब्लाऊझपीस देण्यापेक्षा हे चांगलं उपयोगी पडणारं '

'आपल्याकडे ओळखीची, नात्याची माणस डोहाळेजेवण करतात इथ शेजार-पाजारच्या बायकासुद्धा, बेबीसाठी काही काही आणून द्यायच्या तिथल्या पेपरमध्ये आल होत रोज ठरावीक बसने नोकरीवर जाणारी एक गरोदर बाई बसमधले लोकही ठरावीकच त्यानी एक दिवस ठरवला आणि प्रत्येकाने तिला तिच्या बेबीसाठी गिफ्टस् दिल्या '

'बाळंतपण कसं केलत? ते तर सांगा '

'कसलहो बाळंतपण ते बाळंतीण झाल्याबरोबर, तिच्या खोलीत, तिला भेटायला आम्ही गेलो, तर तीच आमच्या पुढ्यात उभी बाळ दाखवायला तीच आम्हाला घेऊन गेली तिसऱ्या दिवशी बाळबाळंतीण घरी मुलगी म्हणून तिला सगळं गुलाबी रंगाच क्रीबच्या गाद्यागिरद्याना गुलाबी फुलाची कव्हर्स तिचे कपडे, ब्लँकेट, शाल सगळ गुलाबी लोकाकडून सुदर सुदर कार्डस् आलेली ती भिंतीवर, क्रीबच्या कठड्याना लावलेली वरती रंगीत फुलपाखराचं चिमणाळ मुलीला शक्य तेवढ क्रीबमध्येच ठेवायच मांडीवर पुढ्यात घ्यायच नाही तेल नाही मालीश नाही बाळाला नाही नी बाळाच्या आईला पण नाही '

'आणि खाण काय द्यायच? डिंक, हाळीव, सुठ अस काही केलत का?'

'छे, तसल काही नको म्हणाली ती रोजच खाण अंडी, कोंबडी मग ते काही नकोच म्हणाली तिथ पोटात मुलाचा वास पडल्यापासून, दर महिना डॉक्टरकडे जायचं मुलाची वाढ कशी होतेय्? गरोदर बाईचं वजन कस वाढतंय् अस सगळ तो बघणार त्याच्या सल्ल्यानुसार वागायचं, खायच, प्यायच, व्यायाम करायचा नवराबायको दोघांसाठी क्लासेस असतात मुलाची कशी जोपासना करायची बाहुल्या देऊन आंघोळ कशी घालायची ते पण शिकवतात गर्भाची वाढ कशी होते, प्रत्यक्ष प्रसूती कशी होते हे पडद्यावर दाखवतात सगळ माहीत असल्यामुळे मनातली भीती जाते तिथ कोण येतय्

बाळतपण करायला नवराबायको दोघ मिळून सगळं करतात मुलाच आपलीही मुल आवडीने थोड थोडं करतात '

सुशिलाबाईंचा मुलगा व मुलगी दोघही अमेरिकेत त्या अमेरिकेत गेल्या आणि चागल्या दीड वर्ष तिथ राहिल्या त्या परत आल्या तेव्हा, मी त्यांना आमच्या घरी बोलावल दुसऱ्याही चारचौघी आल्या होत्या सुशिलाबाई सांगत होत्या,

'सगळ्यानी घर घेतलीत हो आता टुमदार घरं मागेपुढे हिरवळ थोडीशी मेपलची मोठी झाडं मधून मधून फुलझाडाचे ताटवे खालून पसरट व वर हळूहळू टोकदार होत गेलेली पाइनची झाड, ही तर तिथलं खासीयत आतूनही घरं छान सजवलीत तीनचार बेडरूम्स, शिवाय स्वयपाकघर, फॅमिलीरूम, लिव्हिंग रूम '

'करायची काय ती एवढी मोठी घर? घरात राहणारी माणस इनमीन तीन '

'तिथ प्रत्येकाला वेगळी खोली असते शिवाय पाहुण्यासाठी एखादी खोली आपल्यावरून तिथलं मोजू नका आपण काय करतो? नोकरी संपून पन्शन घेतल की, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटीचे सगळे पैसे घालून, कुठंतरी 'श्रमसाफल्य' बाधतो या मुलांनी तिशीपस्तिशीतच एवढी छान घर घेतलीत, हे वाखाणण्यासारख नाही का?'

'पण घरं घेतली म्हणजे, त्यांचा पाय अमेरिकेत अडकायला लागलाय् हे तर खर? आता ती कसली परत येतात? मग आमच कस व्हायचं हो? हातपाय धड आहेत, तोवर ठीक पण एकदा खोडंमोडं झाल मग कोण बघणार आपल्याला?'

'आता तर ती आपल्याला काही कमी पडू देत नाहीत न? पैसाअडका पाठवतात तुम्ही मजेत राहा, कुठही टॅक्सीनेच जा असं सांगतात नं? नुसता आपलाच विचार करून कस चालेल? त्याच उभं आयुष्य आहे त्याच्यापुढे शिवाय त्याची मुल, त्याचाही त्याना विचार करायला हवा आपल काय? दहा गेले पाच राहिले '

'त्या विनायकरावांनी काय केलं बघितलंत न? मुलगा गेल्यापासून अंथरूणाच धरल सारखी त्याला 'तू ये तू ये' म्हणून पत्र एक दोनदा तो भेटून परत गेला पण यांचा ध्यास सपेना शेवटी तो अमेरिकेहून चंबूगबाळ गुडाळून परत आला '

'पण त्याला इथ चागली नोकरी आहे न?'

'आहे हो पण अमेरिकेइतका पैसा इथ मिळेल का? मुलगा जवळ असावा अस वाटणं, ह्या झाल्या भावना पण जगात व्यवहाराला जास्त महत्त्व आहे '

'माझा मुलगा तर स्पष्ट लिहितो, मी परत येणारच नाही म्हणून सगळ्यांना मी तिथं नेईन म्हणतो म्हणून वाटतं, उगीच याला अमेरिकेला पाठवला '

'पण तुमचा मुलगा अमेरिकेला गेला नसता तर, तुमच्या सुलूला इंजिनियर नवरा मिळाला असता का? धाकट्याला मेडिकलला जायला मिळालं असत का?' एकीने पुटका टाकला

'पण तुमची दुसरी मुलं काय म्हणतात?'

'ती सगळी एका पायावर जायला तयार आहेत शेवटची परीक्षा कधी होतेय्, याचीच वाट पाहतोय मुलगा जावई पण तयारीत आहेत पण ही सगळी गेल्यावर मी काय करू?'

'तुम्ही पण तिकडे जा

'मला नाही बाई तिकडे कायम राहायला आवडणार '

'तुमच्याच काय पण दुसऱ्या कितीतरी मुलाना अमेरिकेत जायची इच्छा आहे मग गेलेल्याना आपण परत या म्हणून कशाला आग्रह करायचा? त्यातून आपल्याजवळ काही डबोल असत तर गोष्ट वेगळी, हे घे बाबा आणि कर इथ काही सुरू '

'तस देऊनही परत येणारी मुलं नाहीत हो आमच्या धद्याचा एवढा पसारा वाटल, हा अमेरिकेत जाईल, शिकेल, अनुभव घेईल आणि घरचा धदा आणखी वाढवेल पण कसलं काय? हा मुलगा मुळी येण्याचं नावच काढत नाही त्याच्या बायकोला अमेरिका आवडते, तिथं राहायला आवडतं, ही खरी गोम आहे '

'तिथं स्वातत्र्य मिळत न वागण्यासवरण्याच '

'इथ कुणी आडवलं होत त्यांना? लग्न झाल्या झाल्या वेगळंच बिऱ्हाड करून दिल होत त्याच्या मित्रमैत्रिणी येणार, तिच्या माहेरची माणस येणार आमच्यामुळे कुणाला संकोच नको आधीपासूनच आम्ही तस ठरवल होतं त्यांची ती स्वतत्र, आमची आम्ही '

'तरीपण तिथलं स्वातत्र्य वेगळच नाही म्हटलं तरी इथ, सासरमाहेरचं काही दडपण येतंच हे कपडे घातले तर कुणी हसेल का? बॉब केला तर कुणी टीका करेल का?'

'हे पुरे आता पण सुशिलाबाई, तुम्ही सागा तिथलं मुलाच्या बोलण्यावरून तुम्हाला पुष्कळ कल्पना आली असेल '

'इडियाला जाव की न जावं या प्रश्नाचा ऊहापोह, मी कितीतरी घरी ऐकला आपल्या देशात जाव, आपल्या माणसात राहाव, इडियातली सिनेमानाटक बघावी, इडियातल संगीत ऐकाव, इडियातल्या सामाजिक सास्कृतिक कार्यक्रमात भाग घ्यावा असं तर सर्वांनाच वाटत पण त्यासाठी लागणारा पैसा इंडियात मिळेल अस त्याना वाटत नाही तरीसुद्धा काहींनी इडियात प्रत्यक्ष येऊन, इथला रागरग बघायचा अस ठरवलय् चारपाच जणानी आपले ग्रुप केलेत त्याना इथ येऊन काही धदाउद्योग करायचाय् कसला धदा करायचा? कुठे करायचा? त्यासाठी मशिनरी काय लागेल? मालाचा उठाव कसा होईल? ह्या सगळ्याची ते माहिती मिळवताहेत त्याच्या महिना पधरा दिवसानी मीटिंग्स होतात दरमहिन्याला त्यासाठी पैसे बाजूला काढून ठेवतात शिवाय तिथ घराच्या किमती वाढताहेत तेव्हा जायच ठरल तर, घर विकून पैसा उभा करता येईल '

'हे मात्र चांगल हो चारचौघांनी मिळून काही केलं तर होईल ते आणि मुलं नक्की

परत येतील ' सुधाताई मुलगा परत येईल या कल्पनेने हुरळूनच गेल्या

'माझ्या जावयाने, कारखान्यासाठी अलिबागजवळ जागा पण घेतलीय् तो ६-७ महिन्यात नक्कीच येणार '

'माझ्या सुनेला अमेरिका मुळीच आवडत नाही तिला आपला देश, आपली भाषा, आपली सस्कृती याच भारी प्रेम माझ्या मुलानं इथ नोकरी मिळवलीय् आम्ही त्याच्यासाठी मोठा ब्लॉक पण घेतलाय् '

'माझ्या मामेनणदेचा दीर, गेली १२-१५ वर्षे तिकडेच आहे तिथल्या वातावरणात मुल वाढवण, त्याला पसंत नाही, म्हणून त्यानं बायको मुलाना इथ ब्लॉक घेऊन दिलाय् दरवर्षी सुट्टीत ही मडळी तिथ जाणार आणि वर्षातून एकदा तो इथं येणार, अस ठरलय् त्याच '

'हा कसला हो ससार? पैशाच्या मागे लागून संसाराचं सुख हरवून बसायच यात काय अर्थ?'

'त्यांना काय आनंद वाटला असेल असं ठरवताना? पण आजकाल पैसा बोलतो नुसतं पोट भरून चालत नाही शिक्षणाला पैसा हवा, सुखसोईंसाठी पैसा हवा, जगात पुढं यायचं तर पैशाचं पाठबळ लागतच '

'तुम्ही ऐकलंत का? लीलाताईच्या मुलाने, आपल्या दोन मुलींना, आजीआजोबाकडे शिकायला पाठवलय् ते?'

'ते का बाई?'

'त्या मुली १०-१२ वर्षांच्या झाल्यात तिथं म्हणे अशा आडनिड्या वयाच्या मुलामुलींचे फार प्रश्न मुलमुली फार मोकळेपणाने वागतात त्याची मैत्री होते ती सिनेमाला जातात, हॉटेलमध्ये जातात मग लहान लहान मुली गरोदरसुद्धा राहतात आजूबाजूला असे प्रकार त्याचे परिणाम आपल्या मुलींवर होऊ नयेत म्हणून त्यानी त्याना इथंच पाठवून दिल '

'बरं झालं आजीआजोबा मायेने त्याच करतील आणि शिस्त पण लावतील '

'ह्या फक्त बोलायच्या गोष्टी प्रत्येक पिढीच्या विचारात, वागण्यात फरक असतोच जुन्या पिढीला नव्याच वागण आवडत नाही, नी नव्या पिढीला जुन्यांच पटत नाही याचा अनुभव आपण पण घेतलाय् इथ तर पहिल्या पिढीने, तिसरी पिढी वाढवायची केवढी तफावत कस जमायच त्यांच? इतके दिवस तिथ राहिलेल्या मुली, त्याना आपल्या मनाप्रमाणे वागण्याची सवय असणारच आजी जर 'हे करू नको, तस वागू नको' म्हणाली तर त्याना ते पटेल का? जग तर पुढं चाललय् त्या जगात मुलींना वावरायचंय् त्यासाठी त्याची तयारी करून घेणं आजोबाआजींना कठीणच जाणार '

इथ वाढलेली ही मुल त्याचा पिंड इथला त्याची पाळमुळ इथ रुजलेली त्याना

तिकडच्या गोष्टी कशा रुचणार? आपल्या मुलावर, त्या वातावरणाचा परिणाम होऊ नये, असं वाटणही साहजिकच आहे मुलांवर आपल्या देशाचे संस्कार व्हावेत, त्याना आपला देश, आपला धर्म, आपली भाषा याच प्रेम वाटाव म्हणून हा आटापिटा सगळी मुल शाळाकॉलेजात गेली तरी घर ओकओक वाटतं इथं तर मुलाना दूर ठेवून परदेशात एकट राहायचं, काय सोपं काम आहे ते? मला मराठी पाचवीत शिकलेल्या कवितेच्या ओळी आठवल्या

देशासाठी भटकत जरी दूर देशी फिरेन।
मी राजाच्या सदनि अथवा घोर रानी शिरेन॥
नेवो नेते जडतनुस या दूर देशास दैव।
राहो चित्ती परि मम तरी जन्मभूमी सदैव॥

# ७

# नागरिकत्व

'आमच्या दिनूने काय दिवे लावले, हे तुम्हाला पण समजल न?' वत्सलाबाईंनी आम्हाला बघितल्याबरोबर विचारल हा वत्सलाबाईंचा नेहमीचा स्वर नव्हता त्या अगदी मऊ स्वभावाच्या दुसऱ्याच बरोबर, आपलंच काही चुकल असेल, अस पडत घेणाऱ्या आम्ही गेलो म्हणजे त्यांना किती आनद व्हायचा काय करू नी काय नको व्हायच त्यांना पण आज नुसत 'या बसा' पण म्हणाल्या नाहीत एकदम हाच प्रश्न आम्ही चकीतच झालो

'अहो, पण त्यान एवढं केलं तरी काय?' मी व वीणाताई दोघी एकदमच म्हणालो

'तो अमेरिकेचा नागरिक झाला आमच्या चाळीतल्या लोकाना बोलायला चागलाच विषय मिळालाय् '

'अस बोलतात तरी काय ते?'

'खालच्या मजल्यावरच्या चपूताई म्हणाल्या, आता तुमचा मुलगा काही देवधर्म करणार नाही देवपूजा नाही उपासतापास नाही '

'इथली तरुणमंडळी तरी करतात का देवपूजा नी उपासतापास? दोघ नोकरी करणार वेळ आहे कुठ त्याना? कुणी संकष्टी करतात पण त्यात देवधर्माचा भाग किती आणि साबूदाण्याची खिचडी, रताळ्याची खीर, उपासाच थालीपीठ अस काही वेगळं खायला मिळतं याचा भाग किती, हा प्रश्नच '

'शेजारच्या उमाकाकी विचारत होत्या, गणपती, दिवाळी हे सण पण तो करणार नाही का? का त्याचेच सण खिसमस, न्यूइयर हे करणार?'

'असं कसं होईल? मी तिथ होते, तेव्हा प्रत्यक्ष पाहिलय्' वीणाताई सागायला लागल्या

'कुणाकडे तरी गणपतीची चाल होती त्यांनी इंडियातून गणपतीची मूर्ती आणली होती चांगली मखरात बसवली होती छान आरास केली होती खूप मित्रमडळी जमली होती बिनकाद्यालसणाचा स्वयपाक केला होता मोदक होते पुस्तकात वाचून साग्रसगीत पूजा झाली जोरजोरात आरत्या म्हटल्या मात्र आपल्या इकडल्यासारख पाण्यात गणपतीचं विसर्जन करता येत नाही तिथं तिथला कायदाच तसा आहे मग पाण्यात अक्षदा टाकून शास्त्राला विसर्जन केल गावागावातल्या मडळातून सुद्धा, गणपती उत्सव साजरे होतात तुमचा मुलगा कुठनाकुठ जाणारच

'दिवाळीसुद्धा, काही कुटुबं एकत्र येऊन करतात प्रत्येकाने एकदोन जीन्नस करून आणायचे खाजाचे कानवले, लाडू, चिवडा, चकल्या, पेढेबर्फी कितीतरी फराळाचे पदार्थ मुल ओळीने बसतात, मुली त्याना ओवाळतात अशी भाऊबीजसुद्धा होते तिथ आता ख्रिसमसच म्हणाल नं, तर घराघराला रोषणाई केलेली असते ख्रिसमस ट्री सजवलेला असतो मग आपलच घर काळोखात ठेवल तर आपल्या मुलाना कस आवडेल? नव्या वर्षाच स्वागत करण्याची त्याची पद्धत मला तर खूप आवडली इडियात आम्ही झोपेत गिरणीचे भोंगे ऐकत असू नववर्ष म्हणून एकदा केक करायचा पण हे लोक रात्रभर जागून, खाऊनपिऊन, नाचून नव वर्ष लागल याचा आनंद करतात'

'कडेच्या गाळयातले नानाआजोबा मुद्दाम मला रस्त्यात आडवून म्हणतात कसे, 'भाऊ अमेरिकन झाला, आता अमेरिकन वहिनी कधी यायची तुला? अमेरिकेतल्या लोकाना, एक बायको जन्मभर पुरत नाही एकीला घटस्फोट देऊन ते दुसरी करतात'

'पण आई त्याच हे नेहमीचच वहिनीने पाठवलेली साडी मी नेसले, तिने पाठविलेला दागिना मी घातला, की ते असच काहीतरी खवचट बोलतात' वत्सलाबाईंच्या धाकट्या मुलीलाही आता बोलायचा धीर आला होता

'त्याच काय ऐकता तुम्ही? त्या परक्या देशात, नवऱ्याला बायकोचा आणि बयकोला नवऱ्याचा आधार कोण कशाला घटस्फोटाच्या फदात पडेल?'

'मलाही तसच वाटत' वत्सलाबाईंचा स्वर आता शात झाला होता तिची माणस तरी किती सज्जन केवढ्या थाटने लग्न करून दिल त्यानी आम्हाला एक दमडीचा खर्च करू दिला नाही आमची सगळी हौस आवड पुरवली त्यात अमेरिकेत पाठवायची उचलही त्यानीच केली'

वत्सलाबाईंची समजूत घालून आम्ही आपआपल्या घरी परतलो पण माझ्या काळजात, काळजीची पाल चुकचुकत होती, 'माझा मुलगा पण अमेरिकेचा सिटिझन होईल की काय?' त्या पालीच्या डोक्यावर मी जोराने एक चापटी मारली आणि म्हणाले, 'हा

दिनू अमेरिकेत पाऊल ठेवल्यापासून म्हणतोय, मी इथंच राहणार, कायम राहणार इंडियात कायम राहण्यासाठी परत जाणार नाही इथच राहून मला जे करता येईल ते मी करीन' मला तर तेव्हा त्याचा रागच आला होता असा कसा हा मुलगा? याला आपल्या माणसांची, आपल्या देशाची ओढ नाही म्हणजे काय? म्हणूनच त्याने घेतली असेल सिटिझनशीप आमची मुल तशी नाहीत ती इंडियात यायला अगदी उत्सुक आहेत आज ना उद्या ती येतील ती कशाला घेतील अमेरिकेची सिटिझनशीप? दिनू तसं म्हणाला होता खरा, पण तो अमेरिकेत गेल्यापासून, वत्सलाबाईंच्या घराला ऊर्जितावस्था आलेली होती तो आईला लिहायचा, 'आतापर्यंत तू खूप कष्ट केलेस आता नोकरी सोडून दे, आराम कर' त्याचा अंधेरीला चार खोल्याचा ब्लॉकही तयार होत होता

इंडियात परत येण्यासाठी मुलांच्या भावना उचबळून येत होत्या पण व्यवहार? तिथं गेल्यावर जमेल का? इथं हातात चांगली नोकरी आहे तिथ काय होईल? हातच सोडून पळत्याच्या पाठी लागावं का? तरी पण काहीजणानी हिय्या केलाच ते इंडियात परत आलेच त्याच काय झाल, याची बित्तबातमी, आम्हाला आमच्या 'अमुबाबा' (अमेरिकेतल्या मुलांचे आईबाबा) मंडळातर्फे लागत होतीच

सिंधूताईंच्या मुलाला, बेंगलोरला चागली नोकरी लागली होती कंपनीने राहायला मोठं क्वार्टर दिल होतं गाडी होती कपनीची त्याच्या सुनेला तर फार आवडलं ते आयुष्य अमेरिकेहून आलेल्या मोठ्या ऑफिसरची ती बायको गडीमाणसं हाताशी, अमेरिकेतल्या-सारख सगळी कामं स्वत करायला नकोत समाजात मान क्लब होते पत्ते खेळायला मिळायचे पण मुलाच नोकरीत मन लागत नव्हतं त्याचे अमेरिकेतल शिक्षण, त्याच्या नव्यानव्या कल्पना, त्याची अमेरिकन पद्धत कशाचा त्याला इथ उपयोग करता येत नव्हता मालकाचा जावई कपनीचा सर्वेसर्वा तो म्हणेल तस वागाव लागायच ह्याच्या सगळ्या कल्पना तो मुळी धुडकावूनच लावायचा नोकरीत स्वतत्र निर्णय घ्यायच स्वातत्र्य नाही त्यामुळे नोकरीत त्याला रसच वाटेना जॉब आवडला तर करायचा, नाहीतर दुसरा बघायचा ही अमेरिकन पद्धत त्याला आवडली न आवडणारी नोकरी करण्यात, आयुष्यातली मोलाची वर्षं फुकट घालवायला तो तयार नव्हता त्याचे हितचिंतक त्याला दुसरी नोकरी बघ अस म्हणत होते पण पुष्कळशा मालक लोकानी आपले मुलगे, पुतणे, भाचे अमेरिकेला पाठवून शिकवून आणलेले अशी पैशाची गुतवणूक त्यांना चागली फायदेशीर झालेली तेव्हा तिथंही 'पळसाला पानं तीन' हाच प्रकार असणार पुन्हा प्रयोग करून पाहायला मुळी तो तयारच नव्हता त्याने बायकोला सांगितल, 'मी पुढे जातो, तिथं पुन्हा घडी बसवतो, मग तू ये'

प्रभाताईंच्या जावयाने धंद्यासाठी जागा घेतली होती त्यात एका माणसाच झोपडं होत तो बऱ्या बोलाने तिथून हलायला तयार नाही अव्वाच्या सव्वा पैसे मागायला लागला

नाहीतर कोर्टात जा म्हणत होता एकदा कोर्टात केस गेली की, पाच का दहा वर्षं सुद्धा लागायची, निकाल लागायला शिवाय प्रत्येक अर्ज करताना, त्याच्यावर वजन ठेवायच, नाहीतर तो कचऱ्याच्या कुंडीत उडून जायचा. १०-१२ वर्षं अमेरिकेत राहिलेला तो त्याला हा प्रकार माहीत नव्हताच करणंही जमणार नव्हतं इंडियात राहण्याची, त्याची इच्छाच सपली झाल तेवढ नुकसान पुरे म्हणाला त्या दोघांनी आपल चंबूगबाळ गुंडाळलं आणि अमेरिकेच विमान पकडल

सुमनताईंची देशाभिमानी मुलगी, अमेरिकेत गेली तीच मुळी इंडियात परत येणार असा निश्चय करून इंडियात जाताना तिने फ्रीज, कुकिंग रेंज, वॉशरड्रायर, डिश वॉशर, सगळ सगळं नेल होतं ब्लॉक घेतलेला होताच तो सजवला तिथल्या सामाजिक, सास्कृतिक सस्थांशी तिने सबध जोडले मुलांना उत्तमातल्या उत्तम शाळेत घातले मुलाच्या अभ्यासात लक्ष घालायला लागली पण मुलं हिरमुसलेली-अमेरिकेत, त्याच्या वर्गात १५ ते २० मुल असायची इथल्या वर्गात ४० ते ५० मुल ह्या गचडीत वर्गात बसावं असं त्याना वाटेना शिक्षक काय शिकवतात, ते समजेना अमेरिकेतल्या शाळाना खेळण्यासाठी केवढी मोठमोठी मैदाने शाळेत स्वीमिंग पूल, टेनिस कोर्ट, बेसबॉलसाठी मोठा हॉल, त्यातल इथं काहीच नाही मनासारख खेळायला मिळायचंच नाही त्याची कुचंबणा व्हायची होमवर्क करून पाठ दुखते, मान दुखते याचं रडगाण आई रोज बाबापुता करून अभ्यास करून घ्यायची पण एक दिवस, मुलाने पुस्तक चक्क फेकून दिल आणि म्हणाला,'I hate this school I like American school ' आई हताश झाली आपल्याला हव तस जीवन आपण इथं मिळवू शकू, पण मुलांचं काय? मुलं चागली शिकावीत, त्यांची प्रगती व्हावी, ती नावारूपाला यावीत असं सगळ्या आईबापाना वाटत त्यासाठी सगळी धडपड करायची पण जर त्याना शाळेचाच तिटकारा आला, तर ती काय शिकणार कर्म? शाळेची, अभ्यासाची गोडी लागायलाच हवी मुलाना ते इंडियात होण शक्य नाही, अशी तिची खात्री पटली, तेव्हा तिने आपल्या देशात राहण्याचा हेका सोडला व अमेरिकेची वाट धरली दोघानी, पुन्हा श्रीगणेशाय नम करायला त्यातल्या त्यात चागली गोष्ट म्हणजे, तिचा तो ब्लॉक, तिने अमेरिकेहून आणलेल्या सर्व वस्तू दामदुप्पट किमतीला विकल्या गेल्या

रावसाहेब भावे म्हणजे अहमदाबादमधली केवढी मोठी आसामी कितीतरी गिरणीमालक त्याच्या खिशात त्यांच्या मुलाला, आपण बापाच्या सावलीत राहून खुरटून जाऊ असं वाटायचं तो अमेरिकेत गेला बापालाही वाटल, अमेरिकेत जाऊन शिकून येतोय् चागल पण शिक्षण पुर झाल्यापासून, 'परत ये' म्हणून बापाचा तगादा कापडाच्या गिरण्याना लागणारी यत्रसामग्री पुरवायचा धदा ते करणार होते मुलाने अमेरिकेत नोकरी करून पैसे जमवले व इंडियात परत आला तर काय? अहमदाबादच्या गिरण्यांत संप, मुंबईच्या गिरण्यात सप त्यांची आधीचीच मशिनरी गंजून चाललेली नवी कोण घेणार?

६ महिने झाले, ८ झाले, वर्ष झाले, सप मिटण्याची चिन्ह दिसेनात बाप म्हणत होता आणखी थोड थाब, आपण दुसरं काही बघू तुला अमेरिकेत जेवढा पगार मिळत होता, तेवढे पैसे मी तुला दर महिन्याला देईन पण याला कुठल पटायला ते? तो मुळी अमेरिकेला निघून गेला

इडियात राहिलेल्यांच्या गोष्टी ऐकल्या पण फारच कमी परत जाणारे मात्र बहुतेक तेव्हा आता आपली मुलं, अमेरिकेत कायम राहणार, ही खूणगाठ आम्ही मनाशी बाधली मुलगा अमेरिकेत गेला, तेव्हा अमेरिका किती लाब, तो पुन्हा कधी दृष्टीस पडेल, ह्या काळजीने पोटात गोळा उभा राहिला होता तो आता विरघळून गेला होता नियमित पत्र यायची, इकडूनतिकडून वरचेवर खुशाली कळायची दोनतीन वर्षांनी मुले भेटायला यायची काहींचे आईवडील तिकडे जाऊन, राहून यायचे तिथल्या सर्वांचे वर्णन करायचे आता मुलानी आणखी मोठीमोठी घरं घेतली होती त्या घरात कितीतरी खोल्या, कितीतरी बाथरूम्स कुणाच्या घराला स्वीमिंग पूल तर कुणाच्या टेनिसकोर्ट, गझिबो सुद्धा तर कुणाच्या बाथरूम्स्मध्ये झकुझी इडियात अशा घरात राहायला मिळेल का? मुबईसारख्या ठिकाणी तर चारपाच खोल्याचा ब्लॉक म्हणजे डोकीवरून पूर गेला इडियातल्या कलाकुसरीच्या वस्तूनी घर सजवलेली आता त्यांच्या एकाच्या दोन गाड्या झालेल्या इंडियात गाडी ठेवण कठीण, चालवण कठीण आगगाडीला किंवा बसला लोंबकळून कामावर जायच फर्स्ट क्लासचा पास काढला तरी उभ्याने प्रवास करायचा अमेरिकेत मुल चागली स्वतःच्या गाडीतून आरामात प्रवास करीत होती कशाला यायच इथ? इडियात दर दिवसाला लोकसख्या वाढते, महागाई वाढते अमेरिकेतही थोडी महागाई वाढते, पण सामान्य माणसाला त्याचा चिमटा बसत नाही खाण्यापिण्याची तशी चंगळच आम्ही मुल पाठवली, तेव्हा काहीना दाखवली होती, त्यात विद्वान, विचारी मुलांचे हितचिंतकही होते तेच आता म्हणत होते, 'तुमच्या मुलाला साागा, तू परत येऊच नकोस तू तिथ राहिलास तर इथल्या एखाद्या इजिनिअरला नोकरी मिळेल' असं कुणी म्हटल की, मुलानी तिकडे राहाव असं अगदी मनापासून वाटायच आमच वय होत चाललं होत तेव्हा ब्लडप्रेशर, मधुमेह, दमा, सधिवात असे म्हादू (म्हातारपणीची दुखणी) कुणाकुणाच्या पाठीशी लागलेले होतेच रोजच्या रोज वेळेवर औषध घेऊन ती मडळी त्याना काबूत ठेवत होती याच देशात वर्षानुवर्षं राहिलेले आम्ही समवयस्काना काय तोटा? नातलगाकडे साखरपुडा, लग्न, बारशी, वाढदिवस असे समारभ चालूच सभासमेलनं असायचीच पेन्शनर्स क्लब होताच धार्मिक ग्रथ वाचून त्यावर चर्चा करणारी मडळी होती बायकाची तर ठिकठिकाणी मंडळ कितीतरी कार्यक्रम, स्पर्धा, समारभ त्या सस्थाच्या कार्यकारिणीत काम करायला लागल्यावर, एका मोठ्या कुटुबाच्या जबाबदारीचा छोटा वाटा आपण उचललोय् इतक समाधान नाटक होती, सिनेमा होते, टी व्ही तर घरातच आता कसली जबाबदारी

नव्हती, पैसे वाचवायचे नव्हते कितीतरी ट्रिप्स् निघत होत्या जमेल तसं जात होतो मुलगा अमेरिकेला गेला म्हणून आमची 'सध्याछाया' मुळीच झालेली नव्हती आयुष्यात जमली नाही तेवढी मौजमजा करीत होतो

पण कधी गभीर स्वरूपाचा आजार आला की, मग मुलाची फार आठवण यायची दामुअण्णांना दमा होता एकदा तो एवढा उफाळला नी कोणत्याच औषधउपायाना दाद देईना त्यांच्या अंगात रक्त कमी झालं हातापायाना सूज आली एकातून एक अशी दुखणी उद्भवली पण त्याचे फॅमिली डॉक्टर होते, मुलगा जाताना त्याना सांगून गेला होता, 'डॉक्टर तुमच्यावर मी आईबाबाना सोडून जातोय ' डॉक्टरानी मनापासून उपचार केले रात्रीबेरात्री यायचे स्वत ची प्रकृती बरी नसताना खूप मेहनत घेतली त्यानी डॉक्टर आले की, सुशिलाबाईना देव आल्यासारख वाटायच पुऱ्या तीन महिन्यानी, बथ्थड दर्यात हेलकावे खाणार, त्याच्या आयुष्याचे तारू, किनाऱ्याला लागल शेजारीपाजारी मदत करायचे स्नेहीनातलग विचारपूस करायचे कुणी मुलाच नाव काढल की, हे पठ्ठे म्हणायचे, 'माझा मुलगा अमेरिकेत सुखात आहे, या विचाराने मला दुखणं काढायला बळ येत'

कुशाभाऊ नाडकर्णींना ॲक्सिडेंट झाला बसमधून उतरायच म्हणून दारात जाऊन उभे राह्यले ड्रायव्हरने जोरात ब्रेक मारला नी हे बाहेर फेकले गेले कमरेच, हाताच हाड मोडलं मग दवाखाना, प्लॅस्टर, ऑपरेशन नीलाबाई रात्रदिवस त्यांच सगळ करायच्या, म्हणायच्या, 'मला दुसरं कुणाच काय करायचंय्?'

एकदा मलाच स्पॉंडिलायटीस् झाला काय त्या जीवघेण्या कळा हॉस्पिटलमध्ये ट्रॅक्शन लावून ठेवलेल घरातील बाई आजारी पडली की, दुप्पट अडचण पुरुषांना चहा-शिवाय काही करता येत नाही पण कितीतरी हॉटेल्स, डबा लावला प्रश्न सुटला नातलग – मैत्रिणी काहींना काही आणायचे एकदा पडल्या पडल्या माझ्या मनात विचार आला, 'मुलं इथ असती तर , त्याना माझ फार करावं लागलं असत, चागल निभलं की सगळ' मुलगा अमेरिकेला गेला तेव्हा आमच्याशिवाय त्याचं कसं होईल? नी त्याच्याशिवाय आमचं कसं होईल? या प्रश्नांना काळजी हेच उत्तर होत माझ्या मते केवढी हैराण झाले होते मी? तीच का मी ही? मी स्वत लाच हसून घेतल

अस आमच सुरळीत चाललं होत आता आमचा मुलानी विचारच करू नये मागे पाहूच नये त्याचा नी त्याच्या मुलाचा त्यानी विचार करावा मुलांना चांगलं शिक्षण मिळेल खेळासाठी सोयी मिळतील राहावं त्यानी तिथच अशी आमच्या मनाची पूर्ण तयारी झाली होती आणि एक एक बातम्या कळायल लागल्या

राणेबाईच्या हुशार मुलीच अमेरिकेतच लग्न झालं तिच्यासारखाच पीएच्.डी झालेला नवरा तिला मिळाला मद्रासी होता इतकंच त्या मुलीने केव्हाच सिटिझनशीप घेतली होती लगेच आईवडील, बहिणी सगळयाना स्पॉन्सर केल मुली अमेरिकेत जाणार,

हे कळल्यामुळे की काय कोण जाणे, पण राणेबाईंच्या दुसऱ्या दोन मुलींना उत्तम स्थळं मिळाली, आणि राणे नवराबायको, त्यांच्या सगळ्या मुली, त्यांचे जावई, सगळं लुटकुर अमेरिकेत आरामात राहताहेत

कुसुमच्या जावयाने सिटिझनशीप घेतली त्याला मिलिटरीच्या फॅक्टरीत, मोठ्या पगाराची नोकरी मिळाली, तिथं सिटिझन होण्याची अटच तेव्हा तो सिटिझन झाला कुसुमच्या मुलीने मात्र आपली इंडियन सिटिझनशीप कायम ठेवली होती, त्याचं आईला समाधान वाटत होतं

वीणाताईंच्या मुलाचं पत्र आलं होतं, 'इंडियाला परत जायचं की नाही, या प्रश्नाचा काथ्याकूट करून डोकं शिणलं शेवटी नागरिक व्हायचा निर्णय घेतला आता इथंच कायम राहणं'

प्रत्यक्ष माझ्या मुलाने अमेरिकेची सिटिझनशीप घेतली, हे कळलं तेव्हा माझ्या मनाला चटकाच बसला तो अमेरिकेचा झाला, इंडियाचा नाही, या विचाराने मी बेचैन झाले आमचा जन्म इथला, आमचे आईवडील, त्यांचे आईवडील, अशा आमच्या पिढ्यान् पिढ्या इथं नांदल्या शेकडो का हजारो वर्षं आमची पाळमुळं, या जमिनीत खोल खोल खोल रुजलीत त्या मुळांनी तुझा अंकुर वाढवला ती मुळं तू कशी तोडलीस? चाकूसुरीच काय पण लेसरने सुद्धा ती तुटणार नाहीत रे बाळा पण त्याने सिटिझनशीप घेतली, परक्या देशाची हे तर खरं? रामकृष्णाची ही भूमी गीतेसारखं जगाला चकीत करणारं तत्त्वज्ञान या भूमीत निपजलं त्या देशाला तो पारखा झाला? जिजाबाईने रामायण महाभारतातल्या कथा सांगून शिवाजी घडवला त्याने गोरगरिबांसाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य स्थापलं, सतत आपल्या डोक्यावर टांगती तलवार ठेवून आणि मी काय केलं? भारतीय संकृतीला विसरणारा पुत्र जन्माला घातला माझं काय चुकलं? रामायण महाभारतातल्या गोष्टी मी पण त्याला सांगितल्या होत्या शाळेत शिकलेल्या शिवाजीच्या इतिहासाची मी उजळणी करून घेतली होती गीता गीताई तर मी सगळीच्या सगळी त्याच्याकडून पाठ करून घेतली होती त्या पाठांतराची त्याला किती बक्षिसं मिळाली होती, ती त्यालाच विचारा कॉलेजपर्यंत बक्षिसं घेत होता अजून सुद्धा त्याला ती पाठ असेल पण तो गीतेचा राहिला नाही भारताच्या भल्यासाठी आपल्या सुखावर पाणी सोडणारे, भारताच्या स्वातंत्र्यासाठी हालहाल करून घेणारे, तळहातावर शिर घेऊन लढणारे, यांची नुसती यादी केली, तर रकानेच्या रकाने भरतील आणि हा माझा मुलगा, त्या देशाचा नुसता नागरिक म्हणून राहायला तयार नाही? भारताची संस्कृती, भारताच्या कला, भारताचं संगीत यातलं काही नको याला? माझ्या मनावर काहीतरी चरचरत होतं, झोंबत होतं भारतीय संस्कृतीला विसरणं म्हणजे देशाला विसरणं, देशाला दुरावणं, सगळं एकच पण मी हे कुणाजवळ बोलू पण शकत नव्हते आपलेच दात, आपलेच ओठ शेवटी मुलाच्या

वडिलाजवळ मात्र सगळ भडाभडा बोलून टाकल ते म्हणाले, 'मुलगा दुसऱ्या देशाचा रहिवासी झाला हे मलाही आवडलेलं नाही पण माझा माझ्या मुलावर पूर्ण विश्वास आहे तो शहाणा आहे, विचारी आहे त्याच्या करण्यामागे काहीतरी कारण असतीलच आणि सस्कृतीच म्हणशील, तर ती माणसाच्या रोमारोमात भिनलेली असते अगातला कपडा काढून टाकावा तशी, ती बाजूला काढून टाकता येणार नाही याची प्रचीती तुला येईल पण त्याला काही काळ जावा लागेल'

काळ, खरोखरच काळ हा तर जगाची उलथापालथ करणारा म्हणून त्याला म्हणायचे, 'कालाय तस्मै नम ' अमेरिकेत, इडियातून जाणारी काय फक्त आमचीच मुलं होती? ७०-७५ वर्षापूर्वीपासून अमेरिकेत थोडेफार का होईना पण लोक जातायतच त्यांनी सिटिझनशीप घेतली होती का? कशासाठी घतली?

ह्या इतिहासाचा मागोवा एमिली ब्राऊन, ब्रुस ला ब्रेक, मनोरजन दत्ता अशा काही लेखकानी घेतलेला त्याच्या लेखात, सिटिझनशीपबद्दलचे उल्लेखही सापडतात

१७९० मध्ये अमेरिकेत Naturalization चा कायदा झाला त्या कायद्याने 'स्वतत्र गोऱ्या लोकांनाच' अमेरिकेचे सिटिझन व्हायचा हक्क मिळाला पण या गोऱ्यांनी आफ्रिकेतल्या काळ्या लोकाना गुलाम म्हणून अमेरिकेत आणलेल होतं त्याच काय करणार? म्हणून १८७० साली या कायद्यात दुरुस्ती झाली आफ्रिकेतील रहिवाशी व त्याचे वशज यांचा त्यात समावेश केला त्या वेळी अमेरिकेतील लोकसंख्या गोरे नी काळे याचीच त्यात गोरे हे श्रेष्ठ काळे म्हणजे निग्रो ते वेगळे, गोऱ्याच्या बरोबरीचे नाहीत असंच मग हळूहळू चिनी, जपानी, इडियन यायला लागले, अगदी कायदेशीरपणे मजुराची स्पर्धा सुरू झाली म्हणून त्यांना खूप विरोध झाला आशियाई लीग स्थापन झाली मजुराच्या पुढाऱ्यानी मजुराचीच बाजू घेतली ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी मजुराच्या मतावर निवडून येणारी राजकारणी त्यानी मजुराच्या गाऱ्हाण्याच लोण, थेट Bureau of Immigration and Naturalization पर्यंत पोचवलं आशियाई लोकाचे आर्थिक व राजकीय हक्क खची करावे, अशी हाकाटी सुरू झाली

पण इडियन बेटे ही चिवटच, ते मुळी राहिलेच त्यानी जमीनजुमला घेतला शेती-वाडी घेतली १९०७ साली, वीरसिंग नावाच्या शिखाने, सिटिझनशीपसाठी, कॅलिफोर्नियातल्या अईमडा गावाच्या कौंटी कौन्सिलच्या ऑफिसात अर्ज केला अमेरिकन सरकारचा इडियन लोकाना प्रवेश मिळू नये असा कायदा नव्हता शिवाय १७९० च्या कायद्यात The Mediterranean Branch of Caucasian Family असे शब्द होते Caucasian म्हणजे आर्यन व आर्यन म्हणजे गोरा त्यामुळे वीरसिंगला सिटिझनशीप मिळायला काहीच हरकत नव्हती परतु शपथ घेताना त्याला डोक्यावरचा फेटा काढायला सागितला शीख धर्मात फेटा काढणं निषिद्ध मानल जातं, म्हणून त्याने नकार दिला व त्याला सिटिझनशीप मिळाली

नाही पण यात कायद्याचा काही प्रश्न नव्हता, प्रश्न होता तो फक्त रिवाजाचा १९१० साली बलसारा याना सिटिझनशीप मिळाली, तर १९१३ साली अजयकुमार मुझुमदार सिटिझन झाले १९०८ ते १९२३ च्या दरम्यान ६७ इंडियन्स अमेरिकेचे सिटिझन झाले या लोकानी वेगवेगळ्या १७ स्टेटस्च्या बत्तीस कोर्टांत अर्ज केले होते त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यानी प्रत्येक केसच्या गुणावगुणाची व्यक्तिश छाननी करून मगच आपला निर्णय दिलेला होता काहींचे अर्ज फेटाळलेही गेले असतील त्यांची नोंद मात्र कोठे नाही इतक्या वेगवेगळ्या कोर्टांनी त्यांना सिटिझनशीपचे हक्क दिले म्हणजे ते सर्व कायदेशीरच होत हा प्रश्न इथंच सपायला हवा होता, पण तसं झाल नाही

१९२० साली भगतसिंग थिंड याने सिटिझनशीपसाठी अर्ज केला तो पहिल्या जागतिक युद्धातला सैनिक ओरेगॉन व डिस्ट्रिक्ट कोर्टाचे जज्ज, चार्लस वूलव्हर्टन याच्या पुढे त्याची केस आली त्याचा निकाल देताना ते म्हणाले,

'माझ्यासमोर उभा असलेला माणूस, उच्चवर्णीय इंडियन आहे तो प्रथमदर्शनी गोरा दिसतो का? त्याच्या सवयी, चालीरीती गोऱ्या माणसासारख्या आहेत की नाहीत, याची चर्चा करायला मी इथ बसलेला नाही यापूर्वी अशा अनेक केसीस झालेल्या आहेत त्या प्रत्येक केसमध्ये, इंडियन म्हणजे कॉकेशियन- म्हणजे गोरा असा कायद्याचा अर्थ लावून, त्या त्या न्यायाधीशांनी, इंडियन लोकाना सिटिझनशीप दिलेली आहे तेव्हा मी पण तोच अर्थ ग्राह्य मानून, थिंड याला सिटिझनशीप देत आहे'

परतु हा निर्णय Immigration and Naturalization ब्युरोला मान्य झाला नाही ब्युरोने त्यावर सुप्रीम कोर्टात अपील केल १९२२ साली, टाकाओ ओशावा नावाच्या जपानी माणसाने सिटिझनशीपसाठी अर्ज केला, त्या वेळी न्यायमूर्ती सदरलॅण्ड यानी स्पष्ट सागितलं,

'गोरा माणूस व कॉकेशस वंशाचा माणूस याचा अर्थ एकच आहे परतु ओशावा हा मगोलियन वशाचा आहे म्हणून त्याला सिटिझनशीप देता येत नाही'

थिंडची केस जेव्हा सुप्रीम कोर्टात आली तेव्हा हेच सदरलॅण्डसाहेब जज्ज होते त्यानी सागितले White व कॉकेशस या दोन्ही शब्दाचा अर्थ गोरा आहे खरा परतु समोरचा इडियन माणूस गोरा आहे, हे सामान्य मनुष्य मान्य करणार नाही कॉकेशस हा बोलीभाषेतला शब्द आहे १७९० साली जेव्हा कायदा झाला तेव्हा हा शब्द कायदा करणाऱ्याच्या ओळखीचा नव्हता म्हणून मी सामान्य माणसाची 'गोरा' या शब्दाची व्याख्या गृहित धरून, थिंडला, सिटिझनशीपचे हक्क देण्यास नकार देतो'

ओशावा व थिंड या दोघाच्या बाबतीत, जे विरुद्ध निकाल लागले त्यावर त्या काळी खूप चर्चा झाली मानवस्वभावशास्त्रज्ञानी याबद्दल वादविवाद केला कायद्याचे व शब्दाचे अर्थ कसे बदलतात, याचा अभ्यास करणाऱ्यांनी चर्चा केली शेवटी रे चेस व एस् जी

पंडित या वकिलांनी असा निष्कर्ष काढला की,ओशावाच्या केसमध्ये रंगाचा विचार न करता वंशाचा विचार केला गेला, तर थिंडच्या बाबतीत उलट प्रकार- म्हणजे वंशाच्या ऐवजी रंगाचा विचार केला

थिंडच्या केसच्या निकालाचा, इंडियन लोकांवर फार मोठा परिणाम झाला इंडियन लोक अमेरिकन सिटिझन व्हायला लायक नाहीत असं ठरलं त्यामुळे ज्यांना पूर्वी सिटिझनशीप मिळालेली होती, त्यांना ती परत करायला सांगण्यात आली त्यात सखाराम पंडित नावाचे गृहस्थ होते ते वकील होते स्टेट तसेच मध्यवर्ती कोर्टात ते प्रॅक्टिस करीत होते त्यांनी गोऱ्या स्त्रीशी लग्न केलेलं होतं, त्यांची स्थावरजंगम इस्टेट होती त्यांना १९१४ साली सिटिझनशीप मिळालेली होती डिस्ट्रिक्ट कोर्ट, सर्कीट कोर्ट यांचीच काय पण सुप्रीम कोर्टाचीही त्याला मान्यता होती सर्व कायदेशीर तरीही सिटिझनशीप परत करावी लागली दुसरे शंकर लक्ष्मण गोखले हे १९१२ पासून अमेरिकेत होते ते इलेक्ट्रिकल इंजिनियर होते संशोधन करायचे १९१८ साली त्यांचीही सिटिझनशीप डिस्ट्रिक्ट कोर्टाने बाद ठरवली इंडियन लोकांनी खोटी सर्टिफिकिट देऊन सिटिझनशीप मिळवल्या, असं ठरवून ५० जणांना १९२३ ते १९२६ चे दरम्यान सिटिझनशीप परत करायला लावली

१९१७ सालापासून इंडियन लोकांना अमेरिकेचे दरवाजे बंद झाले होतेच १९२३ साली आणखी एक कायदा झाला जे अमेरिकन सिटिझन्स नाहीत त्यांनी अमेरिकेत जमीन विकत घ्यायची नाही, विकायची नाही की भाडेपट्ट्यानेही घ्यायची नाही इंडियन लोकांनी कष्ट करून मिळवलेला पैसा कुठं गुंतवायचा नाही त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीवर फार परिणाम झाला १९२४ सालच्या कायद्याने, अमेरिकेचे सिटिझन व्हायला लायक असलेल्यानाच अमेरिकेत प्रवेश मिळणे शक्य झाले हे लायक लोक म्हणजे गोरे, इंडियात असलेले ब्रिटिश इंडियन लोकांनी अमेरिकेत यायचं नाही अमेरिकेत असलेल्यांना सिटिझनशीप नाही सिटिझनशीप नाही म्हणून घरदार घेता येत नाही अशी स्थिती १९५२ पर्यंत राहिली इंडियन जमात अमेरिकेतून नामशेष होण्याच्या बेतात आली १९२० ते १९४० च्या दरम्यान ३००० इंडियन्स् परत गेले बरेचसे स्वखुशीने गेले व काही बेकायदा आल्याने, त्यांना हद्दपार केलं १९३० मध्ये इंडियन लोकसंख्या ३,१३० होती ती १९४० मध्ये २,४०५ झाली त्याच दरम्यान ३००० इंडियन शेतमजूर मेक्सिकोमधून बेकायदा अमेरिकेत आले साहजिकच त्यांना काढून लावलं पण शेकडो लपूनछपून राहिलेच

इंडियन लोकांची सिटिझनशीप काढून घेतली, याचा गाजावाजा झाला काही अमेरिकन विचारवंतांनी ' Politics of Prejudice' असे लेख लिहिले इंडियातल्या लोकांना राग आला तारकनाथ दास यांनी 'Stateless people in U S A' असा कलकत्ता रिव्ह्यूमध्ये लेख लिहिला पंडित हे स्वतः ॲडव्होकेट होते त्यांनी सुप्रीम कोर्टात

अपील केलं त्याची सर्व सर्टिफिकिट कादेशीर होती ज्या कोर्टाने त्यांना ती दिली होती, त्यांना ती द्यायचा पूर्ण अधिकार होता सुप्रीम कोर्टाने त्यांच म्हणण मान्य करून, त्याची सिटिझनशीप त्याना परत दिली शकर गोखले हेही सुप्रीम कोर्टात गेले त्या कोर्टाने त्याची सिटिझनशीप कायदेशीर आहे, अस ठरवल्यामुळे खालच्या कोर्टाच काही चालल नाही गेलेली सिटिझनशीप परत मिळवण्यासाठी प्रत्येकाला झगडाव लागल गोखल्याना सिटिझनशीप परत मिळाल्याने, इंडियन लोकाकडून सिटिझनशीप परत घेण्याचे काम थोडं मदावलं पण १९३४-३५ पर्यंत प्रयत्न चालू हातेच मात्र हा प्रकार फक्त इडियन्स्च्या बाबतीतच घडला असं नाही सर्व आशियाईंना त्याची झळ लागली

काही अमेरिकन्स् समजूतदार होते, उदारमतवादी होते, इडियन्स्ना जवळून ओळखणारे होते १९४३ साली चिन लोकाना सिटिझनशीपचे हक्क मिळाले होते, तसे इंडियन्स्ना द्यावे असे त्यांना वाटत होत सेनेटर विल्यम लँगर यांनी एक बिल आणल १९२४ पूर्वी आलेल्या सर्व लोकांना सिटिझनशीप द्यावी, अशी त्यात तरतूद होती याला लुई फिशर, पर्ल बक्, आल्बर्ट आईनस्टाईन, रॉजर बाल्डविन अशा मोठमोठ्या लोकाचा पाठिंबा होता पण इंडियन्स्च्या विरोधी बहुसख्य, त्याच म्हणणं, इडियन लोक, अमेरिकन संस्कृतीत मिसळून जाणारच नाहीत त्याची सस्कृती, त्यांचे स्वभावविशेष, त्याचे आदर्श, त्याच तत्त्वज्ञान, त्याचा धर्म हे फार वेगळ आहे त्यांचं आमच्याशी जमणार नाही त्यांची लोकसंख्या अफाट, त्याचे पगार कमी, त्यांचे जातिभेद अनेक, कंजूषपणाची त्याची राहणी कसं जमायच त्याच आमच्याशी त्याच्यामुळे आमच राहणीमान मात्र कमी व्हायच त्यामुळे हे बिल बारगळलंच

मग क्लारा बूथ नावाच्या बाईंनी एक बिल आणल त्या म्हणाल्या, 'तुम्ही म्हणता ते खर पण केवळ त्यांच्या कातडीचा रग वेगळा म्हणून, आपण त्यांना भेदभावाने वागवणं मात्र योग्य नाही आपण प्रजासत्ताकवादी आहोत, नैतिकतेचे पुढारी आहोत, असा दावा करतो अशा आपल्या वागणुकीमुळे, अशियाई लोक, आपल्या या पोकळ कल्पना आहेत असे म्हणतीलच पण आपल्या इथले काळे लोकही हे ऐकून घेणार नाहीत म्हणून इडियाला थोडासा कोटा द्यावा म्हणजे त्याना बोलायला जागा राहणार नाही' या कायद्यानुसार इंडियाला १०० चा कोटा मिळाला

१९५२ सालच्या कायद्याने वंश, वर्ण हे शब्द इमिग्रेशन कायद्यातून बाद केले कोटा मात्र वाढला नाही प्रे हेन्री ट्रुमन यानाच ते बिल आवडल नाही वश वर्ण हा अडसर या कायद्याने दूर केला खरा, परतु इडियाला फार थोडा कोटा मिळाला तरी सुद्धा, इमिग्रेशन व नॅचरलायझेशनबाबत अमेरिकेच धोरण उदार झाल त्यामुळे १९४७ ते १९६५ च्या दरम्यान ६००० इडियन्स्ना अमेरिकेत प्रवेश मिळाला शिवाय या लोकाचे लगतचे नातलग, म्हणजे नवरा किंवा आईवडील, भाऊबहीण, मुलं असे तितकेच लोक

अमेरिकेत आले त्याचा कोट्यात समावेश नव्हता त्या काळात १७७२ इडियन लोकांनी अमेरिकेची सिटिझनशीप घेतली १९६५ सालच्या कायद्याने इडियाला २००० वर कोटा मिळाला व ते मोठ्या सख्येने अमेरिकेत यायला लागले सिटिझन व्हायला लागले १९७८ साली ६,४७६ इडियन्स् अमेरिकेचे सिटिझन झाले त्यात ३,९५९ पुरुष व २,५१७ स्त्रिया होत्या शिवाय या लोकाच्या नातलगांना २४० सिटिझनशीपची सर्टिफिकिटे मिळाली सिटिझन्स् होणाऱ्याची सख्या दिवसेंदिवस वाढतच आहे

पण कशाला घेतात हे इतके लोक सिटिझनशीप? मायदेशाबद्दलच्या त्यांच्या भावना बोथट झाल्या का? पूर्वीच्या लोकांचं बराबर होत त्यांना धड लग्न करता येत नव्हती अमेरिकेत राहणारी माणसच कमी व्हायला लागली सामाजिक जीवन कसल? आर्थिक कोंडी झालेली होती इडियात जाणयेणं मुष्कील झाल होत आता कुठ तशी परिस्थिती होती? गाड्या होत्या, घरंदार होती, थाटात राहात तर होती की सगळी अशा स्थितीत आमच्या मुलानी अमेरिकेत जागा घेतली तेव्हा आमची मन झळझळली, कातर झाली सर्वांजवळ ग्रीनकार्ड नव्हती खरी कुणी शिकत होती, कुणी सशोधन करीत होती त्याच्याजवळ होता तो स्टुडंट व्हिसा वर्क परमिट मिळालं की नोकरी करायची पण ती कमी पगाराचीच भागण कठीण तशात कुणीकुणी स्टुडट डिपेन्डन्ट म्हणून बायका आणलेल्या या मुली शिकलेल्या, हुशार, काम करायला तयार पण त्याना तशी परवानगी नाही जवळ गाडी नाही पचाइत व्हायची मुलं हुशार होती, त्याच्याजवळ अमेरिकेची डिग्री होती, कामसू होती मन लावून काम करायची अशी मुलं कामाला मिळाली की, वरिष्ठाच्या फायद्याचचं ते मग हे लोक मुलाना ग्रीन कार्डासाठी स्पॉन्सर करायचे मुलाना त्याच्या मेहनतीच फळ मिळायच नवऱ्याला ग्रीन कार्ड मिळाल की बायकोलाही मिळायच दोघही नोकरी करायची हा हा म्हणता, चारपाच वर्षात त्यांचं बस्तान व्यवस्थित बसायच, असं सगळं सुरळीत असल्यावरही जेव्हा मुलानी अमेरिकेचं नागरिकत्व घेतल अस कळलं, तेव्हा आम्ही त्याना दोष दिला, स्वतःलाही बोल लावून घेतला

ग्रीन कार्ड मिळून पाच वर्षं झाली की, सिटिझनशीपसाठी अर्ज करता येतो अमेरिकची सिटिझनशीप घेतली की, इडियाची सिटिझनशीप सोडून द्यावी लागते इस्रायलच्या लोकानी जरी अमेरिकेची सिटिझनशीप घेतली तरी, त्याची इस्रायलची सिटिझनशीप जात नाही पण इंडियातले कायदे वेगळे आपल्या देशाची सिटिझनशीप सोडण मुलाच्या जीवावरच आल एक गभीर प्रश्न त्याच्यासमोर उभा राहिला इंडियात जाव, तिथल्या सामाजिक, सास्कृतिक, राजकीय सस्थात काम कराव, एक उत्साही कार्यकर्ता म्हणून थोडीशी समाजसेवा, देशसेवा पण नागरिक नाही म्हणून कुठल्याही निवडणुकीला उभ राहता येणार नाही पण अमेरिकेत कायम राहायच ठरवल, म्हणजे परतीचा दरवाजा बद करून घेतला न? मग कसल्या सस्था नी कसल्या निवडणुका? तस

परत जाता आल, तर पुन्हा एकदा नागरिकत्व बदलता येत की अमेरिकेत जन्मलेली मुल आपोआप अमेरिकन नागरिक होतात ती १८ वर्षांची झाल्यावर त्यानी त्याच काय ते ठरवाव

आर्थिक प्रगती करायला म्हणून अमेरिकेत कायम राहायच ठरवल मग नागरिकत्व स्वीकारल्याने आर्थिक प्रगती व्हायला मदत होईल का? याचा विचार केला पाहिजे पण प्रश्न कठीण आहे त्याच 'हो' किंवा 'नाही' असं सोप उत्तर होतच कुठं? पण त्या अनुषगाने, अनेक विचार, अनेक कल्पना मुलाच्या मनात येत होत्या अमेरिकेतल्या सरकारी किवा सरक्षणविषयक नोकऱ्या फक्त सिटिझन्सनाच मिळतात म्हणजे ग्रीन कार्डवाले त्यातून बाद झाले अमेरिकेचा मिलिटरीविषयक त्या देशाशी तहनामा झालेला आहे, त्या देशातल्या नागरिकात काही विशेष, त्यांना प्राधान्य, हा या देशाचा कायदा तसा सलोखा इंडियाशी नाही म्हणून ग्रीन कार्ड या चाळणीतून गळले आर्थिक मंदी आली की, त्याची पहिली झळ इडियन्सना लागणार असे म्हणतात सिटिझन झाल्यावर ती झळ कमी होईल का? दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, अमेरिकेने जपानी नागरिकाना कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पमध्ये ठेवलं होतं आता जग खूप पुढे गेलय्, तेव्हा असा जगलीपणा पुन्हा होणार नाही म्हणा, तरीपण सावधगिरी घ्यावी का?

इडियाचं नागरिकत्व व अमेरिकेचं ग्रीन कार्डधारक, अशा स्थितीत राहाव, असंच जास्त करून सर्वांना वाटतं इडियात बहुसख्य म्हणून हक्क, अधिकार अमेरिकेत अल्पसंख्य म्हणून संरक्षण म्हणजे दोन्ही जगातल चागल्यात चांगलं हवं असं का? पण हा दुहेरी अनुभव घेण बेकायदेशीर मुळीच नाही पण सिटिझन नाही म्हणजे अमेरिकेच्या प्रमुख राजकीय प्रवाहापासून अलिप्त, एवढ तर खर? हे इंडियन्स, इथ फक्त पैसे कमवायला येतात, बाकी अमेरिकेच त्यांना सोयरसुतक नाही, असं कुणी म्हटल का? ते कुणात मिसळत नाहीत, आपलाच ग्रुप करून राहतात, अशी आपली प्रतिमा होईल का? सगळ्यांच Melting Pot व्हाव हे अमेरिकेच स्वप्न त्याला आपला काय हातभार? नागरिक चांगल काम करील व ग्रीन कार्डवाला अळंटळ करील, असं म्हणण्यात काही तथ्य नाही पण दोन उमेदवार आहेत, दोघाचंही शिक्षण, गुणवत्ता, अनुभव सारखा आहे, पण एक नागरिक व दुसरा ग्रीन कार्डवाला, ग्रीन कार्डवाला नोकरी सोडून आपल्या देशात केव्हाही चालता होईल सिटिझन मात्र पाहिजे तितके दिवस कामाला मिळेल, असं नोकरी देणारा मालक म्हणेल का? ग्रीन कार्ड म्हणून संधी हुकेल का?

आणखी एक प्रश्न अमेरिकेत गोरे, काळे, निमगोरे, तपकिरी, पिवळे सगळ्या प्रकारचे लोक आहेत नोकरीबाबत भेदभाव झाल्याच्या केसीस वर्तमानपत्रात नेहमी येतात स्त्री-पुरुष भेदभावाच्या सुद्धा ग्रीन कार्ड धारकावर असा भेदभाव झाला तर? अमेरिकेत समान हक्काचा कायदा आहे, तेव्हा त्याला कोर्टाकडे दाद मागता येते पण सिटिझन नाही

तेव्हा राजकीय पुढाऱ्याशी ओळख नाही राजकीय सरक्षण नाही (सलमान रश्दी इंडियात जन्मलेला पण तो ब्रिटिश सिटिझन त्याच्या जिवावर बेतलं, तेव्हा त्याला ब्रिटनच सरक्षण, त्याच्यासाठी ते राष्ट्र खर्च करत) मात्र कायद्याचे सरक्षण कधी कधी अस काम होतही मानवतावादी दृष्टिकोणातून विचार होतो न्याय मिळतो पण त्याच श्रेय अमेरिकेच्या न्यायदान पद्धतीला नागरिकाचा मात्र तो राजकीय हक्क असतो म्हणजे आर्थिक विकासात नागरिकत्व ह्या एकमेकात गुतलेल्याच गोष्टी आहेत न? म्हणूनच १९७९ साली २३ टक्के इडियन्स अमेरिकेचे नागरिक झाले तर १९८६ साली हा आकडा दुप्पट झाला पण एक हातचं राखून बायकांपेक्षा जास्त पुरुषच नागरिक झाले इडियात गेल्यावर बायकोच म्हणजे कुटुबातल्या एकाच तरी भारतीय नागरिकत्व उपयोगी पडाव म्हणून

अमेरिकेच नागरिक होण, मुलांना अवघड वाटतच होत आपल्या देशात आपण बहुसख्य इथ नेहमीच अल्पसंख्य म्हणजे दुय्यम नागरिक म्हणून राह्यच, ही एक प्रकारची आपत्तीच नाही का? इंडियात कुणी मतदानाचा हक्क बजावला असेलही पण काहींना तो चान्स कधी मिळालाच नाही इंडियाचा सिटिझन असून मतदानाला जाता येत नाही अमेरिकेत हजर असून नागरिक नसल्याने मतदानाचा हक्क नाही ज्या देशात राहायच, त्या देशाचे कायदे माहीत असावे लागतातच त्या देशाचा कारभार कसा चालतो, हे रोजच्या रोज वर्तमानपत्रातून वाचायचं, रेडियोवर ऐकायचं, टी व्ही वर पाहायच, त्यावरची आपली मत हिरीरीने माडायची पण प्रत्यक्षात ते कायदे करणारे, ते राज्यकारभार करणारे, त्याना मत देता येत नाही प्रजासत्ताक पद्धतीत, प्रत्येकाच मत केवढ मोलाचं केवढी अभिमानाची गोष्ट ती किती दिवस त्यापासून वचित राह्यचं? सिटिझनला मत देण्याचा हक्क २५ वर्षांच्या, सात वर्षे सिटिझन असलेल्याला रिप्रेझेन्टेटिव्ह होता येतं, तर नऊ वर्षांनंतर तो सिनेटरही होऊ शकतो इंडियन लोकांना अशी राजकीय महत्त्वाकाक्षा का नसावी?

ज्या देशात आपण पैसे कमावतो, त्या उत्पन्नावरचा कर भरतो, त्या देशाच्या जनगणनेत, आपली गणना व्हायला हवीच न? मग त्या देशाला आपला दत्तक देश मानणं चूक का?

पण प्रत्यक्षात इडियन नागरिकत्व सोडून देताना, मुलाची मनं हेलावलीच आपण इंडियाचे, इडिया आपली, ती सोडून आपण इथं आलो आपल्या शिक्षणाचा, आपल्या सशोधनाचा, आपल्या कल्पनांचा मायदेशाला काही उपयोग होत नाही, याची खंत वाटते तिथले बहुसंख्य लोक गरीब, आपण श्रीमंतीत लोळतो या अपराधीपणाचं ओझ सतत मनावर तशात मायभूमीच नागरिकत्वही सोडून द्यायच? दुसरी कुणी चागली भेटली, म्हणून आपल्या जन्मदात्या आईला, 'तू माझी आई नव्हेस' अस सागण्यासारखच नाही का हे? शाळेत संस्कृतच्या मास्तरांनी शिकवलेलं सुभाषित त्याचं मन, त्याच्या कानात

गुणगुणायला लागलं

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी'

मुलं हळवी झाली तरीसुद्धा त्यांनी अमेरिकेचं नागरिकत्व स्वीकारलं त्याला तसंच जिव्हाळ्याचं कारण होतं कुणाचे आईवडील, कुणाची मुलं, कुणाची भावंडं इंडियात होती त्यांना अमेरिकेत यायचं होतं अमेरिकेच्या इमिग्रेशन कायद्यात 'कुटुंब-एकीकरण' असं एक कलम आहे त्यानुसार, अमेरिकन नागरिकाच्या लगतच्या नातलगांना अमेरिकेचं ग्रीन कार्ड मिळतं अमेरिकेचे नागरिक असलेल्या आईवडिलांच्या मुलांना पहिला प्रेफरन्स् सिटिझनची विवाहित मुलंमुली व त्यांची मुलं यांना चौथा प्रेफरन्स् तर सिटिझन्स्च्या भावाबहिणींना व त्यांच्या मुलांना पाचवा प्रेफरन्स् ग्रीन कार्डधारकाच्या नातलगांचे नंबर खाली, त्यामुळे त्यांचं येणं फार लांबतं ही मंडळी ग्रीन कार्डवर इथं आली की, त्यांचा जम बसणं सोपं जातं कुटुंबासाठी काही करावं, अशी प्रत्येकाची इच्छा असते, ते त्यांचं कर्तव्यच आहे आपले आईवडील, मुलंबाळं, भावंडं इथे यावीत, त्यांना इथल्या सुखसोईंचा, श्रीमंतीचा उपभोग घ्यायला मिळावा, ह्यासाठी हा सगळा खटाटोप - अमेरिकेचा नागरिक होण्याचा

❊❊❊

# ८

# चित्रं - संसाराची

'काय सरलताई, कशी झाली अमेरिकेची ट्रीप?' पुष्पाताईंनी विचारलं

सरलताई नुकत्याच अमेरिकेहून आल्या होत्या आजकाल पुष्कळच मुलमुली अमेरिकेला जात होती तुम्ही कुठेही जा एखाद्या समारंभाला जा, व्याख्यानाला जा, नाहीतर मंडळात जा, आमच्या अमुबाबा (अमेरिकेतल्या मुलाचे आईवडील) मंडळाची माणसं भेटायचीच अमेरिकेहून आलेल्यांकडून आपल्या मुलांची ताजी खबर ऐकायला ती मंडळी अगदी उत्सुक असायची अमेरिकेच्या गोष्टी ऐकायला तर सर्वांनाच आवडायच म्हणून आज मंडळात 'अमेरिकेच्या गप्पा' हाच कार्यक्रम होता बायका प्रश्न विचारीत होत्या अमेरिकेची वारी करून आलेल्या उत्तरं देत होत्या

'अमेरिकेची ट्रीप चांगली होणारच त्यात आपलीच मुलमुली तिथ असली म्हणजे जास्तच खूप फिरवतात, पुष्कळ ठिकाणे दाखवतात नाना देशातले पदार्थ खायला घालतात मुल इंडियात रजेवर आली की, त्याना रजा अगदी थोडी असते मग 'रात्र थोडी सोंग फार' अशी स्थिती किती नातलग, किती मित्र, सर्वांना भेटायच, कुणाकुणाकडे जेवायखायला जायच, आपल्या वाटणीला येतच नाहीत ती तिथ गेलं की त्याच्या जवळ राह्यचं, त्याच्याबरोबर तासन्तास प्रवास करायचा मुख्य म्हणजे त्याचा संसार जवळून पाहायला मिळतो हो'

'कसे असतात त्यांचे संसार? आपल्यापेक्षा वेगळे?'

'हो तर आपल्याकडे मुलीचं लग्न झाल की आंदण म्हणून, आपण तिला

भांडीकुडी, फर्निचर, कसले सेट्स् असं देतो वर्षाच्या सणाच्या निमित्ताने काही काही देत असतोच सासरचं काहीना काही असत तिथ यातलं काहीच नाही विजय लग्नापूर्वी ४-५मित्रांबरोबर राहायचे त्या ससारातली त्याची वाटणी म्हणजे, एक डिश्, एक बाऊल नी एक बेड एवढच नीला गेल्यावर लग्नाची पार्टी केली, तेव्हा मित्रांनी डिनर सेट, डब्यांचा सेट, भाड्याचा सेट असं पुष्कळ दिल मग त्यानी अपार्टमेंटमध्ये संसार थाटला हव्या त्या वस्तू घेतल्या दोघांनी नोकऱ्या केल्या पैसे जमवले आणि घर घेतलं छानछान वस्तूनी सजवलय् 'एक बगला बने न्यारा, अति सुंदर प्यारा प्यारा' म्हणतात न, अगदी तस दोघाच्या पैशातून, दोघाच्या कष्टांतून ते घर झालेल असत, म्हणून की काय कुणास ठाऊक पण दोघ बरोबरीने वागतात हो बायको नवऱ्याला चक्क अरेतुरे म्हणते '

'मग तुम्ही तुमच्या नीलाला हटकायचं नाही का?'

'एकीला बोलून काय होणार? सगळ्याच तसं म्हणतात सगळीच मुलमुली एकमेकाना एकेरी नावानेच हाक मारतात भावोजी नाही नी वहिनी नाही नीला सागत होती, इथ ऑफिसातल्या बॉसला सुद्धा कुणी सर म्हणत नाहीत चार्लस् असला तर चार्ली, डग्लस् असला तर डग् म्हणायच '

'काय तरी बाई मुलखावेगळा देश! आणखी काय तुम्हाला वेगळं दिसलं?'

'पुरुष घरातली काम करतात विजय भाडी करायला उठले, तेव्हा मला चोरट्यासारखं झाल मी लगेच म्हटल, तुम्ही बाजूला व्हा मी करते,' पडत्या फळाची आज्ञा घेऊन ते कोचावर जाऊन बसले, टी व्ही बघत मग नीला हळूच म्हणाली, 'तू कितीसे दिवस इथं राहणार आहेस? मग ही भाडी माझ्याच बोकांडी बसतील की इथ काय कामवाली आहे भाडी करायला?'

'पण यत्र असतात न सगळ्या कामाची?'

'यत्रं चालवायला माणूस नको? भाडी धुऊन डिश वॉशरमध्ये घालायची कपडे प्रथम वॉशरमध्ये, मग ड्रायरमध्ये शेवटी घड्या करायच्या घरभर गालीचे, त्याच्या वरची धूळ झटकायला व्हॅक्यूम क्लिनर चालवायचा मोठमोठी घर ती व्यवस्थित नको ठेवायला? घराबाहेरची हिरवळ, व्यवस्थित कापायला नको? फुलझाड लावायची तर खणून, खतपाणी घालून जोपासायला नकोत? दोन गाड्या ठेवायचं गॅरेज, मधूनमधून स्वच्छ करायला नको? गाड्या पण धुवायला लागतात इंडियात ज्यांच्या घरी सर्व कामाला नोकर असतात त्या मुली इथ आल्या की रडकुंडीस येतात '

'एवढे श्रीमंत लोक तिथ, सगळी काम घरी स्वतःच करतात?'

'त्यांना काम करायला कमीपणा वाटत नाही पण अशा लोकांकडे मेड्स् असतात कुक असतो नवराबायको दोघही डॉक्टर सबंध दिवस घराबाहेर राहणार त्याना घरकाम करायला दिवसभर बाई हवी असते तिच्या जेवण्याराहण्याचा खर्च, भरपूर पगार देऊनही,

माणूस मिळणं कठीण आहे खरं!

'म्हणजे आपल्या मुलामुलींना नेहमी सगळी कामं करावी लागतात म्हणायची.'

'तशी एखादी बाई क्वचित कधीकधी मिळते. पण तिला एका तासाचे दहा डॉलर द्यावे लागतात. ते रोज कसं परवडणार? आणि एवढे पैसे द्यायचं जीवावर येतं. काही ठिकाणी ८-१५ दिवसांनी २-४ तासांसाठी बाईला कामाला बोलावतात. पण रोजची रोज कामं नवराबायको दोघांनाच करायला लागतात. स्वीमिंग पूल असला, तर त्यात पाणी सोडा, क्लोरीन घाला, साफ करा, केवढं तरी काम. पैसेही तसेच लागतात. बाहेरची अंगमेहनतीची कामं करणारे तर तासाला २००-४०० डॉलर पण मिळवतात. हे झाडं कापायला, फळ्या कापायला, इलेक्ट्रिकची यंत्रं वापरतात. त्याचा खर्च भरून यायला हवाच की! म्हणून इथं शक्यतेवढी कामं स्वतःच करतात. नवराबायको दोघंही करतात, ही बायकांची कामं, ही पुरुषांची अशी एवढी वाटणी नाही.'

'बघा बाई, नाहीतर आपल्याकडले पुरुष. माझा जावई तर नुसता आयतोबा. पान वाढल्यावर खुर्चीवर येऊन बसणार. जेवायच्या आधी औषधाच्या गोळ्या घ्यायच्या असतात त्याला. त्या सुद्धा बायकोने हातावर ठेवायच्या. माझी मुलगी नोकरी करत नाही खरं, पण या पुरुषांनी थोडतरी स्वतःच स्वतः करायला नको का?'

'नोकरी करणाऱ्या मुलींचं तरी काय? नवराबायको दोघं दमून घरी येतात. नवरा बसतो हातपाय ताणून कोचावर. बायको चहा करून आणून देते. येताना तीच बाजारहाट करून येते. मग संध्याकाळचा स्वयपाक, मुलांचा अभ्यास, घर आवरणं. खरं म्हणजे बायकांचा पगार घरात येतो, म्हणून या आकाशाला भिडणाऱ्या महागाईला तोंड देता येतंय् न? मग स्वयंपाक, घरकाम ही बायकांचीच कामं असं म्हणून कसं चालेल? आपआपल्या वस्तू तरी कोणी जागच्याजागी ठेवतं का? सुट्टीच्या दिवशी माळा झाडणं, भिंतीवरची कोळीष्टकं झाडणं, किती पुरुष करतात ही कामं? बायको बिचारी स्टुलावर चढून, लांब झाडूने कसरत करीत ही कामं करते.'

'नवराबायकोच्या स्वतंत्र संसाराची ही तऱ्हा. पण तीच मुलगी दहा माणसांच्या घरात पडली म्हणजे तर विचारूच नका. नोकरीवरून ती घरात आली रे आली की, एकएक हुकूम सुटतात. 'मला चहा हवा', 'मला एक कप कॉफी.' सर्वांना चहा कॉफी दिल्यावर ही थकलेली मुलगी आपला सुकलेला घसा ओला करणार. मग संध्याकाळचा स्वयपाक. तो सुनेचाच. नवऱ्याला वाटलं, बायकोला लसूण तरी सोलून द्यावा, तर आईबहिणींचे चेहरे एकापेक्षा एक. पुरुष घरात काम करतोय् म्हणजे काय? बायकोनं नवऱ्याबरोबर नोकरी केलेली असते, त्याचं काय मोठसं?'

'हीच सासू जेव्हा सून असते, तेव्हा ती नोकरी करणारी नसते. सून घरात आली की सासूने विश्रांती घ्यायची. मग ती सासूला कितपत विश्रांती देते, घरातल्या सगळ्यांच्या

मर्जीप्रमाणे वागते की नाही? आल्यागेल्यांचे हसतमुखाने स्वागत करते की नाही? यावर मावस-मामे-आते सगळ्या सास्वाची चर्चा शेजारपाजारच्या आखाड सास्वा पण त्यात हौसेने भाग घेणार मग त्या बातम्याना तिखटमीठ लावून, झणझणीत करून, गावभर त्याचा डांगोरा पिटणार

'हे सासूसून प्रकरण सगळीकडे सारखच आमच्या गावोगावी बदल्या व्हायच्या कधी मुसलमान शेजार, ती खालां स्वभावाने फार चागली ईदच्या दिवशी मटण, खीर आणून द्यायची आमचा दिवाळीचा फराळ नावाजून नावाजून खायची पण कमरेला किल्ल्या अडकवून, पानाचा विडा चघळीत, सुनांना हुकूम सोडीत असायची सुना तिला नुसत्या घाबरून तिचा धाकटा मुलगा काही कमवायचा नाही त्याला तालमीचा नाद पण त्याची बायको त्याची बडदास्त कशी ठेवते, ह्यावर खालाचं बारीक लक्ष

'नव्या सुनेच्या विरुद्ध वातावरण सगळीकडेच मग घरात तिचा म्हणजे नवरा मग तो खूष राहावा म्हणून, त्याची सगळी काम करायची दाढीला पाणी, कपडे, रुमाल, चष्मा सगळं हातात द्यायच 'आमच्या ह्यांना चहा पण करता येत नाही' असं कौतुक करायचं मग घरकामशी पुरुषाचा काही सबधच नाही अशी त्याची समजूत झाली तर नवल काय?

'पण पुढे पुढे ते आपल्याला नडलं हो आपल वय झाल मुलंमुली आपआपल्या ससारात ते रिटायर्ड झाले पाहुणे जेवायला यायचे असले की, वाटायचं, यांनी तेवढी देवपूजा तरी करावी पण कसल काय? पाहुणे दारात दिसल्यावर त्यांना आघोळीची आठवण व्हायची मग पुन्यासाठी गॅसवर ठेवलेली कढई उतरवून याना पाणी तापवून द्यायच

'ह्या अमेरिकेतल्या मुली शहाण्या हो त्यांच्यावर अशी पश्चात्ताप करायची पाळी यायची नाही त्यानी पहिल्यापासूनच नवऱ्याना अस सोकवून ठेवलेल नाही नवऱ्याच्याही तशा अपेक्षा नसतात काहींना तर स्वयपाक करायची पण आवड असते.'

'म्हणजे ते काय चपात्या करतात? आपल्यासारखा वाटणाघाटणाचा स्वयपाक करतात?'

'तिथं कोण बसलय् रोज रोज चपात्या करायला? नवीन नवीन मुली तिथं गेल्यावर रोज चपात्या करायच्या मग हळूहळू तो उत्साह ओसरतो तिथल्या जेवणात मटण, चिकन, मासे याच प्रमाण जास्त कुलच्या, पीर, ब्रेड, चपात्या असं आयतं मिळत घरी आणून त्या भाजायच्या म्हणजे झालं रोजच इडियन जेवण असत, असंही नाही ज्यांच्या घरात शाळेत जाणारी मोठी मुल असतात, त्या घरात मुलाना आवडत म्हणून अमेरिकन डिनर होत त्याच्याबरोबर तऱ्हेतऱ्हेचे ब्रेडस् असतात इटालियन डिनरमध्ये वेगवेगळ्या प्रकारचा नास्ता असतो मेक्सिकन पदार्थांसाठी लागणाऱ्या चपात्या किंवा शेल्स तयार मिळतात चायनीज डिनरला भात किंवा नुडल्स् शाकाहारी इडियन जेवणाला चपात्या

करायच्या सगळ्या प्रकारच्या पावडरी मिळतात, त्या वापरून इथले पुरुष मटण, चिकन बनवतात '

'माझ्या सुनेला स्वयपाकघरात पुरुषाची लुडबूड मुळीच आवडत नाही मुलाला आवड आहे नवे नवे पदार्थ करून बघण्याची तर ही म्हणणार, फार पसारा करतात हे पुरुष वेगळ्या प्रकारच मटण तर तिला मुळीच आवडत नाही नाव ठेवत खाणार '

'तिथल्या मुली याच्या उलट हो एक म्हणणार, 'शेखर, छान चिकन सुप्रीम करतो' मग शेखर चिकन तदूर, मश्रुम सूप, एखादी भाजी घेऊन डिश् तयार करून ओव्हनमध्ये ठेवतो आयत जेवण मिळाल्याने बायको खूष दुसरी म्हणणार, 'विनोदचे मसाले डोसे अगदी कुरकुरीत होतात, तुम्ही या एकदा खायला ' मग तिने तयार करून दिलेल्या पिठाचे, विनोद उत्साहाने मसाले डोसे बनवतो '

'लबाडच म्हणायच्या मुली त्या नवऱ्याकडून गोडीगोडीने काम कस करून घ्यायचं, हे त्यांना अगदी बरोबर समजतं '

'करणार काय? तिथ नेहमी पार्ट्या २५-३० माणस तर नेहमीच कधीकधी ६०-७० सुद्धा एवढ्याच मटणाचटणाचा स्वयपाक दहा पदार्थ, शिवाय ड्रिंक्सबरोबर वेगळे पेपर प्लेटस् वापरल्या तरी थोडी का भांडीकुंडी होतात? नवऱ्याला मदत करावीच लागते सगळ्यात पंचाईत होते ती, अमेरिकेतल्या इडियन मुलीशी लग्न केलेल्या इडियातल्या नवऱ्याची तो अमेरिकेत येतो तेव्हा, त्याच्या बायकोला नोकरी असते याला आल्या आल्या कुठली मनासारखी नोकरी मिळणार? ग्रीन कार्ड असते म्हणून बारीक सारीक जॉब मिळतात झालं खरी कमावणारी बायको तिनेच घरातलं सगळ काम कराव, हे त्याला पटत नाही पण पुरुषाना घरातली काम करताना, त्याने इडियात बघितलेल नसत, त्याला तो कमीपणा वाटतो तो कुचबतो हळूहळू इतर घरी गेला की, त्याला समजत त्याची भीड चेपते काही दिवसानी तो सरावतो बायकोला घरकामात मदत करायला लागतो '

'मग अमेरिकेतल्या मुलीची मजाच आहे म्हणायची नवरा बरोबरीने घरकाम करतो '

'बरोबरीने अस मात्र मुळीच नाही जरूर पडली तर तो काम करतो पण एरव्ही त्याची लहर, त्याची आवड, त्याची सवड केल तर केल, नाहीतर नाही, असच बायकांना मात्र आपलं घर टापटीप राहिलं पाहिजे, घरातल्या माणसाना तिन्हीत्रिकाळ आवडीचं खायलाप्यायला मिळालं पाहिजे, भाडी वेळच्या वेळी स्वच्छ केलीच पाहिजेत, सर्वांना त्यांचे कपडे धुऊन मिळालेच पाहिजेत, अशी जबाबदारी वाटते म्हणून त्यानाच जास्त काम कराव लागत '

'अमेरिकन ससार कसे असतात हो? तिथल्या सास्वासुनाचे सबंध कसे असतात?'

'तिथं सासू-सून एका घरात कधी राहात नाहीत मुल-मुली स्वत चं लग्न स्वत च

जमवतात लग्न करायचं नक्की ठरल्यावर स्वतंत्र अपार्टमेंट घेतात, ते सजवतात लग्न झाल्याबरोबर हनीमूनला जातात तिथून परत येतात ते आपल्या अपार्टमेंटमध्ये '

'दूर राहून चागले सबध राहणारच '

'तसंच काही नाही माणस अमेरिकेतली असोत की इडियातली असोत, ती एकाच मोजमापात बसतात एखाद्या सासूला सुनेत दोष दिसतात तर एखाद्या सुनेचा, सासू आपल्या ससारात नाक खुपसते, असाच समज असलो आमच्या शेजारी एक कुटुब होतं सासूसासरा, मुलगा, सून, नातवडं एकत्र राहायच म्हणून घर वाढवून घेतले सासूसून दोघीही समजस त्यांचा स्वत चा बिझिनेस त्या निमित्ताने सासू दिवसभर घराबाहेर सून घरात सगळ करायची, पण वर्षभरात नातवडाची गडबड, गोंधळ, पसारा सासूला खटकायला लागला सासूच्या घरातल पारतंत्र्य सुनेला खुपायला लागल मुलाने नवं घर घेतलं आपण भाडततडत एका घरात राहतो पण इडियन सास्वा म्हणजे सुनाना जाळणाऱ्या अस म्हणतात तिथं'

'काय तरी बाई? आपण का अशा आहोत?'

'तिथल्या पेपर्समध्ये नेहमी लेख येतात त्यात कोणत्या सुनेला, कोणत्या सासूने, केव्हा, कस जाळल याची नावानिशीवार माहिती असते बातम्या देणाऱ्याची नावं पण त्यावर इडियन मुली लिहितात 'आम्हाला लक्ष्मी म्हणून घरात आणतात' अस पण आपल नाव कानफाट पडलय् खरं '

'तिथ नवरा-बायकोचा ससार स्त्रीपुरुष समानता मग तिथले पुरुष बायकाच्या बरोबरीने काम करीत असतील न?

'माझाही असाच समज होता एकाने स्वयपाक केला तर दुसऱ्याने भाडी स्वच्छ करायची, अस मी ऐकत होते पण सामाजिक प्रश्नाचा बारकाईने अभ्यास करणाऱ्या ऑर्ली हॉक्सचाइल्ड नावाच्या बाईने 'Second Shift' नावाच एक पुस्तक लिहिलय् त्यावर टाईम मॅगझिनमध्ये लेख आला होता तो मी वाचला तिने ५० जोडप्याच्या मुलाखती घेतल्या दोघही चागली पगारदार, नोकरीत वर चढण्याची महत्त्वाकाक्षा बाळगणारे स्त्री-पुरुष समानतेच्या बड्याबड्या बाता मारतात पण प्रत्यक्षात, मुलं साभाळण, झाडलोट करणं, कपडे धुणं, बाजारहाट करण या घरकामात पुरुष स्त्रीला पुरेशी मदत करत नाही त्यामुळे बाई घरी येतानाच, घरातल काम, मुलाना गेम्ससाठी नेण, स्वयपाक यांची योजना आखतच येते करिअर व घर या दोहोत तिची कसरत चालूच असते जेमतेम २० टक्के कामाची विभागणी करतात एकूण काय? हल्ली घरोघरी मातीच्या चुली नाहीत खऱ्या पण त्या म्हणीतलं तथ्य बदलेल नाही '

'तिथ आजोबा आजी नसतात मग मुल कोण संभाळतं?'

'लहान मूल म्हणजे एक जबाबदारी, अडचण ती नवराबायको दोघानाच निभावून

न्यावी लागते एखादी आजी आली तरी चार सहा महिनेच तेवढ्याने अडचण संपत नाही नवराबायको दोघांसाठी इथ बालसगोपनाचे क्लासेस असतात मुलाना आघोळ घालण, कपडे घालण, दूध-खाणं देण दोघही करतात पण आई जास्त रजा घेते म्हणून अर्थातच ती जास्त करते मग मुलांना बेबी सीटरकडे ठेवतात '

'तिथल्या बेबी सीटर्सबद्दल मी खूप काही ऐकलय त्या म्हणे मुलांच दूध-बिस्कीट स्वत च खातात, आपला बॉयफ्रेंड घरात आणून मजा करतात मुलाकडे लक्षच देत नाहीत '

'अशा काही गोष्टी घडत असतीलही क्वचित एका बेबीसीटरने मुलाला शिक्षा म्हणून त्याच्या तोंडात चमचाभर मिऱ्याची पूड घातली नी तो मुलगा श्वास कोंडून मेला अशी एक केस चाललेली मी वर्तमानपत्रात वाचलेलं होतं तिथ बेबी सीटिंग करायला लायसन्स घ्याव लागतं, म्हणजे जबाबदारी आलीच अशा बेबीसीटर्सची यादी प्रत्येक गावाच्या कौंटी ऑफिसमध्ये असते बेबीसीटर्सबाबत मैत्रिणींचे अनुभव उपयोगी पडतात मुलाला नुसत खाऊपिऊ घालायच, त्याचा डायपर बदलायचा एवढच बेबी सीटर्सचं काम नसत मुलांच दुखलखुपलं, पडलझडल की तिने ताबडतोब मुलाच्या आईवडिलाना फोन करून कळवायला हव वेळेला मुलाला हॉस्पिटलमध्ये न्यायची तयारी ठेवायला हवी एखादी मुलगी स्वत च लहान मूल असताना नोकरी करीत नाही ती लायसन्स घेऊन दुसरी चारपाच मुलं साभाळते घरी राहून, स्वत च मूल सांभाळून ती चांगले पैसे कमवू शकते डे केअर सेन्टर्स असतात मुलाला शी शू चं कळायला लागल की तिथं घेतात मुलाला पाच वर्षे पूर्ण झाली की, शाळेत घालायच, किंडगार्टनमध्ये, ६ व्या वर्षी पहिलीत मुलं १२ वर्षांची होईपर्यंत, कुणातरी जबाबदार मोठ्या माणसाच्या देखरेखीखाली ती असली पाहिजेत, असा इथला नियम आहे मुलाला बेबीसीटरकडे पोचवण, आणण ही काम दोघ सोयीप्रमाणे करतात '

'अमेरिकेतल्या लहान मुलांचे आजीआजोबा तिथंच असतात की! मग बेबीसीटर क्वचितच लागत असेल '

'छे हो त्यांनाही आपल्या मुलांइतकीच बेबीसीटर्सची गरज असते तिथं व्यक्ति-स्वातत्र्य महत्त्वाच त्या स्वातंत्र्याबरोबर जबाबदाऱ्यापण येतात मुलामुलींनी घर स्वतत्रपणे थाटलं की, त्याच्या अडीअडचणी त्यानीच निभावून न्यायच्या पहिलं बाळंतपण माहेरी हा प्रघात नाही कुणाची आईबहीण मदतीला येतेही पण ८-१५ दिवस म्हणजे शिकस्त आजीआजोबाचं घर वेगळ त्याचा बेबीसीटिंगसाठी उपयोग करून घेत नाहीत अमेरिकेतसुद्धा पुरुषाने नोकरी करायची, घरकाम, बालसगोपन ही बायकांची काम अशीच पूर्वापार समजूत मग बायका शिकल्या, नोकरी करायला लागल्या महागाई वाढली, गरजा वाढल्या दोन पगार घरात येणं आवश्यक झाल काही बायका लहान मूल असताना नोकरी सोडून देतात नवरा घरात आल्यावर जमेल तसा लहानसा जॉब करतात किंवा काही कोर्सेस

घेतात (इंडियन मुलींनीही मुल लहान असताना मास्टर्स केलेल आहे.) तर काही महत्त्वाकाक्षी असतात मुलं लहान म्हणून जास्त रजा घेतली तर आपल्या बढतीवर परिणाम होईल, हे त्यांना माहीत असत, म्हणून त्या कायद्याने मिळते तेवढीच रजा घेतात (मूल दोघाचं, तेव्हा बापालाही मॅटर्निटी रजा मिळावी अशी त्याची मागणी आहे.) अशा परिस्थितीत, जर बायकोच्या महत्त्वाकांक्षेला वाव द्यायचा म्हणजे, घरकामाचा, मुलाला सांभाळण्याचा प्रश्न निर्माण होणारच डायना इहेरन्साफ्ट नावाच्या बाईच, 'Parenting Together' नावाचं पुस्तक मी वाचलं तिथले लेखक अनेकाच्या मुलाखती घेतात काही प्रत्यक्ष तर काही टेलिफोनवरून तिने त्यांना अनेक प्रश्न विचारले मुलं साभाळण पुरुषांना जमेल का? त्याचा अहगड आड येईल का? बायका, पुरुषाना हे काम करू देतील का? असे कल बदलतील का? मुलाखतीत मिळालेल्या उत्तरावरून ती म्हणते, 'परिस्थितीमुळे गरज निर्माण झाली आणि गरजेमुळे हळूहळू कल बदलायला लागला दोघांनी मुल सांभाळली, तर मुलांची देखभाल व्यवस्थित होते रोझेपार्क नावाच्या लेखिकेने, 'Fathers' नावाच पुस्तक लिहिलंय तिनेही खूप सशोधन केलय तिने लिहिलंय, 'बाप मुलांजवळ असला की, तो मुलांचं कौतुक करतो, लाडाने बोलतो, याचा मुलांवर चागला परिणाम होतो आई इतक्याच प्रेमाने बाप त्यांना खाऊपिऊ घालतात मुलांना, त्यांची मनापासून काळजी घेणारी दोन माणसं मिळतात वडील समोर दिसले की बाळ खादे उडवत, तोंड उघडतं, त्याचा चेहरा उमलतो, पापण्याची जोरात उघडझाप होते, ते हातपाय नाचवत, आपला आनंद व्यक्त करतं बाप जास्त वेळ मुलाजवळ राहिला की, त्याची बौद्धिक वाढ चागली होते, त्याचं शारीरिक बळ वाढत '

'इंडियन बापानाही मूलाच असं थोडफार करावं लागतंच मी एका समारंभाला गेले होते, दोघीतिघींची लहान मुल होती बापाच्या कडेखांद्यावर बाप मजेने त्यांना खेळवत होते तर त्या आया, लहान मूल असूनही आपण सुट्या आहोत, आपल्या उंची साड्या फळकवीत सुटवंगपणे इकडेतिकडे फिरतोय्, गप्पागोष्टी करतोय् आणि विशेष म्हणजे नवऱ्यांना मुलात अडकवून ठेवलय्, याचा त्याना आनद वाटत होता '

'इडियातले बापही आपल्या मुलाना घेतात, खेळवतात तरीपण ते लबाड मूल रडायला लागल की, आईकडे देतात आपल्या कपड्याची इस्त्री बिघडू नये म्हणून मुलापासून दूरदूरच राहतात तरीपण घरात एकदोनच मुल असतात, त्यांचे बाप कौतुक करतात आंघोळ–कपडे घालणं अस करतात मुलाना शेजारणीकडे किंवा मुलं सांभाळणाऱ्या संस्थेत ठेवून नोकरीवर जाणाऱ्या बायका पुष्कळच आहेत सगळीकडे थोड्याफार फरकाने सारखीच स्थिती '

'नवऱ्यांना अरे म्हणायच, त्यांना घरकामाला लावायचं, मुलाच करायला लावायच म्हणजे या अमेरिकेतल्या मुली, नवऱ्याचा काहीच मान ठेवत नाहीत म्हणायच्या '

'आपण जशा आपल्या पुरुषांना मान देत होतो, तशा त्या मान देत नाहीत हे खरं आहे तरी पण कधी कुणी नवऱ्याचा अपमान पण करीत नाहीत '

'असं सगळं बरोबरीने चाललं, तर भांडणं तरी कशाला होतील?'

'भांडण? अहो भरपूर भांडतात की दोन माणसं एके ठिकाणी राहिली की, भांड्याला भांडं लागणारच! मग ती आई मुलगी असली तरी ही तर नवराबायको, शिकली पढलेली बरोबरीने कमावणारी वचक असायला घरात कुणी वडील माणूस नाही त्यामुळे झकाझकी चालतेच दोघांनाही आपला संसार, आपलं घर, आपली मुलं उत्तम व्हावीत असं वाटत असतं पण दोघांची मतं वेगळी घरात कोणती वस्तू घ्यायची? किती खर्च करायचा? पार्टीला कोणाकोणाला बोलवायचं? काय काय करायचं? थोडे का विषय भांडायला? मुलं हा तर ज्वलंत विषय आई रागावली की बाप मुलांची बाजू घेणार नी बाप रागावला की आईला प्रेमाचा पुळका येणार गाडीत शेजारीशेजारी बसले की उत्स्फूर्त भांडण स्पीडलिमिटपेक्षा जास्त वेगाने गाडी चालवली नाही, तर तो पुरुष कसला? इकडे हिच्या पोटात गोळा गोडीने सांगते, कळवळून सांगते तिला भिती ॲक्सिडेन्ट होईल का? पोलिस तिकीट देईल का? शेवटी भांडण अगदी खडाजंगी मग अबोला, पण तो किती वेळ टिकणार? मग बोलणार कुणाशी? तुझं नी माझं जमेना, परी तुझ्यावाचून करमेना अशीच दोघांची स्थिती पुरुषांना तर कारच्या किल्ल्या, पैशाचं पाकीट, घड्याळ कधी मिळतच नाही बायकोच शोधून देणार सगळं अबोला कधी एकदा संपतोय्, असं तिलाही झालेलं असतंच आणखी कितीतरी विषयावर तिला नवऱ्याशी बोलायचं-भांडायचं असतंच '

'तसं चालायचच हो ज्या संसारात भांडण नाही त्यात एक भारी गरीब किंवा त्याच्यावर अन्याय आपण नाही का न भांडता संसार केले इतकी वर्षे नवराबायकोची भांडणं ती दिवे मिटले की ती पण मिटतात विकोपाला जाऊन घटस्फोट झाले नाहीत म्हणजे झालं '

'आपल्याकडे पण हल्ली घटस्फोट खूप वाढलेत हो माझा भाचा वकील आहे, तो सांगत होता, त्याच्याकडे कितीतरी घटस्फोटाच्या केसीस आहेत '

'असणारच पूर्वीची गोष्ट वेगळी होती बाईला ना शिक्षण ना नोकरी दिल्या घरी सुख मिळो न मिळो तिथंच राहण्याशिवाय गत्यंतर होतं का तिला? नवऱ्याचं दुसरीशी लफडं बायको आवडायची नाही मग घरातल्या सासू, नणंदा, जावा सगळ्याच फावायचं हाल, छळ सोशीत तिने दिवस ढकलायचे आताच्या शिकलेल्या, कमावत्या मुली, अशा जाचात कशाला राहतील? घटस्फोट घेणारच '

'अमेरिकेत छळ करणारं कुणी नसतं खरं पण दुसऱ्या काळ्या-गोऱ्या बाईशी संधान असलेले नवरे आहेतच कसलं जिणं त्या बाईचं? मग घटस्फोट घेते झालं बायकोला

मारणारे, त्रास देणारे का गोळी झाडणारे क्वचित् का होईना पण तिथे असेही नवरे आहेत चांगल्या करिअरवाल्या मुली, मग घटस्फोट होतात '

'नवरा रोज दारू पिऊन येणार, बायकामुलांना शिवीगाळ करणार, मारणार अस आपल्याकडे पूर्वी चालायचं अशा मुली कशाला असल केरपोतेऱ्यासारख जिणं जगतील? घटस्फोट घेतात, स्वत: कमवतात आणि खातात त्याचा कुणावर भार नसतो '

'अमेरिकेत पण असे दारुडे नवरे आहेत त्याना दारूच्या घोटाशिवाय चैनच पडत नाही सदा प्याला ओठाशी लावलेला अशी एकसारखी दारू घेतल्यावर नशा चढणारच कुणाला थोड्या दारूने सुद्धा झिंग येते अशी नशा चढली की, तो बेताल होतो, बेभान होतो बडबडतो, शिवीगाळ करतो, मारतो सुद्धा घाण करतो, धिंगाणा घालतो नुसता चागली हुशार नोकरी करणारी मुलं ही बायको बिचारी सहन करीत असते पुढेपुढे नोकरीच्या ठिकाणी बाटल्या जायच्या, तिथ पण नशेत राहायच, मग कामात चुका होणारच कोण ठेवणार अशा माणसाला नोकरीवर? मिळतो डच्चू बायको नोकरी करून घर खटला चालवत असते एखाददुसर मूलही असतं आता हा दारुड्या, बेकार नवरा त्याला दारूसाठी द्यायला तिने पैसे कुठून आणायचे? त्याच्याशी घटस्फोट घेण हाच मार्ग मग तिला शिल्लक उरतो अशी वेळ आली की, प्रेमाच कुणी जवळ नाही एकटीनेच त्यातून वाट काढायची फार कठीण '

'पुरुषच वाईट असतात असच नाही काही हल्ली मुली सुद्धा बनेल असतात या छटेल मुली एखाद्या मुलाला भुलवून त्याच्याशी लग्न लावतात मग आपली नखं बाहेर काढतात नवरा काही बोलला तर ही म्हणणार, 'घे घटस्फोट, पोटगी दे म्हणजे झाल ' दुसऱ्याच आयुष्य बरबाद करणाऱ्या या मुली काही आईबाप आपल्या भ्रमिष्ट मुलामुलींची लग्न करून देतात, त्याना वाटत प्रश्न सुटला पण तो आणखी कठीण होतो आणखी एकाच्या गळ्याला फास बसतो '

'अमेरिकेतल्या मुलाची फसवणूक करणाऱ्या मुली आहेत त्याना ग्रीन कार्ड हव असतं तेव्हा अमेरिकेतल्या ग्रीन कार्डवाल्याशी लग्न करून तिथ जायच मग घटस्फोट घ्यायचा इडियातला प्रियकर तिथ येऊन तिच्याशी लग्न करायला तयार असतोच तरीपण या गोष्टी क्वचित्च घडतात आपली मुलमुली तिथ जाऊन अवघी १५-२० वर्षेच झालीत कुणी फारतर २५ वर्षे असेल ती एकमेकावर खूप अवलंबून आहेत हातात हात घालून त्याना अद्याप खूप मिळवायच आहे मुलं वाढवायची आहेत म्हणूनच कितीही मतभेद झाले तरी एकमेकाशी मिळतजुळतं घेण्याचा प्रयत्न चाललेला असतो शिवाय आपले संस्कार एवढ्या लवकर कसे पुसले जातील?'

'अमेरिकन मुलींशी लग्न केलेल्या मुलाच काय झालं?'

'अमेरिकन बायको केली की, जास्तच तडजोड करावी लागते, हे मुल जाणूनच

होती त्या मुलीही स्वभावाने तशा वाईट नसतात मनमोकळ्या असतात, सरळ असतात ससार चागला चालतो तरीपण त्यांच्या रोमारोमात, व्यक्तिस्वातंत्र्याच वारं भरलेल असतं सस्कृती भिन्न असतेच, त्यामुळे त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याला केव्हा तरी धक्का बसतोच त्यामुळे कधी २-४ वर्षांनी तर कधी १५ वर्षांनीही घटस्फोट होतो तरी सुद्धा काही अशी लग्नं १५-२० वर्षे टिकलेली आहेत त्या मुलींना इडियन सासूच्या हातचे इडियन पदार्थ विशेषत चपात्या खूप आवडतात नवऱ्याने योग्य ती काळजी घेतली, तो चागला कमावता असला तर बायकोमुलाची मनापासून काळजी घेणारा इडियन नवरा, त्यांना आवडतो '

हे तर ससारचित्र, २०-२२ वर्षांपूर्वी अमेरिकेत आलेल्या इडियन लोकांच त्यांचं काय? अमेरिकेचे कायदे बदलले अमेरिकेत येण सोपं झाल सुखवस्तू कुटुबातले, पदवीधर शिकत होते, नोकरीधदा करीत होते आणखी संधी मिळत होती ते ती अचूक पकडत होते नवराबयको दोघंही हा हा म्हणता, त्यांनी आपल्याला हवं ते सगळं मिळवल पण ८०-८५ वर्षांपूर्वी अमेरिकेत आलेले इडियन्स, त्याचे संसार कसे होते? त्याच्यावर पुष्कळ संशोधन झालय कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी, नॅशनल सायन्स फौंडेशन, युनिव्हर्सिटी ऑफ पॅसिफिक, अशा कित्येक सस्थानी अनुदान दिल त्यामुळे हेरॉल्ड जाकोबी, लाब्रेक ब्रूस, ॲलन मिलर, केरन लिओनार्ड, लॉरेन्स बेनझेल इत्यादींनी भरपूर संशोधन केलं शिवाय अमेरिकेचे कॉमर्स डिपार्टमेंट, सेन्सस ब्यूरोचे वार्षिक रिपोर्ट, वाशिंग्टनमधली इडियन वकिलात यासारख्यांच्या कागदपत्राचा त्यांनी कसून अभ्यास केला त्यावर त्या काळच्या इंडियन लोकांच्या गृहजीवनाची माहिती मिळते

त्या वेळी अमेरिकेत आलेले इडियन्स म्हणजे गरीब शेतकऱ्याची मुल ८५ टक्के जाट, शीख, थोडेसे हिंदू, थोडेसे मुसलमान, दोन अस्पृश्य सुद्धा त्यातले काही जेमतेम वर्षभर शाळेत गेलेले तर थोडे दोन-तीन इयत्ता झालेले मजुरी करून पोट भरायच, थोडे पैसे इडियात बापाला पाठवायचे, घरखटला चालवायचा त्या वेळी बालविवाहाची चाल, तेव्हा अर्धेअधिक विवाहित पण क्वचितच कोणी बायको आणलेली ७५ पुरुष तर एक बाई १९०९ साली इमिग्रेशन कमिशन पाहणी केली, ४७४ इडियन्सची त्यात ३१ विधुर, २२४ अविवाहित, २१५ विवाहित पण सगळ्याच्या बायका इडियात परका देश, तिथं आधी आपलं बूड टिकल तर मग आणू बायकांना, इडियात जाऊन लग्न करून येऊ पण इथ आले तर काय? सगळाच उजेड पैसे चागले मिळायचे पण सगळ्याचा विरोध चले जावचा दट्ट्या मग तर कायदेच झाले इडियातल्या लोकानी अमेरिकेत यायच नाही ते अमेरिकेचे नागरिक व्हायला पात्र नाहीत नागरिक नाहीत म्हणून जमीनजुमला काही घ्यायचा नाही आणि या सगळ्या कायद्याची अमलबजावणी अगदी चोख व्हायची कसे आणणार ते आपल्या बायकाना अमेरिकेत? कसे जाणार ते इंडियात लग्न करायला? गेले तर अमेरिकेत परत प्रवेश मिळणारच नाही अशी त्याची कोंडी झाली कायद्याच्या

सापळ्यात सापडले ते काही परत गेले तरीपण काही राहिलेच लग्नाशिवाय अर्ध्यांनी तर लग्न केलीच नाहीत त्यांची वय वाढली आणि अशी स्थिती दहापाच नाही, चांगली ३० वर्षे होती १९४६ चा कायदा होईपर्यंत, गोरे लोक तर त्याना जवळपास फिरकू द्यायचे नाहीत, जणू वाळीत टाकलेले मग लग्नाची बात कशाला?

त्याच सुमारास मेक्सिकोत क्राती झालेली होती नद्यांना पूर आलेले त्यामुळे कुटुबाची वाताहत नवरा एकीकडे, बायको दुसरीकडे, मुलं आणखी कुठे मोलमजुरीसाठी हे लोक टेक्सासमधून अमेरिकेत आले काही बायका कॅलिफोर्नियात आल्या, खालच्या वर्गाच्या पैसाअडका नाही कुणाजवळ लहान मुल त्याना कुणी पुरुष नातलग नाहीत हे मेक्सिकन थोडे इडियनसारखेच दिसायचे आर्थिक स्थिती बेतासबात गोरे लोक त्यानाही जवळ करायचे नाहीत इडियन्ससारखीच स्थिती, मग ते एकमेकात मिसळायला लागले होता होता ओळखी वाढल्या त्यातून लग्न व्हायला लागली पहिलं लग्न शेरसिंग व अॅन्टोनिया अल्वारिस याचं, नोव्हेंबर १९१६त झाल मग तिच्याच दोन बहिणींची शेरसिंगाच्या दोन मित्राशी लग्न झाली खर म्हणजे, दोघाची भाषा वेगळी, धर्म वेगळा, राहणी वेगळी, सस्कृतीत तर फारच तफावत सगळ समजत होत, पण झोटिगाला मिळेना बायको आणि हडळीला मिळेना नवरा, अशीच तर स्थिती होती दुसरा व्यवहार्य पर्याय होता का? सोय म्हणून अशी लग्न व्हायला लागली लग्न झाल, की ती बाई नवऱ्याच्या घरी यायची तिथ त्याचे ४-५ मित्र नात्यागोत्याचे नाही पण एका किंवा जवळच्या खेड्यातले, एका बोटीतून आलेले, एका फलटणीत असलेले मग ही बाई आपली आई, बहीण, चुलतबहीण, मैत्रीण अशा कुणाची या मित्राशी ओळख करून द्यायची अशा ओळखी आळखीतून लग्नं व्हायची कॅनडा, मेक्सिको, युटाह, न्यू मेक्सिको, अरिझोना, कॅलिफोर्निया वगैरे गावाना जाऊन ही नवरानवरी लग्नं करून यायची १९२४ पूर्वी अशी ७३ लग्न झाली स्थिरस्थावर झालेल्या ६० लग्नापैकी ५२ बायका हिस्पॅनिक होत्या, ५ अँग्लो व ३ काळ्या मुल असली तर ती पण आईबरोबर यायची ही लग्नं सगळी कचेरीत जाऊन रजिस्टर व्हायची नवऱ्याचे दोन मित्र साक्षीदार म्हणून सही करायचे नतर काही वर्षांनी कुणीकुणी चर्चमधलही लग्न करायचे पण कुणी धर्मांतर केल्याची नोद नाही फक्त एक नवरा कॅथॉलिक झाला व एक बाई मुसलमान झाली पण अशा लग्न केलेल्याना इडियन्स व अँग्लोही कमी लेखायचे त्याना लग्नाला वगैरे बोलवायचे नाहीत पुरुष वयाने मोठे तर बायका लहान कधीकधी हे अतर २० वर्षांचे पण असायचं

ह्या बायका घरकाम करायच्या, स्वयपाक करायच्या, केरवारा करायच्या मेक्सिकोत जन्मलेल्याना अमेरिकन नागरिकत्व मिळायच, तेव्हा त्यासाठी यांनी लग्नं केली असा आक्षेप आहे पण या बायका अक्षरशत्रू, कुठल्या नागरिक होणार? मुलं झाली की, त्याना स्पॅनिश नाव ठेवायचं, मग कॅथॉलिक बाप्तिस्मा द्यायचा त्यांना आईचा धर्म माहीत

असायचा, बाप आपल्या हिंदू, मुसलमान, शीख धर्माप्रमाणे वागायचे मुलांना त्याबद्दल आदर वाटायचा, कुतूहल वाटायचं स्पॅनिश, इंग्लिश बोलायची थोडस पंजाबी समजायच त्यांना बापाच्या मित्रांना काका म्हणायचे त्यांना एखादं टोपणनाव पण ठेवायचे काही नवरे कॅथॉलिक लग्नसमारंभाला चर्चमध्ये जायचे, त्यामुळे बायकोला चर्चशी संबध ठेवता यायचा एकमेकाकडे जेवायखायला जायचे, एकमेकाच्या मुलांचे गॉड पेरेन्ट्स् व्हायचे

असे त्यांचे अमेरिकेत वेगळे संसार सुरू झाले होते, तरी ते इंडियातल्या आपल्या कुटुंबाला, नातलगांना विसरले नव्हते, बहुतेक जण दर महिना इंडियात पैसे पाठवायचे ते आपलं कर्तव्य आहे व ते पार पाडलं पाहिजे असं त्यांना वाटायच काही जण तर आपल्या खेड्याला, शाळेसाठी, विहिरीसाठीही पैसे पाठवायचे अमेरिकेतही हे लोक आपल्या पैशांनी शेतजमीन घ्यायचे, मुलाच्या नावावर व स्वत गार्डियन, त्यांच्यावर केसीस व्हायच्या

पण ही आंतरधर्मीय लग्नं तकलादूच ठरली म्हणायची एकमेकांचे पटेना भांडण व्हायला लागली पुरुष म्हणायचे, 'कसल्या या बायका? काम मुळीच करायला नकोत नवऱ्याशी बाचाबाची करतात, शिव्या देतात झाडलोट करीत नाहीत स्वयंपाक करत नाहीत मनात येईल तेव्हा आईकडे बहिणीकडे जातात नट्टापट्टा करायला हवा त्यासाठी बाजारात जायच, लिपस्टीक, पावडर आणायची गरोदरपणात, बाळतपणात याना औषधे लागतात मेक्सिकन मित्राच्या बरोबर भटकायला हव, डान्स करायला हवा ' बायकांच्याही पुरुषांबद्दल थोड्या तक्रारी नव्हत्या त्या म्हणायच्या, 'कितीही घरकाम केल तरी यांना थोडच याचे मित्र आले की रांधा, वाढा घरसामान पुरेस आणून देणार नाहीत आजारी पडलं तर औषधपाणी नाही शिवीगाळ करतात मारतातसुद्धा दारू पितात, बाहेरख्यालीपणा करतात ' अशी भांडणं, मग त्यातून घटस्फोट त्या वेळी घटस्फोटाचे प्रमाण खूपच होत १३० जोडप्यातल्या, ३५ पुरुष व ४७ बायकाची दोनदोन तीनतीन लग्न झालेली एक बाई व एक पुरुष यांची पाच लग्न, तर एका बाईची ७ लग्नं त्यामुळे सावत्र मुलांचे प्रमाण खूप त्यांना मुल कमी व्हायची तरी मेक्सिकन, अँग्लो नवऱ्यांच मूल इंडियन नवरे वाढवायचे तर इंडियन नवऱ्याची मुलं मेक्सिकन बाप वाढवायचे सावत्र भावडांची मात्र जवळीक घटस्फोट झाल्यावर, आईबाप दोघांनाही मुलं हवी असायची, बापाला मुलगा मिळाला की, हॅरीचा हरभजन व्हायचा आईला मिळालेला बलदेव व बसती फ्रान्सिस्को व एमिली व्हायची त्या बायका इस्टेटीत वाटा मागायच्या पोटगी मागायच्या शिवाय मुलाच्या चरितार्थासाठी पैसे १९१९ साली पहिला घटस्फोट झाला बाईला पैसे मिळाले त्या काळात घटस्फोटितेला एक छदाम सुद्धा मिळायचा नाही, हेच इंडियन नवऱ्यांना माहीत, त्यामुळे त्यांना धक्काच बसला

इतक्यातूनही काही संसार तरले त्या बायका, चिकन करी, रोटी असे खास पंजाबी पदार्थ करायला लागल्या त्यांना थोडंफार पंजाबी यायला लागलं, तरीपण एक बाई - २८

वर्षे तिने, शीख नवऱ्याशी ससार केला, पण, 'सत् श्री अकाल' तिला नीट बोलता यायच नाही दुसरी ५० वर्षे शीख नवऱ्याजवळ -(त्यातली खूप वर्षे नवऱ्याचे भाऊ व त्याचे भागीदार याच्या एकत्र कुटुबात) राहिली ती म्हणायची 'सिंग हा धर्म ' एका इंडियन माणसाचा मेक्सिकन बाईशी तीस वर्षे छान संसार चाललाय्

जवळजवळ ३० वर्षे अमेरिकेचे जे कायदे होते, त्यांची झळ या इडियन्सना खूपच लागली काहीच २-४ इयत्ता शिक्षण तर काहींनी शाळेच तोंड सुद्धा पाहिलेलं नाही ते शेतमजूर, शेतकरीच राहिले फारतर शेताचेच फोरमन मॅनेजर अगदी थोडे - जेमतेम चार टक्के काही धदा उद्योग करायचे सगळा कामगारवर्ग इथ त्याला blue collar म्हणतात मेक्सिकन बायकाशी लग्न केलेले, एकाकी पडलेले समाज म्हणून त्याना म्हणताच येणार नाही ४०,५०,६० अशा वयाचे हे लोक हळूहळू अमेरिकन लोकाच मत बदलल, भारत स्वतत्र झाला, कायदे बदलले अमेरिका- इडिया जाण्यायेण्याची मोकळीक झाली त्याबरोबर या सगळ्या लोकानी भराभर मेक्सिकन बायकाशी घटस्फोट घेतले व ते आपल्या इंडियातल्या पहिल्या बायकोच्या भेटीसाठी गेले १५,२०,२५ वर्षानतरच्या या भेटी काहीच्या ३० वर्षानतरच्याही कुणाकुणाच्या बायका हे अमेरिकेत असताना मेल्या होत्या, तर कुणीकुणी लग्नंच केली नव्हती त्या सगळ्यांनी इडियात जाऊन नव्या नवऱ्या आणल्या अगदी पूर्वापार पद्धतीप्रमाणे वडील माणसानी ठरवलेल्या मुलीशी त्यानी लग्न केली काही जण आपल्या मेक्सिकन बायका-मुलाना घेऊन इंडियात गेले ती मुल आपल्या सावत्र भावंडाना भेटली आपला बाप ज्यांच्यासाठी दरमहा पैसे पाठवीत होता, त्या नातलगाना भेटली बापाने पैसे पाठविल्यामुळे बाधलेल्या खेड्यातल्या शाळा बघितल्या तेव्हा त्याना आपल्या बापाचा अभिमान वाटला मात्र अमेरिकेत आल्यावर, ही बापाची इंडियन मुल, अमेरिकेतल्या आपल्या इस्टेटीत वाटा मागतील ह्या भीतीने, त्यानी त्याच्याशी सबध ठेवलाच नाही तरीपण इंडियातल्या गरीब सावत्र भावाची आठवण ठेवून, बापाला त्याला पैसे पाठवायला लावणारा एखाददुसरा होताच इडियन-मेक्सिकन लग्नापासून निर्माण झालेली प्रजा, इंपीरियल व्हॅलीत अद्याप आहे त्याची ३-४ थी पिढी तो एकसंध समाज नाहीच भाषा, धर्म, कौटुबिक जीवन याबाबतीत ज्यांना शीख म्हणता येईल, असे फारच थोडे म्हातारे आहेत तर काही लोक स्वतःला मेक्सिकन म्हणवतात, तर काही आम्ही हिंदू आहोत म्हणतात पण त्याना, हिंदू, मुसलमान, शीख यांतला फरक समजत नाही मात्र त्यांनी आर्थिक प्रगती चागली केलीय त्या सर्वांना आपल्या हिंदू पूर्वजाचा अभिमान वाटतो

पंजाबमधून बायका घेऊन येणाऱ्या शिखानी आपले रीतिरिवाज पाळायला सुरुवात केली पजाबी अन्नपदार्थ, पजाबी भाषा, पजाबी पोशाख सगळ पजाबसारख अस आपल्याला वागता येईल, असं त्याना कधीच वाटल नव्हत धर्म तर त्याना फार प्यारा

त्यानी गुरुद्वारा बाधले त्याची आर्थिक परिस्थिती तर डोळ्यात भरण्यासारखी हजारो एकर बागायती जमीन, मैलोन्‌मैल गव्हाची शेती, कुणी पोटॅटो किंग तर कुणी .वॅक्स म्युझियमसारख्या मोठ्या म्युझियमचा मालक त्यानी आपल्या नातलगांना, मित्रांना स्पॉन्सॉर तर केलंच शिवाय त्याच्या राहण्या-जेवण्याची व्यवस्था केली आर्थिक मदत केली

उमदे जॉन केनेडी अमेरिकेचे प्रेसिडेन्ट झाले त्यानी इडियातल्या पुष्कळ लोकांना अमेरिकेत येण्याची सधी मिळवून दिली. खूप मोठ्या संख्येने इडियन्स आले कुणी डॉक्टर, कुणी वकील, कुणी इजिनिअर तर कुणी स्वत:चा धदाव्यवसाय करणारे अमेरिकेच्या सगळ्या सुखसोईंचा ते उपभोग घेत आहेत अमेरिकन पोषाख करतात त्या सर्वांचे संसारही सारखेच एखाद्या कानामात्रेचा फरक असेल एवढंच

※※※

## ९

# मुलं, मुलं, मुलं

अनघा रोज सकाळी ५ वाजता घराबाहेर पडते तिची दोन लहान मुलं मुलगी सव्वादोन वर्षांची, मुलगा एक वर्षाचा मुलं बेबीसीटरकडे ठेवायची आदल्या दिवशी तिने सगळी तयारी करून ठेवलेली असते मुलांचे कपडे, दूध, खाणं, डायपर्स, काही औषध द्यायचं असलं तर ते सुद्धा आठ वाजता माधव मुलांना तिथं सोडतो पण मुलंच ती लवकर उठत नाहीत उठली तर दात घासत नाहीत कपडे घालताना खळखळ मग माधवची चिडाचीड दुपारी अडीच वाजता, अनघा मुलांना घेऊनच घरी येते मुलांबरोबर बराच वेळ घालवता यावा, म्हणून ती एवढ्या लवकर काम सुरू करते घरचही बघता येतं बेबीसीटर मात्र तिला चांगली मिळालेय्, इंडियन आहे मुलांचं फार प्रेमाने करते कधी एखाद्या पार्टीत भेटली, तर मुलं तिलाच चिकटतात दुपारी आल्यावर जरा पाठ लांब करावी, एखादी डुलकी घ्यावी, असं अनघाला वाटतं पण मुलांना एकसारखी आई हवी असते, पुष्कळ वेळाने भेटलेली त्यांची भांडणं, रडणं, काहीतरी चालूच असतं शिवाय घरात पसारा पडलेला असतो बेड्स् करायचे असतात, भांड्यांनी सिंक भरलेलं असतं, मुलांच्या आंघोळी, संध्याकाळचा स्वयपाक, कधी लॉंड्री, कधी ग्रोसरी तिला वाटतं, कधी एकदा माझी मुलं मोठी होतील, समजूतदार होतील, शाळेत जायला लागतील, स्वतःच स्वतः करतील

तशी सगळी मुलं मोठी होतातच तान्हं रांगायला लागतं, चालायला लागतं, बेबी सीटरकडे जातं प्राथमिक, माध्यमिक, हायस्कूल, कॉलेज सगळं पण मुलं अशी

सुतासारखी सरळ वाढतात का? लहानपणी चिडतात, रडतात, हट्ट करतात, अभ्यास करीत नाहीत त्याना वाढवणं, शहाणं करणं कठीणच काम म्हणून अमेरिकन तज्ज्ञ म्हणतात, मुल वाढवण्याच काम, आईवडील दोघांनी कराव आई तर नऊ महिने गर्भभार पोटात वागवणारी, प्रत्यक्ष जन्म देणारी पण बापाने सुद्धा, आईच्या पोटात गर्भाचा पास पडल्यापासून त्यात सहभागी व्हाव गर्भारपणात, बाईत शारीरिक, मानसिक बदल होतात ते त्याने जाणून घ्यावे, गर्भाची हालचाल अनुभवावी वेणा त्रासदायक होऊ नयेत, प्रसूती नैसर्गिक (औषध न देता) व सुलभ व्हावी यासाठी अमेरिकेत क्लास असतात दोघानी त्या क्लासला जायचं, प्रत्यक्ष प्रसूतीच्या वेळी, नवऱ्याने, बायकोबरोबर त्याच खोलीत राह्यच, असा नवा प्रकार इथं सुरू झालेला आहे कळा देताना बाकीच शरीर शिथिल ठेवायच, विशिष्ट प्रकारच श्वसन करायच, याची नवऱ्याने बायकोला सतत आठवण करून द्यायची तिचा घाम पुसायचा तिचे हातपाय, तोंड थडगार टॉवेलने पुसायचे, तिला आराम वाटेल अशा गोष्टी करायच्या आईच्या पोटातून बाळ बाहेर पडलं की, त्याची आईला माया वाटायला लागते तसंच प्रत्यक्ष प्रसूती पाहिल्याने बापालाही वाटत शिवाय त्या दोघाच्या आयुष्यातल्या सर्वात मोठ्या आनंदाच्या क्षणाचे ते दोघे सहभागी होतात घरात आईवडील दोघंच तेव्हा दोघानी मुलांच सगळ करायचं मुलाला जवळ घेण, त्याच्यावर प्रेम करण, त्याच्याशी खेळण हे तर सर्वच बापांना आवडत तेव्हा मुलाला आघोळ घालण, डायपर बदलण, कपडे घालण, दूध पाजण, सगळं आईच्या बरोबरीने करायच ही बायकाची काम अस म्हणायच नाही त्यामुळे त्याची मुलाशी जास्त जवळीक होईल मुलाला काळजी घेणारी दोन माणसं मिळाली, हा फायदा त्यात बापालाही आनद मिळतोच अर्थात सर्वच वडील करतात अस नाही उलट ही जबाबदारी टाळण्यासाठी पळून जाणारेही आहेत

मुलासाठी डे-केअर सेन्टर्स, नर्सरी स्कूल्स असतात अलीकडे अगदी लहान अर्भक, रांगती मुल याच्यासाठीही अशी सेंटर्स निघालीत मुलांना घरी कुणी खेळायला नसत घर दूरदूर, तिथ कुणी खेळगडी असला तरी, आया आपल्या सवडीने मुलाना एकमेकाकडे नेणार मग मुलानी करायच तरी काय? ती टी व्ही बघतात त्यांतल्या जाहिराती त्यांना फार आवडतात इथली मुलं बोलायला लागली की, त्या जाहिरातीतले शब्द, वाक्यच बोलतात त्या जाहिराती ७१% खाण्याच्या पदार्थांच्या त्यातले ८०% पौष्टिक आहाराच्या दृष्टीने कुचकामाचे आईने चागला ब्रेकफास्ट तयार केला की, यांना हवा असतो कॅण्डीतार जाहिरातवाल्याना आपला माल खपवायचा असतो हे मुलाना समजत नाही पण आईवडिलांना समजतं पण ते तरी काय करणार? दोघही नोकरी करणारे मुलाच्या बरोबर घालवायला त्याना वेळच नसतो, त्याबद्दल त्याना अपराधी वाटतच असत मुलाना हव ते दिलं नाही की, ती हट्ट करणार, रडणार, नाराज होणार मुलांना हव ते दिल की प्रश्न मिटतो टी व्ही वर मुलाना अक्षरओळख होईल, त्यांच्या ज्ञानात भर पडेल असेही शो

असतात म्हणा

अमेरिकेत दोन प्रकारच्या शाळा आहेत प्रायव्हेट स्कूल व पब्लिक स्कूल प्रायव्हेट स्कूलची फी, वर्षाला दोन ते दहा हजार डॉलर्स असते प्रत्येक वर्गात मुलं थोडी व अभ्यासही कसून करून घेतात परतु ही फी परवडेल असे श्रीमत लोकच मुलं प्रायव्हेट स्कूलमध्ये घालतात ह्या श्रीमत मुलाच्या सवयी आपल्या मुलांना लागतील, म्हणूनही मध्यमवर्गीय त्या शाळात मुलाना घालत नाहीत पब्लिक स्कूलमध्ये सर्व शिक्षण मोफत पुस्तक मिळतात येण्याजाण्यासाठी बसची सोय, दुपारी माफक दरात गरम लच पाच वर्षे पूर्ण झाल्यावर या शाळात किडरगार्टनमध्ये प्रवेश मिळतो मुलाना अभ्यासाची गोडी लागावी, हसतखेळत त्यांनी शिकावं, म्हणून त्याना फारस होमवर्क देत नाहीत दिलेल होमवर्क मुलान कोणाची मदत न घेता करावं अशी अपेक्षा पाठातर नाहीच घरात आईवडील, मुलाना त्याच बेड करण, बारीकसारीक काम करण यासाठी अलावन्स देतात शाळेत इतर मुलामुलीजवळ तऱ्हेतऱ्हेची खेळणी असतात मग मुलांच्या मागण्या सुरू होतात, 'Mom, can I have that? Dad can I have this' अस म्हटलं की, आईवडील विरघळतात व त्याना हव ते घेऊन देतात अक्षरओळख होण्यापूर्वीच ते, 'Toys R us' ची रगीबेरगी पाटी ओळखतात वास्तविक त्याच्या वाढदिवसाला त्याना खूप खेळणी मिळतात ख्रिसमस प्रेझेन्टस् म्हणूनही नवी नवी खेळणी मिळतात तरीपण त्याना प्रत्येक वेळी नव खेळणं हव असत खेळण्यांच्या दुकानात गेली की, ती वेडीच होतात तऱ्हेतऱ्हेची स्टफ्ड् ॲनिमल्स, पझल्स, गेम्स स्टफ्ड् ॲनिमल बनवणारे, ब्रह्मदेवापेक्षा कल्पक त्याने निर्माण केलेले सगळे प्राणी-पक्षी ते करतातच शिवाय त्याच्या सुपीक डोक्यातून अनेकांची निर्मिती होते डिस्नेचे मिकी माऊस, मिनी माऊस, डोनाल्ड डक, टी व्ही वरचे सुपर मॅन, बॅट मॅन, योडा सगळे सगळ्या मुलाना सगळंच हव असत मुल नाराज होऊ नयेत म्हणून आईवडील घेऊनही देतात बाहुल्या तर किती प्रकारच्या रगडी ॲन, लहान मोठ्या बार्बी, रागणाऱ्या, चालणाऱ्या, बोलणाऱ्या, गाणाऱ्या, रोलर स्केट करणाऱ्या, तऱ्हेतऱ्हेचे ड्रेस घातलेल्या बाहुल्याच बाहुल्या मुलीला तिच्या पहिल्या वाढदिवसापासून सोळाव्या वाढदिवसापर्यंत विशिष्ट बाहुल्या द्यायच्या चांगल्या किमती लग्न झाल्यावर तिने त्या आपल्या घरी न्यायच्या ४-५ वर्षापूर्वी एका डोकेबाजाने 'कॅबेज पॅच' नावाच्या बाहुल्या बाजारात आणल्या ओबडधोबड कापडी बाहुल्या, किंमत १०० डॉलर्स मुलगी म्हणते, माझ्या सर्व मैत्रिणींजवळ तशी बाहुली आहे, मला पण तसली बाहुली हवी मागणी वाढली त्या हुशार माणसाने पुरवठा कमी केला एखाद्या दुकानात त्या आल्याची बातमी कळली की, प्रेमळ माता तिथ रांगा लावायच्या मग धक्काबुक्की कुणाला लागल, कुणाला खरचटल पण आपल्या मुलींसाठी त्यानी बाहुल्या मिळवल्या कुणी लडनहून मागवल्या मग त्या बेट्याने त्याच्यासाठी, तऱ्हेतऱ्हेचे टीचीटीची कपडे बाजारात आणले महाग मोलाने हातोहात खपले

(म्हिमेच्या वृक्षाला पूर्वेची ओढ

बाहुल्या दत्तक घेण्याची टूम काढली त्याने त्या दत्तकविधानाच्या कवडीमोल कागदांनी त्याच उखळ चागलंच पांढरं झाल माझ्या नातीच्या मोना, प्रिया, लीली, हेलन, कॅथी, जेसिका अशा अनेक बाहुल्या त्याना दुतर्फा बसवून, आम्ही रोज एकीचा बर्थडे साजरा करतो माझ्या लहानपणी मी एका लाकडी बाहुलीशी खेळले ती सुद्धा, माझी अक्का, बायजी, ताई, माई, बाई, दिदी यानी खेळल्यावर, आईने माझ्यासाठी जपून ठेवलेली तिच्या कानानाकाचा पत्ताच नव्हता तिच्या हिरव्या रंगावर पिवळे ठिपके होते की पिवळ्या रंगावर हिरवे ठिपके हाते, ते मला कधी समजलच नाही पण आम्ही अशाच बहुलाबाहुलींची कौतुकान लग्न लावत होतो आता या मुलाना, ते खेळणं हातात पडल की कौतुक सपल मग ते अडगळीत

मुल १२ वर्षांची झाली की, ती पेपर टाकून पैसे कमावतात कुणी शेजाऱ्यापाजाऱ्यांची हिरवळ कापतात, बेबीसीटिंग करतात मुलानी चागला अभ्यास करावा, शाळेत, शाळेबाहेर चागल्या गोष्टी कराव्या, चागल्या ग्रेड्स मिळवाव्या, अशी सगळ्याच आईबापांची इच्छा असते साम, दाम, दंड, भेद सगळे प्रकार करून ते पाहतात मार आता इतिहासजमा झाला पण मुलाला खोलीत डाबून ठेवण्याची शिक्षा कोणी देतात १४-१५ वर्षांच्या मुलाना स्टोअर्समध्ये कामं मिळतात १६ वर्षांनंतर रेस्टॉरंटमध्ये हॅम्बरगर, हॉट डॉग्ज, पिझ्झा करायची कामंही मिळतात तासाला ४-४॥ डॉलर्स शाळा सपल्यावर काम करणारी मुल आहेत उन्हाळ्याच्या तीन महिन्याच्या सुट्टीत मुल पुष्कळ पैसे कमावतात क्वचित कुणी हे पैसे आपल्या कॉलेज शिक्षणासाठी ठेवतात पण बहुतेक खर्चच करतात १३ ते १९ म्हणजे त्याना टीन एजर्स म्हणतात इथ या वयात मुल आईबापाच ऐकत नाहीत त्याना अभ्यास करायचा नसतो मॉलमध्ये भटकायला आवडत, अभ्यासात चांगल्या ग्रेड्स् मिळवा अस सांगितलं तर त्याच्यावर प्रेशर येतं या मुलामुलींच्या पार्ट्या सुरू होतात दर वीकएण्डला शिवाय अधेमधे मुलमुली मिळून एखाद्या मुव्हीला जातात, भाड्याने मुव्ही आणून एखाद्याकडे सर्वजण जमतात बटाट्याच्या, कॉर्नच्या चिप्स, पॉपकॉर्न, कोक हे त्यांच आवडतं खाद्य रात्री वेळेवर घरी या सांगितल तर त्याना ती कर्फ्यू वाटते अशा या मुलाना अभ्यास करायला लावायच कसं? आईवडिलांना ते मोठं आव्हान वाटत कधीकधी आपणच अपराधी आहोत असं वाटतं कुणाकडे स्लंबर पार्टी, शाळेत मुलामुलींच्या डान्स पार्ट्या, अशी इथली मुलं खूप मजा करतात

अमेरिकेत अभ्यासाइतकंच खेळांनाही महत्त्व आहे पहिली-दुसरी पासूनच मुलाना सॉकर, बेसबॉल, बास्केटबॉल शिकवतात काही मुलाचे वडील आनदाने मुलांना कोचिंग करतात गावागावाच्या टीम्स्, त्याचे सामने, जिंकणाऱ्याना मोठमोठ्या ट्रॉफीज थोडी मोठी झाल्यावर मुल फुटबॉल, टेनिस खेळतात पुष्कळांकडे स्वत चे स्वीमिंग पूल्स असतात प्रत्येक गावाचाही असतो त्यामुळे सर्व मुलांना पोहता येत सगळ्या खेळांचे कॅम्पस् स्काऊट

ब्राऊनीचे कॅम्पस् उन्हाळ्याच्या सुट्टीतले कॅम्पस् तिथ खेळांवर जास्त भर मुल मोठ्याच्या मदतीने ब्रेकफास्ट, लंच, डिनर सगळ तयार करतात

मुल जसजशी मोठी होतात, तसतसा त्याना कपड्याचा हव्यास सुरू होतो ते कपडे त्याना सुप्रसिद्ध कपनीचे अगदी नव्या फॅशनचे हवे असतात फॅशनची लाट जरा ओसरली की, तेच कपडे सेलवर निम्म्या किमतीत मिळतात पण ह्यांना नव्या फॅशनचे कपडे घालून मित्रमैत्रिणींकडून कौतुक करून घ्यायच असत न मग ५० डॉ चे स्नीकर्स, ६० डॉ ची जीन, ८० डॉ चे स्वेटर, २०० डॉ चं जॅकेट त्याना हव असत मग आईवडील घेऊन देणार, कारण तेही त्यातलेच ह्या देशातल्या लोकांना, जगातल्या सगळ्या गोष्टीचा उपभोग घ्यायचा असतो मोठमोठी घर, किंमती गाड्याच काय पण घोडे, बोटी, विमान सगळं त्याच्या मालकीच ज्ञानेश्वरानी, 'जो जे वाछील ते तो लाहो' अस सांगितलेल पसायदान, या अमेरिकन लोकाच्या पदरात पडलेलं ज्याच्या जवळ हे सगळ आहे, तो यशस्वी असच मुळी समीकरण मुलाना हवं ते घेऊन दिल नाही तर दुसरी मुल त्याला कमी लेखतील इथली मुलं दरवर्षी ४ अब्ज ४५ कोटी डॉलर्सच्या वस्तू विकत घेतात

११ वी १२ वीच्या मुलाचा 'प्रॉम' म्हणून एक कार्यक्रम असतो मुलाने आपल्या गर्लफ्रेंडला किंवा मुलीने आपल्या बॉयफ्रेंडला या कार्यक्रमासाठी आमत्रण द्यायच ज्याचे आमत्रण त्याचा खर्च मुलगी या कार्यक्रमासाठी २०० डॉलर्सचा ड्रेस शिवून घेते त्याला मॅचिग होईल असा मुलाचा टाक्सिडो (कोट, टाय, पट्टा) त्याचं भाड ९० डॉलर्स मुलगा मुलीला फुलं देतो व ह्या जोड्या एका घरी जमतात ते हौशी आईवडील मुलं व त्याचे आईवडील यांच्यासाठी शॅंपेन व स्नॅक्स ठेवतात मग ह्या जोड्या लिमोझिनमध्ये बसून, प्रॉमचा कार्यक्रम असलेल्या हॉटेलमध्ये जातात एका लिमोझिनमध्ये सहा जण बसतात तिचं भाडं ४०० डॉ हॉटेलमध्ये डान्स व डिनर त्याच तिकीट प्रत्येकी ८० डॉ १२ नतर कार्यक्रम संपतो मुल कुणाकडे तरी झोपतात सकाळी समुद्रकिनारी जाऊन मजा करतात या खर्चिक कार्यक्रमाला सर्वच मुल येऊ शकत नाहीत काही मुल स्वत पैसे कमवून प्रॉमची मजा लुटतात

१६ व्या वर्षी मुलाना गाडी चालवायच लायसन्स मिळतं न्यूयॉर्कमध्ये १७ व्या वर्षी शाळेत गाडी चालवायच शिक्षण देतातच आईवडील मुलाना खासगी तज्ज्ञाकडून धडे देतात आता या मुलाला स्वतची गाडी हवी असते गाडीची किंमत, पेट्रोल, इन्शुरन्स हा खर्च शिवाय ही लहान मुल गाडी हातात मिळाली की हुरळून जातात आपण आता खूप मोठे झालोत, गाडी घेऊन कुठही भटकायला जाऊ, डेटिंगला जाऊ पण आईबापाना भीती ही निष्काळजीपणे बेफाम गाडी हाकतील, ॲक्सिडेंट करतील त्याच्यासारखीच दुसरी मुल कुणी मद्यपान करून ड्रग्ज घेऊनही गाडी हाकतील ठोकर देतील केवढा प्रश्न पण शेवटी त्यांना गाडी घेऊन द्यावीच लागते त्याच्या सर्व मित्राजवळ असते न

## ॥ १२ ॥ पश्चिमेच्या वृक्षाला पूर्वेची ओढ

मुलं १८ वर्षांची झाली की, १२ वी म्हणजे स्कूल ग्रॅज्युएट होतात अधेमधे शाळा सोडली नाही तर त्यानंतर आईवडिलांवर मुलांची जबाबदारी नाही, असला इथला अलिखित नियम त्यांना नोकरी मिळते स्वत च पोट भरू शकतात कॉलेजात गेली तरी नोकरी करून शिकू शकतात एकूण १८ वर्षांनतर मुल आईवडिलाच घर सोडून जातात कॉलेज दूर डॉर्मेटरीत राहतात २-४ मुलं-मुली एखाद भागीत अपार्टमेंट घेऊन राहतात कॉलेज शिक्षणासाठी हुशार मुलाना स्कॉलरशीप मिळते, कर्ज मिळत, कॉलेजच्या कॅम्पसमध्ये काही काम मिळतं मुलाचं कॉलेजशिक्षण करणारे आईबाप आहेत, पण त्यांच्याकडून पैसे घेणे मुलाना कमीपणाच वाटत मुलानी काहीतरी कमवाव, निदान उन्हाळ्याच्या सुट्टीत काम करून, आपल्या पॉकेटमनीसाठी पैसे जमवावेत अस सर्वच आईवडिलाना वाटत कॉलेज शिक्षण फारच महागड आहे वर्षाला १३ ते २० हजार डॉलर्स असा शिक्षणाचा खर्च असतो

आमची मुल आपला देश सोडून, अमेरिकेत स्थायिक झाली, त्याची किमत त्यांना द्यावी लागलीच आपण या देशात परके ही त्रासदायक भावना सतत मनात या देशातले बहुसख्य लोक, वेगळ्या वशाचे, वेगळ्या धर्माचे आपण अल्पसंख्य म्हणजे नगण्यच यावर उपाय म्हणून भारतीय लोक एकत्र यायला लागले त्याच्या पार्ट्या सुरू झाल्या त्यात मराठी, गुजराथी, पजाबी, मद्रासी, बगालीच काय पण एखादा पाकिस्तानी पण असायचा इग्रजीतून सर्वांच्या अघळपघळ गप्पा चालायच्या सर्वांची मुलं पण यायची एकमेकांत खेळायची कधी त्यांना एखादी मुव्ही आणून द्यायचे, कधी मुलाचे कार्यक्रम कुणी गाण म्हणायच, वाद्य वाजवायचं, जोक्स सागायचे, जादूचे प्रयोग नि फॅन्सी ड्रेस अस काहीतरी एकमेकाशी खेळणारी ही इडियन मुलं, अशीच एकमेकाच्या सगतीत वाढतील, मोठी होतील त्याच्यावर आपोआप इंडियन संस्कार होतील पुढे त्यांची एकमेकात लग्न सुद्धा होतील, असेनात का वेगवेगळ्या प्रांतातली, इडियन तर आहेत असे माझ्यासारख्या आजीने मनात पोटभर मांडे खाल्ले मुल लहान होती, घरात मातृभाषाच बोलायचे, वरणभात, भाजी-पुरी, इडलीडोसा आवडीने खायचे शाळेत जाणार तेव्हा इंग्रजी आल पाहिजे म्हणून आईवडिलांनी त्याच्याशी इग्रजी बोलायला सुरुवात केली, आणि मग मुलांनी मराठी बोलणच टाकल की! इंग्रजीत सागितलेलं मुलाना चागल समजत, म्हणून आईवडील त्याच्याशी घरात इग्रजीच बोलायला लागले काहीनी मात्र मुलानी मराठीच बोलाव, म्हणून खूप प्रयत्न केले अगदी अट्टाहास केला पण मुलांना घरीदारी एकच भाषा बोलण सोप वाटल शाळेत लंचची सोय त्यात अमेरिकन पदार्थ मिळायचे मुलांना तेच आवडायला लागले कामावरून घरी आल्यावर, दमलेल्या आईला ते करायला सोपे पण शाकाहारी लोकाची पचाईत मुल म्हणणार, 'This is real lunch' मग त्याना बाहेर नेऊन त्याच्या आवडीच खायला घालायच काही लोक हळूहळू मासाहारी झाले, तरी थोड्यांनी शकाहार

कायम ठेवला आहे शाळेत जास्त मुलं अमेरिकन, ते मित्र झाले त्याची सगत आवडायला लागली तशाच मागण्या, खूपखूप खेळणी, त्याना घरून मिळणार स्वातंत्र्य ह्यानाही हव झाल हा देश व्यक्तिस्वातंत्र्याचा भोक्ता मनाला वाटेल ते करायच इंडियन पार्ट्यांत त्याना रस वाटेना काही आग्रह करून मुलाना न्यायचेच फार थोडी मुलं तिथं रमायची ठिकठिकाणी महाराष्ट्र मंडळ त्यांचे धार्मिक, सास्कृतिक कार्यक्रम या मुलांना आकर्षण वाटाव, म्हणून इग्रजी कार्यक्रम, डिस्को डान्स ठेवायचे पण फार मुलं त्यात भाग घ्यायची नाहीत शाळेतल्या मुलाच्या स्लबर पार्ट्या रात्रभर एखाद्या मुलाकडे राह्यच अमेरिकन कुटुब अपरिचित मुलाना तिथं पाठवायचं का? तिथलं कस वातावरण असेल? मग प्रथम आपल्याच घरी मुलांच्या मित्राना बोलवायचं, त्याना अजमावायच, मग आपल्या मुलाला पाठवायच मुलीच्या बाबतीत आणखीनच प्रश्न, नाही पाठवल तर मुलगी नाराज होणार मुलाच्या आईची ओळख वाढवायची भीत भीत मुलीला पाठवायची शाळेत मुलामुलीच्या डान्स पार्ट्या मुलमुली एकत्र जमून डान्स करणार, त्यातून काही विपरीत घडल तर? अनेक शकाकुशका काही आईवडील अशा कार्यक्रमाना मुलींना तरी पाठवायचे नाहीत, त्याऐवजी तिला चागल्या रेस्टॉरंटमध्ये जेवायला न्यायचं, तिच्या आवडीच्या ठिकाणी न्यायच पण मुलीच मन सगळं शाळेत आपले मित्रमैत्रिणी एकत्र जमून मजा करताहेत, नाचताहेत ही नाराजी काही पालकाना मात्र आपल्या मुलाना, शालेय जीवनातल्या, या मौजमजेला अंतरवण योग्य वाटायचं नाही

अमेरिकेत मोडकी घर खूप त्या घरात आई सख्खी तर बाप सावत्र मुलांना ते घर आवडत नाही ते आपलं घर अस वाटत नाही ह्या अवस्थेत सिग्रेट ओढायची, दुसऱ्या मुलानाही आग्रह करायचा, त्यांना दीक्षा द्यायची काहीतर घराबाहेर पडलेली खाण्यापिण्याची पचाईत, ड्रगवाले अशी मुलं बरोबर हेरतात त्याच्याजवळ हिरॉइन, कोकेनच्या गोळ्या द्यायच्या फुकट वाटायला ड्रग्जबद्दल कुतूहल त्यात फुकट मिळालेली वस्तू, बघायची घेऊन मग चटक, मग विकत घ्यायच्या जी गोष्ट ड्रग्जची तीच सेक्सची सेक्सचा अनुभव नाही म्हणजे जगावेगळा आम्ही सर्व असे, तूच कसा असा? अशी त्याची हेटाळणी होते तो एकाकी पडतो आपल वागण अनैसर्गिक आहे, अस वाटत सगळीकडून असा दबाव आल्यावर, त्या मुलाने, त्याला तोड द्यायच कसं? न खरचटता, काहीही दुखापत न होता, त्यातून बाहेर कस पडायचं? (अमेरिकेतली चागल्या ग्रेड्स् मिळवणारी स्थिर कुटुंबातील मुल ड्रग्जच्या वाटेला जात नाहीत, अस पहाणीवरून दिसून आलेल आहे) घरी आईवडील वेगळच सागतात हे करू नका, ते करायच नाही अभ्यास करा, वरच्या ग्रेड्स् मिळवा त्यामुळे मुलाच्या मनाची रस्सीखेच होते

१४-१५ वर्षांच्या मुलाला, आपल्या खोलीत स्वतत्र टेलिफोन हवा असतो मित्रमैत्रिणींशी मग त्यावरून गप्पा चालतात त्याच्या बरोबरीची मुलं डेटिंग करतात, तेव्हा

त्यानाही ते करावसं वाटतं ढवळ्याशेजारी पोवळ्या बांधला की, त्याचा वाण नाहीतर गुण लागतोच मुलं डेटिंगची भाषा बोलायला लागली, की आईबापाचं धाब दणाणतं ही अमेरिकेत आलेली मुलमुली, त्याची जुळवून, ठरवून लग्न झालेली क्वचित कुणाचा प्रीतिविवाह २५ वर्षापूर्वी तरुण मुलामुलीना मोकळेपणी बोलण्याची तरी रीत होती का? आता अमेरिकेत आलेत, इथले सगळे सुखोपभोग घेताहेत, अमेरिकन पेहराव करतात, अमेरिकन फूड खातात, अमेरिकेचे नागरिक झालेत, पण तो केवळ उपचार धंद्यापुरता अद्यापही इडियन पदार्थ जास्त आवडतात इंडियन सगीताचे शौकीन, इडियन धर्म-सस्कृती प्यारी देव भक्ती करण्याची पद्धत इडियन, सगळे समारभ इडियन पद्धतीचे इडियन साड्या, दागदागिने सगळी चौकट इडियन इडियन मित्र, त्याच्यातच जास्त मिसळण हाडाचे सर्व इडियनच त्याना हे डेटिंग कस आवडणार? कस रुचणार? मग घरोघरी वादग, नाहीतर चर्चा सुद्धा डेटिंग म्हणजे आईवडिलाची सत्त्वपरीक्षाच, ते मुलाना समजावून सांगत

'डेटिंग आपल्या संस्कृतीशी जुळणार नाही मुलाने आपल म्हणणं बाजूला ठेवून, वडिलांशी समझोता करायचा, अशी आपली रीत त्यामुळे आपली कुटुब स्थिर पायावर उभी आहेत, एकजीव आहेत सध्याची अमेरिकन कुटुब तुम्हाला आदर्श वाटतात का? तुमच्या पुढच्या आयुष्याच्या दृष्टीने योग्य तेच, आम्ही तुम्हाला सागतो लहानपणी फार गोड खाऊ नका म्हणून सागत होतो तस '

'पण आता आम्ही मोठे झालोत, आमच हित समजण्याइत्तकी हुशार झालोत आम्ही प्रामाणिक आहोत आमचीही काही तत्त्व आहेत रीतिरिवाज, परंपरा याचा कशाला एवढा विचार करायचा? आपल्या मुलाला काय हवं, त्याला काय योग्य वाटत, हे का तुम्ही बघत नाही? आमच्या म्हणण्याला काही अर्थ आहे, किंमत आहे, हे पालकानी ओळखायला शिकल पाहिजे तुम्ही आम्हाला मूल्य दिलीत न? मग आता आमच्यावर विश्वास टाका '

'शरीराची गरज निर्माण झाली की, मूल्यांची आठवण राहात नाही '

'पण तुम्ही डेटिंग म्हणजे सेक्स असं समजताच का? डेटिंग करण्यात आमचा तो हेतू नाहीच आम्हाला एकमेकाची चागली ओळख करून घ्यायचीय् त्यातून आमचा जोडीदार आम्हाला निवडायचाय् '

'मग तुम्ही ग्रुप डेटिग करा, चार चौघं मिळून जा तरुण वयात एकमेकाच आकर्षण वाटतं दोघं एकटे गेले की, एकमेकांवर छाप पाडण्याचा प्रयत्न चालतो त्या भरात दुसऱ्या व्यक्तीची पारख चुकीची होते त्यापेक्षा ग्रुप डेटिगमुळे, प्रत्येकाची सर्व बाजूनी पारख होईल '

'हे कसल डेटिग? आम्हाला लग्नाआधी सेक्स मुळी नकोच तरी सुद्धा, आईवडील मुलाना जाऊ देतात मुलींना मात्र सक्त मनाई असं दुटप्पी वर्तन का?'

'५० टक्के बलात्कार डेटिंगच्या वेळी होतात १० पैकी एक टीनएजर गरोदर राहते अमेरिकन समाजाने कुमारी माता मान्य केली असली तरी, ती अल्पवयीन मुलगी तिच ते बाळ याची परवड होतेच '

'त्या मुली आडाणी असतील, त्याना तुमच्यासारखे मूल्य देणारे आईवडील नसतील लग्न झाल्यावर काही नवरे बायकाना मारतात, म्हणून लग्न व्हायची थांबलीत का? तुम्ही आम्हाला चागलं वाढवलय न? मग आता आमच्यावर विश्वास ठेवा आम्हाला स्वातत्र्य द्या '

काही पालक शेवटी वैतागाने म्हणतात,

'जाऊ द्या त्याना, घेऊ द्या स्वतःची नाक बरबटून'

काही अगतिक होऊन म्हणतात,

'नैसर्गिक चुका करण्यापासून आपण त्यांना कसं परावृत्त करणार? त्या चुकांतूनच ते शिकतील म्हणायच आपल्या मूल्याना आकार देतील आणि समजा, त्यानी चूक केली, तरी आपण त्यांच्यावर प्रेम करायचं थाबवणार आहोत का? उलट मुलीला गरज लागेल, तेव्हा आपण तिच्या पाठीशी उभ राहणारच '

मुलाना अमेरिकन मुलांसारख स्वातत्र्य देण योग्य नाही, अशा मताचेही काही आईवडील आहेत शिक्षण, नोकरीधदा यापुरतं त्यानी अमेरिकन व्हाव पण त्यांनी आपला धर्म, आपली संस्कृती, आपल वेगळपण टिकवून ठेवाव ती मूल्य ठसायला वेळ लागेल, ते कठीण आहे, पण ते केलच पाहिजे अमेरिकेच्या मूळ प्रवाहात भारतीय संस्कृतीचे धागेदोरे गुफले पाहिजेत हरेकृष्णाचे केवढेतरी अनुयायी अमेरिकेत आहेत विवेकानंद सेंटरमध्ये, शांतपणे बसून ध्यानधारणा करणारे लोक आहेत त्या दिवशी ते बिन-कांद्यालसणाचं जेवण जेवतात भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारे अमेरिकन विद्यार्थी आहेत हा विषय घेऊन ग्रॅज्युएट होणारी एक मुलगी, मला मुद्दाम भेटायला आली होती तिला पुष्कळ माहिती होती, म्हणूनच भारतीय संस्कृती पाळणारी आपली मुलं बघून, अमेरिकन मुलं, त्यातल काही उचलतील की! आपणच का आपल्या मुलांना त्याच्याप्रमाणे वागू द्यायच? म्हणून ही मंडळी घरात मराठीच बोलतात मुलाशी घरात इंडियन स्वयंपाकच होतो सगळ्या मातृभाषा शिकवण्याचे इथ क्लासेस आहे पाच दिवस आपली नोकरीधदा सांभाळून, शनिवार-रविवारी मुलाना मराठी शिकवणारे लोक इथं आहेत नुसती भाषा नाही तर इतिहास सुद्धा इडियातून पुस्तक आणायची, त्याच्या कॉपीज काढायच्या मुलांचा उत्साह बेतासबात असला तरी आईवडील त्याना घेऊन येतात कित्येक वर्षं हा क्रम चालू आहे घरात रोज देवपूजा, आरती होते आईवडील भजन मंडळात जातात ठिकठिकाणी आहेत अशी मडळ छान चाललीत तशीच देवळसुद्धा मुलाना घेऊन देवळात जायच विश्वहिंदुपरिषद, अमेरिकेत भारतीय संस्कृती टिकवण्याच फार मोठ कार्य करते त्यांचे

कार्यकर्ते मनापासून कार्य करतात देवळात मुलासाठी कार्यक्रम असतात मुलांना रामायण महाभारताच्या व्हिडिओ कॅसेट्स दाखवतात अनेक लोककथा सांगतात त्या माहितीवर आधारित स्पर्धा होतात मुलांनी हौसेने याव म्हणून त्याना खायलाप्यायलाही देतात हरप्रयत्न चाललेले असतात ही मडळी इडियन वस्तीत राहतात मुलाना इंडियन शेजार मिळतो आपण एकमेकाचे भाऊबद आहोत, अस त्यांना वाटत, त्यामुळे आपोआप इंडियन सस्कार होतात इडियन तत्त्वज्ञानाचीही थोडी ओळख करून देतात मुलाना ते मुलाना सागतात, तुमची विद्यार्थीदशा, या आश्रमात तुम्ही खूप खूप ज्ञान मिळवायचं एकाग्रतेने ज्ञानार्जन करायच असं सगळं वातावरण ठेवल्याने मुलांना अमेरिकन मुलासारख वागावं, असं वाटणार नाही, अस त्यांना वाटतं

काही लोकाचे याच्या अगदी विरुद्ध मत मुलांवर बधन घालण, त्याना मुळीच योग्य वाटत नाही आपण इथं आलो म्हणून, मुलं इथ जन्मली, वाढली अमेरिकन मुलात ती मिसळणार, त्याच्या सारख वागाव अस त्याना वाटणार त्यात त्याचा काही दोष नाही त्याच्यावर बधनं घातली, तर ती आईवडिलाशी मोकळेपणान वागणार नाहीत त्यांच्या नकळत ती, त्याना हव ते चोरूनमारून करतील आईवडिलाशी खोट पण बोलतील मुलानी सगळ्या गोष्टी आईवडिलाना सागाव्या त्यांच्याशी मनमोकळी चर्चा करावी कधी त्याचं भाडणही होईल पण हसण्याच्या वेळा जास्त येतील मुलांशी बोलण्यातून आईवडीलही काही शिकतात मुलाना त्याचे निर्णय त्यांना घेऊ द्यावेत, पण योग्य निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन करावं विशषत अभ्यासाचे बाबतीत ते मुलाना सागतात, 'आम्ही तुमचे आईवडील, तुमच्यावर प्रेम करणारे, तुम्हाला मदत करणारे तुम्हाला हवं तेवढ शिक्षण आम्ही देऊ, त्यासाठी तुम्ही चागल्या ग्रेड्स् मिळवा, चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळवा बाकीच्या तुमच्या गोष्टींत आम्ही पडणार नाही, त्याची जबाबदारी तुमची तुम्हाला स्वातंत्र्य हवं आहे, ते घ्या, पण त्याबरोबर जबाबदारीही घ्या ' डेटिंगलाही ते हरकत घेत नाहीत डेटिंगमुळे इतरांचे स्वभावविशेष समजतात माणसाच्या वाढीला त्याची गरज आहे जन्माचा जोडीदार शोधायला त्याची चागली मदत होते घरात इंडियन वातावरण, शेजार इंडियन, असं कोबड झाकलं तरी उजाडायच राहणार आहे? अमेरिकन लोकाशी बरोबरीने वागून, स्पर्धेला तोड देऊन त्यांनी पुढे जायला नको का? ८०-९० वर्षांपूर्वी इडियन्स इथ आले, ते गरीब होते, अडाणी होते पण त्यांना विरोध करणारेही अडाणी, गरीब अमेरिकन मजूरच होते त्यांनी त्याना आपल्यात मिसळू दिल नाही त्यामुळे त्याना किती हाल, वनवास सोसायला लागले त्याची पुनरावृत्ती करायची आहे का? काळे लोक तर गोऱ्याबरोबर इथं आले २०० वर्षांपूर्वी, तेव्हा ते गुलाम होते पण गुलामी नष्ट होऊनही १०० वर्षे झाली तरी काळ्या-गोऱ्यातली दरी अजून कायमच आहे त्याच्या माऱ्यामाऱ्या चालूच आहेत काळा मुलगा, गोऱ्या मुलीबरोबर डेटिंगला गेला म्हणून त्याचा खून झाला परवापरवाची

गोष्ट, आपल्याला आपली अशी स्थिती करून घ्यायचीय् का? मग त्याच्यात मिसळल पाहिजे, अमेरिकेच्या मूळ प्रवाहात सामील झालं पाहिजे नुसतं आर्थिक, सामाजिकच नव्हे तर अमेरिकेच्या राजकरणातही शिरायची वेळ आलेली आहे

ही मुल इडियात जातात, आपल्या आईवडिलांच्या नातलगाना भेटायला इंडियात कितीही उकडलं तरी, मोठी मुलगी लाब पॅन्ट घालणार ही मुलं रंगबेरंगी समरड्रेसमध्ये, त्याच बोलण वेगळ, उच्चार अमेरिकन, चुकतमाकत मराठी बोलणार, मनात येईल ते मोकळेपणाने, वडील माणसासमोर अदबीने बसण, बोलण माहीत नाही (तरीपण घरातल्या एखाद्या म्हाताऱ्या बाईला, न सागता वाकून नमस्कार करतात) त्यानाही सर्व वातावरण परक माणसच माणस, धूळ, घाण, लहानलहान घर घरच्यासारखा मोकळेपणा वाटत नाही तरीपण जमवून घ्यायचा प्रयत्न करतात इंडियातल्या काही माणसाना वाटत, 'ही पूर्ण अमेरिकन बनलेली म्हणजे बिघडलेली मुलं आहेत' (अमेरिकेतली सगळीच मुँल बिघडलेली अशी कल्पना) कुणी स्पष्टवक्ती तशी बोलूनही दाखवते त्या मुलांना वाटत, ही माणस तर आपल्यासारखीच दिसतात, पण आपण त्यांच्यातले नाही अमेरिकन मुलापेक्षा आपण वेगळेच आहोत मग आपण कुठले? इडियाचे की अमेरिकेचे? दोन्ही देशांवर प्रेम करायला हरकत नाही, दोन्ही सस्कृती आपल्या म्हणायला हरकत नाही दोन्ही ठिकाणच्या चांगल्या गोष्टींच एकीकरण केल तर जास्त मौजमजा करता येईल, हे समजण्याइतका समंजसपणा नसतो

कॉलेजात गेल्यावर मात्र मुलांच्यात फरक पडतो राजू चांगलाच गोरागोमटा, अमेरिकन म्हणून सहज खपून जाणारा एका पजाबी मुलाने त्याला हाक मारली दोघही इडियन आहेत अस समजल नि एकदम आपुलकी वाटायला लागली शाळेत असताना, इडियन मित्राना बद केलेला दरवाजा एकदम उघडला इंडियन स्टुडंटस् असोसिएशन आपली वाटायला लागली आपण वेगळे दिसतो, वेगळे वागतो, अमेरिकन मुल आपल्याला वेगळे समजतात, गर्लफ्रेंडही असा भेदभाव करते सगळ लक्षात आल प्रत्येक युनिव्हर्सिटीत अशा प्रत्येक देशाच्या असोसिएशन आहेत न्यूयॉर्कच्या युनिव्हर्सिटीत इडो-अमेरिकन क्लबचे ४०० मेंबर्स आहेत ते नेहमी एकेठिकाणी जमून चर्च करतात

मधुलिका शंकर नावाच्या मुलीने डॉक्टरेटसाठी प्रबध लिहिला 'इंडियन लोकाच्या अमेरिकन जीवनाशी मिळतजुळतं घेण्याच्या पद्धती' हा तिचा विषय तिने केलेल्या सशोधनावरून तिला अस दिसून आलं की, पहिल्या पिढीपेक्षा ही दुसरी पिढी जास्त अमेरिकनाइझ्ड् झाली आहे खरी, तरीपण त्याचं इडियन वैशिष्ट्य, इडियन भावना कायम आहेत ही मुल स्वतःला प्रथम इडियन समजतात इंडियन वारसा, इंडियन मूल्यं आपल्याला, स्वतःचा मार्ग शोधून काढायला उपयोगी पडेल अस त्याना वाटतं पुष्कळाना इडियन मुलीशी लग्न करण्याची इच्छा आहे

एक मुलगी म्हणाली, 'माझे आईवडील मला महाराष्ट्र मंडळात येण्याचा आग्रह करायचे, मी ते टाळल आता वाटत, त्यानी माझ्यावर सक्तीच करायला पाहिजे होती हिंदुधर्माबद्दल आईवडिलानी आम्हाला जास्त माहिती द्यायला पाहिजे होती मराठी चांगलं येत नाही याच मल वाईट वाटत इडियातल्या लोकाचे कौटुंबिक सबध मला फार आवडले पण मुलामुलीत ते फेरफार करतात, ते बरोबर नाही' ती मुलगी जे बोलली, तेच एक ज्यू मुलगी बोलल्याचं मी वाचल त्या लोकांची इथं ५-६वी पिढी आहे तरीपण आपला धर्म, आपली सस्कृती याची ओढ वाटतच राहते अलेक्स हॅलेची आजी, लहानपणी त्याला आपल्या कुटुंबाच्या गोष्टी सांगायची ती म्हणायची माझ्या आजोबाच्या आजोबांना आफ्रिकन म्हणायचे तो मोठा झाला, लेखक झाला त्याला आपल मूळ, आपली संस्कृती शोधून काढायची इच्छा झाली आजीच्या सागण्यातल सत्य पुराव्यानिशी सिद्ध करावस वाटल त्याने अमेरिका, युरोप, आफ्रिका या तीन खडाचा ५० हजार मैलाचा प्रवास केला, अनेक लायब्रऱ्या, कागदपत्र धुडाळली आपल्या पणजोबाचे खापरपणजोबा, त्याचे गाव याचा त्याला बरोबर शोध लागला सतत १२ वर्षे तो त्यासाठी झटला त्याचा धर्म, त्यांचा सास्कृतिक वारसा, त्याची नावे सुद्धा गुलामगिरीने नष्ट केली पण त्याने आपली मुळं शोधून काढली २०० वर्षांचा ६ पिढ्याचा इतिहास त्याने आपल्या 'Roots' या आपल्या पुस्तकात लिहिला अमेरिकन वाङ्मयात ते अजरामर झालच शिवाय माणसाचा आत्मा अजिंक्य आहे, हे सत्य त्याने जगाला सागितल वेगळ्या देशात वेगळ्या सस्कृतीत राहायला लागल तरी, आपली मुळ आपल्याला अशी खेचीत असतात

आमची मुल आपली मुल वाढवताहेत तीही वेगळ्या देशात, वेगळ्या संस्कृतीत बालपणीचे त्याचे अनुभव त्याच्या गाठी असल्याने, मुलावर शक्य तितक रागवायचं नाही, अस त्यानी ठरवल असल तर नवल नाही इडियात सुद्धा प्रत्येकाला एखाददुसरच मूल दोघही कमावती, त्यामुळे मुलाला हवं ते मिळतच इथ तर काय? पैशाचा प्रश्नच नाही मुलांना तऱ्हातऱ्हा दिसतात, मग मुलाच्या मागण्या सागितल की, आईवडील घेऊन देणारच मीच अस म्हणते अस नाही एक अमेरिकन आजीपण म्हणत होती 'आम्ही काय मुलं वाढवली नाहीत, पण आमच्या वेळी असं नव्हत हो' माझ्या मुलीने डोळे उघडझाप करणाऱ्या बाहुलीसाठी हट्ट धरला मला मुळी खिसाच नव्हता मी त्या हट्टी कार्टीच्या पाठीत दोन धपाटे घातले पण मुलीची हौस पुरवता आली नाही, याचं मलाच खूप वाईट वाटल इथल्या आईबापावर तशी पाळी येतच नाही पण त्या देण्याला काही सीमा? मुलाना नाराज करायच नाही पण मुलांच उभं आयुष्य त्याच्या पुढे ते काय अस सरळ असतं? निराश व्हायची पाळी येणारच न? ती निराशा ही मुल कशी पचवणार? निराशा पचवण्याच्या मात्रेचा वळसा, त्याना लहानपणीच द्यायला हवा मुलांना काम करायला सागितलं की, ती बरोबर उलट करणार आई रागावली की बाप त्याची बाजू घेणार, बाप चिडला तर

आई बापालाच गप्प करणार बापाचा धाक कसा तो नाहीच इथलेच काही मानसशास्त्रज्ञ म्हणतात, खंबीर बाप नसल्याने काही मुल मनोरुग्ण बनतात तर काही जेलमध्ये पोचताल पण इथल्या मुलींनी नवऱ्याला अरे म्हणून बापामधली हवाच काढून टाकलीय् (अमेरिकेतल्या विमेन्स लिबवाला, इथल्या स्त्री मुक्तिवाल्या मला फाडून खातील) मुलानी कपडे मागितले दिले घेऊन फोन हवा, घे बाबा गाडी घे अस चाललेल असतं सगळ असं आयत मिळत त्यांना अमेरिकेत आईवडील मुलाना काम केल्याबद्दल अलावन्स देतात दुसऱ्याची काम करूनही ते पैसे कमावतात पण आमची मुलं? त्यांच्या जवळ पैसे आहेत मुल लाडकी त्यानी काही कमवाव, अस त्याना वाटतच नाही न कमावता, कष्ट न करता सगळ मिळल तर ही ऐदी नाही का होणार? त्यांच्यात स्वाभिमान कसा निर्माण होणार? स्वाभिमान नाही त्याला कोण जगात विचारेल? आमची मुल इथं आली, तेव्हा त्याच्याजवळ कुठं पैसे होते? म्हणून तर आपले आपणच हातपाय हलवले पाहिजेत अशी त्याना आच लागली त्यानी कष्ट उपसले, शिक्षण केल, तेव्हा त्यांना अस सुजीवन मिळालय् न? मग आपल्या मुलाच्यात त्यानी अशी आच उत्पन्न करायला नको? हीच मुल जेव्हा प्रथम इथ आली, तेव्हा कसलीही नोकरी करून आपल शिक्षण करणारी, अमेरिकन मुलं त्यानी पाहिली तेव्हा ते म्हणायचे, आम्ही डॉक्टर झालो, इंजिनियर झालो, सगळा खर्च आमच्या आईबाबानी केला काय हे? अमेरिकन मुल अशी आईवडिलावर अवलबून नसतात ती स्वत कमावतात आता हे सर्व ती विसरली का? आपले आईवडील आपल्या कॉलेजचा खर्च स्वत होऊन का करतात याच मुलानाही नवल वाटत आपले आईवडील आपल्यासाठी काहीही करतील अशी खात्री असल्याने १८ वर्षावरील घरट सोडून गेलेली अमेरिकन मुल परत आईवडिलाच्या घरी आल्याचीही इथ उदाहरणं आहेत मुलं कशी वाढवायची यावर मी लेखच लिहायला लागले म्हणायची पण माझा कसला लेख? अमेरिकेत मुल कशी वाढवावी यावर सहा हजार पुस्तक आहेत पण एकातही धड नियम नाहीत सुप्रसिद्ध विनोदी नट बिल कॉस्बी तर म्हणतो, 'I doubt there can be a philosophy about something so difficult, something down right Mystical as raising kids.' पण कुणीतरी व्यवस्थित नियमावली देणारा तुम्हाला भेटेलही पण- त्याला स्वतःला मूल नसलेला!

❀❀❀

८२९ ३६७ २२/६/९७

# १०

# शून्य पिढी

'तुम्ही अमेरिकेत या, ग्रीन कार्ड घेऊन कायम अमेरिकेत राह्यला या '

आमच्या मुलाची अशी पत्रं आमच्याच काय पण अमेरिकेत असलेल्या बहुतेक सर्व मुलाची आपल्या आई-वडिलाना अशीच पत्र येत होती पण आम्ही अमेरिकेत कायम राहायला जायच कस? सातासमुद्रापलीकडचा तो देश तिथली माणसं वेगळी त्यांची भाषा निराळी पोशाख वेगळे त्यांच्या आमच्या चालवागणुकीत तर जमीनअस्मानाचा फरक कसं निभणार आमच तिथं? तिथ थडी म्हणजे मी कशी सोसणार आम्हाला? दोघ नवराबायको दिवसभर नोकरीवर जाणार मुलं शाळेत आजूबाजूला ओळखीपाळखीचं कुणी नाही आम्ही दिवसभर तिथ करायच तरी काय? एकदा तिथ जाऊन आलोच होतो नुसता सुमसुमाट माणसाची चाहूलपण लागायची नाही कस तिथ जाऊन राह्यच कायमच? मुलाच पत्रातून टुमणं लागल होत इथ आल्यावर आमच मन पालटायला बघत होती एखादा मित्र आला की, ब्रेनवॉश करायला बघायचा पण आमच मन तिथ जायला तयार होतच नव्हत फार तर पुन्हा एकदा ४-६ महिने त्याच्याजवळ राहून येऊ पण कायम मुळीच नाही

आणि ही मुल तरी कायमसाठी तिथ गेली होती थेडीच? शिक्षण पुर झाल की, इंडियात परत येणारच होती पण शिक्षण संपल त्यानी नोकऱ्या धरल्या परत यायचं तर गाठी थोडे पैसे हवेतच ते काही वावग नव्हतं 'पूर्वी मुलं इग्लडला शिकायला जायची आय सी एस किंवा बॅरिस्टर होऊन परत यायची बड्याबड्याच्या मुली मिळायच्या त्याना

सुदर, शिकलेल्या वाटल होत, आमची अमेरिकेत शिकलेली मुल, त्याना पण अशा मुली मिळतील थाटामाटात त्याची लग्न होतील अमेरिकेची डिग्री घेतलेला मुलगा नोकरी तशीच मोठ्या पगाराची मिळणार त्याला मग मोठा ब्लॉक घेऊ गाडी घेईलच खूप हिंडू फिरू मुलाच लग्न, नातवाच बारस, वाढदिवस चागले थाटात करू नातलगाचे, इष्टमित्राचे हात भिजतील आमच्या घरी त्याच्या कौतुकाच्या नजरा आमच्याकडे वळतील चारी धामाच्या यात्रा करू नातवड खेळवू नि एक दिवस मुलाच्या माडीवर डोक ठेवून सुखाने डोळे मिटू, म्हणजे झाल जन्माच सार्थक पण मुलाना अमेरिकेतच मोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळायला लागल्या काहींनी तिथंच लग्न केली बरेचसे लग्नासाठी इडियात आले जेमतेम दोन आठवडे तेवढ्यात मुलगी पसत करून, मिळेल त्या हॉलमध्ये, जमेल तशी लग्न केली हौशी आवडीच कुणाला काही फारस वाटल नाही इडियन मुलीशी लग्न केलं, त्यात आम्ही सगळ भरून पावलो परक्या देशात एकाला दोघ झाले शिवाय इडियातली मुलगी आपल्या आईवडिलाच्या ओढीने इडियात येणारच त्याबरोबर आपला मुलगाही ज्यांच्या मुलांनी अमेरिकन बायका केल्या, ते आईवडील मात्र धास्तावले मुलगा आपल्याला भेटायला येईल की नाही? आपल्याला दुरावेल असं त्याना वाटायचं माझ्या एका मैत्रिणीला तर उभ वार लागल फाट्यासारखी झाली ती मी तिला म्हणाले, 'अमेरिकेतला मुलगा तुम्हाला विचारेल की नाही, हे एवढ कशाला लावून घेता? तुमचा मोठा मुलगा सून इथ आहेतच की' त्यावर ती म्हणाली, 'माला त्याने विचारल नाही तरी काही हरकत नाही हो, पण अमेरिकन मुली डायव्होर्स घेतात तसं झाल तर माझ्या मुलाच्या ससाराच काय?'

मुलाची लग्न झाल्यावर दोघानी नोकऱ्या धरल्या चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या त्याना पैसे जमवून काही परत आले पण बहुतेक परत गेले तशाच अडीअडचणी सोसून काही इडियात राहिलेच आपल्या शिक्षणाचा, आपल्या ज्ञानाचा आपल्या देशालाच उपयोग झाला पाहिजे या जिद्दीने ते खरे देशभक्त आपल्या देशासाठी आपण काही करू शकत नाही, ही रुखरुख मनात ठेवून बहुतेक अमेरिकेत राहिले त्यांना मुलबाळ झाली त्यांना सधी मिळत होती दिवसेदिवस जास्त पैसे मिळत होते त्याचा पाय अमेरिकेत गुतला ते अमेरिकेचे नागरिकही झाले त्याच ठीक हो त्याचं त्यानी काहीही कराव मुल शहाणी आहेत, त्याचं हित त्यानी बघितल त्याच्या आड आम्ही येणार नव्हतोच पण आता आम्हीच तिथं कायम राहायला याव, असा त्याचा आग्रह त्याच काय करायच?

खर म्हणजे आमच्या देशात आम्हाला काही कमी नव्हत सासरमाहेरचा केवढा तरी गोतावळा, कुणाकडे जाणयेण फारस जमायच नाही लग्नावऱ्हाडाच्या आडाने भेटी व्हायच्या आमच तर वधू-वर सूचक मडळ कलकत्ता, दिल्ली असे लाबून लाबून लोक यायचे मुलीचेच आईवडील नाही तर मुलाचे सुद्धा त्याच्या मुलाला चागली मुलगी हवीच की अमेरिकेतून, कॅनडातून मुल आली की, त्यांचे आईवडील आम्हाला कळवायचे त्यांची

सुद्धा लग्न जमली हो लोक मानायचे लग्नाला आवर्जून बोलवायचे आमच्या सस्था म्हणजे मोठमोठी कुटुबच ती ह्या सस्थानी आमची कधी सध्याछाया होऊ दिली नाही किती मारास भेटायची जीवाभावाची मैत्री व्हायची समाजासाठी काही करायची सधी मिळायची करमणूक तर भरपूर या सस्थाचं ऋण कधी फिटायच नाही हे सगळ सोडून अमेरिकेत कायम राहायला जायच कस?

तरीपण मुलाची खूप आठवण यायची विशेषत सणावारी एकटेपणा जाणवायचा आपण मुलापासून कायम असेच दूर राहणार का? हा विचार मनाला सतवायचा मग ते झुरळ तावडतोब झटकून टाकायच मनाला सागायच, मुल शरीराने दूर आहेत खरी पण मनाने जवळ आहेत आपल्या सुखाला जपताहेत याची साक्ष त्याच्या प्रत्येक पत्रातून मिळतेय् त्याना इडियाची ओढ आहे इडियातल्या नातलगाच प्रेम आहे इडियन सगीत, इडियन नाटक, इडियन शो पिसेस याच आकर्षण आहे इडियन पदार्थ आवडतात ती जिथ आहेत तिथ मजेत आहेत आणखी काय हव? मुल हवीत जवळ हवीत मनाचा हा हट्टाहास रोज कामावरून त्यान घरी याव, त्याच्या आवडीच त्याला करून घालाव रोजच जाऊ दे पण इंडियातच कुठं असती तर ४-६ महिन्यानी तरी भेटली असती पण अमेरिका केवढी दूर केवढा खर्च मुलाचे वडीलमात्र खंबीर मनाचे ते म्हणायचे, 'आपल्या मुलानी आपल्याला खूप खूप सुख दिलय् आपण अगदी सुखाच्या शिखरावर आहोत तिथून देवान आपल्याला उचलून नेलं तर आपल्या आत्म्याला लगेच शाती मिळेल आपल काही क्रियाकर्म करायची पण गरज नाही ' माझा जीव मात्र मुलाच्यात अडकायचा मुलाजवळ एका घरात राहणाऱ्या आईवडिलाचा मला मनातून हेवा वाटायचा पण अशा घरात काय स्थिती होती? आईवडिलाच्या घरातच मुलाचा ससार सुरू झालेला मुलाचा वाढता ससार जागा पुरायची नाही घरात २४ तास ठिय्या देऊन बसलेल्या म्हाताऱ्याची अडचण वाटायची वाढत्या महागाईला तोड देऊन घरातल्या सर्वांच्या गरजा पुरवण, दोन कमावत्या नवराबायकोला कठिण जायच काही म्हाताऱ्याना वाटायच, आम्ही आजवर चालवल तसच घर चालल पाहिजे काही घरात तरुणाना म्हाताऱ्या माणसाच्याविरुद्ध वागण्यात आनद वाटायचा खर म्हणजे परिस्थितीचा राग ते एकमेकावर काढायचे त्यामुळे घरातली सुखशाती नष्ट होतेय्, याच भान कुणालाच नाही अर्थात समजुतीने, त्यातल्या त्यात समाधानाने राहणारी कुटुब आहेत पण परिस्थितीचा काच जाणवतो त्यातून सुटका मिळावी अस वाटतच तरुण माणसानी स्वतत्रपणे संसार करण्याची इच्छा असतेच, पण म्हाताऱ्यानी जायच कुठं? याच्या उलट आमची मुल आम्हाला अमेरिकेत, त्यांच्या जवळ कायम राहायला बोलवत होती आपले आईवडील ही आपली जबाबदारी म्हातारपणी त्यांनी आपल्याजवळ राहावं ही त्याची मनापासूनची इच्छा वास्तविक ती दोघं स्वतत्रपणे संसार करीत होती तिथ आमच्या राहण्याने त्याच्या स्वातत्र्याला थोडा आळाही बसण्याची

शक्यता. आमची मुलं आम्हाला बोलवताहेत, हे आम्ही सगळ्यांना मोठ्या अभिमानाने सांगत होतो. आम्ही जात नाही याचं त्यांना नवल वाटलं होतं. पण जावे त्याच्या वंशा तेव्हाच कळे. आपला देश सोडून जाणं काय सोपं आहे? पण इथल्या परिस्थितीने कावलेली अशीच माझी एक मैत्रीण मला म्हणाली,

'एवढा मुलगा बोलावतोय् तर जा की अमेरिकेत राहायला. इथलं कसलं जिणं? जागेची अडचण. धड खायलाप्यायलाही मिळत नाही. सगळी धक्काबुक्की. सुखाने मुलाजवळ राहा. त्याच्या गाडीतून फिरा. आता म्हातारपणी किती दिवस तुम्ही एकटे राहणार?'

तिचं म्हणणं काय खोटं होतं? म्हातारपण आलेलं होतंच. हळूहळू शक्ती कमी होणार होती. परावलंबी व्हावं लागणार होतं. मग तरी मुलाकडे जाऊन राह्यचं न? खोडंमोडं होऊन गेलो तर, मुलगा-सून करतील आपलं. पण नातवंडं म्हणतील ही कोण आपल्याकडे निजून राह्यला आलीत? त्यापेक्षा आधी गेलो तर नातवंडाचं काही करता येईल. त्यांना आपलं प्रेम लागेल. आपली भाषा, आपला धर्म, आपली संस्कृती आपल्या वागण्यातून थोडीतरी त्यांना समजेल. त्यांच्या आईवडिलांना नसतो वेळ. मुलाचं करू, स्वयंपाकाची चार भांडी उतरून ठेवू. तेवढीच सुनेला मदत. 'आम्ही येणारच नाही' असं स्पष्ट कधी मुलांना लिहिलं नव्हतं खरं. पण 'आजारी आहोत', 'कुणाचं लग्न आहे' 'थंडी संपल्यावर येऊ' अशा बारा बयादी लावल्या होत्याच. आपला देश सोडून जाणं जिवावर आलं असलं तरी, मुलांची ओढ होती. शेवटी ग्रीन कार्ड काढायला तयार झालो. हो ना करता करता बरीच मंडळी तयार झाली.

ग्रीन कार्डसाठी थोडं का सव्यापसव्य करायला लागतं? पासपोर्ट तर हवाच पहिला. मग आमचे जन्माचे दाखले. ६०-६५ वर्षांपूर्वीचे आमचे जन्म. कुठं नि केव्हा कुणास ठाऊक? मग कुणाला सासूबाईचं बोलणं आठवलं. 'माझे आबा मालवणला नाझर होते, घरात सगळी दिवाळीची तयारी होती, नी नर्कचतुर्दशीच्या नहाण्याला हा हजर.' तर कुणी म्हणायचं, 'संक्रांतीचा तिळगुळ हो हा.' आजी सांगायची, 'प्रभादेवीच्या वाकड्या चाळीत आमचं बिऱ्हाड होतं. आषाढातली करकरीत अमावास्या. पाऊस धुमझोड. आवस तेवढी टळू दे म्हणून देव पाण्यात घालून बसले होते मी. पण तुला घाई झाली न यायची! गंपाची आई हुशार म्हणून पोरीची हातीपायी सुटका झाली. मग शांती केली.' एवढं जुनं रेकॉर्ड, त्यांना खरंच मिळालं की नाही कोण जाणे पण दाखले मात्र मिळाले. आता मॅरेज सर्टिफिकेटचा प्रश्न. लग्न रजिस्टर करण्याचा कायदा होता कुठं तेव्हा. त्यातून पळवाट. रजिस्ट्रारच्या ऑफिसात लग्नाची नोटीस द्यायची. मग महिन्याने, आपले जावई, भाचे, पुतणे कुणा दोघांच्या साक्षीने हे लुटूपुटीचं लग्न आणि त्याचा दाखला. मुलाच्या जन्माचा दाखला, त्याच्या स्पॉन्सॉरशीपचे पेपर्स त्याला जोडायचे. डॉक्टरच्या तपासण्या, एक्सरे. मग

फोटो उजवा कान सपूर्ण दिसेल असा सगळं घेऊन अमेरिकन कॉन्सुलेटमध्ये जायच यातलं काही चुकल तर पुन्हा फेऱ्या मुलगा अमेरिकेचा नागरिक, तेव्हा त्याच्या आईवडिलाना व्हिसा मात्र लगेच मिळतो (अमेरिकेच्या विमानतळावर पुन्हा फोटो, बोटाचे ठसे मग ग्रीन कार्ड घरपोच)

आमच्या मुलाची पहिली इंडियन अमेरिकन पिढी मग त्याचे अमुबाबा (अमेरिकेतल्या मुलाचे आईबाबा) म्हणजे शून्य पिढीच म्हणायची ही शून्य पिढीही अमेरिकेत जमायला लागली होती आपल्या सगळ्या मुलीना अमेरिकेत राहायला मिळाव म्हणून राणेंनी केव्हाच ग्रीन कार्ड घेऊन टाकलं होत वत्सलाबाईच्या इडियातल्या मुलांना अमेरिकेत जायची घाई होती आईच्या ग्रीन कार्डामुळे, त्याचा नबर लवकर लागणार होता मुलांच भलं व्हाव, म्हणून त्यांनी चटकन ग्रीन कार्ड मिळवल नलूताईंची एकुलती एक मुलगी ती अमेरिकेत इकडे नानासाहेब वरचेवर आजारी पडायचे त्यांना हॉस्पिटलमध्ये ठेवायला लागायच मुलगी धावतपळत यायची शेवटी ती म्हणाली, 'किती दिवस काकामामानी तुमच करायच? ती माझी जबाबदारी तुम्ही आता तिथच कायम राहायला या तिथ औषधपाणी पण चागल होईल ' नलूताईंना ते पटलं त्यांची पण तारांबळ व्हायची दुसरी माणस, स्वतःचे व्याप सांभाळून नेहमी नेहमी आपल किती करणार? आजारी माणसाला घरात एकट ठेवून जायच कस? न जाऊन जमणार कस? डॉक्टर, औषधं, बाजारहाट करायलाच हवा कधीकधी त्याना जेवायला पण वेळ मिळायचा नाही त्या निमूटपणे लेकीकडे कायम राहायला गेल्या वैद्याना दोन मुलगे दोघेही अमेरिकेत स्थायिक झाले वैद्यांची इंडियात इस्टेट घरदार वर्षा दीडवर्षाने अमेरिकेत जायचे, ४-६ महिने राहायचे काही वर्ष छान चालल मग त्याच हार्ट ट्रबल सुरू झाल ॲन्जियो प्लास्टी झाली इन्शुअरन्सशिवाय अमेरिकेत आजारीपण म्हणजे भलताच खर्च ग्रीन कार्डाबरोबर आरोग्यसेवा मिळते म्हणून तर मुलांचा ग्रीन [illegible] घ्या असा आग्रह असतो वैद्यानी घेतल मग ग्रीन कार्ड पेंडसे हिन्दुधर्म-सस्कृतीचे अभिमानी त्याचेही दोन मुलगे अमेरिकेत अमेरिकेतल्या आपल्या लोकाना, आपल्या सस्कृतीची माहिती करून द्यायची, हा त्यांचा ग्रीन कार्ड घेण्यामागे हेतू सत्यनारायण पूजा, गृहप्रवेश, मुंज, पचाहत्तरी, होमहवन सगळ करतात ते तिथ प्रभाताईच्या थोरल्याने अमेरिकन मुलीशी लग्न केलं धाकट्याची बायको इडियन त्याने बोलावल नी त्या लगेच गेल्या नाही म्हटल तरी अमेरिकन बायको, तेव्हा थोरला थोडा दुरावलेलाच ह्याच्याशी सुनेशी जवळीक होईल, नातवडाचं करायला मिळेल मोठाही मधूनमधून भेटेल फोन तरी करता येईल सगळ साधल त्यानी कुणाची काही कुणाची काही कारण होती पण मुले म्हणजे, सगळ्याना आपल्या मुलाची ओढ होती त्याची जवळीक हवी होती म्हणून म्हातारपणी आम्ही अमेरिकेत कायम राहायला गेलो

तशी शून्य पिढीतली बरीच माणसं अमेरिकेत राहायला आली होती, आपल्या

मुलांकडे पण आमची गाठभेट व्हायची कशी? अफाट अमेरिका, इंडियाच्या तिप्पट कुणी न्यूयॉर्कमध्ये दर कुणी कॅलिफोर्नियात, तीन हजार मैल दूर कुणी टेक्सासमध्ये तर कुणी मिडवेस्टमध्ये न्यूजर्सीत म्हटल तरी घर लावलाब एक दीड तासाच्या अतरावर ना गाडीची सोय ना बसची मुल आमची कावड घेऊन जातील तेव्हा मधूनमधून पार्ट्यांमध्ये समवयस्क भेटायचे, तेवढच पूर्वी मुल अपार्टमेंटमध्ये राह्यची तेव्हा वरखाली, आजूबाजूला माणसाची चाहूल तरी लागायची पण आता मोठमोठी घर, त्याभोवती मोठ आवार त्या पलीकडे तशीच घर ती सुद्धा दारखिडक्या चगडबद लावलेली संध्याकाळी घरात दिवे लुकलुकायला लागले, की त्या घरात वस्ती आहे अस समजायच नाहीतर बेल वाजवून शेजारी जायच, गप्पा मारायच्या, ही पद्धत आहे कुठ इथ? घरातली नवराबायको नोकरीवर जाणार, मुलं शाळेत त्यातल्यात्यात जी एकमेकाना दोघ होती ती भाग्यवान तसा सगळा एकान्तवासच कधी फ्रीज सुस्कारायचा, कधी बॉयलर गुडगुडायचा नवीन नवीन तर उचकायलाच व्हायचं या एकटेपणातून आमचा आम्हीच थोडा मार्ग काढला, कुणी बागकाम करायला लागले फुलाची, भाज्यांची रोप आणून लावली बागेच्या मशागतीत तासन्तास निघून जायचे रोपाला फुटलेला धुमारा, पान, कळी, फुलं-फळं मनाला उभारी द्यायची पुष्कळाना वाचायचा नाद रोज पेपरचा गठ्ठा यायचा शिवाय मोठमोठ्या लायब्रऱ्या अर्थात कुणी नेईल तेव्हा परस्वाधीनच ते पण गेल्यावर हवी तेवढी पुस्तक, घरी आणा, वाटलं तर लिहा सुद्धा दिवसाच्या चोवीस तासांपैकी साडेतेवीस तास बडबडणारा टी व्ही लहानांपासून थोरापर्यंत आवडतील असे कार्यक्रम इथल्या बातम्या, जगाची हालहवाल सागायच्या दुपारचे सोप ऑपेरा खर तर त्यातले लव्ह-सीन्स डोळ्यांत खुपायचेच पण घरबसल्या रोज दोन तास होणारी करमणूक तिला मुकून चालेल का? पण त्यातून अमेरिकन लोकांची घर पाह्यला मिळाली ती माणस, त्याचे स्वभाव, त्याची करमणूक, त्याचे प्रश्न बहुतेक प्रश्न फ्री-सेक्समुळे निर्माण झालेले, पण काही तरी समजलं व्यसनाधीनता, बलात्कार, कुमारीमातृत्व, निरपराध माणसावर आलेला खुनाचा आळ, या सगळ्यामधले बारकावे त्यात चित्रित करतात त्यामुळे 'उद्या काय होणार?' अशी उत्सुकता वाटते पात्र बदलतात, कुणी सोडून जातात, कुणी खरी-खोटी मरतात, पण हे शो ४०-५० वर्षे चालूच आहेत इग्रजी न समजणारी काही असतात, त्याना मात्र या करमणुकीला वंचित व्हाव लागत घरकाम, शिवणकाम, विणकाम यांत बायकांचा पुष्कळ वेळ जातो पाकसिद्धी ही तर आमचीच मिरासदारी इंडियात असताना वाटायच इतर देशातली माणसं काय बर जेवत असतील? अमेरिकेत आल्यावर, अमेरिकन, चायनीज, जपानीज, इटालियन, फ्रेंच, मेक्सिकन, थाय अशा कितीतरी रेस्टॉरंटमध्ये मुलाबरोबर गेले त्याचे पदार्थ चाखले, काही आवडले करून बघावेसे वाटले त्यांच्या पाककृतीची पुस्तकं लायब्ररीत हवी तेवढी ठिकठिकाणी पाकशास्त्राचे क्लाससुद्धा आपली इच्छा असली

शिकायची, तर ही खवैय्यी मुलं आवडीने ने-आण करतात आपली या पदार्थांना लागणारे जिन्नस ग्रोसरी स्टोअर्समध्ये तयार त्या पाककृतीबरहुकूम पदार्थ बनवला तर बिघडायची शक्यता नाहीच मुलांना-नातवडांना फार आवडतात ते पदार्थ सगळ्याच्या आवडीचे पदार्थ राधायचे, त्याच्या पानात वाढायचे, त्यानी ते आवडीने खायचे, यापेक्षा मोठा आनद तरी कुठला?

अमेरिकेत आमची खरी करमणूक म्हणजे आमची नातवडं शाळेत जाण्याजोगी होईपर्यंत, ती घरातच असतात आजोबाआजी त्यांना फार आवडतात कारण ते नसले तर या मुलांना बेबीसीटरकडे जावं लागत स्वत च्या घरात हुंदडायला, मधूनमधून काही खायला त्याना आवडत शिवाय आजी गोष्टी सागते इसापनीतीतल्या, बिरबलाच्या, रामायण महाभारतातल्या सुद्धा रामायणातल्या गोष्टी सागतासागता, सीतात्यागाची गोष्ट आली तेव्हा सात वर्षांचा माझा नातू म्हणतो, 'मग तिने त्याला सू का केल नाही?' अमेरिकेतल्या व्यक्तिस्वातत्र्याची चुणूक त्याने मला दाखवली इथल्या हवेमध्ये 'स्वातत्र्य' हा घटक ओतप्रोत भरलेला आहे याची जाणीव घटकोघटकी येते ५-६ वर्षांचा मुलगा, तुम्ही काही करायला सागा, तो म्हणणार, 'I will do it by my way' त्याच्यावर जास्त जबरदस्ती केलीत तर तो म्हणणार, 'I hate you,' 'I don't care' हे टी व्ही वर किंवा शाळेतल्या मुलाच्या तोंडून ऐकलेलं पण त्यांचं आवडतं वाक्य मुलं जसजशी मोठी होतात, तसतशी त्याच्या स्वत च्या स्वातंत्र्याची कल्पना मोठीच होत जाते इथल्या टीनएजर्सपुढे इथल्या अतिरथी, महारथींनी सुद्धा हात टेकलेत पण इंडियन्सची ही दुसरी पिढी फार भाग्यवान आहे मुख्य म्हणजे भरपूर पैसे कमवणारे व त्याच्यावर खूप प्रेम करणारे आईवडील मग मुलाना हवा तो खेळ- महाग मिन्टॅन्डो सुद्धा तऱ्हेतऱ्हेचे कपडे , स्कीइंग [illegible] स्पोर्ट त्याला मुलं विमानान लांबलांब जाणार फोन, गाडी, उत्तम युनिव्हर्सिटीत शिक्षण (आमच्या मुलाना एका शिक्षणाखेरीज आम्ही काहीच दिलं नाही, ते त्याच मजा करायच वय होतं, आम्ही कमी पडलो वाईट वाटत पण बैल गेल्यावर झोपा करण्यात काय अर्थ? असो) काही मुलांनी याचा चागलाच फायदा घेतलाय् त्याना बक्षिस, ॲवॉर्डस्, स्कॉलरशिप्स मिळाल्यात पण हाताची पाची बोटं काय सारखी असतात? व्यक्तिस्वातत्र्याबद्दल मात्र सर्वांच एक मत १४-१५ वर्षांची मुलं झाली की, त्याच बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंड सुरू, मग तासन् तास फोनाफोनी, मॉलमध्ये भटकणं, मुव्हीला जाणं मुलं अशी रात्रीची गेली की, आजीच्या डोक्यात नाही नाही ते विचार 'ही अमेरिकन मुलं, कोण, कुठची, कशी आहेत कुणास ठाऊक त्यांच्या नादाने आपला मुलगा सिग्रेट ओढेल का? ही मुलं ड्रग घेणारी असतील का? आपल्या मुलाला दीक्षा देतील की काय?' खर म्हणजे आम्ही आमची मुलं वाढवली, आता त्यांची मुलं त्यांनी वाढवावीत, हे आम्ही प्रत्यक्षात करत होतो पण तरी नातवडासाठी आमचं आतडं तुटत होतं काळजी

केल्याशिवाय राहावत नव्हतं आणखी जरा मोठी झाली की, त्याना डेटिंगला' जायचं असत मुखासुखी परवानगी देणारे क्वचितच बहुतेकाचा विरोध मुलगी असली तर जास्तच, मग बाचाबाची शेवटी मुलगी म्हणणार, 'This is my life ' यावर आईवडिलानी करायच तरी काय? आणखी विरोध केला तर, मुलगी घरातून निघून जायची 'धरल तर डसत, सोडल तर पळत ' शेवटी सोडायलाच लागतं अशा अर्ध्या कच्च्या वयाची मुल डेटिंगला गेली की आजोदा विशषत आजी हादरतेच तिच्या डोक्यात नाना किडे वळवळायला लागतात मुलगा असला म्हणून काय झाल? या लहान वयात सेक्सचा अनुभव घेणं वाईटच मुलीची तर आणखी भीती तिच्यावर कुणी बलात्कार करील का? तो तर कानावर हात ठेवील शिवाय कोण, कुठला माहीत नसताना, तिच त्याच्याशी लग्न तरी कस लावून द्यायच? आतापासून मुल सेक्सचा अनुभव घ्यायला लागली तर त्यांना AIDS तर होणार नाही? तो तर कधीच बरा न होणारा रोग' असल्या विचारांनी जीव खालवर व्हायला लागतो आमची जबाबदारी नाही खरी पण ती आमची लाडकी नातवडं, दुधावरची साय जीव व्याकुळ झाल्याशिवाय कसा राहील? कुंणाला अमेरिकन सुना, अमेरिकन जावई आले, पण ही लग्न टिकतील का? जरा व्यक्तिस्वातत्र्याला धक्का लागला की, ती म्हणणार, 'हे लग्न म्हणजे एक चूक होती, डायव्होर्स घेऊन ती दुरुस्त करायची मग पुन्हा लग्न कदाचित ती घोडचूक ठरली तर पुन्हा लग्न-डायव्होर्स लग्न-डायव्होर्स या चक्रातून जाण्यापेक्षा, सरळ लग्नाशिवाय एके ठिकाणी राहावं, जमेल तितके दिवस, नाही पटल तर दोघानी दोन दिशेला निघून जाव आमच्या लाडक्या नातवडाच असं काही होईल की काय? नकोरे नको देवा, अस काही बघण्यापूर्वी, माझे डोळे मिटव रे बाबा पण मी मेल्यावर जग बुडणार आहे थोडच आमच्या मुलांचं काय? त्यांना दु:ख होणारच त्यांची मुल त्यांना सुख देतील का?

पण हा दोन पिढ्यातला संघर्ष नवा थोडाच आहे? आमच्या बाबानी जेव्हा शेंडी-ऐवजी केस राखले, मिश्या काढल्या, तेव्हा 'धर्म बुडाला','सस्कृती बुडाली' म्हणून आजोबानी आकाशपाताळ एक केल पण झाल काय? धर्म राहिला सस्कृती राहिली गेल्या फक्त शेंड्या आमच्या भावांनी स्वत ची लग्न स्वत जमवली तेव्हा बाबाना वाटल लग्न म्हणजे जन्माच्या गाठी, याला काय समजणार? ह्याचा निर्णय चुकीचा ठरेल, त्याच आयुष्य दु खी होईल त्यानी ओरडाआरडा करून घर डोक्यावर घेतल नुसत त्या काळी वडील घरात आले की, दहशतीचच वातावरण असं झाल म्हणजे बापाच तोंड पूर्वेला तर मुलाच पश्चिमेला आईची त्रिशकू अवस्था भावाबहिणीत मोकळेपणा नाही घरातली माणस व येणारी सून याच्यात अढी पण मुलानी आपल्या मनाप्रमाणे लग्न केली परजातीत-परधर्मात सुद्धा त्याच्या आयुष्यात काही फरक पडला नाही जुन्या पिढीला वाटायच, ही नवी पिढी, समाजरूपी जगन्नाथाचा रथ फरफर ओढेल, तो आडवातिडवा जाईल,

खड्ड्यात पडेल, त्याला खीळ घातलीच पाहिजे पण रथ पुढे सरकतच राहिला सकच्छ की विकच्छ यावर काय थोडे वाद झाले? वर्तमानपत्र, मासिक यातून रंगले ते ज्याला जो आवडेल तो पोशाख जो तो करतोच न? आम्ही मात्र थोड शहाणपण शिकतो मुलाना धाक होता पण नव्या जगाशी त्याना सामना करायचा आहे, तेव्हा त्याचे त्यानी, काही बाबतीत तरी निर्णय घ्यावेत, इतपत तरी आमच्या मनाची तयारी झाली होती तीच आमची मुल आपली मुल वाढवताहेत न? मग माझ्या नातवडाची भविष्य वर्तवणारी मी कोण? आकाशपाताळ एक करणाऱ्या आजोबाची आक्रस्ताळी जात घर डोक्यावर घेणाऱ्या वडिलाची आतताई मुलगी त्याच आपल्या मुलांवर प्रेम नव्हत, अस मुळीच नाही पण वडिलाचा धाक नसेल, तर मुल वाह्यात होतील, ही त्याची प्रामाणिक समजूत आम्ही वडील, अनुभवी, मुलाचे खरे हितचितक हा अहगड इकडे मुलाना तर काही धार्मिक, सामाजिक बधन झुगारून द्यायची होती त्यामुळे सघर्ष पण हळूहळू जुनी पिढी, नव्या पिढीला समजून घ्यायला लागली मुल आपल्या मनासारख करणारच त्याना विरोध करून, त्याच्या आपल्यात अतराय निर्माण करण्यात काही हाशील नाही हेही समजून चुकल अमेरिकेत यायचा निर्णय त्याचा तो का चुकीचा होता?

आता त्यांची मुल, नुसता पिढीचाच फरक नाही सस्कृती वेगळी, वातावरण वेगळं व्यक्तिस्वातत्र्य हा अधिकार असलेल्या अमेरिकेत जन्मलेली, वाढणारी राष्ट्रीय ध्वज जाळला तरी तो व्यक्तिस्वातत्र्याचा आविष्कार असे मानणारे लोक आहेत इथं शाळेत बहुतेक अमेरिकन मुल, त्यांच्यासारखा हा वागला नाही, तर खड्यासारख त्याला बाजूला टाकतील की मग त्याला तस वागायच असत आईवडिलानी विरोधासाठी मान खाली केली की ज्वाला आणखी वरवर उफाळणार चोरूनमारून हव ते करणार विरोध झाला नाही की, अगदी मोकळेपणान वागतात खोटेपणा नाही चोरलिपी नाही इतकच काय स्वातत्र्याबरोबर जबाबदारी येते हेही समजत त्याना आईवडिलाच आपल्यावर प्रेम आहे, अशी खात्री पटते ते आपल्यासाठी केव्हाही उभे राहतील असा विश्वास वाटतो त्यामुळे त्याचाही आत्मविश्वास वाढतोच त्यानी पाश्चात्यांच्या सस्कृतीच अनुकरण केल तरी घरात इडियन परपरा चालूच असते घरातील पिढ्या गुण्यागोविदाने नादताहेत याचा ठसा त्याच्या मनावर उमटतोच साहजिकच कौटुबिक प्रेमाच्या कोळ्याच्या जाळ्यात अडकतात आजी त्याच्याशी मराठीतून बोलते सगळ समजत त्याना बोलायला धजत नसली तरी कधीतरी मराठीतून उत्तर येतच इडियात गेल्यावर भाषेची मुळीच पचायत पडत नाही कसा कुणास ठाऊक, पण इडियातल्या एखाद्या आजीच्या पायाशी वाकून नमस्कार करतात न सांगता तिन्हीसाजा, आजी देवापुढे निराजन लावून प्रार्थना करायला लागली की, एखादा आजीच्या सुरात सूर मिसळतो तर एखादा आजोबा बर्फावरून घसरतील म्हणून त्यांना हात देऊन गाडीत बसवतो एका १२ वर्षांच्या मुलाने पेपर टाकून पैसे कमावले त्यातले

पाच डॉलर्स आजोबांच्या हातावर ठेवले 'Keep it for you' अस म्हणून आजीला चालण होत नाही, म्हणून तिला बोटीत बसवून चार दिवस फिरवून आणणारा नातू मी अमेरिकेत पाहिला त्याला लग्न झाल्यावरही आजी आपल्याकडे राहावी असं वाटतं अशी ही चित्र बघितल्यावर माझ्या नातवंडाच्या भवितव्याचा घोर मी कशाला लावून घ्यायचा? सापसाप म्हणून दोरी बडवण्यासारखंच ते आणि १३ ते १८ वय म्हणजे आडनिडं मुलाच्या अगातल रक्त नुसत उसळत असत, काय करू नी काय नको असं होत त्याना पण एकदा का १८ संपलं की, त्याचे ताबूत थंडे पडतात ती कॉलेजमध्ये जातात तिथं त्याना खूप इंडियन मुलमुली भेटतात ती त्याच्यासारखीच दिसतात, तशीच वागतात जातपात हा शब्द त्याच्या कानावरून कधी गेलेला नसतोच हा उत्तर हिंदुस्थानी, हा दाक्षिणात्य, हा केरळी, हा बगाली, कुणी शिकवलाय् त्यांना इडियाचा भूगोल कोण ब्राह्मण, कोण शूद्र, कोण ख्रिश्चन, कोण मुस्लिम हाही विचार त्याच्या मनात येणार नाही ब्राऊन दिसतोय् म्हणजे तो इडियन अस ते समजतील एकमेकांना हस्तांदोलन करतील एकमेकांचे मित्र होतील, लग्नही होतील असा एक इडियन समाज अमेरिकेत तयार होईल मग मात्र अमेरिकेतली ही माझी नातवंडं, इंडियातल्या त्याच्या बरोबरीच्या मुलापेक्षा, खऱ्या अर्थानं इंडियन आहेत, अस तुम्हा सगळ्याना म्हणावंच लागेल, खरं न?

असा प्रकार होतो आहे, होणार आहे, हे खरं पण त्याबरोबरच मुलमुली अमेरिकन मुलामुलींशी लग्न करताहेत सेक्सला अवास्तव महत्त्वही देणार नाहीत मी जेव्हा, माझ्या अमेरिकन नाती कुमारी माता होतील की काय, ह्या विचाराने व्याकूळ झाले होते नं, तेव्हा कुणीतरी माझा पदर मागे खेचीत होत त्या वेळी मी माझ्याच तद्रीत आत वळून पाहिल, तर ती लीली होती आमच्या शेजारच्या चाळीत राहणारी, तिचं लग्न होत नव्हत रूपाने डावी शिवाय त्याची भरपाई करायला हुडा तरी हवा पण तिला वडीलच नव्हते हुडा कोण देणार? तिला होती एक आजी, एक भाऊ त्या तिघाच पोट जेमतेम भरेल इतपतच त्याची नोकरी लीलीच वय वाढत होत आणि मग एकाएकी तिच पोट वाढल 'माझ्या पोटात रोगाचा गोळा वाढतोय्' अस ती सगळ्याना सागायची एक दिवस पोलिसांनी तिला नि तिच्या आजीला पकडून नेलं त्याना तिच्या घराजवळच्या कचऱ्याच्या कुडीत, नुकतंच जन्मलेल-मारून टाकलेल मूल सापडलं त्याला एका फडक्यात गुंडाळलेलं होतं तो फडक्याचा तुकडा होता, लीलीच्या आजीच्या लुगड्याचा पोलिसांना ते लुगड तिच्या घराच्या झडतीत सापडल शेजारीपाजारी म्हणत होते, लीली पहाटे नळावर कपडे धूत होती त्या चादरी तिच्या घरासमोरच्या कठड्यावर वाळत होत्या त्यावर रक्ताचे डागही दिसत होते लीली 'वाईट चालीची ठरली', आणि तिची आजी 'कोवळ्या बाळाला नख लावणारी राक्षसीण' शक्य असतं तर आजीने लीलीलाच मारून टाकल असत आणि अशा थोड्या का मेल्या? कुणाला वडिलांनी गुरासारखं झोडपल, कुणी आड-विहीर जवळ केली आणि

चंदा? केवढी हुषार? वक्तृत्वात पहिलं बक्षीस मिळवलं होतं तिने तडफडून तडफडून तिचा कोळसा झाला या मुलीच्या साथीदाराची कुणालाच आठवण झाली नाही एखादा, त्याच वेळी मुंडावळ्या बांधून बोहोल्यावर उभा पण असेल एखादी दागिन्यांनी मढलेली रूपवती त्याला माळ घालीत असेल कुमारी मातांना आम्ही मुळी जगूच देत नाही आज तरी कुठं फारसा फरक पडलाय् अमेरिकन समाजाने कुमारी मातृत्व मान्य केलंय्, न करून कुणाला सांगतात? लाखावारी कुमारी माता कुणाला मिळणार आहे अनाघ्रात पुष्प? १३-१४ वर्षांच्याच काय ११ वर्षांच्या मुली गरोदर राहतात त्या स्वत:च लहान मूल त्यांना मुलं मग गर्भपात होतात पुष्कळसे क्वचित कुणी आपलं मूल कचऱ्याच्या कुंडीत किंवा चर्च-हॉस्पिटलच्या पायऱ्यांवर ठेवतातही पण ही मुलं घ्यायला कितीतरी दत्तक एजन्सीज एका पायावर तयार असतात कारण त्यांच्याकडे दत्तक घेणाऱ्यांचा क्यू लागलेला असतो दहा दहा हजार डॉलर्सच्या थैल्या घेऊन सातआठ वर्षे तिष्ठत असतात ते गर्भपात केला किंवा मूल दत्तक दिलं, तरी त्या कोवळ्या पोरीच्या आतड्याला पीळ पडतोच आपल्या रक्तामांसाचा गोळा, आपण देऊन टाकला, हा सल जन्मभर राहतोच मग मोठेपणी कुणी त्या मुलाचा शोध घ्यायला बघतात मुलांनाही मोठं झाल्यावर आपण दत्तक आहोत, हे समजतं त्यांनाही आपल्या जन्मदात्या आईची ओढ लागते तीही आपली आई शोधतात दत्तक आई-वडिलांनाही, लहानपणापासून आपलं म्हणून वाढवलेल्या मुलाची बेचैनी समजते मूल आपल्याला दुरावेल म्हणून तेही दु:खी होतात काही कुमारी माता स्वत:च मूल वाढवण्याचा निर्णय घेतात पण मुलाच्या खस्ता का थोड्या? दूध, औषधपाणी, कपडे, बदलणं, रात्रीची जाग्रण, शाळेचं शिक्षणही अर्धवट शाळेत जाणार कशी मुलाला टाकून? नोकरी तरी कसली मिळणार तिला? तिचं नि मुलाचं भागणार कसं? वेलफेअरवर राहायचं म्हणजे किती दिवस गरिबीत राहायचं? शिवाय त्याचा समाजावर बोजाच अशा मुलींसाठी अमेरिकेत केंद्र आहेत त्यांची मुलं सांभाळायची व्यवस्था करून, त्यांना काही शिकवायचं तरी सगळं अपुरं पडतं त्यांच्या आयुष्याची घडी, इतकं करूनही विस्कटतेच तरीपण, लग्न झाल्याशिवाय कौमार्यभंग होऊ द्यायचा नाही, अशा मुली इथं आहेत त्यांच्या म्हणण्याला मान देणारे त्यांचे बॉयफ्रेंडस् पण आहेत अशा वातावरणात आमची दुसरी पिढी वाढतेय् पहिली पिढी, विचारपूर्वक आपआपल्या पद्धतीने त्यांना वाढवतेय् या परिस्थितीतून मार्ग काढणं, कठीण जात आहे एवढं खरं

आमची मुलं इथं येऊन २०-२५ वर्षे झालीत पण ती आपल्या माणसांना विसरलेली नाहीत की आपल्या देशाला विसरलेली नाहीत इथल्या सर्व मुलामुलींना आपल्या आई-वडिलांनी आपल्याजवळ अमेरिकेत राहावं असंच वाटतं पण काहींच्या आई-वडिलांना ते शक्य नसतं, काहींना इथं राहणं मुळीच आवडत नाही त्यांच्या मुलांना, आपण आपल्या आई-वडिलांची 'संध्याछाया' केलीय् अशी रुखरुख वाटत असते कुणाचे आई-

वडील, बहिणभाऊ सगळी इथेच असतात, तरी त्यांना इंडियात जावस फार वाटतंच आम्ही शून्य पिढीची माणसं वर्षा दोन वर्षांनी इंडियात जातो, बरेच दिवस राहतो, म्हणून ही मुलं आमचा हेवा करतात इंडियातली घाण, गर्दी, गरिबी हे सगळं आपलं आणि त्याच्याकडे पाठ फिरवून आपण इथं आलोय, मजेत राहतोय् म्हणजे आपण काहीतरी अपराध केलाय् असं त्याना वाटतं इंडियातल्याही सर्वसाधारण सहृदय माणसांना गरिबीचा कळवळा येतोच, पण ते म्हणतात, 'आमच्या हातात काय आहे? आम्ही काय करणार?' ह्या अमेरिकेतल्या मंडळींनी त्यावर तोड काढलीय् त्यांनी 'महाराष्ट्र फौंडेशन' सारख्या संस्था काढल्यात इथूनच्या लोकांकडून पैसे जमवून इंडियातल्या सेवाभावी संस्थांना द्यायचे 'बाबा आमटे, अनूताई वाघ नि त्याचे असंख्य अनुयायी, जन्मभर गरिबासाठी झिजणारी माणस ' त्याना पैशाची निकड असतेच ते मिळवून द्यायचे स्वतःच्या मनाला टोचणारा काटा थोडा बोथट करायचा

आपली भाषा, आपली संस्कृती टिकवण्याचा त्याचा प्रयत्न चालू असतो गणपती, दिवाळी, संक्रात असे सण सर्व मिळून साजरे करतात ठिकठिकाणची महाराष्ट्र मंडळे, दर दोन वर्षांनी अधिवेशन दूरदूरची खूप मंडळी जमतात त्यात दुसऱ्या पिढीनेही सहभागी व्हावे यासाठी खास कार्यक्रम वेगवेगळ्या विषयावर चर्चासत्रं करमणुकीचे कार्यक्रम कुणाला गाण्याची आवड तर कुणाला नाचाची आपआपले छंद जोपासतात इथल्या परिस्थितीत ते कठीण जात तरी मराठी माणूस नाटकवेडा स्वतः नाटकं करतात नाटकातली पात्र एकमेकांपासून ५०-६० मैल दूरदूर राहतात शिवाय आठवड्याचे पाच दिवस ती नोकरीच्या घाण्याला जुंपलेली मग शनिवार-रविवार सहकुटुंब सहपरिवार एकेठिकाणी जमायच प्रॅक्टिस करायची या सर्वांचं जेवणखाणच काय पण भाडी पण घासावी लागतात आपल्या भाषेतलं नाटक बघायला मिळणार म्हणून प्रेक्षकही चागला प्रतिसाद देतात पण नाटकाचे प्रयोग होणार चारदोन त्यासाठी ही मंडळी हौसेने लष्करच्या भाकऱ्या भाजतात अलीबाबाच्या गुहेसाठी ५०-६० मुलंमुली वर्षभर झुजत होती

इंडियातली खूपच मंडळी हल्ली अमेरिकेत येतात कुणी सरकारी खर्चाने तर कुणी स्वतःच्या खर्चाने गायक, वादक, नर्तक, साहित्यिक, प्रवचनकार सगळे त्याची इकडून तिकडे ने-आण करण, त्याना आपल्या घरी ठेवून घेणं, त्याचे कार्यक्रम आखून त्याना पैसे मिळवून देण, या गोष्टी इथली माणस मोठ्या उत्साहाने करतात आपल्या देशातला माणूस न बहुतेक पाहुणे मंडळीही चागली समजस असतात आपल्याला एअरपोर्टवरून आणण्यासाठी, यजमानाचे २५ डॉलर्स खर्च झालेत, हे ते प्रत्यक्षच पाहतात आपुलकीन केलेल आदरातिथ्य त्याना भारावून टाकत कार्यक्रमानिमित्त पुष्कळ माणस भेटल्याचा आनद होतो खरेदीसाठी थोडे डॉलर्स मिळतात पण खाल्ल्या घरचे वासे मोजणारी माणसं जगात आहेतच की! मग ती म्हणतात हे कसले श्रीमंत? हे तर लाकडी घरात राहतात

हलकी व्हिस्की पितात अमेरिकेतले कराडोपती, सुप्रसिद्ध नटनट्या याची १५-२० बेडरूम्सची घरं, घरातच स्वीमिंगपूल, सोन्याचे नळ पण घराची बांधणी लाकडीच हे कदाचित त्याना माहीत नसेल, पण इथ प्रत्येकाकडे तऱ्हेतऱ्हेच्या उची मद्याचा बार तर त्यांनी नक्की पाहिला असेल मनात आल तर त्यांना आघोळही करता आली असती मद्याने कुणी आणखी तारे तोडत 'ही कसली माणस? उत्तम अन्न, किंमती वस्त्रं, शोभिवत निवारा यातच त्याना इतिकर्तव्यता वाटते आत्मकेंद्री एकलकोंडी' पण ज्या पुस्तकाच्या उद्घाटनासाठी हे महाराज आले होते, त्या पुस्तकात जगभरच्या लोकाच्या गोष्टी होत्या त्यांची जमवाजमव आत्मकेंद्रित माणूस करू शकेल का? आणि ह्य लेख जेव्हा मी पाठ्यपुस्तकात वाचला, तेव्हा मला कमालीचं दु:ख झालं आमची मुल जशी अमेरिकेत आहेत, तशी इंडियात पण आहेत त्याना एकमेकाविषयी वाटणार प्रेम, आपलेपणा या लेखाने कमी होणार नाही पण कोवळ्या वयाच्या नातवडांचं काय? ती एकमेकांची चुलत-मावस-आते-मामे भावंडं आहेत दूरचा पल्ला, खर्चाचे काम म्हणून त्याच्या एकमेकाच्या वर्षानुवर्षे भेटीगाठी होत नाहीत त्याच्यावर ह्या अशा लेखाचा परिणाम होणार? ती एकमेकाना दुरावणार, अस किल्मिष निर्माण करण बरोबर आहे का? इडियातल्या फारच थोड्या लोकाना अमेरिकेत यायला मिळतं त्यानी या दोन्ही देशांतल्या लोकामध्ये सेतू बाधला पाहिजे एकदा इदिरा गाधी म्हणाल्या होत्या, 'परदेशस्थ भारतीय हे आपल्या देशाचे राजदूत आहेत ' केवढा सन्मान केला होता त्यांनी परदेशात राहणाऱ्यांचा त्यांचं म्हणणं शभर टक्के खर कारण ह्या माणसावरून ते देशाची परीक्षा करणार इडियाबद्दल, अमेरिकन लोकाच्या फार विकृत कल्पना होत्या सगळे इडियन्स अडाणी, अशिक्षित, गरीब, अशी त्याची समजूत होती इडियन लोक सगळे देवभोळे इडियन माता अतिशय प्रेमळ पण मगर देवाला तृप्त करण्यासाठी त्या आपली छोटी बाळ नदीत सोडून देतात म्हणून २०व्या शतकाच्या आरभी जे इडियन्स इथं आले, त्यांना इथल्या लोकांनी खूपच त्रास दिला इडियन लोक अमेरिकन समाजाला भार होऊन राहतील, तेव्हा त्यांना अमेरिकेत प्रवेश देऊ नये असच त्याना वाटायचं पण आता तेच म्हणतात, 'इंडियन अशी एकच कम्युनिटी अमेरिकेत आहे की, जिच्यातला एकही माणूस वेलफेअरच्या पैशावर जगत नाही ते शिकलेले आहेत, हुशार आहेत' प्रेसिडेट बुश म्हणाले, 'मिळालेली सधी पकडण्यात ते तरबेज आहेत ' समृद्धीच जीवन मिळवण्यासाठी, यापूर्वीही इडियन लोक देशाबाहेर गेलेले आहेत सगळ्या जगभरची माणस तेच करतात त्यात त्याचा दोष काय? दहा लाख इडियन्स अमेरिकेत आहेत, असा अंदाज आहे ते इथ आलेत म्हणून इंडियातल्या तेवढ्या लोकांना रोजगार मिळाले इंडियात बुद्धिमानाचीही कमतरता नाही इडियाची प्रगती होतेच आहे मग ब्रेनड्रेनची तर मुळीच भीती नाही त्याच्यामुळे भारतातल्या परकीय चलनात वाढ झाली ते जगाच्या पाठीवर कुठेही गेले तरी त्याची पाळंमुळं इडियात खोलवर

रुजलेली आहेत तशी सगळ्यांचीच असतात अमेरिका हा तर अठरा पगड देशाचे राष्ट्र जगप्रसिद्ध माणूस आपल्या मूळ देशाच नाव अभिमानाने सांगतो तसंच त्यांना ओळखतात म्हणूनच अमेरिकेतल्या इडियन्सचे इडियाशी लागेबाधे राहणारच ते अधिक घट्ट करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे ते ज्यू लोक पाहा त्यांची पाचवी सहावी पिढी असेल अमेरिकेत पण त्याचे आपल्या देशाशी सबध घनिष्ठ ते अमेरिकेचे नागरिक आहेत पण इस्रायलचे पण नागरिक आहेत इस्रायलमधल्या ज्यू लोकानी, अमेरिकेतल्या आपल्या या श्रीमत बांधवाना, आपल्याशी अगदी जखडून ठेवलंय् त्यांचं सरकार पॅलेस्टाइन लोकांवर केवढे जुलूम करत त्याच सैन्य सुद्धा ते जुलूम करायला कचरत पण अमेरिकेत त्या लोकानी, इस्रायलसाठी, एवढी खंबीर लॉबी तयार केलीय् की, अमेरिका त्यांच्या विरुद्ध ब्र काढू शकत नाही आणि आम्ही पहिल्या पिढीतच तुम्ही वेगळे आम्ही वेगळे सुरू करायचं? त्याना स्वतःच्या कोषात गुरफटून राहणारे सुखासीन म्हणायचं? महाराष्ट्रातल्या अनेक सस्थाना, आजवर २,६०,००० डॉलर देणाऱ्या महाराष्ट्र फौडेशनची या इण्ट्रोव्हर्ट माणसाला कशी माहिती असणार? अधिकाधिक पैसे जमवण्यासाठी आमची मुलं जीवाचा आटापिटा करतात, तो त्याला कसा समजणार? इडियातल्या आमगरिबासाठी सतत कामात व्यग्र असलेली ही इण्ट्रोव्हर्ट माणस अमेरिकेत कायम राहायला येऊच शकणार नाहीत त्यासाठी स्टँपपेपरची गरजच नाही पण आपल्या मुलांना पाठवण्याची ते नक्की खटपट करतील मराठी मराठी म्हणून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालायच ही आमची रीतच आहे म्हणा

आमच्या शून्य पिढीतल्या लोकानाही इथ येऊन १०-१५ वर्षे झालीत प्रत्येक पार्टीत २-४ तरी समवयस्क भेटतातच न्यूजर्सीत बरेच आहेत तेव्हा आमच खास गेटटुगेदर करावं अशी एका मुलाने कल्पना काढली २-३ महिन्यानी एकदा आम्ही कोणाकडे तरी भेटतो त्या वेळी त्या घरची तरुण मंडळी बाहेर जातात मग आमचच राज्य जेवणखाण नी गप्पागोष्टी अँगदी मनमोकळ्या

आप्पासाहेब म्हणत होते,'मी इंडियात असताना क्लबमध्ये जात होतो टेनिस खेळत होतो इथ मी क्लबमध्ये जाणार कसा नी माझ्याशी खेळणार कोण? अगदी परस्वाधीन वाटत, वेळ जाता जात नाही मग मी बागकाम सुरू केलं फुलझाडं लावली टोमॅटो, मिरच्या, वांगी, बीन्स इतकंच काय दुधी नी कारली पण लावली खूप फळ येतात बागकामात तासचे तास कसे निघून जातात ते समजत नाही तुम्हा बायकाच बर घरकाम, स्वयपाक यात तुमचा वेळ जातो '

'ते तर आम्ही इंडियातही करत होतो पण तिथ आमची मंडळं होती मी तर कार्यकारणीत मग आज काय स्पर्धा, उद्या समारभ, हळदीकुकू कार्यक्रम तर दर आठवड्याला त्यासाठी ह्याला भेट, त्याला भेट मंगळवार, शुक्रवार आला की , मला

वाटत, आता बायका जमल्या असतील, कार्यक्रम सुरू झाला असेल किती बायका भेटायच्या खूप मजा यायची इथ एकटंच टी व्ही बघत बसाव लागत मी मधूनमधून इथल्या सीनियर सिटिझन्स क्लबमध्ये जाते तशा सगळ्या बायका चागल्या आहेत आपल्याला परक लेखत नाहीत पण त्याच्याशी काय बोलाव हेच समजत नाही अलीकडे माझ्या बऱ्याच ओळखी झाल्यात त्यामुळे तिथ जावस तरी वाटत '

'माझ्या पाच मुलाची पाच घर इकडून तिकडे अशी माझी सारखी फिरती चालू असते सगळीकडे नातवड प्रत्येकाच घर, गाड्या सगळ व्यवस्थित असे दिवस येतील अस स्वप्नात देखील वाटलं नव्हत खर म्हणजे म्हातारपणी नातवंडं खेळवीत, देवाचं नाव घेत बसायचं पण मला आपली आमच्या खांडके बिल्डिंगची आठवण येते एका घरात खुट्ट झाल की, सगळीकडे आवाज जायचा हेवेदावे, भाडण असायची पण वेळेला तीच माणसं उपयोगी पडायची तिथं कधी एकट वाटल नाही करमत नाही असं वाटलं नाही '

'आमचा शिवाजी पार्क कट्टा क्लब घरात पख्याचा वारा घेत बसण्यापेक्षा कट्ट्यावर मोकळ वाटायच मग चालू विषयांवर, राजकारणावर चर्चा १०-१२ मडळी अगदी नियमाने जमायचो बायका कधी कधी भजी, चकल्या, लाडू खायला आणायच्या छान वेळ जायचा सध्याकाळचा इथं मुळी संध्याकाळी बाहेर जायची पद्धतच नाही दिवसभर काय ते करून डिनरला घरी यायच कोणाशी बोलणार? कुणाशी चर्चा करणार? कुणाकडे जाणं तर आपल्या हातात नाहीच '

'आम्ही साताठ मंडळी मिळून धार्मिक वाचन करायचो साखरेची ज्ञानेश्वरी वाचली, टिळकाच गीतारहस्य वाचल, दासबोध वाचला वाचायच, चर्चा करायची एकदा वाचून काही समजत नाही तीन तीन वेळा वाचलं तेव्हा थोडस समजल भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे काय ते इथ मी पुस्तक आणलीत पण एकट्याने वाचायला मजा वाटत नाही थोडस वाचतो मला इथला टी व्ही मुळीच आवडत नाही बातम्या तेवढ्या ऐकतो एरव्ही मी तिथून गाण्याच्या टेप्स् आणल्यात, त्या ऐकत बसतो घरातली काही काही कामं करतो पण इडियाला जाऊन राहाव अस फार वाटत इथं कुणी नेल तरच जाता येतं '

'मला तर इथ राहणं मुळीच आवडत नाही मी नोकरीवाली बाई एकटी तशात माझी कामगारबायकाची मडळ, बालवाड्या सबंध दिवस माझा बाहेर मुलाच्या अभ्यासाची आबाळ नको म्हणून त्याला मी बोर्डिंगात ठेवलेला शाळा-कॉलेज त्यांचं तस झाल सुट्टीत सुद्धा कुठंकुठं ट्रीपला जायचा आम्ही मायलेक फारसे एकत्र राहिलोच नाही रिटायर्ड झाल्यावर मुलगा म्हणाला, 'जन्मभर आपण दूरच राह्यचं का? आता तू इथं ये विश्राती घे नातवंड साभाळ' म्हणून मी आले पण इथ मुलं साभाळायला चांगल्या बेबीसीटर्स मिळतात माझी गरजच आहे अस नाही पण इडियातल्या झोपडपट्टीतल्या लोकाना माझी गरज आहे स्वच्छता कशी राखायची, मुलांना औषधपाणी द्यायच,

त्याच्यासाठी बालवाड्या चालवायच्या कितीतरी कामं इथं मी ऐषारामात राहते पण माझं मन मला खात असत 'उद्योग नाही म्हणून, आजवर जे करायला वेळ मिळाला नाही, ते करते लोणची, मुराबे घालते तऱ्हतऱ्हेचे पदार्थ करते वीणकाम तर चालूच असत '

'आमची मुल अमेरिकेत आम्ही दोघंच घरी आमचे खूप नातलग कुणाचं दुखलंखुपल की आम्ही हजर, कुणाला दवाखान्यात ठेवल की, आम्ही बघणार कुणाला जेवण नेऊन दे कुणाजवळ जाऊन बस अस चालायच तशात आमचा रमी क्लब आठवड्याचे तीन दिवस खेळाचे खेळाच्या निमित्ताने, लोणावळा, महाबळेश्वर, नाशिक अस कुठकुठ जायच पण मग मी एकटी झाले मुलगा म्हणाला, इथ ये, चागली भरल्या घरात राहते आहेस पण एकट वाटत इडियात जावसं वाटल '

'कसल हो इथल जिणं? नुसत पोस्टात जायचं तर दुसऱ्यावर अवलबून पण इथं सोशल सिक्युरिटी मिळते त्या पैशानी मी माझ्या चारी मुलींकडे जाऊ शकतो वर्षा दोन वर्षांनी इडियातही जाऊ शकतो म्हणून केवळ मी इथ राहतो नाहीतर मी इडियातच राहिलो असतो '

शून्य पिढीतल्या माणसाना इडियात जाऊन राहावं असं वाटणाऱ्या कितीतरी गोष्टी आहेत इडियाचं पारडं त्यानी अगदी शिगोशिग भरलय् अमेरिकेच्या पारड्यात फार थोड्या गोष्टी आहेत पण त्याबरोबर त्यात एक तुळशीपत्र आहे आमच्या मुलाच्या प्रेमाचं त्यामुळे ते पारडं पार भुईला टेकलय् म्हणूनच आम्ही शून्य पिढीची माणसं आमच्या ग्रीन कार्डाला चिकटून बसलोय

❁❁❁

## ११

# अमेरिकेची पवित्र गाय

अमेरिकेतली म्हातारी माणसं वृद्धाश्रमात राहतात करतील काय? त्यांच्या मुलाच्या घरात त्यांना स्थानच नाही आणि तिथं जाण्यापूर्वी, फ्युनरल एजन्सीला पैसे देऊन आपल्या दफनाचीही व्यवस्था करून ठेवतात कुणी मेल की, वृद्धाश्रमाचे चालक पहिला फोन त्या एजन्सीला करतात मुलानाही फोन करतात पण मुलं कुठ लाबदूर असतील, त्यांना वेळेवर यायला मिळेल न मिळेल पण त्या एजन्सीचा माणूस मात्र तातडीने येतो मुलाच्या इच्छेप्रमाणे सगळा कार्यभाग उरकतो मुलं वेळ मिळेल तेव्हा येतात, आपल्या आईच्या थडग्यावर पुष्पगुच्छ ठेवतात की झाल काही वृद्ध आपल्या घरातच राहतात कुणाशी तरी बोलण्यासाठी आसुसलेले असतात तशा वर्तमानपत्रात जाहिराती पण देतात दारापुढे वर्तमानपत्र किंवा दुधाच्या बाटल्या बऱ्याच साठल्याच कुणाच्या तरी लक्षात येतं, पोलिसांना खबर देतो पोलिस दार उघडून आत जातात तर, एखादी वृद्धा मरून पडलेली

अमेरिकेतल्या वृद्धाबद्दल अशा कितीतरी गोष्टी मी ऐकलेल्या, वाचलेल्या सुद्धा त्यावरून अमेरिकेतले वृद्ध म्हणजे पालापाचोळा अशी माझी समजूत झालेली होती मी आणि माझ्यासारखी शून्य पिढीतील माणस, अमेरिकेत आली ती म्हातारपणीच आपल्या आईवडिलांनी म्हातारपणी आपल्याजवळच राहाव अस आमच्या मुलाना फार वाटत होत आम्हालाही म्हातारपणी मुलाचा आधार हवाच होता म्हणून आम्ही आमचा देश सोडून, इतक्या लांब परक्या देशात येऊन राहिलो मग अमेरिकेतली म्हातारी माणस आपल्या मुलांजवळ का राहात नाहीत? त्यांच मुलावर प्रेम नसत का? मुलाना आपल्या

आईवडिलाबद्दल कृतज्ञता, आपलेपणा वाटत नाही का? असे कितीतरी प्रश्न माझ्या मनात यायचे इथल्या वर्तमानपत्रात वृद्धाबद्दल कितीतरी वाचायला मिळायच शिवाय मी सीनियर सिटिझन्स क्लबमध्ये जाते, तिथ खूप माणसं भेटतात, अर्थात सगळी म्हातारीच मैत्रिणी मिळाल्या त्याच्याबद्दल काही काही समजल प्रत्यक्ष सीनियर सिटिझन्सच जीवन अनुभवायला मिळाल आणि मला समजून चुकल की, अमेरिकेतली म्हातारी माणसं ही अमेरिकेची 'पवित्र गाय' आहे

केसात एखाददुसरा रुपेरी केस दिसायला लागला, डोळ्याला चाळिशी लागली की, म्हातारपणाची चाहूल लागली अस आपल्याकडे वाटायला लागते निदान ५५-६०व्या वर्षी रिटायर्ड झाल्यावर, तुमच्यावर 'म्हातारा' असा छाप बसतो रस्त्यावरचे भाजीवाले 'आजी' म्हणायला लागतात, ते तुम्हाला आवडो न आवडो इथं सेवानिवृत्तीच वय ६५ तरी सुद्धा ते म्हातारे होतच नाहीत ते होतात सीनियर सिटिझन म्हातारपण, वृद्धापकाळ अह हे शब्द त्याच्या कोशातच नाहीत ती असतात त्याची Golden years मनाप्रमाणे वाटेल ते करण्याची

इडियात मुलगा एखाद्या सरकारी खात्यात किंवा कपनीत चिकटला की, गगेत घोड न्हालं आस्ते आस्ते तिथ त्याला बढती मिळणार, तिथूनच तो निवृत्त होणार तिथलंच पेन्शन त्याला मिळणार अमेरिकेत अशी एकच एक नोकरी करणारी माणस शोधूनच काढावी लागतील नोकरी मनासारखी नाही, तिथलं वातावरण आवडत नाहीं, घरापासून दूर आहे, जास्त पगाराची नोकरी मिळाली, अशा काही कारणांनी, इथली माणस नोकऱ्यांची धरसोड करीत असतात कधीकधी कामगाराच काम चागल नाही, कपनी डबघाईला आली म्हणून पुष्कळाना नोकरीतून अर्धचद्रही मिळतो काही दिवस बेकार राहाव लागतं कुणीकुणी Job Shopping करतात जिथ काम असेल तिथ रोजावारी करतात तिथं ओव्हरटाईम मिळतो पैसे दुप्पटतिप्पट मिळतात पण इन्शुरन्स, आरोग्यसेवा, पेन्शान याचे काही फायदे मिळत नाहीत काम सपलं की, याची नोकरी संपली दुसरीकडे काम हेरून ठेवल नाही तर घरी बसावं लागतं नोकरीसाठी या गावाहून त्या गावाला जाणं तर नेहमीचच अशा माणसाना कोण नि कसं पेन्शन देणार?

यावर उपाय म्हणून अमेरिकन सरकारने, १९३५ साली सोशल सिक्युरिटी कायदा केला आहे अमेरिकेच्या नागरिकांना, तसच कायम रहिवाशाना, सोशल सिक्युरिटी नबर मिळतो एकाच नावाची अनेक माणस असू शकतात पण हा नबर मात्र प्रत्येकाचा वेगळाच असतो या नबरामुळे प्रत्येकाला संरक्षण मिळत व कायदेशीर नोकरीही करता येते नोकरी करणाऱ्या प्रत्येकाने, आपल्या कमाईतून, आपल्या पगाराप्रमाणे सोशल सिक्युरिटी टॅक्स भरायचा त्याची कपनी तेवढेच पैसे त्यात घालते ते पैसे सोशल सिक्युरिटी फडात जमा होतात एक नोकरी सोडून दुसरी धरली तर ती कंपनीही तेच करते काही लोकांचा स्वतत्र

धदा असतो त्याना आयकराचा तक्ता भरताना असाच टॅक्स भरावा लागतो सेवानिवृत्त झाल्यावर प्रत्येकाने केलेल्या नोकरीची वर्षं व कमावलेले पैसे याच्या प्रमाणात, त्याला सोशल सिक्युरिटीचे पैसे मिळतात सेवानिवृत्त झालेल्या माणसांनी, देशाच्या उन्नतीसाठी खूप कष्ट केलेत, देशाच्या प्रगतीला त्याचा हातभार लागलाय्, तेव्हा त्याच निवृत्त जीवन सुखासमाधानात जाण आवश्यक आहे व ती जबाबदारी सगळ्या राष्ट्राची आहे, या जाणिवेतून या योजनेची आखणी झालेली आहे नोकरी करणारी माणस, सोशल सिक्युरिटी टॅक्स भरून, जो पैसा जमा होतो, त्यातून सेवानिवृत्ताना सोशल सिक्युरिटीचे पैसे मिळतात पण अमेरिकेत, असेही काही लोक आहेत–विशेषत बायका त्यानी कधी नोकरीच केली नाही त्याच्यासाठी दुसरी एक योजना आहे प्रत्येकाला स्वत चं काहीतरी उत्पन्न असाव, दर महिना ठरावीक रक्कम मिळावी हा त्या योजनेमागचा हेतू त्याला सोशल सिक्युरिटी इन्कम अस म्हणतात ६५ वर्षावरील लोकाना, तसेच आधळे-अपंग यांना पण हे इन्कम मिळते मध्यवर्ती सरकार आपल्या तिजोरीतून त्यासाठी पैसे देत राज्य सरकार आपल्या कुवतीप्रमाणे त्यात भर घालून, नंतर ते चेक्स, त्या माणसाना, दर महिन्याच्या पहिल्या तारखेला मिळतात

याशिवाय प्रत्येक माणूस आपल्या सेवानिवृत्त जीवनाची थोडीफार तरतूद करून ठेवतोच विमा उतरवणं, स्टॉक्स किंवा बॉन्ड्स्मध्ये पैसे गुतवणं, बँकेत पैसे ठेवण, घरं घेण पुष्कळ लोक घर, गाडी, बोट, विमान अस घेतात अर्थात कर्ज काढून ते कर्ज एव्हाना फिटलेल असत मुलं १८ वर्षांची झाली की, ती आईवडिलाच्या घरातून बाहेर जातात कुणी शिकतात, कुणी नोकरीधदा करतात पण ते स्वत च्या हिमतीवर आईवडिलांवर त्याची जबाबदारी नाही सून किंवा मुलगी नोकरी करते म्हणून तिची मुल साभाळायची, अशी प्रथा इथ नाही एकूण ६५ वर्षावरील माणसावर कसली जबाबदारी नसते इथली हवा, खाणपिण, सुबत्ता यामुळे प्रकृतीही ठणठणीत असते पैसाही गाठी असतो अशी सगळ्या बाजूनी अनुकूलता असलेली वर्षं–सोनेरी वर्षंच म्हणायची नाही का?

आजवर इच्छा होती पण करता आलं नाही, ते करायला आता पूर्ण मोकळीक मग कुणी कॉलेजात जाऊन आपल्या आवडीच्या विषयात पदवी मिळवतात कुणाला एखादं साहस करायची इच्छा असते आजवर धीर झालेला नसतो आता अगोवर बेतल तरी हरकत नाही कुणाला वाद्याची आवड तर कुणाला सुतारकामाची–बागकामाची घराच्या बेसमेंटमध्ये छोटस वर्कशॉप सुबक वस्तू बनवायच्या घराच्या आवारात फुलझाड, भाजीपाला लावायचा प्रवासाची तर सर्वांना विलक्षण आवड प्रवासी कंपन्याबरोबर जायच पैसेवाले मोटर होम घेतात ते त्याच 'Home away from home' असत त्यात सगळ्या सोईसुविधा त्यात बसून सगळ्या अमेरिकेभर फिरायचं, नातलगाना-मित्राना भेटायच ठिकठिकाणी प्रेक्षणीय स्थळ, ऐतिहासिक वास्तू, म्युझिअम्स ती बघायची

समुद्रकिनारी भटकायच गेम्स बघायचे २-४ वर्षे असा प्रवास करून कुठ कायम राहायचं ते ठरवायच पुष्कळाना फ्लोरिडा आवडत तिथली हवा गरम ना थंडी ना बर्फ फ्लोरिडा म्हणजे पेन्शनर्स पॅरॅडाइझ् पेन्शनर्ससाठी घर, अपार्टमेंट्स बाधण्याचा धदा तिथं तेजीत त्यांना दिवसभर गुतवून ठेवण्याचे अनेक वर्ग-मानसशास्त्राचे, डान्सिंगचे, फुलं करण्याचे, वेगवेगळ्या भाषाचे शिवाय करमणुकीसाठी, तरण-तलाव, सिनेमागृह, नृत्यालय, गेम्स ही मडळी उन्हाळ्यात काही दिवस आपल्या मुलांकडे जातात, तर हिवाळ्यात, त्याची मुल सुट्टी घऊन त्याच्याकडे येऊन राहतात मयामीलाही वृद्धाश्रम पुष्कळ तिथल्या सर्व वसाहतीची देखभाल तेच करतात पोलिसही त्यातलेच पण काहींना आपल राहात गाव सोडून दुसरीकडे राहण आवडत नाही मग ती आपल्या गावात आपल्या घरातच राहतात या वयात नवराबायको दोघ असणं, हे मोठ भाग्य पण पुरुषापेक्षा बायकाची आयुष्यमर्यादा जास्त त्यामुळे पुष्कळजणी एकएकट्याच राहतात

पुष्कळाची मोठमोठी घर असतात त्या घरांची स्वच्छता, आजूबाजूच्या आवाराची देखभाल वयोपाडी त्याना जमत नाही म्हणून ते घर विकून ते कान्डोमिनिथ घेतात ते लहानशा घरासारखच असतं आजूबाजूला थोडी जागा असते आणि तिथ झाडपान लावण्याचं, स्वच्छता राखण्याच काम करायला माणूस असतो कुणी अपार्टमेंट घेतात पण त्याची भाडी फार महाग सर्वानाच ते परवडत नाही त्याना दरमहिना बेताचेच पैसे मिळतात सरकारी मदतीने अपार्टमेन्ट्स् बाधून घ्यायची व ती सीनियर सिटिझन्सना कमी किंमतीत किंवा कमी भाड्याने द्यायची असे प्रयत्न चालू असतात ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालणाऱ्या एखाद्या कंपनीकडून अशी अपार्टमेन्ट्स् बांधून घेण्याची खटपट गावोगावच्या नगरपालिका करतात तरीपण बेघर वृद्ध अमेरिकेत खूप आहेत

या वयात ब्लडप्रेशर, मधुमेह, संधिवात अशा वृद्धांच्या तक्रारी सुरू होतात त्यासाठी सरकारने त्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून दिलीय् सोशल सिक्युरिटी मिळणाऱ्या प्रत्येकाला मेडिकेअरचं कार्ड मिळतं डॉक्टराची भेट, तपासण्या, औषध या कार्डामुळे मिळतात १९६० पासून सरकारने आरोग्यविषयक इन्शुरन्स योजनाही सुरू केली आहे त्यासाठी वार्षिक थोडासा विम्याचा हप्ता भरावा लागतो काही लोकाचे हप्ते सरकार भरतं यामुळे हॉस्पिटलमध्ये राह्यची वेळ आल्यास थोडेच पैसे द्यावे लागतात अतिदक्षता विभागात राहव लागल तरी ओषध, उपकरणं या इन्शुरन्समुळे मिळू शकतात एक्स-रे, ड्रेसिंग, कृत्रिम अवयव, डोळे, चाकांची खुर्ची, ऑक्सिजन सिलेंडर याचाही त्यात समावेश आहे इतकंच काय हॉस्पिटलमधे जाण्यासाठी लागणाऱ्या अँब्युलन्सचे पैसेही मिळतात मध्यवर्ती सरकारच्या मदतीने राज्य सरकार हे कार्यक्रम पार पाडतात

मध्यवर्ती व राज्य सरकाराप्रमाणे कौटीसुद्धा वृद्धासाठी बऱ्याच गोष्टी करते त्याचा मुख्य कार्यक्रम म्हणजे फूड-स्टॅम्प्स्चा या योजनेचा बहुतेक खर्च, अमेरिकेच शेतकी खात

करत पण कार्यवाही कौंटी ऑफिसतर्फे होते कमी उत्पन्न असलेल्या ६५ वर्षांवरील लोकाना हे स्टॅम्प्स् मिळतात, व ते कोणत्याही सुपर मार्केटमध्ये नोटाप्रमाणे चालतात

देशातल्या वृद्धांना अशा सुविधा देण्याच्या सरकारच्या प्रयत्नाना, देशातल्या इतर संस्था, व्यक्ती यानीही प्रतिसाद दिलेला दिसतो बस कपन्या, सकाळ-सध्याकाळचे गर्दीचे दोन तास सोडून, मधल्या वेळी या लोकाना निम्म्या किंमतीत प्रवास करण्याची सवलत देतात काही समाजसेवक, वृद्धाकडून, हस्तव्यवसायाची काम करवून घेऊन, ती विकून वृद्धाना पैसे मिळवून देतात बेकरीमध्ये, डिपार्टमेंट स्टोअरमध्ये एखादा दिवस त्याचा त्या दिवशी त्याना १० टक्के सूट केस कापण्याच्या दुकानात अशीच सवलत लॉस ॲंजिलिसच्या एका फिश मार्केटवर पाटी 'बुधवार-सीनियर सिटिझन्सचा दिवस-१० टक्के सूट ' सिनेमा थिएटरमध्ये अर्धं तिकीट, चष्मे १०-१५ टक्के सूट एक लॉड्रीवाली या लोकाना एक कप कॉफी द्यायची चर्चमध्ये त्याच्यासाठी व्याख्यान मग माफक दरात लच ठिकठिकाणी भाषांचे, शिवणाचे, हस्तव्यवसायाचे, पाकशास्त्राचे क्लासेस असतात त्यात त्यांना सवलत हॉटेल भाड, मोटार भाड यातही सवलत

सीनियर सिटिझन्सच्या दोन मोठ्या असोसिएशन्स आहेत एक 'ग्रे पॅन्थर्स' व दुसरी 'अमेरिकन असोसिएशन ऑफ रिटायर्ड पर्सन्स ' सेवानिवृत्ती म्हणजे गरिबी असच या सस्थांच म्हणण वार्षिक आठ हजार डॉलर्सपेक्षा कमी उत्पन्न असलेले लोक इथ गरीब समजले जातात वृद्धांपैकी चार लक्ष लोक गरीब रेषेच्या खालच्या पातळीवरचे आहेत या लोकांच्या हक्काची जपणूक करून त्यांना, जास्तीत जास्त सवलती मिळवून देण्याचा, ह्या सस्था सतत प्रयत्न करीत असतात १९८० च्या कालगणनेनुसार म्हाताऱ्याची सख्या, अमेरिकेच्या एकूण लोकसख्येच्या ११ टक्के आहे येत्या २० वर्षांत ती १२ टक्के होईल २०२० साली २० टक्के होईल अशा वृद्धाच्या वाढत्या सख्येमुळे त्याच्या मतांवरच, निवडणुकीत कोणाला जय मिळेल हे ठरवल जाईल मग हीच मंडळी कायदे लिहितील, कराची आकारणी करतील, किमती व मजुरी याचा समतोल कसा राखावा, हे ठरवतील असा आशावाद वृद्धासाठी काम करणाऱ्या या सस्थाचे प्रतिनिधी व्यक्त करतात

वृद्धाच जीवन जास्तीत जास्त सुखाचं व्हाव म्हणून झटणाऱ्या सस्था, शिवाय मध्यवर्ती सरकार, राज्य सरकार, नगरपालिका याची आर्थिक मदत, आसरा, आरोग्य ह्यासाठी सहाय्य, इतरांचाही मदतीचा हात तरीही गरिबी ही वृद्धाची समस्या आहेच त्यापेक्षा बिकट समस्या म्हणजे त्याच्या एकाकीपणाची

यावर उपाय म्हणजे वृद्धाश्रम घरात एकट राहण्यापेक्षा तिथ चारचैघात राहण बर म्हणून पुष्कळसे लोक तिथं जाऊन राहतात स्वत च स्वत सर्व करू शकणारे तिथ त्याच्यासाठी कुकिंग, हस्तव्यवसाय, वाढदिवसाच्या पार्ट्या, चर्चमधली सर्मन्स, बिंगो असे कार्यक्रम दिवसभर चालू असताल गंमत म्हणजे आजूबाजूचे धट्टेकट्टे वृद्ध, आपणहून तिथ

काम करतात पण वृद्धाश्रमाचे नियम पाळून राहणं काहींना आवडत नाही मग ते घरीच राहतात त्यांच्यासाठी प्रत्येक गावात सीनियर सेन्टर्स असतात तिथही फिटनेसचे क्लासेस, भाषांचे वर्ग असतात कुणी पत्ते खेळतात आमच्या गावागावात सीनियर सिटिझन्स क्लब आहेत नगरपालिकेकडून काही अनुदान मिळत १२५-१५० माणस जमतात बहुतेक बायकाच ३०-३५ पुरुष फक्त महिन्यातून दोन मीटिंग्ज मीटिंग सपल्यावर लंच मग लकी नबर, बिगो खेळायचा थँक्सगिव्हिंग, खिसमस, मदर डे अशी ५-६ साग्रसंगीत डिनर्स असतात म्युझिक असत स्त्री-पुरुष डान्स करतात पण फारच थोडे या डिनर्सना मेयरसारखे लोकप्रतिनिधी येतात सीनिअर्सची संबंध ठेवायला त्याना चांगली सधी आणि क्लबलाही काही सोयी सवलती मिळवायला बर उन्हाळ्यात पिकनिक्स्, बारबेक् मधून मधून सहली, कॅसिनो गावी खेळायला जायचं पुष्कळजण आपआपल्या गाडीने येतात गाडी नसणाऱ्यासाठी दोन व्हॅन्स कुणी देणगी म्हणून दिलेल्या आहेत ही व्हॅन सर्व्हिस आठवड्याचे पाच दिवस ग्रोसरी, शॉपिंग आणि मुख्य म्हणजे डॉक्टरकडे जाण्यासाठी क्लबची फी, लंच, व्हॅन सगळ्यासाठी नाममात्र पैसे घेतात त्याचीही सक्ती नाही पण इथ कुणाला फुकट काही नको असत क्लबमध्ये मी एकटीच इडियन आहे पण पहिल्या दिवशी मेयरने मला हात धरून खुर्चीवर नेऊन बसवल माझ्या इग्रजीची स्तुती केली आणि म्हणाला, 'तुला कसली गरज पडली तर माझ्याकडे जरूर ये ' अमेरिकन मडळी मनमोकळी व बोलघेवडी त्यामुळे मला तिथं खूप मैत्रिणी मिळाल्यात त्याच्या सहवासात माझा वेळ चांगला जातो

सिल्व्हेस्टा ८५ वर्षांची तिच्या नवऱ्याजवळ पैसाअडका भरपूर म्हणून दोन बेडरूम्सच तिच कान्डोनियम पण गेल्या वर्षी तिचा नवरा वारला तरी ती स्वत ची समजूत करून घेते, 'Still I got him for a long time.' डोळ्यांत पाणी येत तिच्या मुलानातवडाबरोबर कधी-कधी ८-१५ दिवस कुठंकुठं जाते तिची मुल तिला एक दिवसाआड फोन करतात पण जमेल तितकं दिवस तिला एकटं राहायचंय् .

बाराबारा नि क्लारा ह्या बहिणी बहिणी बाराबाराने कधी लग्नच केल नाही ती शिक्षिका क्लराला एक मुलगा व दोन मुली नवरा होता तेव्हा नातवडांच बेबीसीटिंग करायची घर खूप मोठ विकलं तिन ते आता दोघी बहिणींनी मिळून एक लहानस कान्डोनियम घेतलय् मधून मधून क्लाराच्या मुलाकडे जातात २-३ दिवस कधी त्याच्याबरोबर डिनरला जातात पण स्वतंत्र राहायला आवडत

हेलनच खूप मोठ घर नवरा व त्याच्या मागोमाग तिचा मुलगाही ॲक्सिडेंटमध्ये गेला घराच्या वरच्या मजल्यावर तिची नात राहते ही खाली राहते ग्रोसरी आणते स्वत च्चं स्वत करून खाते माझ्याजवळ तिने छोटे कोन मागितले होते पण तिला देता आले नाहीत ती हार्टॲटॅकने गेली

जेसिकाला मुल नाहीत ती व तिचा नवरा तिच्या भावाच्या घरात राहतात भाऊ

तिच्यापेक्षा मोठा तो हार्टअॅटॅक येऊन गेला मी तिला Sorry म्हटलं तिचे डोळे रडून रडून सुजलेले मला म्हणाली, 'आम्ही सहा भावंड होतो आता तीनच राहिलो, पण I like you ' तिने एकदम विषय बदलला ती म्हणत होती, 'माझ्या भावाच दु:ख मी कशी विसरणार? पण आता क्लबमध्ये आलेय, तेव्हा तो विषय नको ' ती झेकोस्लोव्हाकियाची कधी ती तिथ गेलीच नाही तरी ती म्हणते,'तिथ आमचे खूप नातलग आहेत माझी आई त्याच्या खूप गोष्टी सागायची, मला पण तिथ जावस वाटत, त्या लोकाना भेटावसं वाटत '

डोरोथीचा नवरा दिवसभर बियर पितो तिला बियरचा तिटकारा आणि नवऱ्याचाही ती बेबीसीटिंग करून पैसे कमावते तिचा अविवाहित मुलगा तिच्याकडेच राहतो मात्र ती त्याच्याकडून बोर्डिंगलॉजिगचे ठोकून पैसे घेते त्याला बागकाम करायला लावते

मेरीचा नवरा मेल्यावर तिने एका फ्रेंच माणसाशी लग्न केल आता तोही गेला पण दोन्ही नवऱ्याकडून तिला चांगला पैसा मिळालाय् तेव्हा चागली थाटात राहते दुसरी मेरी स्वित्झर्लंडची (अमेरिकन नावाच दुर्भिक्षच आमच्या क्लबमध्ये कितीतरी मेऱ्या, ४-५ जेसिका, हेलन बापाचंच नाव मुलाला ठेवायचं मग त्याला जॉन ज्युनिअर किंवा फार तर जॅक म्हणायच आमच्या शेजारी आजोबा, बाप, मुलगा सगळे क्लिफ) तिला एक अपंग मुलगी आहे ती कुणाकडे तरी संध्याकाळच डिनर करून पैसे मिळवते मला म्हणते,'मला इंडियात खूप श्रीमत नवरा बघून दे '

आयडा तर ८४ वर्षांची स्वत च लहानसं घर सगळं स्वत करते इतकंच काय उन्हाळ्यात भाजीपाला पण गेल्या वर्षापर्यंत गाडी चालवायची आता तिचे डोळे तिला फसवतात तिच्या ब्रेसलेटला कितीतरी बिल्ले अडकवलेले त्यावर तिच्या मुलाचे, डॉक्टराचे, हॉस्पिटलचे, फ्युनरल एजन्सीचे फोन नबर तिची मुलगी कधी कधी आपल्या दोन मुलाना घेऊन तिच्याकडे येते आल्या दिवशी सगळ्यांच एके ठिकाणी डिनर होत दुसऱ्या दिवशी आयडा बेसमेंटमधल्या स्टोव्हवर आपल्यासाठी काही शिजवते तिची मुलगी वरच्या स्वयपाकघरात तिच्यासाठी व मुलांसाठी काय करायच ते करते पुन्हा जायच्या दिवशी एके ठिकाणी जेवतात सपल माहेरपण

ही तिसरी मेरी तिची मूर्तीच तिची परिस्थिती सागते महागाई कशी व किती वाढलेय् ह्यावरच ती सारखी बोलत असते तिचे आईवडील जर्मनीच्या कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पमध्ये मरण पावले ती आपल्या मोठ्या बहिणीबरोबर अमेरिकेत आली इंग्लिश शिकली आणि कारकुनाचं काम करायला लागली मग तिच लग्न झाल तिच्या नवऱ्याच औषधाचं लहानसं दुकान होतं ही हिशोब ठेवायची गिऱ्हाइकाना औषधं द्यायची फारसे पैसे नव्हते पण स्वस्ताई होती नवरा खूप दिवस आजारी पडून मेला सगळी पुजी सपली आता तिला सोशल सिक्युरिटीचे ४८५ डॉलर मिळतात पण त्यातले १६८ डॉलर

अपार्टमेंटचं भाडं तिची मुलगी गावाच्या दुसऱ्या टोकाला राहते पण तिला मुलीवर भार घालून राहायच नाही

बॉब व रोझ हे जोडप आमच्या क्लबमध्ये नेहमी येतं बॉबला अर्धांगाचा झटका येऊन गेलेला त्याला धड चालता येत नाही की बोलता येत नाही एका हातात काठी, दुसऱ्या हाताने कशाला तरी धरून तो व्हॅनमध्ये चढतो अगदी नाइलाज झाला, तरच रोझ त्याला मदत करते बोलायची त्याला भारी हौस मग रोझ म्हणते, 'He wants to talk to you' त्याच बोलणं धड समजत नाही मग बहाणा करून त्याच्याशी बोलायचं रोझ म्हणते, 'आम्ही स्वस्ताईत घर घेतलेल आता घराच्या किंमती वाढल्यात, वाढत्या किंमतीवर आम्हांला टॅक्स आकारतात हा काय न्याय आहे?'

नॅन्सी ९२ वर्षांची १०० वर्षांपूर्वीच तिच जुन मोठ घर तिला फक्त दोन मुलीच त्यातली एक गेलीच तिने आपल्या घरात काही गरीब लोकाना राहायला जागा दिलीय् ती मंडळी तिच घर, आजूबाजूची जागा स्वच्छ ठेवतात शिवाय तिला थोडथोड भाड देतात टॅक्स भरायला तिला मदत होते माझ मी सगळं करू शकते मग कशाला मुलीला त्रास द्यायचा? अस तिच म्हणण

दुसऱ्या रोझची खूप मोठी जागा लहान घरात ती राहते बाकीची जागा तिने मुलीला दिली मुलीने आपल घर विकून आईच्या जागेत घर बाधलय् ८२ वर्षांची बाई अजून गाडी चालवते क्लबच्या सगळ्या सहलींना जाते

ल्युसी स्कॉटलडची तिची आई तिथ आहे तिला आईला भेटायला जायची खूप इच्छा आहे पण पैसे फार लागतात तिची मोठी मुलगी यंदा कॉलेजला गेली धाकटी १५ वर्षांची मोठी स्वतःच स्वत सगळं बघायला लागली की, माझे पैसे वाचतील मग मी माझ्या आईला व इतर नातलगांना भेटायला जाईन अस ती म्हणते

अशा या माझ्या अमेरिकन मैत्रिणी वेगवेगळ्या देशातल्या आहेत प्रत्येकीची परिस्थिती वेगळी आहे पण स्वतत्र राहण्याबद्दल सर्वांचं एकमत नाहीतरी त्यांची मुल १८ वर्षांनतर घराबाहेर पडलेली असतात शिक्षणासाठी किवा नोकरीसाठी सणावारी दोनचार दिवस आईवडिलाकडे जायच उन्हाळ्याची सुट्टी तीन महिने असते पण त्या वेळी जॉब करून पैसे कमवायचे पुढे लग्न, मुलंबाळ, त्याचं विश्व वेगळच होतं वर्षा दोन वर्षांनी कधीतरी दोन आठवड्याची रजा घेऊन आईवडिलांकडे जायच कधी आईवडील त्याच्याकडे तसेच येतात पण एका घरात राहणं होतच नाही अमेरिकेत एकत्र कुटुंबपद्धती कधी नव्हतीच स्वतंत्र अपार्टमेंट घेतल्याशिवाय मुलमुली लग्नच करीत नाहीत मग रिटायर्ड झाल्यावर आईवडिलांनी त्याच्याजवळ राहण्याचा प्रश्नच कुठे? शिवाय सरकार त्याची काळजी घेतच एके ठिकाणी राहायच म्हणजे एकमेकांशी मिळतजुळतं घ्यायचं आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा सकोच करून घ्यायचा तो का आणि कशासाठी? मुलांना आईवडिलानी

आपल्या संसारात डोकावलेलं आवडत नाहीच पण म्हाताऱ्यानाही नातवडांची गडबड, दगामस्ती सहन होत नाही शिवाय, 'माझं मी सर्व करू शकते, मी कुणावर अवलबून नाही ' ही फार मोठी अभिमानाची गोष्ट मानली जाते इंडियातसुद्धा मुलाच लग्न झाल्यावर, त्याच स्वतत्र बिऱ्हाड, दूर राहून चागले सबध ठेवण्याची प्रथा सुरू झालेली आहेच पण सून नोकरी करते, नातवडाची आबाळ होते म्हटल्यावर आम्ही आमच्या व्यक्तिमत्त्वाची मुरडशेग करायला तयार होतो आम्ही भावनाना महत्त्व देतो तर अमेरिकन व्यवहाराला त्यांच्याकडे व्यक्तिस्वातंत्र्याला पर्याय नाहीच याचा परिणाम म्हणून एका मुलाची आई, आघोळीला टबमध्ये उतरली आणि तिला हार्ट ॲटॅक आला तिने मारलेल्या हाका कुणाला ऐकू येणार? टबमध्ये मरून पडलेल्या आईला पाहून मुलाच्या मनाला फार मोठा धक्का बसला अद्यापही ती गोष्ट त्याच्या मनाला लागून राहिलेली आहे 'आम्ही मुलासाठी करकर करतो आणि म्हातारपणी, आता आम्ही थकलो, मुलांनी आमच सगळ करायच' असं म्हणून मुलावर सर्वस्वी अवलबून राहतो व म्हातारपणाला फार लवकर शरण जातो

काही झालं तरी दीर्घ जीवनाचा शरीरावर परिणाम होतोच वयाच्या खुणा शरीरावर उमटतातच कांती निस्तेज होते, अंगावर सुरकुत्या पडतात, टक्कल पडतं, चापल्य कमी होत, कान, डोळे याची शक्ती कमी होते, विसराळूपणा येतो तोल जातो, त्यामुळे कुणी पडतात, त्याची हाड मोडतात २५ टक्के पूर्ववत होतात पण बाकीच्याना व्हीलचेअरवर बसून व्यवहार करावे लागतात अशा परावलबी लोकासाठी, अमेरिकन सरकारने एक पचवार्षिक योजना आखलीय् वृद्धाची शारीरिक, मानसिक व भावनात्मक दुखणी असतात, त्यावर उपचार करायचे, त्याना वाणसामान आणून द्यायच, त्याच्या घराची व्यवस्था बघायची, त्यांना आंघोळ करायला, जेवायला मदत करायची, त्याना घरपोच जेवण द्यायच त्याला Meals on wheels असे म्हणतात यासाठी समाजसेवक व परिचारिका याची संख्या खूपच वाढायला लागली आहे मिड्लसेक्स कौटीच्या, वृद्धासाठी काम करणाऱ्या ऑफिसमधील सोशलवर्कर जीन मून म्हणते, 'हे काम अफाटच आहे इतके टेलिफोन येतात की, कुठं धावाव ते समजतच नाही ' कुणीही प्रेसिडेंट आला तरी, त्याने ही योजना चालू ठेवली पाहिजे, असा कायदा कॉंग्रेसने करावा, अशी वृद्धाच्या सघटनाची मागणी आहे

वृद्धांसाठी एवढ सरकार करत, त्याला विरोध करणारे लेख अमेरिकेच्या वर्तमानपत्रात नेहमी येतात वृद्धांसाठी एवढा खर्च करण योग्य नाही, अस त्याचं म्हणण काही वृद्ध तर चांगले श्रीमत असतात अमेरिकेत बालमृत्यूच प्रमाण इतकं आहे की, जगात अमेरिकेचा २० वा नबर लाखो लोक बेघर आहेत अनाथ मुलाची समस्या आहेच शिक्षणाचा दर्जा खालावतोय् या सर्वांसाठी पैसे खर्च करणं जास्त अगत्याच आहे शिवाय

सतत वाढणाऱ्या या वृद्धांच्या संख्येला तोंड द्यायची अमेरिकेची तयारी आहे का? १९३५ साली सोशल सिक्युरिटीचा कायदा झाला, तेव्हा नोकरी करणाऱ्याकडून वसूल झालेल्या टॅक्समधून सेवानिवृत्ताना सोशल सिक्युरिटी द्यायची व्यवस्था ठरलेली १९४५साली, एका सेवानिवृत्तामागे ४१ ७ लोक टॅक्स भरणारे होते आता ते प्रमाण ३ २ वर आलयं दिवसेंदिवस ते कमीच होतय् मग रिटायर्ड लोकाना सोशल सिक्युरिटी द्यायला पैसे कुठून आणणार? आज आम्ही टॅक्स भरतोय, पण रिटायर्ड झाल्यावर आम्हाला सोशल सिक्युरिटी मिळेल की नाही, या शंकेने लोक हवालदिल झालेत पण वृद्धांच्या सवलती कमी करण्याची कुणाचीच प्राज्ञा नाही वाढत्या संख्येचा हा ग्रुप हटकून मतदान करणारा ज्या पवित्र गाईंच्या पाठिंब्यावर निवडून यायच, त्याना कोण दुखवणार? राजकारणी तर त्यांना, स्वस्त घर देऊ, फुकट आरोग्य सेवा देऊ, कर वाढवणार नाही, अशी आश्वासन देतात

अमेरिकेत National Institute of Aging या नावाची एक सस्था आहे त्या सस्थेत म्हातारपणावर संशोधन चालत निम्म्यापेक्षा जास्त कॉलेजमध्ये 'Gerontology' हा विषय घेऊन पदवी मिळवता येते म्हातारपणाचा सखोल अभ्यास केलेले डॉ बिरेन म्हणतात, 'म्हातारपण ही नैसर्गिक प्रक्रिया आहे खरी पण ती सथपणे व्हावी असे आमचे प्रयत्न चालू आहेत काही लोक अकाली म्हातारे होतात, त्यांना काहीना काही दुखणी होतात तर $\frac{1}{4}$ लोक असे आहेत की, त्याना म्हातारपणाचा स्पर्शसुद्धा होत नाही त्याची आजूबाजूच्या गोष्टीत रस घेण्याची कक्षा वाढते, ते आणखी समृद्ध होतात म्हातारपणावर मुख्य औषध म्हणजे व्यायाम व करमणूक शरीर कधी झिजत नाही, ते गजत, म्हणून वृद्धानी व्यायाम करायचा मनालाही नव्या नव्या गोष्टींत रस घ्यायला लावायच अमेरिकेत म्हातारपणात, समाधानाने कस जगाव हे सागणार स्थिर अस तत्त्वज्ञान नाही, याची इथल्या पुष्कळ तज्ज्ञाना जाणीव आहे एकाग्रतेने ध्यानधारणा करण्याचाही ते वृद्धाना सल्ला देतात

वाढत्या वयाच्या शारीरिक समस्या बऱ्या करण्यात डॉक्टरांनीही पुष्कळ यश मिळवलय् पुष्कळशा वृद्धाना खचल्यासारख वाटतं पण ते एकाकी असतात दुसरा काही उद्योग नसल्याने कसली तरी, काही तरी सतत काळजी करत बसतात कुटुबातली माणसं जर त्याच्या प्रेमाने-मायेने वागली तर ही स्थिती नष्ट होऊ शकते १९७२ सालापर्यंत, ५० टक्के लोकांना आपल्याला ब्लडप्रेशर आहे हे माहितपण नव्हत आता त्यामुळे हार्टअॅटॅक येतो, स्ट्रोक येतो हे बहुतेकांना ठाऊक झालय तेव्हा ते चेक करून त्यावर औषध घेतात त्यामुळे या रोगानी मरणाऱ्याची संख्या घटलीय मधुमेहाने मरणाऱ्याची सख्या ३१ टक्के कमी झालीय्, तर न्युमोनियाने मरणाऱ्याची ५३ टक्के कमी झालीय् स्क्रीनिंगमुळे कॅन्सर झाल्याच सुरुवातीलाच समजतं त्यामुळे तोही बरा होतो म्हातारी माणस तर वरचेवर तपासण्या करून घेतात, डॉक्टर सांगतील तो आहार घेतात, रोज व्यायाम करतात त्यामुळे ८५ वर्षांवरील वृद्धांच्या सख्येत जलद वाढ होतेय् तरीपण काहीजण दोन तीन डॉक्टराची

औषध घेतात, अयोग्य उपचार करतात, कुणी पडतात, कुणाला अर्धांगाचा झटका येतो, सधिवात-होतो, मनोरुग्ण होतातच त्याच्यासाठी हॉस्पिटल्समध्ये खास डिझाईन केलेले वॉर्डस् उघडलेत हॉस्पिटल्समधल्या १/३ खाटा वृद्धानी आडवल्यात

डेव्हिड ८७ वर्षाचा तर ॲना ८५ वर्षांची ६१ वर्षे लग्नाला झालेली सुखाने आपल्या घरात राहात होती ती घर स्वच्छ ठेवायची, स्वयपाक करायची सगळ दोघाच करायची पण तिला अर्धांगाचा झटका आला तिची शक्ती गेली आठवण नष्ट झाली तिला काही करवेना नवऱ्याला तर हार्टट्रबल आता ते एका सेन्टरमधल्या एका खोलीत राहतात डेव्हिडच तिची काळजी घेतो.

सेवानिवृत्त लोकाची जन्मभर काळजी घेणाऱ्या एजन्सी आहेत पण त्याची प्रवेश फी २६,००० ते २,५०,००० डॉलर च्या दरम्यान शिवाय दरमहिन्याचा खर्च शिवाय हातभर प्रतीक्षा यादी हे बघून लोकाची छाती दडपते हॉस्पिटलमध्ये राहण्याचा खर्चही खूपच आणि सर्व पैसे सरकारकडून मिळत नाहीत त्यासाठी कुणी इन्शुरन्स काढतात ते लोकही ठरावीक रक्कम देतात

वय झाल की लोक परावलबी होतातच आयुष्य वाढत पण जोम नसतो स्वतःच स्वतःच करण्याची जिद्द असली तरी आता कुणाची तरी मदत हवीच असते अशी लोक नर्सिंग होममध्ये राहतात तिथे नशिबानेच जागा मिळते शिवाय वर्षाला ४०,००० डॉलरपेक्षा जास्त खर्च ही महाग मोलाची सेवा सर्वांना कशी परवडणार? आपल्या आईवडिलांना नर्सिंग होममध्ये ठेवण, मुलांना अपराध्यासारख वाटत नाइलाजाने ठेवाव लागतही त्यांनी ख्रिसमसला, थँक्सगिव्हिंगला घरी यावं अस वाटत कधीकधी ही वृद्ध मडळी घरी जाण्याच्या परिस्थितीत नसतात मग त्याची मुलं ढसाढसा रडतात, असं एक इडियन सोशल वर्कर मला सागत होती

आपल्या आईवडिलाची अशी स्थिती झाली की, मुलं त्याना आपल्या घरी आणून ठेवतात. आमच्या शेजारच्या रोझची आई फ्लॉरिडाला स्वतत्र अपार्टमेंटमध्ये राहायची ९२ वर्षांच्या मेरीची दोन्ही डोळ्याची मोतीबिंदूची ऑपरेशन झाली रोझचा स्वतःचा धदा त्यातून वेळ काढून ती आईला भेटायला जायची तेही तिला कठीण व्हायला लागल आईला एकट ठेवणही जीवावर आल तिची कशीबशी समजूत घालून तिने तिला आपल्या घरी आणल पण मेरीला दुखणखुपण काही नाही ती जिन्याची चढउतार करते, स्वतःची लॉन्ड्री करते ब्रेकफास्ट, लंच करून घेते स्टोव्ह मात्र पेटवत नाही ती म्हणते, 'मला चार मुल झाली त्यातली एकटी रोझ जगली तरीपण मला पाच नातवडं (रोझच्या दोन दत्तक मुली आहेत) व ११ पतवंड आहेत म्हणजे मी भाग्यवानच नाही का? आता गॉड मला बोलवेल तेव्हा मी जाईन '

वृद्धाच्या समस्या पण पुष्कळ ऐकू येत नाही मग मन खचत मेन्दूच्या पेशी मरतात,

त्यामुळे आठवण राहात नाही, त्याचा गोंधळ उडतो न्युरोनिया किंवा मूत्राशयाच्या मार्गात, जंतूंची बाधा झाली की, ही माणसं एकदम गोंधळून जातात डायबिटिसमुळे अशी बाधा होते म्हातारी माणस खूप औषध घेतात त्याचाही असा परिणाम होतो अर्धांगाचा झटका आल्याने किवा मूत्राशयात काही बिघाड झाला तर मलमूत्रावर ताबा राहात नाही अमेरिकेत २,००,००० वृद्ध पडतात हृदय रोग, हाडं ठिसूळ होणं किंवा खूपशी औषधं घेणं त्यामुळे शरीरावरचा ताबा जातो अशी माणस एकेकटी राहिली तर त्याच्या साठी lifetone, lifeline यासारखी वैद्यकीय तातडीची सेवा आहे काही शहरांत पोलिसाची Phone - In सर्व्हिस आहे वृद्धाच्या गळ्यात एक यत्र अडकवलेलं असतं त्याच बटण दाबल की, पोलिसांना खबर मिळते

म्हाताऱ्या आईवडिलाना घरी आणून त्याचं पालक होणं, हे मूलं वाढवण्यापेक्षा वेगळच आहे म्हातारपणामुळे त्याच्या ज्या गोष्टी हरवल्यात, त्याच्याशी मुकाबला करायला त्याना मदत करायची असते बारबाराने गेली काही वर्षे आपल्या आईची काळजी घेतली, आता सासूची घेतेय् तिला भीती वाटते, आता मीच आजारी पडेन का? मग माझ कोण करील?

कारमेन ब्राऊनची आई ॲलीस गली १३ वर्षे तिच्याकडे आहे ७६ वर्षांच्या या बाईला मूत्राशयाचा रोग आहे आठवड्यातून तीन दिवस तिला डायलिसिससाठी हॉस्पिटलमध्ये न्याव लागतं कारमेन नोकरी करते त्यामुळे एक हेल्थव्हिजिटर एक दिवसआड येते शिवाय Meals on wheels ची मदत तिला रात्रीही धड झोप लागत नाही आई केव्हा हाक मारील हा धसका

पुष्कळांना स्वतःची मुल असतात ससार, नोकरी सगळं सांभाळून आपल्या आईवडिलाच करणं जड़च जातं शिवाय काहींना स्टोव्ह पेटवला तर विझवायची आठवण राहात नाही काही चाकांच्या खुर्चीवरच अल्झमायझर रोग झालेल्याना, आपला नातू कुठला नि मुलगा कुठला हे समजत नाही खायला विसरतात, बाथरूममध्ये जाऊन काय करायच तेच समजत नाही पार्किन्सनचे रोगी, त्यांना उचलायला दोन तीन माणस लागतात या लोकांना घरात एकटं ठेवायच कसं नी नोकरीवर जायच कसं? यांच्या साठी डे-केअर सेन्टर्स ठिकठिकाणी निघालीत मुल लहान असताना, ऑफिसमध्ये जाताना, त्याना बेबी-सीटरकडे सोडत असत तस आता आईवडिलसाठी करायच काही सेन्टर्सची व्हॅन सेवा असते काही चर्चच्या बेसमेटमध्ये अशी सेन्टर्स आहेत तिथ चागल जेवण मिळतं थोडा व्यायाम करायला लावतात नर्स येऊन त्याची तपासणी करते त्याच्यासारखी माणसं तिथ असल्याने, त्याच्या मनालाही उभारी येते नर्सिंगहोममध्ये दिवसाचे ७५ डॉलर घेतात खासगी नर्स आठ तासाचे १५० ते २०० डॉलर घेते 'या सेन्टर्सना दिवसाचे तीन डॉलर द्यावे लागतात अमेरिकेत अशी १५०० सेन्टर्स ६००० वृद्धाची काळजी घेतात आणखी

सेन्टर्सही निघताहेत काही म्हातारी माणसं, आपल्या मुलांपासून दूर गावी राहतात त्यांच्यासाठी Aging Network Service आहे हे लोक म्हाताऱ्यांच्या गरजा शोधून काढतात कुणाला जाण्यायेण्याची सोय हवी असते, कुणाला घरी किंवा बिल भरायला मदत हवी असते कुणाला डे-केअर सेन्टरमध्ये जायच असत, कुणाला वाणसामान किंवा लाँड्री करून हवी असते त्यासाठी दर तासाला पैसे चार्ज करतात १९८६ साली एक पहाणी झाली त्यावरून अमेरिकेतल्या निम्म्या लोकाना आपल्या वृद्ध नातलगाची काळजी घ्यावी लागते आणखी पाच वर्षांत, आणखी २० टक्के लोकांचा त्यात समावेश होईल अस आढळून आल मुलं १८ वर्षांची झाली की, त्याची जबाबदारी सपते पण म्हाताऱ्या नातलगांची जबाबदारी त्याहीपेक्षा जास्त वर्षे त्यांना घ्यावी लागणार आहे, अशी चिन्हं दिसताहेत

कारण अमेरिकेत शभरी ओलांडलेली २५,००० माणसं आहेत वृद्धाचा या देशाने कधी उपयोगच करून घेतला नाही त्यामुळे त्या पवित्र गायी भाकडच होत गेल्या जपानमधले वृद्ध काहीना काही काम करीत असतात त्याना काम देणाऱ्या कपन्याना सरकारी अनुदान मिळत इडियातले वृद्ध विशेषत स्त्रिया नाइलाज होईपर्यंत घरात काम करीत असतात आपल्या मुलाना म्हाताऱ्या आजीआजोबाजवळ ठेवून तिथली मुलंमुली, निर्धास्तपणे नोकरीवर जातात जीवाचा कलिजा, परक्या बेबीसीटरजवळ ठेवून आलेय् असा त्यांचा जीव टांगणीला लागत नाही प्राचीन भारतीय वाङ्मयातही शतायुषीपणाच स्तोत्र ठायीठायी गायिलेलं दिसत ऋषिमुनींनाही शंभर वर्षे जगून आपल्या मुलांचा-नाडवडांचा फुललेला ससार बघाव अस वाटायच पण ते तरतरीत असायचे त्याच ज्ञानार्जन-विद्यार्जन चालूच असायच त्याची तपश्चर्या, त्यांनी केलेली लोकसेवा याचं तर हे फळ नव्हत? असेलही कारण आता अमेरिकेतले डॉक्टर सगळ्याना सागताहेत, 'मेडिटेशन करा म्हणजे दीर्घायू व्हाल ' भीष्मपितामह तर जख्ख म्हातारे आणि ते भारतीय युद्धाचे सेनापती कसा एवढा जोम त्यांच्या अंगात? त्याच्या तपाचरणामुळे? त्यांच्या मनोनिग्रहामुळे? सामान्य माणसाच्या १०० वर्षांच्या आयुष्याची चार आश्रमात विभागणी केलेली गृहस्थाश्रमातील सगळी कर्तव्ये सपली की, वनात जायच - लोकसेवा करायला अगदी जरुरीपुरत मुलाकडून घ्यायचं अस ते विरागी वार्धक्य त्यात अनुभवांची परिपूर्णता होती लहानमोठे व्यवहार अलिप्ततेने जोखण्याचा समतोलपणा होता मग तर सर्वसंग परित्याग आता कुठलं आलय् असं वार्धक्य? शक्ती कमी होते काम करवत नाही शरीराला क्लेश होतात जिणं परस्वाधीन होतं - 'शतायुषी भव' हा शाप वाटावा इतक इंडियातही वृद्धाना मानाने-प्रेमाने वागवतात पण अशी स्थिती झाली की, वृद्ध देवाच्या बोलावण्याची वाटच पाहत असतात मेरीसारखेच मुलांना आपले आईवडील काय नको असतात? पण त्याचे हाल पण बघवत नाहीत ते वृद्ध तर 'देवा सोडव रे बाबा' असा

मनातल्या मनात जपच करत असतात

अमेरिकेने आपल्या सीनियर सिटिझन्सना 'पवित्र गाय' म्हणण्याइतपत सोयीसुविधा दिल्या पण म्हातारपणाने त्यावर मात केलीच आयुर्मर्यादा वाढली पण त्यांची स्थिती काय झाली? शभरावा वाढदिवस साजरा केलेल्याची बातमी वर्तमानपत्रात कधीमधी येते ही माणस बरेच दिवस काही कामधदा करत होती, त्याची स्मरणशक्ती चागली आहे वाढदिवसाला आलेल्यांना त्यानी ओळखल पण अशी माणसं किती? ७५ नतरही सामाजिक, राजकीय क्षेत्रातही काम करणारी काही माणस आहेत शो बिझिनेसमध्ये आहेत पण एकदर लोकांच्या मानाने अगदी नगण्य बहुतेक गलितगात्रच कुणी आपल्या मुलानातवडावर अवलबून, तर कुणी स्वतंत्रपणे राहणे अशक्य झाल्याने, वर्षानुवर्षे नर्सिंग होममध्ये पडून कुणाचा तर अगदीच लोळागोळा कुणी व्हीलचेअरवर, तर कुणाला कसली जाणीवच नाही मुलगी त्याचा आवडीचा पदार्थ खाऊ घालते, त्यांना आवडणार म्युझिक लावते, पण कशाच काही नाही देशातल्या हॉस्पिटलसमधल्या १/३ खाटावर आडवे झालेले काय धडधाकट आहेत? कॅटस्कॅन, अल्ट्रासाऊंड ईत्यादी आधुनिक यत्रानी त्याची तपासणी होते, वेगवेगळे लाइफ सपोर्ट लावून त्याना जगवतात खाता येत नाही म्हणून घशात नळ्या खुपसतात क्लारानी साराची ८६ वर्षांची आत्या डेफनी अशीच शेवटी त्या नळ्या काढून टाकून तिला सुखाने मरू द्या अशी त्यानी डॉक्टराना विनंती केली डॉक्टर म्हणाले, 'आम्ही माणस जगवतो पदवी घेताना आम्ही तशी शपथच घेतलीय उपासमार करून आम्ही कुणाला मारणार नाही ' त्या दोघींनी खटपटलटपट करून कोर्टाची परवानगी आणली तर हॉस्पिटलची आडकाठी तिथं अशा गोष्टी करतच नाहीत मग त्यानी तिला दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये हलवल, तेव्हा त्या म्हातारीची सुटका झाली अशी दुखणाईत कितीतरी डॉक्टर तरी काय करणार? त्यानी असं काही केलं तर, एखादा तिरशिंगराव डॉक्टरावर केस करणार केस करणाऱ्याला लाखो डॉलर्स नुकसानभरपाई मिळवून द्यायला वकीलमडळी तयार मग डॉक्टरचा मलप्रॅक्टिस इन्शुरन्स वाढतो त्याबरोबर आरोग्यसेवेचा खर्च वाढतो व तो सामान्य माणसाच्या बेकाडी बसतो

अशी वस्तुस्थिती असली तरी , माणसाची आयुर्मर्यादा १२० वर्षांची असताना, फारच थोडी माणस तेवढा पल्ला गाठतात असं का? या प्रश्नाच उत्तर अद्याप शास्त्रज्ञाना मिळालेलं नाही त्याची फोड करण्यासाठी १०० शास्त्रज्ञ, त्या कामाला जुडलेत त्याची अशील एकट्या अमेरिकेत आजच दोन कोटी पंचावन्न लाख आहेत २०३० साली तो आकडा सहा कोटी सत्तर लाखावर जाईल आम्हाला आयुष्याची नुसती वर्षे वाढवायची नाहीत, तर त्या वर्षांमध्ये जोम उत्पन्न करायचाय् Life to years, not years to life असे ते म्हणतात तारुण्याचा फवारा कुठतरी आहे, अशी आख्यायिका ती ज्युॲन पॉन्स डी लिऑनने ऐकलेली १५१२ साली स्पेनच्या राजासाठी तो फवारा शोधून काढायला तो

निघाला दरबारी माणसाशी इरीशिरी करून भटकभटक भटकला शेवटी पोचला फ्लॉरिडात तेही चागल झाल म्हणा फर्नांडिस महाराजाची, सोनेरी वर्षे तिथं मजेत गेली पण तो झरा-तारुण्याचा, तो मात्र त्याला मिळाला नाहीच आता शास्त्रज्ञ म्हणतात, 'तो तुझ आहे तुझपाशीच' आहे मेंदूच्या अगम्य पेशीत किंवा शरीरातल्या जीन्समध्ये कुठतरी लपलेला आहे कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीचे एडवर्ड स्नायडर म्हणतात, 'शरीरातल्या चयापचय क्रियेमुळे, काही विषारी पदार्थ तयार होतात, त्यामुळे शरीरातल्या पेशी गजतात ही क्रिया सथ केली की, म्हातारपण लवकर येणार नाही ' शरीरशास्त्रज्ञ मायकेल रोझ, याच्या मते, जननविज्ञानाचा म्हातारपणावर परिणाम होतो त्यानी माश्या पाळल्या त्या पूर्ण वयात येईपर्यंत म्हणजे सत्तर दिवसाच्या होईपर्यंत त्याना प्रजोत्पादन करू दिल नाही अशा सात ते दहा पिढ्या झाल्यावर, त्याना त्यांच्या जीन्समध्ये फरक दिसून आला त्या चांगल्या फिरल्या, जोरात उडाल्या व ४० टक्के जास्त जगल्याही कोलोसडोचे थॉमस जॉन्सन यानी किडे वाढवले जास्तीत जास्त जगणाऱ्या किड्याची पिढी तयार केली त्याचे जीन्स कमी जगणाऱ्या किड्यापेक्षा वेगळे आहेत, हे त्याना आढळून आलं सर्व प्राण्यामधले म्हातारे करणारे जीन्स शोधून काढण्याची त्यांना उमेद आहे VCLA चे गॅरॉय वॉलफोर्ड यानी आठ वर्षे जगणाऱ्या उदराचे जीन्स कमी जगणाऱ्या उदराच्या अड्यात रोपण्याची योजना आखलीय् Genetic Engineering च शास्त्र प्राण्याच आयुष्य वाढवण्यासाठी ते प्रथमच वापरणार आहेत लिटल रॉकमधल्या लॅबोरेटरीचे डिरेक्टर रोनॉल्ड हार्ट यानी उदराना ४० टक्के कमी खाणं दिलं तेव्हा ते ३० महिने जगायचे ते ६० महिने जगले चागले शक्तिमान झाले त्याची रोगप्रतिकारक शक्तीपण वाढली आपल्या गुड्यात एक ग्रथी असते ती ३५ व्या वर्षापासून झिजत जाते ती जसजशी झिजते, तसतस म्हातारपण येतं ती न झिजण्याचा उपाय शोधून काढला की, मिळालाच तारुण्याचा झरा मग माणूस २००-४०० वर्षे पण जगेल

माणसाला मरायची इच्छा नसते, हे खरं रोगाने पिडलेल्यालाही, आणखी एखादा सूर्योदय बघावासा वाटतो आणखी एखादा नातवड पतवड बघायची इच्छा करतो मरण कुणाच्या हातात नसतं, पण २००-४०० वर्षे जगून करायच तरी काय? आजच म्हाताऱ्याना वेळ कसा घालवावा हा प्रश्न पडलाय् काम करण्याची शक्ती नाही झोप पळून गेलेली वेळाच-आयुष्याच करायच काय? अमेरिकेतली म्हातारी माणस रात्ररात्र टी.व्ही बघतात या शास्त्रज्ञाना माणसांना अमर करायचंय् का? चिरंजीव अश्वत्थाम्यासारखं तारुण्यमणी हरवलेला ती जखम भळभळ वाहतेय् तिच्यावर थापायला हा तेल मागत भयभय फिरतोय् शाश्वती, अमरता भीषणच आहे बालपण संपल्यावर धुद तारुण्य येते बेभान उत्कटतेने हे करावं ते करावं अस वाटतं मग हळूहळू गात्र श्रांत व्हायला लागतात खूप जगल की, शारीरिक दु:खं तर असतातच, पण प्रियजनाच्या मृत्यूची मानसिक दु:खही

भरीला येतात, अशा वेळी मृत्यू जवळ येऊन फुंकर घालतो जीवनाच्या अखेरीला मृत्यू आहे, म्हणून माणसाचं जीवन आकर्षक आहे मृत्यू हा माणसाचा खरा सखा आहे शास्त्रज्ञ काहीही करोत जराजर्जर झालेल्या माणसांना मरण हवं असतं अगदी इच्छामरणालाही ते तयार असतात अमेरिकेतले सीनिअर सिटिझन्स म्हणजे त्या पवित्र गायी त्याना स्वंथही करता येत नाही, अशी वेळ येते त्या वेळी आम्हाला Life Support नको, असं ते आपल्या मृत्युपत्रात लिहूनच ठेवतात

❀❀❀

REFBK-0026371

सेन्टर्सही निघताहेत काही म्हातारी माणस, आपल्या मुलांपासून दूर गावी राहतात त्याच्यासाठी Aging Network Service आहे हे लोक म्हाताऱ्यांच्या गरजा शोधून काढतात कुणाला जाण्यायेण्याची सोय हवी असते, कुणाला घरी किंवा बिल भरायला मदत हवी असते कुणाला डे-केअर सेन्टरमध्ये जायचं असतं, कुणाला वाणसामान किंवा लॉंड्री करून हवी असते त्यासाठी दर तासाला पैसे चार्ज करतात १९८६ साली एक पहाणी झाली त्यावरून अमेरिकेतल्या निम्म्या लोकाना आपल्या वृद्ध नातलगाची काळजी घ्यावी लागते आणखी पाच वर्षात, आणखी २० टक्के लोकाचा त्यात समावेश होईल अस आढळून आल मुलं १८ वर्षांची झाली की, त्याची जबाबदारी संपते पण म्हाताऱ्या नातलगांची जबाबदारी त्याहीपेक्षा जास्त वर्षे त्यांना घ्यावी लागणार आहे, अशी चिन्हं दिसताहेत

कारण अमेरिकेत शभरी ओलाडलेली २५,००० माणसं आहेत वृद्धांचा या देशाने कधी उपयोगच करून घेतला नाही त्यामुळे त्या पवित्र गायी भाकडच होत गेल्या जपानमधले वृद्ध काहीना काही काम करीत असतात त्याना काम देणाऱ्या कंपन्यांना सरकारी अनुदान मिळतं इडियातले वृद्ध विशेषत स्त्रिया नाइलाज होईपर्यंत घरात काम करीत असतात आपल्या मुलाना म्हाताऱ्या आजीआजोबाजवळ ठेवून तिथली मुलंमुली, निर्धास्तपणे नोकरीवर जातात जीवाचा कलिजा, परक्या बेबीसीटरजवळ ठेवून आलेय् असा त्याचा जीव टागणीला लागत नाही प्राचीन भारतीय वाङ्मयातही शतायुषीपणाच स्तोत्र ठायीठायी गायिलेलं दिसत ऋषिमुनीनाही शंभर वर्षे जगून आपल्या मुलांचा-नाडवंडाचा फुललेला ससार बघाव अस वाटायच पण ते तरतरीत असायचे त्याचं ज्ञानार्जन-विद्यार्जन चालूच असायच त्याची तपश्चर्या, त्यानी केलेली लोकसेवा याच तर हे फळ नव्हत? असेलही कारण आता अमेरिकेतले डॉक्टर सगळ्याना सागताहेत, 'मेडिटेशन करा म्हणजे दीर्घायू व्हाल ' भीष्मपितामह तर जख्ख म्हातारे आणि ते भारतीय युद्धाचे सेनापती कसा एवढा जोम त्याच्या अंगात? त्याच्या तपाचरणामुळे? त्यांच्या मनोनिग्रहामुळे? सामान्य माणसाच्या १०० वर्षांच्या आयुष्याची चार आश्रमात विभागणी केलेली गृहस्थाश्रमातील सगळी कर्तव्ये सपली की, वनात जायच - लोकसेवा करायला अगदी जरुरीपुरत मुलांकडून घ्यायच असं ते विरागी वार्धक्य त्यात अनुभवाची परिपूर्णता होती लहानमोठे व्यवहार अलिप्ततेने जोखण्याचा समतोलपणा होता मग तर सर्वसंग परित्याग आता कुठल आलय् अस वार्धक्य? शक्ती कमी होते काम करवत नाही शरीराला क्लेश होतात जिणं परस्वाधीन होतं – 'शतायुषी भव' हा शाप वाटावा इतक इंडियातही वृद्धांना मानाने-प्रेमाने वागवतात पण अशी स्थिती झाली की, वृद्ध देवाच्या बोलावण्याची वाटच पाहात असतात मेरीसारखेच मुलाना आपले आईवडील काय नको असतात? पण त्याचे हाल पण बघवत नाहीत ते वृद्ध तर 'देवा सोडव रे बाबा' असा

मनातल्या मनात जपच करत असतात

अमेरिकेने आपल्या सीनियर सिटिझन्सना 'पवित्र गाय' म्हणण्याइतपत सोयीसुविधा दिल्या पण म्हातारपणाने त्यावर मात केलीच आयुर्मर्यादा वाढली पण त्याची स्थिती काय झाली? शंभरावा वाढदिवस साजरा केलेल्याची बातमी वर्तमानपत्रात कधीमधी येते ही माणसं बरेच दिवस काही कामधदा करत होती, त्याची स्मरणशक्ती चागली आहे वाढदिवसाला आलेल्याना त्यांनी ओळखल पण अशी माणस किती? ७५ नतरही सामाजिक, राजकीय क्षेत्रातही काम करणारी काही माणसं आहेत शो बिझिनेसमध्ये आहेत पण एकदर लोकाच्या मानाने अगदी नगण्य बहुतेक गलितगात्रच कुणी आपल्या मुलानातवडांवर अवलबून, तर कुणी स्वतंत्रपणे राहणे अशक्य झाल्याने, वर्षानुवर्षे नर्सिंग होममध्ये पडून कुणाचा तर अगदीच लोळागोळा कुणी व्हीलचेअरवर, तर कुणाला कसली जाणीवच नाही मुलगी त्यांचा आवडीचा पदार्थ खाऊ घालते, त्याना आवडणारं म्युझिक लावते, पण कशाच काही नाही देशातल्या हॉस्पिटल्समधल्या १/३ खाटावर आडवे झालेले काय धडधाकट आहेत? कॅटस्कॅन, अल्ट्रासाऊंड इत्यादी आधुनिक यत्रानी त्याची तपासणी होते, वेगवेगळे लाइफ सपोर्ट लावून त्याना जगवतात खाता येत नाही म्हणून घशात नळ्या खुपसतात क्लारानी साराची ८६ वर्षांची आत्या डेफनी अशीच शेवटी त्या नळ्या काढून टाकून तिला सुखाने मरू द्या अशी त्यांनी डॉक्टरांना विनती केली. डॉक्टर म्हणाले, 'आम्ही माणसं जगवतो पदवी घेताना आम्ही तशी शपथच घेतलीय उपासमार करून आम्ही कुणाला मारणार नाही' त्या दोघींनी खटपटलटपट करून कोर्टाची परवानगी आणली तर हॉस्पिटलची आडकाठी तिथ अशा गोष्टी करतच नाहीत मग त्यांनी तिला दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये हलवल, तेव्हा त्या म्हातारीची सुटका झाली अशी दुखणाईत कितीतरी डॉक्टर तरी काय करणार? त्यानी अस काही केलं तर, एखादा तिरशिंगराव डॉक्टरावर केस करणार केस करणाऱ्याला लाखो डॉलर्स नुकसानभरपाई मिळवून द्यायला वकीलमंडळी तयार मग डॉक्टरचा मलप्रॅक्टिस इन्शुरन्स वाढतो त्याबरोबर आरोग्यसेवेचा खर्च वाढतो व तो सामान्य माणसाच्या बेकाडी बसतो

अशी वस्तुस्थिती असली तरी , माणसाची आयुर्मर्यादा १२० वर्षांची असताना, फारच थोडी माणस तेवढा पल्ला गाठतात अस का? या प्रश्नाचं उत्तर अद्याप शास्त्रज्ञाना मिळालेलं नाही त्याची फोड करण्यासाठी १०० शास्त्रज्ञ, त्या कामाला जुडलेत त्यांची अशील एकट्या अमेरिकेत आजच दोन कोटी पंचावन्न लाख आहेत २०३० साली तो आकडा सहा कोटी सत्तर लाखावर जाईल आम्हाला आयुष्याची नुसती वर्षे वाढवायची नाहीत, तर त्या वर्षांमध्ये जोम उत्पन्न करायचाय् Life to years, not years to life असे ते म्हणतात तारुण्याचा फवारा कुठतरी आहे, अशी आख्यायिका ती ज्युॲन पॉन्स डी लिऑनने ऐकलेली १५१२ साली स्पेनच्या राजासाठी तो फवारा शोधून काढायला तो

निघाला दरबारी माणसांशी इरीशिरी करून भटकभटक भटकला शेवटी पोचला फ्लॉरिडात तेही चागल झालं म्हणा फर्नांडिस महाराजाची, सोनेरी वर्षे तिथ मजेत गेली पण तो झरा-तारुण्याचा, तो मात्र त्याला मिळाला नाहीच आता शास्त्रज्ञ म्हणतात, 'तो तुझ आहे तुझपाशीच' आहे मेंदूच्या अगम्य पेशीत किंवा शरीरातल्या जीन्समध्ये कुठतरी लपलेला आहे कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीचे एडवर्ड स्नायडर म्हणतात, 'शरीरातल्या चयापचय क्रियेमुळे, काही विषारी पदार्थ तयार होतात, त्यामुळे शरीरातल्या पेशी गजतात ही क्रिया सथ केली की, म्हातारपण लवकर येणार नाही ' शरीरशास्त्रज्ञ मायकेल रोझ, यांच्या मते, जननविज्ञानाचा म्हातारपणावर परिणाम होतो त्यानी माश्या पाळल्या त्या पूर्ण वयात येईपर्यंत म्हणजे सत्तर दिवसांच्या होईपर्यंत त्याना प्रजोत्पादन करू दिल नाही अशा सात ते दहा पिढ्या झाल्यावर, त्याना त्याच्या जीन्समध्ये फरक दिसून आला त्या चागल्या फिरल्या, जोरात उडाल्या व ४० टक्के जास्त जगल्याही कोलोसडोवे थॉमस जॉन्सन यांनी किडे वाढवले जास्तीत जास्त जगणाऱ्या किड्यांची पिढी तयार केली त्याचे जीन्स कमी जगणाऱ्या किड्यापेक्षा वेगळे आहेत, हे त्याना आढळून आल सर्व प्राण्यामधले म्हातारे करणारे जीन्स शोधून काढण्याची त्याना उमेद आहे VCLA चे गॅरॉय वॉलफोर्ड यानी आठ वर्षे जगणाऱ्या उदराचे जीन्स कमी जगणाऱ्या उदराच्या अंड्यात रोपण्याची योजना आखलीय् Genetic Engineering च शास्त्र प्राण्याचं आयुष्य वाढवण्यासाठी ते प्रथमच वापरणार आहेत लिटल रॉकमधल्या लॅबोरेटरीचे डिरेक्टर रोनॉल्ड हार्ट यानी उदराना ४० टक्के कमी खाण दिल तेव्हा ते ३० महिने जगायचे ते ६० महिने जगले चागले शक्तिमान झाले त्यांची रोगप्रतिकारक शक्तीपण वाढली आपल्या गुडघ्यात एक ग्रथी असते ती ३५ व्या वर्षापासून झिजत जाते ती जसजशी झिजते, तसतस म्हातारपण येत ती न झिजण्याचा उपाय शोधून काढला की, मिळालाच तारुण्याचा झरा मग माणूस २००-४०० वर्षे पण जगेल

माणसाला मरायची इच्छा नसते, हे खर रोगाने पिडलेल्यालाही, आणखी एखादा सूर्योदय बघावासा वाटतो आणखी एखादा नातवड पतवड बघायची इच्छा करतो मरण कुणाच्या हातात नसतं, पण २००-४०० वर्षे जगून करायच तरी काय? आजच म्हाताऱ्यांना वेळ कसा घालवावा हा प्रश्न पडलाय् काम करण्याची शक्ती नाही झोप पळून गेलेली वेळाच-आयुष्याचं करायच काय? अमेरिकेतली म्हातारी माणस रात्ररात्र टी व्ही बघतात या शास्त्रज्ञाना माणसांना अमर करायचय् का? चिरजीव अश्वत्थाम्यासारख तारुण्यमणी हरवलेला ती जखम भळभळ वाहतेय् तिच्यावर थापायला हा तेल मागत भयभय फिरतोय् शाश्वती, अमरता भीषणच आहे बालपण संपल्यावर धुद तारुण्य येते बेभान उत्कटतेने हे करावं ते कराव अस वाटतं मग हळूहळू गात्र श्रांत व्हायला लागतात खूप जगल की, शारीरिक दुःखं तर असतातच, पण प्रियजनांच्या मृत्यूची मानसिक दुःखही

भरीला येतात, अशा वेळी मृत्यू जवळ येऊन फुकर घालतो जीवनाच्या अखेरीला मृत्यू आहे, म्हणून माणसाचं जीवन आकर्षक आहे मृत्यू हा माणसाचा खरा सखा आहे शास्त्रज्ञ काहीही करोत जराजर्जर झालेल्या माणसांना मरण हवं असतं अगदी इच्छामरणालाही ते तयार असतात अमेरिकेतले सीनिअर सिटिझन्स म्हणजे त्या पवित्र गायी त्याना रवंथही करता येत नाही, अशी वेळ येते त्या वेळी आम्हाला Life Support नको, असं ते आपल्या मृत्युपत्रात लिहूनच ठेवतात

❋❋❋

REFBK-0026371